ग्रंथ संग्रहालय, ठाणे

# काव्य रत्नावली - वर्ष २२

१८८८ - १८८९

जून ते डिसें.

जाने. ते. मे.

(श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे)

जुनी मासिके (संदर्भ)

# काव्यरत्नावली.

## मासिक पुस्तक.

वर्ष २ रें.] जून सन १८८८. [अंक १३ वा.

त एव पदविन्यासास्ता एवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



जळगांव--खानदेश येथें
प्रसिद्ध होत असतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हशिलासुद्धां दीड रुपया.

मुंबई: " सुबोधप्रकाश " प्रेस.

# अनुक्रमणिका.


१ मुक्तांजली—स्त्रीदैन्य. ... ... ... ... १
२ ऋतुसंहार—शरद्वर्णन. ... ... ... ... ... ५
३ ईशदर्शनकाव्य. ... ... ... ... ... ... १०
४ आलस्यहवन. ... ... ... ... ... ... १३
५ संध्याकाळ.... ... ... ... ... ... ... १८
६ स्फुट पद्यें ... ... ... ... ... ... ... २०
७ स्त्रीअवयव ... ... ... ... ... ... ... २१
८ वर्षाऋतूंतील रात्रीचा समय. ... ... ... ... २१
९ निर्द्रव्य पुरुष. ... ... ... ... ... ... २२
१० सुभाषित. ... ... ... ... ... ... ... २३
११ चंद्रावरील कलंक ... ... ... ... ... ... २४


## काव्यरत्नावलीच्या संबंधानें सूचना.

१ वर्गणीदारांकडून जी वर्गणी येईल त्या बद्दल निराळी पावत किंवा पुस्तकांत पोंच हीं दिलीं जाणार नाहींत. मनीआर्डरीवर जी स ही होईल तीच पावती समजावी.

२ जाहिराती करितां कांहीं स्वतंत्र पृष्ठें ठेवण्याचा विचार आहे तर ज्यांस जाहिराती पाठवावयाच्या असतील त्यांणीं खालील पत्त्याव कळवावें, ह्मणजे त्यांस जाहिरातीचे दर कळविण्यांत येतील.

३ ज्यांस ही रत्नावली घ्यावयाची नसेल त्यांनीं ती परत करितां एका चिठ्ठीवर आपलें नांव गांव स्पष्ट लिहून ती पुस्तकांत घालावं पुस्तकावर नांव गांव कांहीं लिहूं नये.

४ हा अंक पोंचतांच वर्गणीदारांनीं आपली वर्गणी लौकर पाठवावं

५ कविता करणारांनीं आपलीं काव्यें एकाबाजूवर स्वच्छ लिहू पाठवीत जावी. लहान प्रकरण अर्धवट पाठवूं नये.

६ या रत्नावलींत जीं काव्यें प्रसिद्ध होतील, त्यांची आवृत्ती का ण्याचा प्रसंग आल्यास त्यावर कविता करणाराचा हक्क राहील.

७ वर्गणीदारांचा पत्ता बदलल्यास त्यांणीं तावडतोब कळवीत जा

**नारायण नरसिंह फडणीस.**

जळगांव-खानदेश

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# काव्यरत्नावली.

## अंक १३ वा.

## मुक्तांजली—स्त्रीदैन्य.

(एकनाथ गणेश भांडारे.)

One more unfortunate—gone to her death.

T. Hood.

### श्लोक.

दैवानें प्रतिकूल होउनि जिला भारीच हो गांजिलें
आयुष्य स्वमनांत रोज झुरुनी क्लेशीं जिनें कंठिलें
चित्तव्याधि अनेक आजवर जी सोशीत होती खरी
काळाच्या भयदा गृहांत बसली जाऊन ती सुंदरी. १

येथें देह तिचा निवांत पडला भूमीवरी सुंदर
ठेवा हो ! जपुनी तया उचलुनी या घोंगडीच्या वर
तत्तारुण्य शरीरमार्दव तसें सौंदर्य लोकोत्तर
निर्माणीं असतील खास शिणले वाटे विधीचे कर. २

गेली ती जरि या सुरेंद्रभुवनीं जावो बिचारी परी
पातिव्रत्य, परोपकार कृतिनीं नांदेच कीं भूवरी
तेणें मृत्यु तिचा असेल सकलां झाला अती दुःखद
अस्तु. प्रेत तिचें हळूच उचला जें होय कारुण्यद. ३

झाला अंत तिचा कसा लवकरी ऐसा अकालीं; अशी
आतां बारिकशी तुह्मी करूं नका या साध्विची चौकशी

नेलीं सर्व तिच्याबरोबर तिचीं दुःखें लया मृत्युनें
कैसा तो परि राहिला विमलतनुसौंदर्य नेल्याविणें. ४
आहे शाश्वतचें तिच्या तनुवरी अद्यापि सौंदर्य तें
तेणें तें जगिं एक रत्न रतिच्या वंशांतलें वाटतें!
तोंडांतून तिच्या कशी गळतसे भूमीवरी लाळ ती
वस्त्रानें पुसुनी करा विमल हो! तद्विद्रुमोष्ठांप्रती. ५
बांधा केस तिचे! कसे विखुरले तेही शवाभोंवतीं
वेणी आणि फणी तया युवतिची नाहीं जयां माहिती
काळेभोर तथापि लांब कुरळे आहेत तत्कुंतल
काळ्या षट्पदपंक्तिच्यापरि अहो! ते भासती केवळ. ६

आहे असा पुरुष कां तुमच्यांत कोणी ?
जो तच्चरित्रमधु ओतुं शकेल कर्णीं ?
राहे कुठें चरित साग्र तिचें कळाया
माझे विचार शकती नच आकळाया. ७

कोणास तज्जनकनाम असेल ठावें ?
कोणास तज्जननिच्या चरिता पुसावें ?
होती तिला विमल सुंदर कां बहीण ?
बंधू तरी असति तीप्रति कोण कोण ? ८

ज्यांनीं दया सतत दाखविली तियेला
त्यांच्याहुनी अधिक जो तिज आप्त झाला
जो जाहला तदचल प्रणयास पात्र
होता न कां तिजशिं तो पति चारुगात्र. ९

तों बोलला उठुन त्यांतुन एक थोर
तेजस्वि चंड भगवान् रविच्या समोर
नेई अम्हां सुपथ दाउनि जें दिवाला
सत्यास त्या स्मरुनि मी कथितों तुम्हांला. १०

भद्रावती नगर सुंदर आपुलें हें
भाग्य प्रसन्न सकलांप्रति येथ आहे
हा! हा! परंतु नव्हतें हिजला तसें तें
आश्चर्य हेंच सकलांप्रति होत होतें. ११

राहावया गृह तिला नव्हतें मिळालें
माता, पिता, भगिनि, बंधु तिचे निमाले
( तेंही तिच्या शिशुपणीं विधिदुर्गतीनें ! )
ठावें तियेस ममतासुख काय तेणें. १२

आतां उदार जन हो कथुं फार काय
प्राणप्रियप्रमुदितप्रतिमाहि हाय
स्वप्नीं तिनें बघितली सहसा नसावी
आहे मला सकल तत्स्थिति दीन ठावी. १३

होवो कसेंहि मनुजां प्रतिकूल दैव
अंतीं तयास परि देइल ठाव देव
ह्या त्याचियाहि नियमाप्रति बाध आला
तेव्हां तिच्यावर असा विधिकोप झाला. १४

अत्युच्च सातमजली नव गोपुरांच्या
तैसेंच एक-मजली पडक्या घरांच्या
वातायनांतुनि दिवे जळतात जे जे
त्यांच्या प्रकाशकिरणीं सरिता विराजे. १५

लांबून दूरवर त्या सरिताजलांत
दीपप्रकाशकिरणें रमती प्रभूत
मंदानिळें सकळ कंपित दीप होतां
पाण्यांत तेंच विलसे लहरीसमेतां १६

होतां निशा प्रतिदिनीं वनवासिनी ते
ठेवूनियां हनुवरी मृदु अंगुली तें

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | मुक्तांजली—स्त्रीदैन्य. ... ... ... .. | १ |
| २ | ऋतुसंहार—शरद्वर्णन. ... ... ... .. | ६ |
| ३ | ईशदर्शनकाव्य. ... ... ... ... ... .... | १० |
| ४ | आलस्यहनन. ... ... ... ... ... ... | १३ |
| ५ | संध्याकाळ.... ... ... ... ... ... ... | १८ |
| ६ | स्फुट पद्यें ... ... ... ... ... ... ... | २० |
| ७ | स्त्रीअवयव ... ... ... ... ... ... ... | २१ |
| ८ | वर्षाऋतूंतील रात्रीचा समय. ... ... ... ... | २१ |
| ९ | निर्द्रव्य पुरुष. ... ... ... ... ... ... | २२ |
| १० | सुभाषित. ... ... ... ... ... ... ... | २३ |
| ११ | चंद्रावरील कलंक ... ... ... ... ... ... | २४ |


## काव्यरत्नावलीच्या संबंधानें सूचना.

१ वर्गणीदारांकडून जी वर्गणी येईल त्या बद्दल निराळी पावती किंवा पुस्तकांत पोंच हीं दिलीं जाणार नाहींत. मनीआर्डरीवर जी सही होईल तीच पावती समजावी.

२ जाहिराती करितां कांहीं स्वतंत्र पृष्ठें ठेवण्याचा विचार आहे, तर ज्यांस जाहिराती पाठवावयाच्या असतील त्यांणीं खालील पत्त्यावर कळवावें, ह्मणजे त्यांस जाहिरातीचे दर कळविण्यांत येतील.

३ ज्यांस ही रत्नावली घ्यावयाची नसेल त्यांनीं ती परत करितांना एका चिठ्ठीवर आपलें नांव गांव स्पष्ट लिहून ती पुस्तकांत घालावी. पुस्तकावर नांव गांव कांहीं लिहूं नये.

४ हा अंक पोंचतांच वर्गणीदारांनीं आपली वर्गणी लौकर पाठवावी.

५ कविता करणारानीं आपलीं काव्यें एकाबाजूवर स्वच्छ लिहून पाठवीत जावीं. लहान प्रकरण अर्धवट पाठवूं नये.

६ या रत्नावलींत जीं काव्यें प्रसिद्ध होतील, त्यांची आवृत्ती काढिण्याचा प्रसंग आल्यास त्यावर कविता करणाराचा हक्क राहील.

७ वर्गणीदारांचा पत्ता बदलल्यास त्यांणीं तात्डतोब कळवीत जावें.


**नारायण नरसिंह फडणीस.**

जळगांव-खानदेश.

# काव्यरत्नावली.

अंक १३ वा.

## मुक्तांजली–स्त्रीदैन्य.

(एकनाथ गणेश भांडारे.)

One more unfortunate—gone to her death.

T. Hood.

### श्लोक.

दैवानें प्रतिकूल होउनि जिला भारीच हो गांजिलें
आयुष्य स्वमनांत रोज झुरनी क्लेशीं जिनें कंठिलें
चित्तव्याधि अनेक आजवर जी सोशीत होती खरी
काळाच्या भयदा गृहांत बसली जाऊन ती सुंदरी. १

येथें देह तिचा निवांत पडला भूमीवरी सुंदर
ठेवा हो ! जपुनी तया उचलुनी ह्या घोंगडीच्या वर
तत्तारुण्य शरीरमार्दव तसें सौंदर्य लोकोत्तर
निर्माणीं असतील खास शिणले वाटे विधीचे कर. २

गेली ती जरि त्या सुरेंद्रभुवनीं जावो बिचारी परी
पातिव्रत्य, परोपकार कृतिनीं नांदेच कीं भूवरी
तेणें मृत्यु तिचा असेल सकलां झाला अती दुःखद
अस्तु. प्रेत तिचें हळूच उचला जें होय कारुण्यद. ३

झाला अंत तिचा कसा लवकरी ऐसा अकालीं; अशी
आतां आरिकशी तुह्मी करूं नका ह्या साध्विची चौकशी

नेलीं सर्व तिच्याबरोबर तिचीं दुःखें लया मृत्युनें
कैसा तो परि राहिला विमलतत्सौंदर्य नेल्याविणें. ४
आहे शाश्वतचें तिच्या तनुवरी अद्यापि सौंदर्य तें
तेणें तें जगिं एक रत्न रतिच्या वंशांतलें वाटतें!
तोंडांतून तिच्या कशी गळतसे भूमीवरी लाळ ती
वस्त्रानें पुसुनी करा विमल हो! तद्विद्रुमोष्ठांप्रती. ५
बांधा केस तिचे! कसे विखुरले तेही शवाभोंवतीं
वेणी आणि फणी तया युवतिची नाहीं जयां माहिती
काळेभोर तथापि लांब कुरळे आहेत तत्कुंतल
काळ्या षट्पदपंक्तिच्यापरि अहो! ते भासती केवळ. ६

आहे असा पुरुष कां तुमच्यांत कोणी?
जो तच्चरित्रमधु ओतुं शकेल कर्णीं?
राहे कुठें चरित साग्र तिचें कळाया
माझे विचार शकती नच आकळाया. ७

कोणास तज्जनकनाम असेल ठावें?
कोणास तज्जननिच्या चरिता पुसावें?
होती तिला विमल सुंदर कां बहीण?
बंधू तरी असति तीप्रति कोण कोण? ८

ज्यांनीं दया सतत दाखविली तियेला
त्यांच्याहुनी अधिक जो तिज आप्त झाला
जो जाहला तदचल प्रणयास पात्र
होतां न कां तिजशिं तो पति चारुगात्र. ९

तो बोलला उठुन त्यांतुन एक थोर
तेजस्वि चंड भगवान् रविच्या समोर
नेई अशां सुपथ दाउनि जें दिवाला
सत्यास त्या स्मरुनि मी कथितों तुम्हांला. १०

भद्रावती नगर सुंदर आपुलें हें
भाग्य प्रसन्न सकलांप्रति येथ आहे
हा! हा! परंतु नव्हतें हिजला तसें तें
आश्चर्य हेंच सकलांप्रति होत होतें. ११

राहावया गृह तिला नव्हतें मिळालें
माता, पिता, भगिनि, बंधु तिचे निमाले
(तेंही तिच्या शिशुपणीं विधिदुर्गतीनें!)
ठावें तियेस ममतासुख काय तेणें. १२

आतां उदार जन हो कथुं फार काय
प्राणप्रियप्रमुदितप्रतिमाहि हाय
स्वप्नीं तिनें बघितली सहसा नसावी
आहे मला सकल तत्स्थिति दीन ठावी. १३

होवो कसेंहि मनुजां प्रतिकूल दैव
अंतीं तयास परि देइल ठाव देव
ह्या त्याचियाहि नियमाप्रति बाध आला
तेव्हां तिच्यावर असा विधिकोप झाला. १४

अत्युच्च सातमजली नव गोपुरांच्या
तैसेंच एक-मजली पडक्या घरांच्या
वातायनांतुनि दिवे जळतात जे जे
त्यांच्या प्रकाशकिरणीं सरिता विराजे. १५

लांबून दूरवर त्या सरिताजलांत
दीपप्रकाशकिरणें रमती प्रभूत
मंदानिळें सकळ कंपित दीप होतां
पाण्यांत तेंच विलसे लहरीसमेतां १६

होतां निशा प्रतिदिनीं वनवासिनी ते
ठेवूनियां हनुवरी मृदु अंगुली तें

हें काय कौतुक असें सरिता प्रदीप्त
होती पहात पटहीन उभी रहात. १७

जेव्हां वसंतऋतुयामिनि येत होत्या
तेव्हां सुमंद गति शीतल वायुच्या त्या
कंपायमान करिती तनु ती अमोल
होती तिची ह्मणुन वाजत दांतखीळ १८

केव्हांहि भीत नव्हती परि ती तमाला
किंवा सरित् घबब, खळ्खळ, सूं रवांला
ती आठवीत असतां विधिकर्मकांड
व्हावें तिचें हृदय सत्वर हो ! त्रिखंड !! १९

"कोठें तरी वदन कृष्ण अतां करूनी
जावें कुणा न कळतां असु हे त्यजूनी
आहे बरा अति भयंकर डोह हाच
द्यावें गडे ! शरिर फेंकुन यांत साच. २०

धैर्या धरून उठली वदुनी असें ती
निःशंक घातलि तिनें उडि त्यांत अंतीं.
आतां, गिळून तिजला कशि वाहताहे
कालस्वसेंसम महा सरिता पहा हे. २१

आणा तिचें अति भयंकर रूप चित्तीं
वाटेल खास सकलांप्रति राक्षसी ती
घ्या ठाव हे रसिक हो ! करुणार्णवाचा
चित्तीं धरूनि सगळा इतिहास तीचा." २२

परिसुनी असें वृत्त साध्विचें
हृदय कालवे हाय ! आमचें
विभु मनीं असे रुष्ट जीवरी
तिजवरी दया कोण हो करी ? २३

करपद तिचे जाण्यापूर्वी अकुंचित होउनी
उठुन कुणि हो ! आस्थेनें या दया धरुनी मनीं
हृदयकमलीं ठेवा दोन्ही तिचे मृदुसे कर
हळुच पसरा या या कोणी तिचे पद सुंदर. २४
दृढतम तिनें आशा भावी सुखांवर ठेवुनी
भयचकितशा दृष्टीनें ती नदीं चिखलांतुनी
अतिशय निराशेनें अंतीं जयीं अवलोकिली
नयनकमलें तीं झांका हो ! कशीं तरि आपुलीं २५
निशिदिनिं तिनें चित्तामाजी नको झुरणें अतां
सहन करणें दीर्घत्रासां नको तिजला स्वतां
तिज कठिणशा वाग्बाणांचीं नकोतचि ताडणें
सकल सरलीं दुःखें तीच्या अकालिक मृत्युनें २६
मौनव्रता धरुन ती जणुं मानसांत
सद्भक्तिनें स्तवित ईश्वर तो अनंत
यासाठिं हे कर तिचे उचलून दोन
ठेवा उरावर तिच्या धरणीवरून २७
होती चहूंकडुन जाहलि ती अनाथ
चित्तीं परी स्मरुन तो जगदेकनाथ
पापें तिच्याकडुन जीं असतील झालीं
तीं तीं तयास विनयें कथण्यास गेली. २८

---

# ऋतुसंहार—शरद्वर्णन.

## (गोविंद गोपाळ टिपणीस.)

### श्लोक ( स्रग्धरा. )

नेसे जी काशवस्त्रा, नवविकसित जें पद्म तें वक्त्र जीचें
कांते ! उन्मत्तहंसध्वनि. मानिं गमती गे ! जिच्या नूपुरांचे

झाली जी पक्क झाली बहुत नत तशी गात्रयष्टी[1] जिची हो
आली ती नव्य[2] योषा जनसुखद शरद् लोककल्याण वाहो. १

रात्री शुक्ला शशीनें, क्षिति तशिच दिसे काशपुष्पव्रजांहीं[3]
हंसांच्या संगतीनें नदिजल, कुमुदीं पांढरीं गे तळींहीं
रानें कीं श्वेत झालीं अतितर कुसुमीं सप्तपर्णाचियांहीं[4]
शुभ्रा तैशाच बागा बघ सखि ! दिसती मालतीच्या फुलांहीं. २

मासे कांची जयांतें सुरुचिर दिसती वेधिती मानसांतें
हंसांच्या पंक्ति तीरीं बसुनि दिसति त्या हार मोठे जयांतें
मैदानें वालुकेचीं दिसति सखि ! जयां श्रोणि पुंष्प[5] प्रदेश
उन्मत्तस्वैर[6] नारीगुणकृतिनिं[7] नद्या वाहती सावकाश. ३

कोठें शंखाप्रमाणें, रजतसम[8] कुठें, शुभ्र पद्मेंचि जैशीं
अभ्रें[9] रिक्तांबु कांते ! शतविध पळती वायुवेगेंच कैशीं
भार्ये ! तें भासतें कीं सकल नभ मला चामरें व्योमगोलें
शोभा ऐश्वर्य देतें जगतिवरि जसें ज्यास तो भूमिपाल. ४

काळें जें शुद्धवर्णे नभ दिसत असे अंजनांच्या[10]समान
बंधूकांच्या[11] फुलांनीं दिसति जणुं मही तांबडी फार जाण
शेतें जीं शोभताती विमलकमलिनीसंचयानें सुपूर्ण
या सर्वांनीं मिळूनी तरुणजनमना टाकिलें हो हरून. ५

ज्याच्या बारीक शाखा सुरुचिर हलती पर्णही मंद वातें
पुष्पांच्या उद्गमानें[12] बहुत मृदुलता ज्या तरूंच्या दलांतें
होऊनी मत्त फार भ्रमर मधुरुची सेविती यत्सुमांची
कैसा हा कोविदार[13] प्रचलित[14] न करी मानसें हो जनांची? ६

---

१ शरीर. २ नवीन. ३ समूह. ४ वृक्षविशेष. ५ ढुंगणें. ६ स्वच्छंदानें. ७ गुण. व आचरण यांनीं. ८ चांदीसारखे. ९ आभाळ. १० काजळाच्या. ११ पुष्पविशेष. १२ नवीन फुलांचा बहार. १३ वृक्ष विशेष. १४ भुलवी.

कांते! हे सर्व तारे दिसति अजि जिला[1] भूषणांच्यासमान
मेघांपासूनि झाला अपवृत[2] शशी तो तेंच चंद्रकाजाण
ज्योत्स्नेची थोर कांती विमल वसन[3] हें जीस शोभायमान
ऐशी हे रात्रि वाढे अनुदिन तरुणीबालिकेच्या समान. ७
भार्ये! कारंडवांच्या[4] वदनीं रचित त्या थोर लाटा, जयांत
कादंबीं,[5] सारसांनीं[6] तट रुचिर दिसे व्यापिलेलें समस्त
भोंताल्या प्रांत देशीं कमलदलरजीं रक्तता ज्या नद्यांना
हंसांच्या गोड शब्दें करुनि वितरिती मोद मोठा जनांना. ८
नेत्रातें तोषवी जो किरणनिवह[7] तो मोहितो चित्त ज्याचा
आल्हादा देउनीयां हिमजलपति जो वार्षितो रोहिणीचा
कांताच्या दुर्वियोगें विषभरित शरें पीडिलेल्या स्त्रियांतें
जाळोनी टाकितो हा हिमकिरण सखे! पाहसी काय यातें? ९
धान्यानें लोंबलेल्या प्रचलित करुनी शालिवृक्षां अशा या
पुष्पांच्या थोर भारें नत तरुशिं पहा हालवी वाहुनीयां
झालीं उत्फुल्ल ऐशां नवजलकमलां वायु हा कांपवूनी
मांद्यें[8] सद्गंधयोगें तरुणजनमना मोहि वेगें करूनी १०
उन्मादें पूर्ण ऐशा द्युति[9] दिधालि असे हंसयुग्मीं[10] जयांतें
ज्यांमध्यें शोभताती नवकमलसुमें स्वच्छशीं गंधयुक्तें[11]
केल्या उत्पन्न लाटा हळुहळु उदकीं वायुनें वाहुनीयां
ऐशीं उद्युक्त झालीं जलभरित तळीं मानसातें हराया! ११
मेघांच्याखालतीं हो गुपित हरिधनू[12] आजि झालें असे हें
व्योमीं विद्युत्पताका स्फुरण नच सखे! आजिही पावताहे
पक्ष्यांच्या पक्षवातें अजि नच बगळे विंजताती[13] नभातें
औत्सुक्यें अंबरातें बघति नच शिखी आजि तैसेच, कांते! १२

---

१ मोकळा. २ चांदणें. ३ वस्त्र, पातळ. ४ पक्षिविशेष. ५ बगळे. ६ ससाणे. ७ किरणांचा समूह. ८ मंदपणें. ९ शोभा. १० हंसांच्या जोडप्यांनीं. ११ वासानें भरलेलीं. १२ इंद्र धनुष्य. १३ हलवितात. (वारा घालतात.)

सोडूनी नील[1]कंठां करिति नच अतां नृत्य जे तेंवि त्यांतें
हंसांपाशींच गेला मदन बघ सखे ! गाति जे गोड गीतें
सर्जाऽर्जूना[2]दि नीपा[3]दिक तरु त्यजुनी केंवि हे प्राप्त झाली
शोभा सप्तच्छदांतें शरदृतुसमयीं पुष्पसंगेंचि आली. १३

पक्ष्यांच्या गायनाचा प्रतिरव उठुनी दीसती व्यापिलेलीं
पुष्पें शेफालिकांच्या सकल उपवनें तांबडीं का जहालीं
बैसोनीयां मृगींनीं स्वनयनकमलीं शोभवीलें जयांतें
तीं सारीं मानसातें हरण करिति गे ! ना धरीं संशयातें. १४

पद्मा[5]तें कैरवा[6]तें हलवुनि असकृ[7]त् वायु सौगंधिकातें
त्यांच्या संपर्कयोगें अधिकतर पहा होउनी थंड कांते !
तत्पत्रांतीं जलाचे दंव पडुनि किती बिंदु, तच्छै[8]त्य घेत
प्रातःकाळीं करी हा मुदति[10]शंय गडे ! वेधुनी लोकचित्त. १५

शालीच्या व्याप्त झाली सकळहि अवनी धान्यराशीमुळें ही
तैशी गोवत्सयूथें बसुनि चहुंकडे शोभते कोंवि पाहीं
हंसांनीं सारसांनीं मधुर मधुरशीं गाउनीयां सुगीतें।
व्यापूनी तीस कांते ! हरुनि जनमनां, देइ आल्हां सुखातें. १६

हंसांनीं जिंकियेली सु[11]ललित गति कीं आजही अंगनांची
अब्जांनीं जिंकियेली फुलुनि मुखशशीकांति सारी तयांची
नीलाब्जें जिंकियेलें मदयुत बघणें जें सखे ! योषितांचें
लाटांनीं तेंवि केले हरण निजवळें खेळही भोंवयांचे. १७

कांते ! ह्या शा[12]मिवेली कुसुमभरनता जिंकिती सुंदरींच्या
कांतीतें भूषणांनीं खुलवि रुचिर जी बाहुंना गे ! स्त्रियांच्या

---

१ मोर. २ वृक्षविशेष. ३ वृक्षविशेष. ४ एका फुलझाडाच्या. ५ पद्म नामक कमलांस. ६ कैरव नामक कमलांस. ७ वारंवार. ८ एक जातीचें कमळ. ९ त्यांचा थंडपणा. १० अत्यानंद. ११ सुंदर. १२ काळ्यावेली.

कंकेली[1] मालतींचा कुसुम बहर हो लाजवीतो कसा हा.
हास्यातें शोभतें जें विधुसमरदनीं[2] योषितांच्याचि पाहा. १८

वेण्या काळ्या कचांनीं घन कुटिल अशा भामिनी घालितात
त्यामाजी मालतींचीं अभिनव कुसुमें सद्रसें ओंवितात
ज्यामध्यें शोभताती कनकखचित तीं कुंडलें घातलेलीं
त्या कर्णीं घालिताती युवति निजकरीं उत्पलें आजि काळीं. १९

हारीं शोभा स्तनांतें युवति पुरविती चंदनोद्गंधदांनीं[3]
तैशा त्या शोभवीती सुविपुल कटिला आजिकांची गुणांनीं
शोभा पादांबुजांतें मधुररव करीं ऐशिया नूपुरानें
हर्षानें भामिनी या विपुल बघ सखे ! डोलती मानसानें. २०

हंसांनीं बैसुनीयां, स्फुटकुमुदचयें[4] ज्यांस कीं शोभवीलें
यत्तोया आजि कांते! मरकतमणिच्या[5] कांतिनें भूषवीलें
ऐशा तोयाशयांच्यासम[6] नभ धरितें कांतितें हो कसें हें ?
ताराचंद्रप्रभेनें घनरहित निळें होउनी आज पाहे. २१

पुष्पांच्या संगतीनें शरदृतुमधिं हे शीत वायू वहाती
मेघांचे वृंद गेले ह्मणुनि बघ दिशा स्वच्छ या दीसताती
झाले हे स्वच्छ पाणी, तशिच बघ सखे! शुष्कपंका[7] धरा[8] ही
आकाशा व्यापियेलें हिमकर विधुनें आणि तारांगणांहीं. २२

आदित्याच्या करांहीं[9] युवति मुखसमा कांति ज्यांची अशा या
पद्मांतें केंवि केलें विकसित, करितो जे प्रभातीं सुहास्या
जेव्हां अस्तासि जातो हिमकिरणशशी कैरवीणी तदा ही
होते हो म्लान जैसी निजपति विरहें स्त्री घरामाजि पाहीं. २३

---

१ एक फुलझाड. २ चंद्रासारख्या पांढऱ्या दातांनीं. ३ चंदनाचा वास देणाऱ्या. ४ फुललेल्या कुमुद नामक कमळांच्या समुदायानें. ५ पाच नामक रत्नाच्या. ६ तळ्यांच्या. ७ जिचेवरचा चिखल वाळला ती. ८ पृथ्वी. ९ किरणांनीं.

पाहूनी नेत्रशोभा प्रियकर सखिची या निळ्या पंकजांत
कल्पूनी स्वर्णकांची झण झण रव हा मत्तहंसस्वनांत
मानूनी बंधुजोवीं सखि! अधरनवश्रीप्रती पांथलोक
ढाळूनी अश्रुवारी करिति बघ सखे! भ्रांत होवोनि शोक! २४
स्थापूनी चंद्रकांती तरुणरुचिर ज्या सुंदरी तन्मुखांत
हंसांच्या स्थापि शब्दा रुचिर बहु अशा त्यांचिया नूपुरांत
स्थापी बंधूकपुष्पद्युति अधरिं मनोवेधकीं, स्वैर जाते
आतां कोठें तरी हे शरदृतुरुचिरोश्री पहा आजि, कांते. २५
जीचें उत्फुल्ल झालें कमलमुख, निळीं उत्पलें नेत्र पाहीं
काशाचीं श्वेत पुष्पें जणुं सुवक दिसे पातळ स्वच्छ देहीं
जीचें सौंदर्य वाटे कुमुदकुसुमसें, जेंवि नारी प्रमत्ता
ती देवो स्वप्रभावें स्वगमनसमयीं तूमच्या प्रीति चित्ता! २६

---

# ईशदर्शन काव्य.

## गुच्छ २ रा.

### ( विष्णू गणेश नेने. )

### श्लोक.

सुषुप्तीच्या वेळीं सकळ नृमनोधर्म तिमिरीं
लया जातां आणी कवण मग त्यांतें स्थितिवरी
शरीराचे सारे अवयव करी कोण सबल
तुझ्या वांचोनीही इतर कवणा शक्ति अतुल? १
तुला भावें, नीत्याचरणकरुनी जो भजतसे
तयाच्या कल्याणाविषयीं तुज चिंता बहु असे

---

१ माजलेल्या हंसांचा शब्द. २ एकाप्रकारचें फुलझाड. ३ ओठांस आलेल्या नव्या शोभेस. ४ बंधूक नामक फुलांची शोभा. ५ शोभा. ६ निद्रेच्या. ७ मनुष्याचे मनोधर्म. ८ अंधकारांत.

कसेंही त्या येवो कठिण सहण्या संकट तरी.
कृपा तूझी त्याचें सतत अवघें संकट हरी
नराचा तूं नारायण करिसि तत्भक्तिमुदित[1]
कृपेनें तूं मूकां[2] सुरगुरुगिरा[3] देसि खचित
कृपा होतां तूझी गिरिवर चढे पंगु चरणीं
अशी आहे ख्याती बहु तव कृपेची त्रिभुवनीं. ३
ध्वनी ऐकूं यावा अविरत दिसावें त्रिभुवन
कळावा वस्तूंचा परिमल[5] रुची तेंवि ह्मणुन
मनुष्यां तूं देशी श्रवणनयनघ्राणरसना[6]
नसे देवा तुझ्या खचित उपकारास गणना. ४
जसा ज्या मानाचा मनुज जगिं अन्याय करितो
तसा त्या मानाचा प्रचुर लघु त्या दंड घडतो
असे ज्याची जैसी सुकृति मिळतें त्या फल तसें
असें तूझें न्यायीपण अमित देवा ! दिसतसें. ५
जरी आहे ऐसें निजुन उठल्यापासुनि किती
निजाया जाई तोंवरि नर करी कल्मषकृती[8]
दिनाच्या रात्रीच्या मिळुनि घटिका साठहि जरी
दिनीं नेमानें त्वद्गुण अठविणारे किति नरीं ? ६
जगन्माता पृथ्वी त्रिभुवनिं महाभूत पहिलें
जयामध्यें नानाविध विषय आहेत भरले
असे कीं एक्याही विषयिं शतवर्षांतहि जन
नसे प्रायः पारंगत बहु तदभ्यास करुन. ७
सजीवांचा तैसा विटपगिरिचा[9] थोर नियत
महा[7] भूदेवी जी सहन करिते भार सतत

१ त्या मनुष्याच्या भक्तीनें प्रसन्न होत्साता. २ मुक्यांना. ३ ब्रहस्पतीची वाणी. ४ मदोदित. ५ सुवास. ६ कान, डोळे, कान आणि जीभ. ७ मोठा ८ पापकृति. ९ झाडाचा डोंगराचा.

तृणें धान्यें भू जी उगवि निजपृष्ठावरि सती
असो माझी तीतें चिर सविनय प्रश्रयेंनती[1]. ८
धरित्रीच्या पोटीं विपुल मिळती शुभ्र हिरवे
मणी, धातूहेमामलरजतलोहादि[2] बरवे
तसे अंगारादी[3] बहुत उपयोगी हि खनिज
दुज्या वस्तू तेथें असति किति जाणे न मनुज. ९
तिच्या पोटीं जंतू असति नयनागोचर[4] किती
विषारी सर्पादी किति उरग[5] भूमींत वसती
किती कैशी कंदा रुजवि निजगर्भांतरिं मही
न भूगर्भाभ्यासी क्षम समजण्या हें अजुनि ही. १०
निघे कोठें उष्णोदक बहु कुठें शीत सलिल
निघे कोठें गोडें मचुळ अथवा खारट जल
कसे भूगर्भीं हे अविरत चमत्कार घडती
न भूगर्भाभ्यासी कधिं हि समजे पूर्ण सुमती. ११
जिथें बीं पेरावें अतिशय लघू या जमिनिंत
तिथें येती कैशीं बहुत कणसें धान्यभरित
जसें तें बीं तैसा खचित फुटतो अंकुर सदा
अशक्त ज्वारीला[6] सबल गहुं येई नच कदा. १२
सदा ज्याचीं पानें जलदसदना[7] जाति धरण्या
हजारों पांथा जे क्षम विपुल छाया सुखविण्या
असे अश्वत्थादी तरु बहुत दृष्टीस पडती
बघूं जातां त्यांचा उगम पारि आहे अणु[8] किती. १३
जलाधारें वेगें सतत जडवीं जीव धरुनी
कसें येई भूमींतुनि अवयवीं पूर्ण बनुनी

---

१ नियम आणि पूज्य बुद्धि यांनीं युक्त असा नमस्कार. २ सोनें, शुभ्ररूपें लोखंड आदि करून. ३ कोळसे आदिकरून. ४ डोळ्याला न दिसणारे. ५ उरानें चालणारे (सर्प) ६ जोंधळ्याला. ७ मेघमंडळाला. ८ सूक्ष्म.

पुढें होई कैसें ससुमफल तें कालगतिनें
सुलीला जाणावी तव कशि अशी म्यां अमतिनें १४
तरूमध्यें साऱ्या सुरभिकुसुमांचे तरु किती
कितींतें रंगांचीं रुचिर सुमनें मात्र असती
तशीं कित्येकांतें अतिशय फळें येति सुरस
फळें पुष्पें दोन्ही असति बहु कित्येक तरुंस. १५
लता ही यां वृक्षांसम असति नानाविध किती
फुलांच्या कांहींशा कितिक सुफलांच्याच असती
फलांचें ओझें तें जडतर कशा साहाति लता
अगाधा ही आहे खचित तव देवा ! चतुरता १६
न बीजें लावाया विपुलजल द्याया प्रतिदिनीं
असूनी कोणीही नर, गिरिवरी घोर विपिनीं
त्वदिच्छेनें होती ससुमफल वेली तरु कसे
कशाला गर्वानें मनुज मिरवे जाणत नसे १७

# आलस्यहनन.

## (गंधर्वकृत.)

उद्योगाची इच्छा मात्र उत्कट; पण आळस हा उद्योगाचा मोठा प्रबळ शत्रु आहे. तो मनुष्यावर आपली झडप घालावयाचा निरंतर प्रयत्न करीत असतो. आणि कसाही उद्योगशील मनुष्य असला, तरी केव्हांना केव्हां तरी तो त्याच्या तावडींत सांपडतोच. त्यांतून मी तर स्वभावतःच आळशी असल्यामुळें उद्योगाच्या मोठ्याही प्रबल इच्छेचें आळसापुढें काय चालतें? तथापि, चमत्कार असा कीं, नुसतें पडून रहावें तर त्याचाही कंटाळा येतो. तेव्हां असा कंटाळवाणा झालेला आळसाचा काळ कांहीं तरी उद्योग—कसा कां होईना—करून सारावा अशा हेतूनें निरनिराळ्या प्रसंगीं ही पुढील कविता लिहिली आहे व ह्याच कारणाकरितां हीस **आलस्यहनन** असें नांव दिलें आहे.

१ फुलें आणि फल यांनीं युक्त. २ सुवासिक. ३ सुंदर. ४ फुलें. ५ अरण्यांत

# सीमा काय तया सुखास असतो निष्काळजी बालक !—

## श्लोक.

सीमा काय तया सुखास असतो निष्काळजी बालक ?
आनंदें सदनीं अजूनि वसतों शैलोदरीं[1] मोहक
पालाशीं[2] विपिनीं विहार करित स्वच्छंद मी राहतों
नीरोल्लंघनही[3] करीत अथवा चित्तास संतोषितों. १

उत्सेकोदित[4] भारभूत विभवश्री[5] नीच लोकीं वसो
स्वातंत्र्यप्रिय मानसास न रुचे; धिःकार तीतें असो
ज्या भागीं गिरिचीं शिरें पसरलीं तो सेव्य त्याला गमे
तेथें तो विरमे जिथें सदुपलीं[6] कल्लोळमाला[7] रमे. २

दैवा घे परत स्वयें वितरलीं हीं उन्नतीचीं[8] स्थळें
ह्या कीर्तिध्वनिचें नको परत घे हें नांव जें गांजलें
नीचांचा अति गर्ह्य[9] भूतळवटीं संसर्ग मानी मति
भोंतालीं वसती श्ववृत्ति[10] जन ते उद्वेग[11] उत्पादिती. ३

देई प्रस्तरसंचय[12] प्रतिरवा[13] जो सिंधुच्या गर्जितां[14]
माझें प्रेम जयावरी मज तिथें नेऊन ठेवी स्वतां
पूर्वीं अल्पवयीं कुमार असतां सप्रेम जीं पाहिलीं
याचीं हेंच पुनः विहार करूं दे त्या रम्य दैवा ! स्थलीं. ४

माझें फार नसूनही वय मला भासावया लागलें
धात्यानें मजकारणें न ह्मणवें कीं विश्व हें निर्मिलें

---

१ पर्वताच्या अंतर्भागीं २ हिरव्या. ३ पाण्याचें उल्लंघन. ४ गर्वानें संपादन केलेली. ५ वैभवद्योतक संपत्ति. ६ खडकावर. ७ जलतरंग. ८ सुधारणेचा संस्कार झालेलीं. ९ निंद्य १० गोंडा घोळणारे—हांजी हांजी करणारे. ११ तिटकारा. १२ खडक. १३ प्रतिध्वनी. १४ गर्जनें.

आयुर्हानि घडेल एक समयीं येणारची काल तो;
मायाजाल तयास कां मग अहा झांकूनियां ठेवितो. ५

स्वप्नीं सुप्रभ[1] एक वेळ सुख मी सानंद जें भोगिलें
मिथ्या होय खरें, परंतु न तसें जन्मांतही पाहिलें
केलें जागृत कासया अवितथा![2] क्लेशास भोगावया
विश्वांतील, गुणें तुझ्या सुख हरे निंदू नये कां तया ६

होतें प्रेम-परंतु ज्याजवरती तें नाहिंसें जाहलें !
होते मित्र-तथापि बाळपणचे कोणी न ही राहिले !
आशादीपकभा[3] हृदीं पसरली होती निर्मालीच[4] ती !
नैराश्यें विटलें विषण्ण[5] ह्मणुनी झालें अहा तें किती ! ७

सौख्याचें नलगेच नांव असुख स्वांतीं[6] सदा संचरे
थोडेसें परिहासशील[7] सखिच्या संगीं जरी ओसरे
ह्या उन्मादक[8] मानसास सुख दे प्रोत्साहनातें जरी
एकाकीत्व सदैव वास हृदयीं राही करूनी तरी. ८

प्राधान्यें सुभगें जयांस अथवा संपत्तिनें वा बलें
केलें उत्सवपात्र वैभव, असे ज्यांना भलें लाभलें
ते माझे सख[9] वा न होत अरिही; ऐकावयास ध्वनि
त्यांचा कर्ण न वाहतो मम; तरी कंटाळतों मी मनीं. ९

ज्यांची वृत्ति समान आजवरती ज्यांच्या वयीं अंतर
नाहीं स्तोक[10] सुहृद्[11] असे समगुणी देशील दैवा! तर
आनंदास अवास्तवास[12] इथल्या मोहूनि गेले जन
मी त्यांच्या ध्वनीला भुलेन न कधीं कों दूरता सेविन. १०

---

१ दिव्य. २ हे सत्या ! ३ आशारूप दिव्याचा उजेड. ४ नाहींसा झाला. ५ खिन्न. ६ मनांत. ७ विनोदी. ८ वेड्या ९ मित्र. १० थोडे. ११ मित्र. १२ खोट्या.

नारी रूप तुझें मनोहर किती चित्तास आल्हादितें;
आशा जीवनसौख्यहेतु सखये! तूं होस सर्वस्व तें
माझें; त्वत्स्मितलाभ तोहि न घडे आशा निमालीच ती!
तेणें मत्हृदयांत वास करिते सांगूं किती दुःस्थिति? ११
सौख्याचा परिधान वेष करुनि दुःखें स्थलव्यापृत;
केलें; त्यागिन मी तयास सहजी प्रेमें अनिश्वासित[1]
धर्माचार जयास जाणत असे किंवा दिसे जाण तो
चिच्छांतिप्रद यावया वसतिला माझ्यांत संतोष तो. १२
जेथें लोकसमूह वास करितो तेथें नको राहणें
नाहीं द्वेष खरोखरीच जनता तत्रापि ती टाळणें
वाटे इष्ट मला मनीं वसतसे माझ्या उदासीनता
ती इच्छी गिरि कंदरांत वसती नाहीं बरी लोकता[2] १३
ज्या पक्षी आपुल्या कपोत[3] निलयीं[4] जाया शके ते पहा
देतें दैव मला क्षणांत उडुनी स्वर्गात जातों अहा
तेथें ऐहिक ताप सर्व सरता विश्रांतिला पावतों
नाहीं दैवच कोठुनी मग अहा व्हावा मला लाभ तो. १४

---

# २ आलस्यहनन—आशाभंग.

(गंधर्वकृत.)

**श्लोक.**

होता संभव एकता उभयतामाजी घडावा असा,
येता योग घडून हेतु पुरता मन्मानसींचा तसा;
होतों ना सहसा अकार्यवश[5] मी प्राणेश्वरी! यापरी;

---

१ दुःखाचा सुस्कारा टाकल्यावांचून. २ लोकसमूह. ३ खबूतर. ४ घरट्यांत ५ वाईट काम करण्यास प्रवृत्त.

चित्त स्वास्थ्य न भंगतें, न चळती माझी मती सुंदरी ! १
हे जे अल्पवयीं प्रमाद घडले तूं होस त्यां कारण
ज्ञाते वृद्धहि निंदिती तुजमुळें मातें विनाकारण
पापाचार मदीय जाणति; परी ठावें नसे त्यांजला
प्रेमाच्या वचनास अंतर दिलें त्वां त्यागिलें कीं मला. २
होतें निर्मल चित्त ज्यापरि तुझें माझें तसें एकदा
झालों शक्त[1] विकार उत्कंठ तरी रोधावयातें तदा
मत्प्रेमोचितपारितोषक[2] परा देऊनियां लोटिलें
दु:खाब्धींत मला असे कपट वा हें क्रौर्य कां चांगलें ? ३
त्याच्या शांतिस अंतराय करणें नाहीं मला दुष्कर
ज्या सौख्यातिशयावरी भरंवसा त्याचा असे निर्भर[3]
नेतां त्या विलयास येइल; परि घेई न माझें मन;
आनंदांत हंसो; तुझ्यास्तव न मी दुर्भावना चिंतिन. ४
जेव्हां अंतरलीस तूं प्रियतमे लावण्यधामे ! बसे
कोणाच्यावरती न चित्त अगदीं, विश्रांति त्यातें नसे;
प्रेमा ज्याकरितां तुझ्याचवरती केला; अनेक स्त्रिया-
पासूनी करिते प्रयत्न वितथा[4] तें इष्ट लाभावया. ५
बाले ! वंचकता[5] करूनिहि तरी राही सुखें भूवरी
व्हावें दु:खित कां तुझ्यास्तव वृथा कांहीं न लाभे तरी ?
आशेनें स्मृतिनें न दु:ख कमती होई; परी वाटतें
गर्वें विस्मृति पाडिल्यास सगळें जाईल अस्तास तें. ६
जातो काल वृथा, भ्रमे मन तयें, उद्विग्नता वाढते;
फेरे नश्वर सौख्य घेत फिरतें कंटाळवाणेंच तें
प्रेमाचे बहु भेद हे, युवतिची भीती किती जाचते ?
जे का उद्भवती विकार हृदयीं बाहेर येती न ते. ७

१ प्रवल. २ माझ्या प्रेमाचें योग्य बक्षीस. ३ पुरा. ४ व्यर्थ. ५ कपट.

त्वां मातें असतें जरी परिणिलें कांहीं न होतें असें
जे कामज्वरसंगरांत झिजले तेजस्विता ज्यां नसे
झाली प्राप्त कधीं; कपोल[1] असते संफुल्ल आरक्त ते
त्वत्संगें गृहसौख्यसांत्वन मला दैवें जरी लाभतें. ८

होतें सौख्य सुधारुचिप्रिय[2] जरी साधेसुधें एकदा,
होती हास्य करीत ती तुजसवें जाणो वनश्री यदा
मच्चित्तें कपटा न आश्रय दिला, विद्वेषिलें एकदा,
त्यातें ध्यान करावया तुजविणें कांहीं न होतें यदा. ९

आनंदेतर-वासना मम हृदीं आतां परी वागते;
कां कीं चिंतन वेड लाविल तुझें ऐसे मला वाटतें
अर्धी घालवितों मनीं वसतसे माझ्या उदासीनता
लोकीं शून्यविचारशील अथवा रिक्तध्वनी ऐकतां. १०

हे चित्तीं असतां विचार शिरतो त्यांच्यामधें एक हा
चोरूनी करितां प्रयत्न सगळे वायाच जाती पहा
हा हा! लाभ तुझा फिरूनि मजला होणार नाहीं कधीं
तेणें होय दशा द्रवेल बघतां अत्यंतही तो कुधी. ११

---

# संध्याकाळ.

## ( गोपाळ गणेश रानडे. )

### श्लोक.

अस्ताचलीं[3] तो दिनराज गेला
प्रफुल्लता आलि तरूगणांला

---

१ गाल. २ अमृताच्या रुचीप्रमाणें व्हावेंस. ३ पर्वताकडे.

लागे डुलूं पल्लवभार वातें
संध्या[1] बहू तोषवि मानसातें. १

संताप जो कां सकलां जनांला
प्रचंड[2] चंडांशुकरें[3] जहाला
समीर[4] सन्मित्र तयास वारी
प्रसूनसौरभ्य[5] जनीं प्रसारी. २

गेला अस्तनगास भास्कर तदा दिव्या दिशा पश्चिमा
सर्वांगीं बहु लालशी दिसतसे, ती फुल्लपद्मोपमा
सूर्यानें अपुल्या करीं श्रमविलें सर्वांस हें जाणुनी
संध्या येइ सुशांतिवस्त्र अपुलें सर्वांवरी टाकुनी. ३

रानांतुनी चरुनि धेनु गृहास येती
तेव्हां त्वरा करुनि; फारचि शोभताती
वत्सांस आठवुनि हंबरतात गाई
पान्हा फुटे ह्मणुनियां करितात घाई. ४

शेतांत काम करुनी बहु भागले जे
तेव्हां किती वृषभ[6] शांत गृहास साजे
माघारि शेतकरि ते गमले त्वरेनें
येतीं; प्रवेशति गृहीं अपुल्या सुखानें. ५

रात्रिस्वसा[7] पृथवि बाल तृणांकुरानें
झाली असे हरित[8] ती सकला क्रमानें
हें योग्य गर्भ-भर-नम्र अशा स्त्रियेतें
जाणून, ती हरितवस्त्र जणो धरीते- ६

---

१ संध्याकाळि. २ प्रखरतर. ३ सूर्यकिरणांनीं. ४ वारा. ५ फुलांचा वास. ६ बैल. ७ बहीण. ८ हिरवा. ९ गरोदर.

देईल जन्म गमलें सुफलांस जेव्हां
काया तिची अधिक रम्य दिसेल तेव्हां
होईल थोर जिकडे तिकडे समृद्धि
पावेल त्यासमयिं मानव सौख्य-वृद्धि. ७
त्यजुनि फिरणें सारे पक्षी गृहाप्रति येउनी
करिती मधुरा शब्दा तेव्हां तरूवरि वैसुनी
उठति लहरी जैशा, तैसे विचार तयांमुळें
खवळुनि कसा गेला माझा मनोजलधी वळें. ८

---

# स्फुट पद्यें.

## ( वळवंतराव कमलाकर )

## विप्रलंभ शृंगार.

### श्लोक.

स्वप्नीं रोष पराङ्मुखी निजसखी म्यां आज हो पाहिली
मातें स्पर्श करूं नका रडत हे बोलोनि जी चालली
नाहीं म्यां मृदुभाषणें करुनि जों आश्वासुनी रोधिली
हा! हा! काय अशांत दुष्ट विधिनें निद्राच कीं भंगिली. १

### आर्या.

दुर्वार[1] कामशर हे कुल निर्मल वय नवीन पति दूर
मन उत्सुक अबला मी शिव! शिव! नाहीं तथापि सखि चतुर. २
निद्रेनें निज नेत्रां धृतिनें[2] चित्तास शक्तिनें तनुला
त्यजिलें तूंहि प्राणा सोडिशि अद्यापि कां न रे मजला.
मत्तपिकांचे कूजित[3] तीक्ष्ण असे हे अनंगशरसंघ
मलिनाशयविधुकरहे साहाति न सखे घडे हृदयभंग. ४

---

१ निवारण करण्यास कठीण. २ धैर्यानें. ३ किलबील शब्द.

# स्त्रीअवयव.

### मुख ( श्लोक. )

देवोच्छिष्ट न जाहला नच तसा जो राहुनें ग्रासिला
अंकानेंहि[1] न दूषिला न रविनें म्लानत्वही पावला
नाहीं लुप्त कुहुमुळें[2] न युवती वक्त्रेंहि जो जिंकिला
ऐसा स्वर्ण लतेस कोण उदया हा चंद्रमा पावला. १

### केश ( आर्या. )

मलिनहि संयमनानें[3] कुटिल परी विविध सुमनसंगानें
देवत्व पावलेंही[4] लोकीं हे बाल[5] मुक्तसंगानें[6]. २

### वेणी ( आर्या. )

हीच्या मुखकमलाचा मकरंदास्वाद घ्यावया साची
वेणीमिषेंचि जाणो मागुनि ये रम्य पंक्ति भृंगाची. ३

# वर्षाऋतूंतील रात्रीचा समय.

## ( विठ्ठल भगवंत लेंभे )

### पद.

( "नको हरी निशिं बाहेर जाऊं" या चालीवर. )

काळा कुट्टचि तिमिर दिसे, ही काय भयंकर गे! रजनी ॥ ध्रु० ॥
प्रचंड वारा भररर वाहुनि कडडड मोडुनि वृक्षांतें ॥ धडडड पाडी भूवरि, बाई गमतें उडुनी मी जातें ॥ गडगडती हे ढग बाई गे काळिज माझें धडधडतें ॥ सड सड सडकी पाउस लागति फड फड गारा अंगातें ॥ जलमय झालें भूतळ, वरि वरि घसरुनि पंकीं मी

१ चिन्हानें, काळ्या डागानें. २ अमावास्येमुळें. ३ इंद्रियदमन पक्षीं दावणें. ४ देव पक्षीं फुलें. ५ केश पक्षी मर्ख. ६ मोती पक्षी मुक्ति.

पडत्ये ॥ चम चम चमकुनि वीज अहा! ही दिपवी माझ्या नयनांतें ॥ हाय! कडाडत भूवरि आली जाय तडाडुनि हे निघुनी ॥ किती तरी भ्यालें! सर्वांगाचें होउनि गेलें गे पाणी ॥ घोर वनीं या भ्याल्या हरिणापरि मन गेलें बावरुनी ॥ १ ॥

---

# निर्द्रव्य पुरुष.

## (मोरो गणेश लोंढे.)

### पद.

( " घनःशाम सुंदरा "–चाल. )

निर्द्रव्या पुरुषाला अगदीं पुसेना कोणी
श्रीमंतांच्या गृहीं जातां होय मानहानी ध्रु.
कुशल तयाला कुणी पुसेना निजग्रामीं जातां
मित्र तयाशीं कुणी वदेना एक मधुर वार्ता
बांधव पाहुन तया ह्मणती चल होई परता
मायबाप त्यागिती ह्मणती मूर्ख त्यास वरता
स्थिति बाहिर यापरी गृहामधिं जांचितसे कान्ता
अलंकारभूषणें न ह्मणुनी करीत आकान्ता (चाल)
चहुंकडुन असी त्यांते
गति कठिण असे भाई
बहिणी त्या कुठुन पुसती
जरि पुसे न ती आई
रमणी ते खिळे बंची
ह्मणे खावयास नाहीं
पुत्र विचित्र हि पहा वचना त्याचें अवमानी. १ नि.
वस्त्र तया चांगलें मिळेना आंगावर घ्याया.

श्रीमंतांच्या घरीं वाटते लाज त्यास जाया
द्रव्य न ह्मणुनी झुरे अंतरीं शुष्क होय काया
वेळीं सार्ध असे मिळेना अन्न त्यास खाया
दुसऱ्या जवळी मना वाटते लज्जा मागाया
देती द्रव्य न परी असती तत्पर हांसाया (चाल)

त्रासुनी स्वजीवातें
बोलतो काय ऐका
हर हर ! हे दुर्गति त्वां
ईश्वरा दिली मज कां
पीडिलें दरिद्रानें
मरण तें येइना कां

मोरेश्वर पाहुनी अशाला न कधीं अवमानी. २ नि.

---

# सुभाषित.

## (केशव सदाशिव रिजबूड.)

### श्लोक.

ज्यानें विश्वीं व्यर्थ केलें न कांहीं
रत्नें तैसीं निर्मिलीं मृत्तिकाही
जो आधार स्थावराजंगमाला
सद्भावें त्या नम्र व्हा ईश्वराला. १

स्वार्हपणें करिवरें निज कर्णतालें
दानार्थि भृंगनिकरां जरि दूर केलें
जातील ते मधुप पद्मवना निघोनी
शोभाविहीन तव होतिल गंड दोनी. २

जातील हे हंस उडून जेथें
भूमंडळा शोभवितील तेथें

# जाहिरात.

## काव्यरत्नावली.

प्रस्तुत मासिक पुस्तक १८८७ च्या जून महिन्यापासून सुरू झालें आहे. आजपर्यंत पुष्कळ प्रकारचे विषय प्रसिद्ध झाले आहेत, यांत अलीकडील नामांकित कवींचीं काव्यें प्रसिद्ध होतात. ही रत्नावली अनेक कवींकडून गुंफली जात असल्यामुळें काल्पनिक, ऐतिहासिक, पौराणिक, संस्कृत व इंग्लिश काव्यांचीं भाषांतरें, वगैरे अनेक कविता प्रसिद्ध होतात. उत्तरोत्तर नवीन कवि जास्त मिळत आहेत.

नवीन काव्यरचना करून देणाऱ्या कवींचीं काव्यें तपासण्याचें काम पुढील [ काव्यपरीक्षक ] मंडळींनें पत्करिलें आहे.

**रा० रा० लक्ष्मण रामचन्द्र वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी.**
**रा० रा० जनार्दन बाळाजी मोडक बी. ए.**
**रा० रा० वामन दाजी ओक.**
**रा० रा० वासुदेव वामन शास्त्री खरे.**
**रा० रा० गणेश बळवंत मोडक.**

या सांचाचीं प्रतिमासास २४ पृष्ठें प्रसिद्ध होतात. टपालखर्चासुद्धां फक्त दीड रुपया किंमत ठेविली आहे. मागाहूनचा दर मुळींच नाहीं. दुसरा अंक पोंचतांच वर्गणी पाहिजे.

पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा:—

**नारायण नरसिंह फडणीस.**

जळगांव—खान्देश.

# काव्यरत्नावली.

( मासिक पुस्तक )

पुस्तक २ रें. ] जुलै सन १८८८ [ अंक १४ वा.

त एव पदविन्यासास्ता एवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



## जळगांव--खान्देश येथें प्रसिद्ध होत असतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हसिलासुद्धां दीड रुपाय.

भुसावळ "खानदेशमित्र" प्रेस

त्यांचा परंतु प्रतियोग होणें
होते सरोहानि, न काय तेणें-? ३
व्योमीं उडा; सतत जा अथवा दिगंतीं
डोहीं शिरा; जन रहाहि यथेच्छ पंथीं
जैसें निजार्जित शुभाशुभ कर्म गांठीं
छाये परी तस तसे सुख दुःख पाठीं. ४

## चंद्रावरील कलंक.

### (माकंद कविकृत.)

आर्या.

अमृतकर कलानिधि हा याला लागो न दृष्टि कोणाची
ह्मणुनी तज्जननीनें चंद्रा ही तीट लाविली साची. १
दिक्कामिनी कपोलाचि हा न निशापति न डाग त्यावर हा
परि तिलकबिंदु आहे कामुकजनमानस प्रमोदी पहा. २
आकाशनदींतिल हे कनककमल होय हा नसेचि शशी
अथवा तत्कमलस्थित अलिवांचुनि कालिमा दिसेल कशी? ३
किंवा कल्पलतेचें हें सुंदर पक्वपीत फळ आहे
काळें जें तेथ दिसें तें त्याचें डेख वाटतें राहे. ४
उदयाद्रि पदर सरुनी जातां विरलघन चौलगत उजवा
श्यामलचूचुक[1]कुच हा पूर्वेचा काय दिसतसे अथवा. ५
अथवा शिवें चुकूनी न शशी देतां दिला परत भाळीं
जो नेत्र असे सामी कनीनिका मात्र ज्यांत ती काळी. ६
अभिसारिका जनाला जीवितपति सदनमार्गदर्शि जळे
कज्जल कृष्णवदन हा दीप असे शशांक हें न कळे. ७
अथवा हा विशदमधुकरकविवचनांचा असेल समुदाय
ज्यावरी अरसिक दुर्जन निंदेचा डाग बसुनियां जाय. ८

१ स्तनाग्र.

# जाहिराती.

—:o:—

## श्रीमान् व हौशी लोकांकरितां मनोरंजक वस्तु.

**कृतिजन्य सर्प**—हे दिसण्यांत हुबेहुब जीवंत सर्पाप्रमाणें पहाणारे मंडळीच्या मनांस भीति उत्पन्न करून मंडळीची दाणादाण होते, व हे कृतीनें तयार केले आहेत असें समजल्यावर मनास फारच आनंद व चमत्कार वाटतो किं० १ रु० ट० हा० चार आणे.

---

**कृतिजन्य किडा**—वरीलप्रमाणें हुबेहुब परंतु शेपटीच्या बाजूस धरून उचलला असतां हात दिडहात लांब होतो व सोडल्यावर बोटभर लांब दिसून चालूं लागतो किंमत ·।।।· आणे ट० हा० चार आणे.

---

**पळणारा उंदीर**—हा धातूचा केलेला असून दिसण्यांत जीवंत प्रमाणें दिसतो यास टेबलावर उरफाटा टेवला असतां तो आपोआप सुलटा फिरतो व जरा धक्का दिला असतां पुष्कळ अंतरावर चालूं लागतो. किंमत १।। रु० ट० हा० चार आणे.

---

**पुष्पगुच्छदर्शक इंद्रजालिक दुर्बिण**—यांत पाहिलें असतां निरनिराळे प्रकारची झाडें, फुलें, कमळें वेली, चित्रें वगैरे ५० सांवर चित्तवेधक देखावे दिसतात. किंमत -।।।- आणे ट० हा० चार आणे.

---

**मानसिकशक्ति वाढविण्यास व लहान मुलांस सोप्या रीतीनें हिशेब शिकविण्याचें चमत्कारीक गूढ**—कि. ३ रु० ट० हा० बारा आ.

**सूचना**—ह्या सर्व प्रकारच्या वस्तु आमचेकडे रोख किंमत अगर व्हाल्युपेएबलनें मागविल्यास पाठऊं.

**पत्ता**—दत्तप्रसाद मंडळीचे म्यानेजर.

मु० राजापूर जि० रत्नागिरी.

# जाहिरात.

## काव्यरत्नावली.

प्रस्तुत मासिक पुस्तक १८८७ च्या जून महिन्यापासून सुरू झालें आहे. आजपर्यंत पुष्कळ प्रकारचे विषय प्रसिद्ध झाले आहेत, यांत अलीकडील नामांकित कवींची काव्यें प्रसिद्ध होतात. ही रत्नावली अनेक कवींकडून गुंफली जात असल्यामुळें काल्पनिक, ऐतिहासिक, पौराणिक, संस्कृत व इंग्लिश काव्यांचीं भाषांतरें, वगैरे अनेक कविता प्रसिद्ध होतात. उत्तरोत्तर नवीन कवि जास्त मिळत आहेत.

नवीन काव्यरचना करून देणाऱ्या कवींचीं काव्यें तपासण्याचें काम पुढील [ काव्यपरीक्षक ] मंडळींनें पत्करिलें आहे.

**रा० रा० लक्ष्मण रामचन्द्र वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी.**
**रा० रा० जनार्दन बाळाजी मोडक बी. ए.**
**रा० रा० वामन दाजी ओक.**
**रा० रा० वासुदेव वामन शास्त्री खरे.**
**रा० रा० गणेश बळवंत मोडक.**

या सांचाचीं प्रतिमासास २४ पृष्ठें प्रसिद्ध होतात. टपालखर्चासुद्धां फक्त दीड रुपया किंमत ठेविली आहे. मागाहूनचा दर मुळींच नाहीं. दुसरा अंक पोंचतांच वर्गणी पाहिजे.

पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा:—

**नारायण नरसिंह फडणीस.**

जळगांव—खान्देश.

# काव्यरत्नावली.

( मासिक पुस्तक )

पुस्तक २ रें.] जुलै सन १८८८ [ अंक १४ वा.

त एव पदविन्यासास्ता एवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



## जळगांव--खान्देश येथें प्रसिद्ध होत असतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हंसिलासुद्धां दीड रुपाय.

भुसावल "खानदेशमित्र" प्रेस

## अनुक्रमणिका.

१ दुष्काळ – वर्णन .... .... ... .... .... . . १–२४

# सूचना.

१ वर्गणीदारांकडून जी वर्गणी येईल त्या बद्दल निराळी पावती किंवा पुस्तकांत पोंच हीं दिली जाणार नाहीं. मनीआर्डरीवर जी सही होईल तीच पावती समजावी.

२ जाहिराती करितां कांहीं स्वतंत्र पृष्ठें ठेवण्याचा विचार आहे, तर ज्यांस जाहिराती पाठवावयाच्या असतील त्यांणीं खालील पत्त्यावर कळवावें, ह्मणजे त्यांस जाहिरातीचे दर कळविण्यांत येतील.

३ ज्यांस ही रत्नावली घ्यावयाची नसेल त्यांनीं ती परत करितांना एका चिट्टीवर आपलें नांव गांव स्पष्ट लिहून ती पुस्तकांत घालावी. पुस्तकावर नांव गांव कांहीं लिहूं नये.

४ हा अंक पोचतांच वर्गणीदारांनीं आपली वर्गणी लौकर पाठवावी.

५ कविता करणारांनीं आपलीं काव्यें एका बाजूवर स्वच्छ लिहून पाठवीत जावीं. लहान प्रकरण अर्धवट पाठवूं नये.

६ या रत्नावलींत जीं काव्यें प्रसिद्ध होतील, त्यांची आवृत्ती काढण्याचा प्रसंग आल्यास त्यावर कविता करणाराचा हक्क राहील.

७ ज्या कविता नापास होतात त्या आह्मी तेव्हांच परत करितों. ज्या परत करीत नाहींत त्या अवकाशानें प्रसिद्ध होत जातील

नारायण नरसिंह फडणीस
प्रकाशक - काव्यरत्नावली
जळगांव– खानदेश

# काव्यरत्नावली.

अंक १४ वा.

## * दुष्काळवर्णन.

( मोरो गणेश लोंढे )

आर्या

भगवान् पादरजीं तव करुनि नमन लागतों वदायास
त्वत्साह्यें पंगूला अद्रीवरि जावया न आयास १
अब्दद्वय योग्य तशी वृष्टि न करितांचि भूवरी मेघें
गडबडले जन, नवल न, जल सरतां केंवि वाहवें ओघें २
प्रलयानलसम उष्णें केवळ कीं दग्ध जाहलीं शेतें
पडलीं मरुनि तयीं भग जन तरि धरतील केंवि आशेतें ३
भक्षिति धान्य गृहांतिल राहे जवळी जयीं न एक कण
हर! हर! काय वदावें ह्मणती देवा! अह्मांस दे मरण ४
पोटासाठीं फिरती राहे जवळी न एक ही दाम
सर्व रिकामे ऐशा-वेळीं इतक्यांस कोठलें काम ५
जागोजागीं पुष्कळ सरकार[1] करी सुरू नवीं कामें
परि तीं कितिक्कां पुरती जाती सोडूनि तेधवां धामें ६

---

* सन १८७७ सालीं जो भयंकर दुष्काळ झाला; त्याचें स्मरण झालें. ह्मणजे आंगावर रोमांच उभे राहिल्या वांचून रहात नाहींत. त्या वेळचा एक प्रसंग मनांत आणून कवीनें त्यावेळची दुःखद स्थिति वरील वर्णनांत दाखविली आहे. प्रस्तुत वर्णनाबद्दल दक्षिणाप्राईज कमिटीनें कर्त्यास बक्षीस दिलें आहे. १ इंग्रज सरकार.

स्वद्रव्यें पुरवासी गरिबांतें बहुत वांटती अन्न
कित्येक तरि भुकेनें आढळती पूर्ण जाहले खिन्न ७
एक दुजा मग तिसरा ऐसे मेळे कितीक आढळती
ठिगळें कितीक द्यावीं आकाशा लागली जरी गळती ८
देतां अन्न अनेकां नाहीं ह्मणणें तरीहि भाग पडे
सिंधूस पूर येतां बांधानें ओघ सर्वथा न अडे ९
उष्ण पडे धरणीवरि वांटति कीं पेटल्या दिशा दाही
अनवाणी क्रमितां पथ पायांतें तप्त भूमिका दाही १०
नर नारी ही चालति आणिक जीं बहुत बालके सान
म्लान उन्हानें, भिजलीं घर्में, पाहुनि रडे बुध कसा न ११
अंगावर वस्त्र नसे हर! हर! मग कोठलें करीं व्यजन
दुःखें तळमळती तें पाहून न कळवळे कसा सुजन १२
उष्णें तप्त भुकेनें पीडित तीं बहुत बालकें रडती
दुःखें व्याकुळ पितरें होती ऐकून अंतरीं रडती १३
पाणी पाणी करितां कोठेंही आढळे न कीं टिपुस
हर! हर! बहु दुःखद हे दिवस न येवोत केधवां रिपुस १४
मेघ न तेणें बहुधा उष्णें न किती जलाशयांत जल
पाण्याविण होउनियां व्याकुळ त्यांनां न ओढवे मजल १५
प्रेतापरि पडताती पाहुनियां थोडकी तरुछाया
पायांत शक्तिहि नसे चालुनियां चार पावलें जाया १६
उपवासानें सुकलें गेलें मिळुनीहि पोट पाठीस
मुष्टीभर अन्न नसे ऐशासमयीं समग्र गांठीस १७
तळमळ पाहुन त्यांची सुजनांच्या पेटते मनीं आग
नाहीं उपाय तेथें जेथें प्रभुचाच सर्वथा राग १८
आई! आई! आई! देई खायास लागली भूक
ऐसें ते बाळांचे पाडिति रव काळजाप्रती भोंक १९

विव्हळ होउन दुःखें एकाएकीं स्वजीव तो सोडी
पाहुन माता दुःखें आक्रोश करी स्वभाळही फोडी २०
शव मातींत पुरुनियां कंठाया लागती पुढें मजल
मेघ जिथें अंत बघे मग मार्गीं कोठलें मिळेल जल २१
कोठें कोठें उरलें थोडेसें मृत्तिकानियुक्त जळ
पडतां दृष्टिस तेंही प्राशाया लाविती न एक पळ २२
संपे तें सकळांतें न मिळे होती किती बहु निराश
पडती व्याकुळ, तृष्णा कोणाचा तत्क्षणीं करी नाश २३
प्राशिति कोणी पाणी भारी ढवळे ह्मणून पोटांत
तिडिका उठती पडती रडती जाती कितीक नाकांत २४
कोणी व्याप्त भुकेनें होउनियां अंतरांत तळमळती
कोण असे परि त्यांची वाराया तेथ सर्व तळमळ ती २५
पायांस फोड आले सर्व शरीरहि धुळीमधें भरलें
खायास अन्न न मिळे कितिकांचें आयु तत्क्षणीं सरलें २६
थकले जागोजागीं बसती मानून तोच ठाव बरा
ह्मणती ईशा अमुचा होणार कधीं बरें प्रवास पुरा? २७
पायांत शक्ति नाहीं याकारितां मावळे जिथें दिवस
तें स्थान उचित मानुनि ह्मणती येथें मना खुशाल वस २८
नाहीं कांहीं खालीं सडकेवर वा हि तरुतळीं पडती
थकले पाय तशांतहि ह्मणुन तयां झोंप होतसे वरिती २९
गांवांत मागुनी जें लाधे खाती कदन्न तें सारे
मिष्टान्न गमे त्यांतें परि तें मारी तयांस अतिसारें ३०
मिळतां धान्य कसेंही खाई कोणी तसेंच तें हिरवें
पोट दुखाया लागे शक्ति उणी त्यामुळें न तें जिरवें ३१
इतक्यांत **महामारी** स्वारी करि आपुली कुणावरती
तेणें त्यांच्या दुःखा स्वाभाविक थोर पातली भरती ३२

नवल न पर येईना आत्ताहि येईन तेधवां जवळी
मृत्यु उदार तयाला प्रेमें येऊन तेधवां कवळी ३३
राहे नवरा मागें आली पुढती चुकोनियां कांता
श्रांता परि बाईच्या[3] संगानें ते करील आकांता ३४
" हा ! हा ! नाथा ! उठते पोटीं माझ्या तिडीक एकसरें
आई ! गे ! आई ! गे ! आयुष्याचा न तंतु काय सरे ३५
पायीं गोळे उठती वळती परि येथ कोण दाबाया
कांता दुराबलासी येते अन्यास कासया माया ३६
सोडिव मजला देवा ! देवा ! देवा ! न सोचवेच कळ
अल्पहि साम्यर्थ नसे होतो हा देह याक्षणीं विकळ ३७
धांवा हो ! धांवा हो ! पाजा मज थोडकें कुणी पाणी
दाबा पायां पळभर पथिक तुह्मां विनवि जोडुनी पाणी ३८
नाथाला सांगा हो ! दुःखानें तडफडूनि मी मरतें
नाथाला धाडा हो ! उदक न जीवंत मी कसी उरतें " ३९
जाती कितीक मार्गीं कोणी पाहे न तिजकडे एक
देवेश वांकडा तो होतां कामास काय ये लोक ४०
पाणी कोण तिला दे जाई जवळी न पाहिना कोणी
वाटे भीति तयांतें पाठीवर हे बसेल कीं गोणी ! ४१
आत्ताहि दुरून पळती कां मग जाईल त्या दिशेस पर
त्या कोण तारिता हो ! ईश्वर होई जयास अदयवर ४२
जागोजाग पडुनियां मरतात कितीक चालतां वाटे
पाणी ! पाणी ! करुनी अन्नाचा घेउनी मुखीं घाट ! ४३
सोडी कांता पतिला, पति कांतेला, मुलांप्रती माया
मायेस मुलें तैशीं, कोठें गेली समग्र हो ! माया[4] ! ४४

---

२ महामारी. ३ माता. ४ ममता.

पोटें पाठीं मिळुनी गेल्या होऊन दामव्या काय
वाऱ्यानें हि उडाया झाला वाकून योग्य हो ! काय ! ४५
ताठे तरुण गडीते बनले वाकून पोट ह्मातारें
सगळे वांकुनि गेले क्षुधातृषांच्या जणूं महाभारें ४६
दाते द्रव्य तयांतें देती कनवाळु अन्न कोणी ते
वस्त्रें कोणी देती मेल्यांतें ठाव भूमिका देते ! ४७
वस्त्राहि एकचि जवळी भांडें तर तें असे नसे जवळ
ओझें तेंच तयांनां भारें लवतात भासती विकळ ४८
उपजे भल्यांस माया, दुष्टांनां येइना कधीं कींव
मौज तयां तीच गमे गरिबांचा जातसे जयीं जीव ! ४९
साधिति कितकि ऐशा - मध्यें जाणून दुष्ट हेतूतें
घेती सुंदर नारी विकत कुणी भ्रष्टवी स्वयें तीतें ५०
म्लेंच्छग्रामधीं मिळाल्या कोणी सौख्यें किती महार्घीनें
हर हर ! दुःखद ! चाले धन्य विपद्ग्रस्त तोच नीतीनें ५१
मिळती अनेक दुःखित नारी नर वृंदि मेंढपाळाच्या
ह्मणती असह्य असती आह्मा या यातना विधे ! साच्या ५२
पाद्री भूतदयेतें दाखवुनी करिति यत्न बोधाया
त्यांना स्वधर्म अपुला, वाटे त्यां योग्य हाच ताराया ५३
वेठीं धरिल्या दावी भाव जसा कीं धन्यास हेलकरी
उदरास्तव धर्मांतर करिती जे देव त्यांस काय करी ! ५४
शुद्धांतरंग असतां धर्मांतर कासयास लागावें
मुक्त असे तो त्याला मुक्तीस्तव लागतें न भागावें ५५

एक कथा ऐका ही होता कुणबी गरीब सामान्य
परि ज्या स्वधर्म वाटे मनुजाला स्वीय जीवसा मान्य ५६
ज्या साधुरीति ठाव्या, ह्मणती जन सर्व देवजी ज्याला

ते अंकुरांत सद्गुण वसती जे ठावके सुबीजाला ५७
ज्या शेतकाम ठावें; माहित नव्हतें जयाप्रती कर्ज
आशीविषाप्रमाणें ज्यातें तें मद्य सर्वथा वर्ज ५८
होती जमीन थोडी गोडी मानूनि तींत तो राबे
पोटापुरता दाणा निजकष्टें तो तिच्यांतही लाभे ५९
त्याची भार्या गंगा त्यावरि करि लोभ जी मनोभावें
लोभ्याचें मन जैसें कोठें द्रव्याविणे न लोभावें ६०
त्रास न होई पतिला मागेना जी कधीं अलंकार
जें जें असेल सदनीं मानी संतोष त्यामधीं फार ६१
होते तनय तयाला पहिला गोंद्या द्वितीय विश्राम
मातापितरांच्या ते देती चित्तास नित्य विश्राम ६२
एकास दहा होतीं वर्षें दुसऱ्यास मात्र हो सात
परि कज्जा दोघांचा झाला न कधीं हि बारमासांत ६३
कन्या एक तयाला सगुणी सुगुणी असे खरी परिसा
सोनें करणें हा गुण नसता तरि कोण मानिता परिसा? ६४
लग्न करावें केला निश्चय वय तीस जाहलें तेरा
दुर्दैवेंच तिच्या परि केला त्याचा क्षणांत मातेरा ६५
होतीं गरीब तरि तीं असती सगळीं सदाहि संतोषें
श्रीमंती श्रीमंतां देना सुख पळभरी असंतोषें ६६
आनंदानें फिरती करिती गमती मुलें मुलां संगें
विसरे शीघ्र गरीबी जनक तयांच्या भरूनियां रंगें ६७

गांवाच्या शेजारीं होती सरिता लहानशी एक
तत्तीरीं खेळाया जाती मिळुनी मुलें कितीएक ६८

---

९ सर्पाप्रमाणें.

संगें घेती कोणी पशु कोणी शुद्ध खेळ खेळाया
जाती जमून चित्तें आनंदानें क्षणैक रमवाया ६९
खेळ विटीदांडूचा करिती चालू मुलें जमून किती
पळती वळती झेलिति शीघ्र विटी मोद होय त्या न मिती ७०
खो खो आट्या पाट्या दमकोंड कितीक खेळती मिळुन
सगळा कांठ नदीचा गेलासे कीं मुलांमुळें भरुन ७१
जागोजागीं असती सरितेवरती लहान पाणवठे
जेथें जल नेतांनां युवतींचा शब्द कोठ कोठ उठे ७२
शेजारणी मिळुनियां सुखदुःखाच्या करीत गोष्टींस
जाती सायंकाळीं जल घेउन शीघ्र त्या स्वगेहास ७३
माथां पात्र जलाचें घेउन गोष्टीमधीं उभ्या रतल्या
घटकाभर जातांही काळ मुळीं मानसीं न ज्या थकल्या ७४

गांवामधीं न मोठी बहु ऐशी एक चावडी होती
लोकांनीं अवघी ही भरलेली नित्य आढळे हो ती ७५
गोष्टी सुखदुःखाच्या करिती तेथें बसूनि सर्व जन
प्रापंचिक दुःखानें शिणलेलें शीघ्र होय शांत मन ७६
पाटील काढिताती गोष्टी केव्हां मधेंच सरकारी
कामाविषयीं किंवा ह्मणती झाले जनांस कर भारी ७७

असती लहान सदनें दोबाजूंनीं सुरेख मार्ग मधीं
सान तरी घाणीनें भरलेला आढळे कुगा न कधीं ७८
सदनें न फार मोठीं सोईकर तीं तरी तयां असती
सारवुनी बहु सुंदर भिंती सर्वत्र ठेविल्या दिसती ७९
प्रत्येक घरापुढती अंगण बहु नेटकें असे एक
झाडूनि सारवूनी केवळ जें ठेविलें असे चोख ८०

गाई महिषी यांनीं भरलासे शानदारसा गोठा
संपत्ति हेच त्यांची असतां कृषिकर्म काय दे तोटा ८१
खाती स्वेच्छ किती ते बसती उठती, कितीक बैल मर्दे
दुसऱ्यांस मारिताती अथवा देती मधून लात पदें ८२
आनंदें हंबरती कालवडी खोंड हो मधुन मधुन
जाई भरून तेव्हां सर्व तयांच्या रवें पहा सदन ८३
बाहेर राहुनीयां करिती रक्षण भुकूनियां कुतरे
चुकवूनि कोण त्यांनां धैर्यानें अंगणामधीं उतरे ८४

देऊळ मारुतीचें होतें बहु सानसें नदीतीरीं
पांथांची नित्य असे दाटी बहुधा तयामधीं भारी ८५
परमेशगुणकथांला गाती तेथें कितीक बैरागी
चौके तयार करुनी पेटाविती त्यामधीं किती आगी ८६

सरकारानें दिधली होती गांवामधींच ती शाळा
बेताची बांधुनियां जी केलीसे पुरेलशी बाळां ८७

ग्रामीं ऐशा राहे अनुभवुनी देवजी प्रमोदास
भाषण घडतां ज्याशीं व्हावें बहु सौख्यही सखेदास ८८
युक्त विचारा सांगे कोणी पुसतां तयास कांहीं ही !
एकाचें दुसऱ्याशीं कथणें गुज ज्यास ठावकें नाहीं ८९
मिळुनी त्याच्या सदनीं येती ग्रामस्थ नित्य अवघे ते
ज्याची वृत्ति तयांचा करितां सत्कार फार सुख घेते ९०
आनंदें असती जन सगळे, आली ह्मणूनियां वर्षा ?
त्यांच्या कारण जी कां उत्कर्षा जेंवि तेंवि अपकर्षा ९१
शाकारिती घरांनां मोदें शेतांत नित्य ते खपती !
जिन्नस अगत्य ऐसे स्वीयगृहामधिं समग्र सांठविती ९२

वारा सुटे, धुराळा फार उडे, नभ ढगें समग्र भरे
लखलख वीज करितसे वाटे आतां करील मेघ पुरे ९३
शेतीं शेतकरी ते बीं पेरिति लगबगीस बहु करुन
चित्तीं ह्मणती आतां टाकिल अंबुद धरेप्रती भरुन ९४

लोपून लक्षणें तीं जाती सगळीं क्षणामधीं देखा
वणव्यांत वृक्ष पडतां होतो आधार कोण हो डेखा! ९५
उष्ण पडे धरणीवर तापे सगळी मही महातापें
उष्णाच्या लहरींनीं वाटे आकाश काय हें कांपे! ९६
करपे धरेमधीं बीं त्यांचे श्रम सर्व मोघसे होती
दुःखद वेळ तयांनां वाटे कैसी न तेधवां होती ९७
ह्मणती फिरून पेरूं आला जरि मेघ चांगला आतां
परि हें केविं घडावें सर्व प्रतिकूळ काळ तो येतां ९८
मेघाची वाट सदा पाहति ते लोक चातकावाणी
" आज न, येईल उद्यां " ही दे धैर्यास मित्रजनवाणी ९९
एका मागुन दुसरा दिन जातां लोटला पुरा मास
तों चिंता आंगाचें त्यांच्या तिळतिळ उणें करी मास १००
धान्य गृहांतिल सरलें उपवास कितीक त्यांप्रती घडले
सोडुनि घरदारांनां जाणें तेव्हां अवश्य त्यां पडलें १
आज रिकामें पडलें एक सदन मागुती उद्यां दुसरें
बहुतेक लोक गेले त्यजुनी उदरार्थ गांव एकसरें २
झालीं घरें रिकामी मनुजांचा शब्दही नये कानीं
तैं देवजीस वाटे कंठितसें दिवस मी जणूं रानीं ३
धान्य गृहांतिल सरलें नाहीं कोणाहि द्यावया उसनें
कंठी कांहीं दिन तो पात्रें आणीक विकुनियां वसनें ४

---

पृष्ठ० ८ वें आर्या ९१ पहा ६ पर्जन्य काळ

कांता काढुनि देई आंगावरले तयीं अलंकार
आणा धान्य विकुनि हें ऐकुनि गहिंवरत देवजी फार ५
शहरांत जाय विकुनी त्यांतें धान्यास देवजी घेई
माथां घेउनियां तें सोडुनि नगरास मागुता येई ६
धान्य नसे ज्यापाशीं खाण्याविषयीं उताविळ मनांत
जमुनि कितीक जन असे धरिती त्या देवजीस पेंचांत ७
एकानें लात दिली एकानें पाडिलें तया खालीं
एक उरावर बसला एकानें मोट पार लांबविली ! ८
सगळे पळूनि गेले टाकुनियां देवजीस दुःखांत
ईशकृपा हे मोठी झालाना देवजी ह्मणे अंत ! ! ९
येईल तात आतां घेउनियां, विपुल धान्य नगरांत
वाटेकडे स्वनयनां लावुनि बसले कुमार दारांत १०
येईल कांत केव्हां होइन संतुष्ट पाहुनी त्यास
तत्श्रम हरीन केव्हां गंगेतें लागला असा ध्यास ११
तों देवजी गृहा ये धान्य नसे अल्पही तयाजवळी
पाहुनि कांतावदना शोकाची पातली तया उकळी १२
नवऱ्याला रडतांनां गंगा पाहून अंतरीं भ्याली
होऊन शोकवश ती भर्त्याच्या तत्क्षणीं गळां पडली १३
होतां शोक कमी ती वृत्त पुसे देवजीस जें घडलें
कथितां गंगा बोले "ईशा ! तुज हें हि काय आवडलें १४
जाऊं द्या जरि गेले रौप्यालंकार लागती न मला.
आलां आपण सौख्यें देवानुग्रह न काय हा घडला १५
कुशली आलेत तुह्मी यांविण मज काय पाहिजे अन्य
सेवा करून तुमची जवळी सौख्यें वसेन मी धन्य १६
सगळे एके ठायीं राहुनियां जें मिळेल तें खाऊं
न मिळे तरि संतोषें उपवासी ही खुशाल कीं राहूं १७

अमृतासम कांतेची ऐशी वाणी रसाळ ऐकून
दुःख व्याप्तहि असतां नाहीं मज देवजी ह्मणे न्यून ! १८
धान्य गृहांतिल सरलें सदनीं कांहीं न एक ही उरलें
तेव्हां निरुपायानें सोडावें घर मनामधीं भरलें १९
सर्व पशूंस तयीं तो दुःखें व्यापून देवजी सोडी
"झाला निरुपाय; धरा वाटेल पथांत ज्या तुह्मां गोडी २०
पोसाया पुत्रांनां दारेला आणि या सुकन्येला
शक्त नसें मी यास्तव तुमचा कीं त्याग आयका केला २१

झालों व्याप्त भुकेनें सकुटुंब, तसे तुह्मी उपासानें
जा ! जा ! नका बघूं हे कैसें त्या विश्वपालका माने २२
मोदानें नित्य तुह्मां सायंकाळीं दिलें करें खाणें
हातानें खाजविलें आजि तुह्मां मोकलीतसे त्याणें" २३
ऐसे बोले; परि ते जाति न त्या देवजीस सोडुनियां
त्यालाहि धीर येना जाया सोडून तेथ शिघ्र तयां २४
शोकें भरली जाया उचलेना पाय मार्ग चालाया
सोडाया गृह वाटे येइल तें दुःख काय वर्णाया ! २५
बाळांनों न रहावें येथ उभें देवजी ह्मणे चाला
आहे कोण हराया दुःखा जरि देव वांकडा झाला! २६
जातों टाकुनि तुजला सदना ! तरि लोभ ठेव मजवरती
होतेंस खरें तूं बा ! केवळ आह्मास शांतिची मूर्ती २७
नित्य पहाया तुजला मोदाचें येतसे मला भरतें
टाकुनि तुला कधीं मम चित्त न बाहेर जाहलें ठरतें २८
गोठा कधिं न रिकामा गाई महिषी सदैव हंबरती
गांवांतिल लोकांची दाटी बहु नित्य ओसरीवरती २९
ओटीवर गांवांतिल लोकांसह मी करी बहू गोष्टी

तेणें त्यांच्या माझ्या चित्ता होई सदा नवी तुष्टी ३०
बाळें अनेक मिळुनी करिती बहु अंगणामधीं खेळ
आनंदानें ज्यां ीं वेंचावा सर्व आपला वेळ ३१
शेतावरती आह्मी कष्ट करुन भागतां विसाव्यास
घ्यायासाठीं संतत येत असों तुजमधीं बसायास ३२
माज घरांत करावें रडरडुनि गडबडीस तोकांनीं
त्रास न व्हावा आह्मां व्हावें सुख परिसुनीहि तो कानीं ३३
संतत पाकगृहामधिं युवतींचे मंजु बोल परिसावे
तेणें रसिकजनांचे मानसमृग सर्वकाळ हरिखावे ३४
गेले निघुनी दिन ते बघवेना तुजकडे मला आतां
जातीं सोडुनि; होइल गांठ पुढें ईश्वरी कृपा होतां ३५
या मार्गांत असेना कोणी, ऐसा न एक दिन जाय
जाणों स्वप्नच वाटे नेत्रांनीं आज पाहतों काय ३६
अरुणोदयीं उठावें हा ज्यांनां नित्य लाविला आळा
गाई महिषी घेउनि जाती गोपाळ होउनी गोळा ३७
नित्य फिरावीं यांतुनि मोदानें सान सान बाळें तीं
तैसे जाती येती शेतकरी या पथें गृहीं शेतीं ३८
सायंकाळीं यांतुनि घेउनि कुंभांस चालती नारी
धेनुमहिषमहिषी वृष यांची दाटी हि होतसे भारी ३९
यांतुनि महोत्सवाच्या वेळीं जन सकल चालती मोदें
वाद्यांचा मधुर ध्वनि नरनारीश्रवणमंदिरीं कोंदे ४०
लग्नांच्या मिरवणुका गेल्या कित्येक या पथांतून
त्यावेळीं वाटावें लोकांनां या सुळीं नसे न्यून ४१
सदनें मनुजांनीं हीं भरुन फिरुन सोहळे तसे काय
होतिल येथें विधिचे चरितें, बघतां फुगेल हा काय ४५
ओस घरें सगळीं हीं दिसती श्वानें तयांत वसतात

होत असे यापूर्वीं जागा मनुजांस थोडकी ज्यांत ४३
भणभणित **चावडी** ही दिसते प्राणाविणें शवासारीं
संतत दाटी जीमाधें तीच रिकामी दिसे पहा सारी ४४
**पाटील** येत संतत ठाव धरी मधुन लोक **सरकारी**
येती जाती लोकां विश्रांतिसुखास देत हे भारी ४५
सुखदुःखाच्या गोष्टी करिती तेथें बसूनि सर्वजण
ह्या डोळ्यानीं आतां त्या सुखपर्वा बघेन काय पण ! ४६
ओटीवरी बसावें म्यां घेउनि **पाटिलास** शेजारीं
माझ्याच मतें त्यानें कामें उरकून टाकिलीं सारीं ४७
माझी सहजच व्हावी ओळख येतां मनुष्य **सरकारी**
त्यानीं जागा द्यावी ती होई मज जनांत सुखकारी ४८
बैसुनि तैसा आतां बोलेन फिरून काय डौलानें
तैसेच बोल माझे आयकतिल सर्व काय मोदानें ४९
यावें मुलांस कांहीं बांधी **सरकार** ह्मणुन हो **शाळा**
तों ईस कुलुप लागे पाहुनि बहु दुःख होय जीवाला ५०
नरनारी ज्यांत सुखें नित्य विनोदें मनास सुख देती
तीं सदनें मनुजाविण ओस कशीं एकदांच हीं होती ५१
या **देउळीं** जनांला दाटी होई सदा सणावारीं
ग्रामाचि ओस जहाला आतां देवास कोण दे वारी ५२
ओलांडुनि गे ! जातों सरिते ! परि धरि न राग मजवरती
जातों निरुपायानें आलीसे दुःखसागरा भरती ५३
नित्य तुझ्या या तीरीं हौसेनें हिंडती गुरेंढोरें
रेतींत खेळ करिती नित्य नवे जमुनि सर्व हीं पोरें ५४
प्रातःकाळीं किंवा सायंकाळीं स्त्रिया जला येती
गुजबुज बहुत करुनियां उदक तुझें कुंभ भरुनियां नेती ५५
माथां कुंभ असुनि ही गोष्टींत कितीक वेळ त्या रमती

दोघी चौघी मिळतां त्यांतें बहु मोद होय त्या न मिती ५६
पोरें कितीक शिरती उदकीं डुंबुनि कितीक तासांस
घालविती गमतीनें बोलाया तेथ कोण ये त्यांस ५७
ऐसें बोलूनि निघे गाळुनि अश्रूंस देवजी जाया
पाहे पुढें मुलें तो दुःखें तैसीच खिन्न निज जाया ५८
क्रमिती पथ त्वरेनें दुःखास गिळूनि कठिण चित्तास
करिती चित्तीं धरिती या विश्वाच्या सदैव मित्रास ५९
आले ग्रामीं एका सदनें अत्रवीं हि जेथ पंचविस
दुष्काळग्रस्तांची झाली दाटी न वर्णवे कविस ६०
जेथें तेथें नारी-नर मुलगे थकुनि बैसले दिसती
अन्नासाठीं कांहीं दारोदारीं जमूनियां फिरती ! ६१
मागाया शिघ्र निघे तंव तो सकुटुंब देवजी लाजे
काय करावें तेथें आवडलें जेथ देवजीला जें ६२
आहे उदयास्त पहा चंद्राला तेवि भास्करालाही
दैवें ही गति आली आंगाची ती करीतसे लाही ६३
गरिबांस अन्न द्यावें चित्त जयाचें अशा सुहेतुकडे
नित्य असे तों दैवें मागे उदरार्थ देवजी तुकडे ६४
ग्रामांत सर्व फिरतां लाभेना एक भाकरी पुरती
बाळांस पुरुनि होइल हो ती वृद्धांस कोठुनी उरती ! ६५
तुकडा बारिक खाउनि घट घट उदकास पिउनियां करिती
शांत भुकेला दैवें कैसी हे वेळ आणिली ह्मणती ६६
शक्ति नसे चालाया उष्णानें फार भाजती पाय
अ. हि पवनें उडतिल ऐसे वाकूनि जाहले काय ! ६७
निघती अन्यग्रामा रस्त्यानें काय होय नवल पहा ७

---

७ इश्वराला.

एकाचा सुत गेला यमसदना सोडुनी पित्यास अहा ! ६८
दुःखें व्याकुळ होउनि बडवुनियां ऊर मृत्तिकेंत शव
पुरुनि निघे जायाला तोंथिल कोणी तयास धरिति तंव ६९
घेऊनि पाटिलाच्या सदनीं जाती तयास ते लोक
हा काय वेळ त्यावर जाउनियां मरुनि पोटचें तोक ७०
पाटील ह्मणे कैसें पुरिलें शव तूं किमर्थ रे येथ
तो गडबडुन ह्मणे हो मजला न ज्ञात येथली रीत ७१
आहें गरीब आणिक उपवासें वृद्ध जाहलों पाहा
आधींच दुःख झालें दुःखावर डाग काय देतां हा ! ७२
अन्न मिळेना पोटा ओंजळभर उदक तेंहि लाधेना
जातां प्राण न उदरीं घेइल मग कोण हे धरा घेना ७३
गांवाच्या सीमेंतुनि काढुनियां प्रेत दूर पुरशील
तरिच करांतुनि माझ्या लौकर तूं एकवेळ सुटशील ७४
होय ह्मणे तो, देई संगें पाटील माणसें कांहीं
दाखविलेल्या जागीं उकरुनियां प्रेत पुरितसे पाहीं ७५
पाहुनियां नयनीं हें आश्चर्यें वदत देवजी काय
हा वेळ दुःखितांनां दुखवाया योग्य काय हो होय ७६
येती शीघ्र मिळुनि ते माध्यान्हीं सर्व थोरल्या गावीं
सर्वच दुःखी त्यांनीं स्वीयें दुःखें कुणास सांगावीं ! ७७
त्या दिवशीं लोकांच्या रात्रीं सकुटुंब देवजी जेवी
काम मिळेल तरि बरें ! ऐसें चित्तांत आपल्या भावी ७८
येती आधीं त्यांतें मात्र मिळे नित्य भाकरीवरण
मागुनि कांहीं न मिळे क्षुधिताला पातलें जरी मरण ! ७९
सरकारी सत्रीं ही सर्वांचा होइना समावेश
लेशहि अन्न न मिळतां त्यजती किति जीव वंदुनी ईश ८०
घेउनि मजूर पैसा सडकेवरती कितीक खपतात

ऐकुनि तेथें जाई आनंदें देवजी शिरे त्यांत ८१
कारकुनाला मग तो स्वावस्था सर्व देवजी कळवी
कांतेसह स्वतांला कामा लावावया तया वळवी ८२
सर्व मजूरी करुनी असती मोदें मिळेल जें त्यांत
यापरि गेले त्यांचे दिन ते कित्येक धर्मशाळेंत ८३
कामासक्त तसा तो होता बहु दुष्टबुद्धि कारकुन
आडवणूक करुनियां साधितसे दुष्टहेतु तो टपुन ८४
कामकऱ्यांच्या कांता कन्या भगिनी स्नुषादिकां भुलला
आलें मनीं न त्यांच्या कीं यम देईल काय आधि मला ८५
लावाया नारींना कामावर हौस बहु गमे त्यास
द्रव्य तेणें त्याचें होउनियां सिद्ध वे बहु सुखास ८६
तरुणी सुरम्य दुहिता होती कीं देवजीस एक भली
भोगाया तत्पर तो होय कुधी तन्मनांत ती भरली ८७
बोले मधुर तिच्याशीं पाहे मोहावयास तीस सदा
वाटे तिला हराया माझी हा सिद्ध सर्वदा विपदा ८८
ऐसें करितां असतां चित्तीं त्याच्या जरी भला हेतू
तो सद्व्रतचि देता होता तिजला विपज्जलीं सेतू ८९
परि तो केवळ वाटे तरुणीच्या त्या यशःखगीं केतू
सत्कीर्ति लया नेउनि करणार जगामधीं सदा छी ! थू ! ९०
नेई तिला स्वसदनीं देई खायास गोड गोड सुदा
अंबर कंचुकि देई अह्न कळो दे तिला न तो विपदा ९१
या लोभाचें आहे मूळ परी काय हें कळे तिजला
आचरणानें हळुहळु तद्भाव तिला विषा परी गमला ९२
जाईना सदनाला राही वाऱ्यासही उभी न कदा
पाहुनि ऐसें स्वमनीं जाणे तो दुष्टहेतु सर्व तदा ९३
मायेनें ऐकेना ऐकाया भाग ईस पाडावें

देऊनि दुःख आतां चित्तांतिल इष्ट सर्व साधावें ९४
गेल्यावर कामकरी सर्व घरीं चीजबस्त राखाया
ठेवी तिला सदोदित लावितसे अडचणींत राबाया ९५
काम तिला कष्टाचें त्रासाचें नित्य नित्य सांगावें
कीं दुष्टवासनेला याच्या पुरवावया खुशी व्हावें ९६
हर ! हर ! मनीं ह्मणे ते देवा हें रूप तूं कशास दिलें
येणें मजवरि देवा ! संकट हें सर्वथैव ओढवलें ९७
व्हावें वश याला तरि दुःखानें प्राण बाप सोडील
वश झाल्यें न तरी हा दुष्ट मला पातकांत पाडील ९८
काय करूं सोडिन हें काम तरी हें कसें भरे पोट
देवा ! सत्कार्यमार्गि राखीं माझी सदैव तूं पाठ ९९
झाल्यें असतांनां मी उपवर हा घात घेत दुष्काळ
कोणास दोष लावूं मद्दुर्दैवें जणूं फिरे काळ ! १००
कामकरी कामावर आले नव्हते अशांत कारकुन
आला कामावर तो चित्तीं निज दुष्टहेतुला धरुन १
उपवर चिंतातुर ते बसली होती कुमारिका दीन
येइल कोणी येथें तेव्हां मी भोजनास जाईन २
इतुक्यामध्यें आला पाहुनियां कारकून तो जो कां
टपला होता तिजला टपतो नवनीत खावया बोका ३
भ्याली कुमारिका ती तेथें त्या एकट्यास पाहून
इतक्यांत करानें तो आलिंगी दुष्ट जवळ जाऊन ४
ऐकें मद्वचनाला टाळीन तुझें समग्र मी कष्ट
दीन वदन कां करिशी न्यून न तुज करिसि यास जरि तुष्ट ५
काळें पडे मुख तिचें वदवेना एक शब्द ही तिजला
झाली अधोवदन ते कंप सुटे फार सर्व आंगाला ६
हातानें रागानें जोरानें त्या बराकिला ढकली

तो त्या अनाथ कन्ये - पाशीं तेव्हां करीत गाढ कली ७
घर्मानें डवडवली जाउनियां शुद्धि भूवरी पडली
कोण सहाय कराया दुष्टाला योग्य वेळ सांपडली ८
दुष्कर्म आचरुनियां गेला तेथुनि निघून कारकुन
चित्तीं ह्मणे सफळ मी झालों कीं आजवरि इला जपुन ९
सगुणी सावध होउनि दुःखानें म्लानशी उभी राहे
अश्रूनें भू न्हाणुनि बोले परमेश्वरा मला पाहें १०
दुष्टानें स्पष्ट बळें स्वार्थानें बुडविलें मला आजी
आनंदानें आतां होत्यें मृत्यूस मी विभो राजी ११
सर्वज्ञा सर्व तुला आहे ठाऊक मदपराध न हा
दुष्टानें कंवटाळुनि धरितां अबलेस काय दोष पहा ! १२
मातापित्यांस माझी बहु वाटे काळजी सदा देवा !
दावीं न तोंड त्यांनां त्यांवरि सदया दयाकरा ठेवा ! १३
वार्ता कळतां त्यांचें दुःखानें अंतरंग फाटेल
वाटेल वीज पडली गहिंवर येऊन कंठ दाटेल ! १४
काय करूं दुष्टानें हस्तानें हा विटाळिला देह
मातापित्यांस ना तरि मुकतें ना मी न यांत संदेह १५
आजवरी मज त्यांची देवा ! सेवा असेल जी घडली
ती पाहुनि तारावें त्यांनां जी संकटांत आवडली १६
काय करूं मी जगुनी वागवुनी हा विटाळला काय
मातापितरांच्या या वृत्तें होतील काळिजा घाय ! १७
कोठें जातां सुजनीं वाग्बाणांनीं सदैव टोंचावें
ऐकायास जगावें त्यापेक्षां योग्य या क्षणिं मरावें १८
देवा ! जरि मी मरतें तरि नाहीं मी मुळींच अपराधी
दुर्दैवानें माझ्या जुलुमानें दुष्ट हेतु तो साधी १९
कूपापाशीं जाई राहूनि उभी मिटीतसे डोळे

बाळे या पायानें तैसें मरणें न चित्त हें पोळे ! २०
सर्वेशा ! जगताचा पालक तूं मायबाप सर्वांचा
सर्वज्ञ तूंच असशी जाणसि घडला प्रकार जो साचा २१
यास्तव क्षमा करावी अपराधाची मदीय तूं सदया
ऐसें ह्मणूनि घाली कूपांत उडी त्यजूनि सर्व भया ! २२
वृत्त जयीं कळलें हें तन्मातेला तसेंच जनकाला
दुःसह दुःख गमे बहु दोघे करिती अपार शोकाला २३
आपत्काळीं आह्मां वृद्धांनां सर्वकाळ अनुसरली
अंधाची यष्टि तशी काळानें कन्यका कशी हरली २४
प्राप्तस्थितिमधिं दावी सौख्य, कधीं आढळे न जी रुसली
जननिजनकसेवेमधिं रत, हरिली कन्यका कशी असली २५
आपण आधीं केव्हां खाईना आमच्याविणें कांहीं
बोले उणें न खावें शक्ति अशानें कशी तुह्मां राही ! २६
होणार तें चुकेना कां द्यावा दोष यांत कोणाला
आणुनि चित्तीं ऐसें बोधानें सर्व शोक आंवरिला २७
हें जों दुख सरावें तों त्यांवरि अन्य येउनी पडलें
दुःसह तें सोसाया वृद्धांचें चित्त फार गडबडलें २८
दोघे पुत्र तयाचे कामावर त्यासवें सदा खपती
येतां गृहास बोलुनि मधुरा वाणी तयास सुख करिती २९
कामावरुनी येतां चित्ता मोदास देत विश्राम
आपत्कालीं त्याला वाटे जो सर्व काळ सुखधाम ३०
येतां गोंद्या सदनीं बहु तोषे देवजी मनामाजी
सौख्यें ह्मणे सरी मम पावावी नृपतिनेंहि ना माझी ३१
मातेनें दिधलेली भाकर खाऊनि आणि पिउनि जला
प्रेमानें गोंद्या तो मातेसी मधुर बोलुनी निजला ३२
माता ह्मणे सुखा मी सुगुणी मुलगा मदीय ह्मणुनीयां

पळभर कसें क्रमावें ऐसें आपत्य दूर टाकुनियां ३४
उठला गोंद्या झाला प्रारंभ बाहिर्दिशेस ही वमना
मातापितरांच्या तें पाहुनि कोठें मिळे न ठाव मना ! ३४
झालें द्विवार ऐसें पाहुनि कान्ता करीत आक्रान्त
भ्रमित मनीं जरि झाला समजावी तरि तिला तिचा कांत ३५
गोंद्या विव्हळ झाला बोलाया शक्तिही नसे उरली
मानी आयुष्याची मर्यादा आपुल्या मनीं सरली ३६
पुष्कळ उपाय केले परि नाहीं लेश त्यास गुण आला
हर ! हर ! ! दुष्ट यमानें बालक एक्या क्षणामधीं नेला ३७
बडवी माता हृदया बाळाची बघुनि भेट शेवटली
लोळे धरणीवर बहु शुद्धि तया राहते तिला कुठली ? ३८
देखुनियां हें डोळां तों अश्रू वृद्ध देवजी गाळी
हर ! हर ! ! दुष्टा ! काळा ! नेलें मजला न कां अशा वेळीं ३९
मी वृद्ध विपद्ग्रस्ताहि असतां सौख्यांत काळ घालविला
ज्या बाळांच्या संगें तीं त्वां न्यावीसि काय रे ! काळा ! ४०
दुष्टा मलिना आली माझ्या बाळावरी मरी कुटिला !
एकाएकी माझा सौख्यनिधी केंवि सर्वही लुटिला ४१
हा ! बाळा ! हा ! बाळा ! माता फोडी ह्मणूनियां भाळा
टाकुनि वृद्धेला मज नेलें बाळास कासया काळा ! ४२
तो देवजी गहिंवरे न सुचे कांहीं तयास सुविचार
दुःखा मागुनि दुःखा अनुभवुनी घाबरे मनीं फार ४३
वक्षस्थळ बडवितसे झाला शोकें बहू उदासीन
पुत्रावीण तळमळे होतो पाण्याविणें जसा मीन ४४
गेला ! गेला ! माझा तान्हा आला वयीं न जो तेग
या दुष्टेनें कैसा केला त्याचा क्षणांत मातेरा ४५
न दिसे आतां ऐसा कोणी जो मज जिवंत काढील
हा पुत्रशोक केवळ मज काळाच्या मुखांत वाढील ४६

मराठी ग्रंथ संग्रहालय

तो वृद्ध **देवजी** हो फोडी दुःखेंकरूनि हंबरडे
जरि कोरडेचि झाले नेत्र तरी शोक सांवरे न रडे
पाहुनि मुख बाळाचें केंवि रडें सांवरेल आईला
**गंगा** विव्हळ झाली शोक तिचा तो न वर्णवे कविला ४८
दुष्टेनें दुःख दिलें कूपीं अंधास जेविं लोटावें
किंवा स्तंभें खचतां सदनें कां त्या दिशेस न कळावे४९
बसली प्रीति इची कां यावरि, टाकुनि मसीं अभागीला
वागविला म्यां पोटीं दुःखा घेऊं कुणास भागीला ५०
' आई नको रडूं हे ' **गोंद्या** तव शब्द मी कसे विसरूं
क्रमिलें पळ न तुजविणें टाकुनि आतांच केंवि दूर सरूं ५१
**गोंद्या** ! मधुर अशा रे ! बोले मजजवळ एक वचनाला
नच आला राग कधीं आतां कां पातला तव मनाला ५२
फोडी मस्तक घाली स्वमुखीं घेउनि करी अपार धुळी
चुंबी मुख बाळाचें शोकाला सिंधुसींच काय तुळी ! ५३
घे मांडीवर त्यातें हा ! हा ! शब्दें उराप्रती बडवी
**गोंद्या** ! रे **गोंद्या** ! रे शब्द तिचा प्रतिनराप्रती रडवी ५४
शोकानें पुत्राच्या कन्येच्या क्षीण होय **गंगा** ते
जे प्रिय पदार्थ ते ही होती चित्ता तिच्या असुख दाते ५५
वाटे न सौख्य तिजला त्याजिलें खाणेंपिणें कितीक दिन
पुत्राच्या शोकानें आलें ही शेवटीं तिला मरण ५६
कांता त्यजूनि गेली दुहिता उपवर हि चोखटा बाळ
असुखास **देवजीच्या** अंत न, वाटे तया बरा काळ ! ५७
दुःखावस्थेंत अशा **विश्रामा**सहित काळ तो काढी
**विश्राम** जपे त्याला होइल त्यामधिं उणें न त्या पाडी ५८
तो एकटा मजूरी मिळवुनि आणी घरीं करी कष्ट
उपजीवन दोघांचें चालवि जनकास ठेवुनी तुष्ट ५९

दिवसोंदिवस अधीकचि ताप करी देवजीप्रती दुखणें
आणिक आप्तजनांचा दुस्तर शोकाब्धि त्यास करित दुणें ६०
अक्षय विश्राम तया व्हावें सुख ह्मणुनि फार यत्न करी
तें बहु सौख्य तया दे देवा ! यावर कृपा ह्मणे वितरीं ६१
गुणवंत पुत्र असला असला जरि एक तो बरा देवा
मरतों मी परि यावरि तुमचा तो सकृपहस्त ही ठेवा ६२
ऐसें ह्मणूनि प्राणा एक दिनीं वृद्ध देवजी सोडी
वाटे विश्रामाच्या या वेळीं काळ काळिजा तोडी ! ६३
हा ! ताता ! हा ! ताता ! कैसा हा वेळ मजवरी आला
मी अज्ञ मूल असतां माझा त्वां त्याग बा कसा केला ६४ ।
माता टाकुनि गेली होता पितया ! तुझ्यावरी भार
कां राग असा केला ? बोलुनि शोका करीत अनिवार ६५
आलों आह्मी येथें मातेसह सर्व सोडुनी सदना
सर्वांचा लय झाला प्राप्त न मी जाहलों कसा निधना ! ६६
पितया तुझ्याविणें मी काय करूं जगुनि भूवरी आतां
मजवर कैशी केली एकाएकीच अवकृपा ताता ! ६७
बाळपणीं त्वां अमुचें केलें पोषण बहूत कष्टून
सेवा अल्प न घेतां गेला कैसा मुलास टाकून ६८
पाजील कोण आतां बोधामृत अज्ञ बालकाला या
या अज्ञ बालकावरि तुमच्याविण कोण हो करी माया ६९
काय करूं काळानें वगळुनि मज घेतलें तुला स्वमुखीं
आतां तुजविण कैसा होइन मी या जगांत पूर्ण सुखी ७०
कांहीं विवेक करुनी पितयाचें प्रेतकर्म तो सारी
नेत्रांनीं गाळितसे पितयातें आठवूनि बहु वारी ७१

जिकडे तिकडे पडला पर्जन्य विपुल ह्मणूनि जन सारे

जाती निघूनि जिकडे होती त्यांचीं समग्र घरदारें ७२
**विश्रामाला** कोणी मिळतां ग्रामस्थ तो निघे जाया
हर ! हर ! हें काय विभो ! कोठें मम तात बंधु ही माया ! ७३
काय करूं कैसा मी ताताविण एकटा गृहीं जाऊं
संकट पडतां आतां कोणाला निरसनार्थ मी बाहूं ७४
मित्रासहित निघाला जायाला आपुल्या घराला तो
पूर्वींच्या गोष्टींचा आठव तेव्हां तया असुख देतो ७५
मागें झाडाखालीं बसलों होतों इथें अह्मी सारीं
माता तृषार्त होती मी शोधायास धांवलों वारी ! ७६
या ग्रामीं पूर्वीं मी मातेचे चरण चेपिले होते
असतां कष्टें तैशी उपवासें खिन्न बैसले हो ते ७७
या झाडाला टेंकुनि बसली होती इथेंच ती **सगुणी**
गोष्टी सुखदुःखाच्या बोलुनि येथेंच लोटिली रजनी ७८
येथेंच अह्मां मागें सर्वांना फार जाहली रात्र
या वटवृक्षाखालीं निजलों आह्मी निशांत सर्वत्र ७९
याच नदीवर आह्मी उपवाशी पातलों दुपाराला
प्यालों यथेच्छ पाणी टाकुनि बाधेल या विचाराला ८०
**गोंद्या** येथें थकला उचलेना एक ही तयास पद
मी घेतलें तयाला उचलुनि वाटे मना किती सुखद ८१
या ग्रामीं पहिल्यानें भिक्षा मागावया अह्मी शिकलों
वाटे पित्यास तेव्हां होतें प्राणास मी बरें मुकलों ८२
ताताच्या नयनांतुनि पाणी तें एक सारखें गळलें !
पाउल पुढें पडेना माझें वाटे तयास मन चळलें ! ८३
याच नदीच्या तीरीं खेळतसों नित्य बाळकें मिळुनी
गेलीं निघूनि सारीं आलों मी एकटाच परतूनी ८४
याच ठिकाणीं माझी माता पाऊल ही पुढें घेना

सोडुनि घरदाराला जावें ऐसें तिच्या मनीं येना ८५
तातानें हातानें दिधले येथें पशूंस सोडूनी
तें त्यांच्या नेत्रांतुनि जाती दुःखाश्रु फार वाहोनी ८६
खायास नसे त्यांनां तरि त्यांनीं सोडिलें न आह्मांला
पाठीमागुनि येती यास्तव पडलें पिटाळणें त्यांला ८७
धांवावें रागानें कांठीनें मारवे तया न परी
सोडावें आह्मांला वाटेना त्यांसही तसेंच तरी ८८
आपत्कालीं आह्मां सोडावें लागलें पशूंलागीं
काय असेल तयांची वार्ता असतील कोणत्या जागीं ८९
काय घरें हीं दिसती कैसी हे पातली कळा यांतें
हें घर केवळ आतां खाया ये वाटतें असें मातें ९०
पूर्वी आनंदानें येथें आह्मी समस्त ही बसलों
दुर्भाग्यें मी आतां सौख्याला एक जन्म त्या मुकलों ९१
**विश्राम** आपुल्या तो राहे मग एकटा स्वसदनांत
रात्रूंनि शेतभाती चित्तीं धरुनी परेश हृदयांत ९२
कालांतरें तयानें केलें मग आपलें सुखें लग्न
तें मोद वरी याचे पितृशोकें चित्त जाहलें भग्न ९३
काव्य करावें म्यां हें कांहीं मज योग्यता नसे ऐशी
दुष्काळग्रस्तांची स्थिति पाहुनि होय दुःख चित्ताशीं ९४

## समाप्त.

# जाहिराती.

वासुदेव शास्त्री खरे

"गुणोत्कर्ष" व "समुद्र" या पुस्तकांचे कर्ते, यांनीं रचिलेलें

## यशवंतरायमहाकाव्य,

सर्ग २४— श्लोक १७२९.

**हें काव्य दाक्षिणाप्राईज कमिटीनें पसंत केलें असून ग्रंथकर्त्यास इनाम दिलें आहे.**

किंमत १ रुपया; ट० ख० ८२. किंमतीचे पैसे पुणें येथें रा० रा० हरि कृष्ण दामले असिस्टंट मास्तर, न्यु इंग्लिश स्कूल यांजकडे किंवा ज्ञानप्रकाशाच्या म्यानेजरांकडे, मुंबई येथें रा०रा० वासुदेव मोरेश्वर पोतदार, हेडमास्तर, गिरगांव प्रायव्हेट स्कूल, यांजकडे-आणि मिरज येथें हायस्कूलांत ग्रंथकर्त्याकडे पाठवावे. पुस्तकें विक्रीस तयार आहेत.

पत्ता— वासुदेव शास्त्री खरे,

मिरज.

साधु मामलेदार

श्रीमद् यशवंतराय देवमामलेदार यांचें गद्यात्मक चरित्र महाराजांचें तजवीरीसह "जगदीश्वर" प्रेसांत सुंदर टाईपावर छापण्याचें काम चाललें आहे. दर प्रतीस बारा आणे किंमत.

केशव सदाशिव रिसबूड

धुळें — खान्देश

// # जाहिरात.

## काव्यरत्नावली.

---

प्रस्तुत मासिक पुस्तक १८८७ च्या जून महिन्यापासून सुरू झालें आहे. आजपर्यंत पुष्कळ प्रकारचे विषय प्रसिद्ध झाले आहेत, यांत आलीकडील नामांकित कवींचीं काव्यें प्रसिद्ध होतात. ही रत्नावली अनेक कवींकडून गुंफली जात असल्यामुळें काल्पनिक, ऐतिहासिक, पौराणिक, संस्कृत व इंग्लिश काव्यांचीं भाषांतरें, वगैरे अनेक कविता प्रसिद्ध होतात. उत्तरोत्तर नवीन कवि जास्त मिळत आहेत.

नवीन काव्य रचना करून देणाऱ्या कवींचीं काव्यें तपासण्याचें काम पुढील [काव्यपरीक्षक] मंडळीनें पत्करिलें आहे.

रा० रा० लक्ष्मण रामचन्द्र वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी.

रा० रा० जनार्दन बाळाजी मोडक. बी. ए.

रा० रा० वामन दाजी ओक.

रा० रा० वासुदेव वामन शास्त्री खरे.

रा० रा० गणेश बळवंत मोडक.

या मासांमीं प्रतिमासास २४ पृष्ठें प्रसिद्ध होतात. टपाल खर्चासुद्धां फक्त दीड रुपया किंमत ठेविली आहे. मागाहून दर मुळींच नाहीं. दुसरा अंक पोंचतांच वर्गणी आली पाहिजे.

पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा --

**नारायण नरसिंह फडनीस**

जळगांव-- खानदेश

# काव्यरत्नावली.

( मासिक पुस्तक )

पुस्तक २ रें )   आगष्ट सन १८८८   (अंक १५ वा

त एव पदविन्यासास्त एवार्थविभूतयः ॥

तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



जळगांव-खानदेश येथें

प्रसिद्ध होत असतें.

किंमत चार आणे

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशिलासुद्धां दीड रुपया.

मुंबई "गौरीप्रसाद" प्रेस.

# अनुक्रमणिका


| | विषय. | पृष्ठ | | विषय. |
|---|---|---|---|---|
| १ | जीवितस्तोत्र. | १ | ८ | ग्रीष्म. |
| २ | मित्रत्व. | ६ | ९ | वर्षा. |
| ३ | इंद्रवज्राशतक. | १० | १० | शरत्. |
| ४ | स्फुटआर्या. | १५ | ११ | शिशिर. |
| ५ | मुक्तांजली-स्त्रीकोधशांतवन. | १७ | १२ | ईशप्रार्थना. |
| ६ | सूर्योदय(स्फुटपद्यें.) | २० | १३ | बोध. |
| ७ | वसंत. | २१ | | |

# काव्यरत्नावली.

## अंक १५

# जीवितस्तोत्र.

( विष्णू गणेश नने )

( LONGFELLOW'S )

# A PSALM OF LIFE.

## WHAT THE HEART OF THE YOUNG MAN SAID TO THE PSALMIST.

TELL me not, in mournful numbers,
  "Life is but an empty dream!"
For the soul is dead that slumbers,
  And things are not what they seem.

Life is real! Life is earnest!
  And the grave is not its goal;
"Dust thou art, to dust returnest,"
  Was not spoken of the soul.

Not enjoyment, and not sorrow,
  Is our destined end or way;
But to act, that each to-morrow
  Find us farther than to-day.

Art is long, and Time is fleeting,
  And our hearts, though stout and brave,
Still, like muffled drums are beating
  Funeral marches to the grave.

In the world's broad field of battle,
In the bivouac of Life,
Be not like dumb, driven cattle!
Be a hero in the strife!

Trust no future, howe'er pleasant!
Let the dead Past bury its dead!
Act,—act in the living Present!
Heart within, and God o'erhead!

Lives of great men all remind us
We can make our lives sublime,
And, departing, leave behind us
Footprints, on the sands of time;

Footprints, that perhaps another,
Sailing o'er life's solemn main,
A forlorn and shipwrecked brother,
Seeing, shall take heart again.

Let us, then, be up and doing,
With a heart for any fate;
Still achieving, still pursuing,
Learn to labour and to wait,

---

# जीवितस्तोत्र.‡

## तरुण मनुष्याचें अंतःकरण स्तोत्रकाराला काय ह्मणालें तें.

### आर्या.

"मानवजीवित केवळ निःसार स्वप्न नच दुजें कांहीं"
सांगूं नका असें मज नैराश्यप्रचुरशद्बकवनांहीं. १

---

‡ हें भाषांतर शद्बशः न करितां कांहीं ठिकाणीं कवीच्या हृद्गताचा यथामति खुलासा करण्याचा प्रयत्न केल्यामुळें क्वचित्स्थलीं न्यूनाधिक केलें आहे; तथापि मूळांतील मुख्यार्थ साधवेल तितका कायम ठेवण्याविषयीं यत्न केला आहे.

१ पोकळ २ निराशेनें परिपूर्ण अशा शद्बांच्या कवनांनीं.

कारण सुषुप्त्यवस्थान्तर्गत आत्मा असे सदैव मृत
वाटूनि वस्तु जशा दिसती तैशाच नसति त्या आंत २
ह्मणजे जिवंत असुनी मृतसम नर जो सदा उदासीन
ज्या सुखदुःख ह्मणे तो सुखदुःख असे खरोखरी तें न ३
सत्यप्रपूरित तसें नानाव्यवसायभरित जीवित हें
जीवितपर्यवसान प्राणसदनाविगलनावसान नव्हे ४
"मातीचा तूं असशी मातीला जाउनी पुन्हां मिळशी
आत्म्याला अनुलक्षुनि वदला कोणी कधीं न उक्ति अशी ५
आह्मां जीवां जीवित यात्रा कर्तव्य जी जगीं आहे
तीचा सुखदुःखांतुनि ठरलेला कोणताहि मार्ग नव्हे ६
सुखगिरिशिखरारोहण दुःखसमुद्रप्रवेश यांमधला
एकाहि अस्मज्जीवितहेतु न निश्चित कधींच ठरलेला ७
वर्तन असें असावें अमुचें कीं कालच्याहुनी आज
अंशानें उन्नततर झालों यावें कळूनि हे सहज ८
प्रत्येक कला विस्तृत इतुकी कीं तत्प्रवीण होण्यांस
आयुष्य मानवाचें नाहीं पुरणार सर्व हें खास ९
वेगें ओढित आहे काल परी मानवा निजकरांहीं
गेलेला क्षण पुनरपि येईना एकदां चुकूनीही १०
निःशंक मानवांचीं हृदयें अत्यंत असाति बलवंत
भरलीं असतीं धैर्यें तीं ओतप्रोत हें असे खचित" ११

---

१ निजलेला २ सत्यानें भरलेलें ३ नानाप्रकारच्या व्यवसायांनीं भरलेलें ४ जीविताचा शेवट ५ प्राणांचें घर जें शरीर त्याचें गळणें ह्मणजे मृत्यु ६ सुखरूपी पर्वताच्या शिखरावर चढणें ७ दुःखरूपी समुद्रांत प्रवेश करणें ८ अधिक उन्नत.

परिएकांतस्थानीं शब्द करी हृदय हें अविश्रान्त
कोलनिदर्शकयंत्रीं लोलक करि शब्द ज्यापरी सतत १
पौश्चात्यांचा आपिहितें शवयात्रासमयदुंदुभीनिनाद
जैसा स्मशानसांनिधि हळुहळु सुचवी तसा हृदयशब्द १३
नाना योध्यांचें हें जगविस्तृतघोरसमररण आहे
त्यावर सशस्त्र जागृत असणारा चौकिदार जीवित हें १४
या विश्वरणावरतीं अथवा चौकींत जीविताच्या या
परतंत्र मूक मेंढा कधिंही होऊं नयेस मनुतनया १५
या विश्वरणावरतीं अथवा चौकींत जीविताच्या या
हो शूर वीर युद्धांतिल नायक विजय सर्व मिळवाया १६
हा विजय मेळवाया तुज युद्धज्ञान पाहिजे बहुत
कारण या संग्रामीं तव आरि कामादि असाति बळवंत १७
तव शत्रूच्या पक्षा भर करिती संकटें असह्य सदा
यास्तव त्यांनीं तुज जरि भिववीलें तरि भिऊं नकोच कदा १८
सन्मतिधैर्यविवेक-प्रमुख महा खड्ग जोडुनि अखण्ड
हो सज्ज तूं कराया काममदप्रमुखशत्रुशरखण्ड १९
अत्यानंदजनक जरि करि कोणीही भविष्यकथन तुला
राहूं नको तयावरि ठेवुनि विश्वास तूं कधिंहि अपुला २०
तूझी गतकालस्थिति दुःखपरिप्लुत असे जरी सतत
हृदयोत्साहविनाशक तत्स्मृति जी ती असूं नकोकरित २१

---

१ एकसारखें २ घड्याळांत ३ लोळा किंवा लंबक ४ युरोपाकडील लोकांचा ५ झांकलेला ६ प्रेत स्मशानांत नेण्याचे वेळच्या चर्मवाद्याचा शब्द ७ स्मशानाजवळचा भाग ८ लढाईत ९ कामक्रोधादि षड्रिपु १० तयार ११ काममदादि शत्रूंच्या बाणाचे तुकडे १२ अतिशय आनंद उत्पन्नकरणारें १३ दुःखानें भरलेली १४ मनाचा उत्साह भंगकरणारी

विश्वास धरुनि अंर्तर्हृदिं अंतर्बाह्यगत हृदीत तसा
तूं वाग वर्तमानाविषयींच करुनी विचार रे सहसा २१

व्यक्त करुनि दाखविती आह्मां चरितें खऱ्या महात्म्यांचीं
कीं आह्मांला उन्नत करितां येतील जीवितें अमुचीं २३

उन्नतजीवितयात्रापदचिन्हें कालरूप सिकतेंत
मरतांना आह्मांला मागें येतील ठेवितां खचित २४

पदचिन्हें ऐसीं कीं जीं पाहुनि भंग्न यान दीन दुजा
जीवितगंभीरोदधि-नाविक आशा पुन्हां धरिल धृतिजा २५

तर मग आतां जनहो आळस टाकुनि चला उद्या त्वरित
उद्योगाला लागा कधिंहि फलाशा धरूनि न मनांत २६

अधिकार कर्म करण्या तुज, न फलाशा कदापि करण्याला
या अर्थाची उक्ती सांगे गीतेंत कृष्ण पार्थाला २७

तुमचा उद्योग तुह्मां जों जों जाईल होत साध्य असा
तों तों त्याचा तुह्मी अधिकाधिक पाठलाग करित असा २८

उद्यम करुनि पहावें मिळतें फल काय तें धरुनि धीर
मानवजन्माचा हा उत्कृष्ठ धडा शिका झटुनि फार २९

---

१ आंत असलेल्या हृदयांत ह्मणजे धैर्यादि त्याच्या गुणामध्यें २ आंत बाहेर व्याप्ति करून असलेल्या ३ उन्नतजीवितयात्रेतलीं पदचिन्हें ४ वाळूवर ५ फुटालि आहे नौका ज्याची असा ६ जीवितरूपी अगाध समुद्रांतील नावाड्री ७ धैर्यापासून निघालेली ८ भगवद्गीतेंतील उक्ति "कर्मण्येवाधिकारस्तेम फलेषुकदाचन" ह्मणजे तुला कर्म करण्याला अधिकार आहे फलाची इच्छा करण्याला अधिकार नाहीं.

# मित्रत्व.

## (गोपाळ गोविंद टिपणीस.)

### श्लोक

जैसे शरीरा कर रक्षिताती,
कीं नेत्र युग्माप्रते पक्ष्मणी[1] ती;
कीं याचिल्यावांचुनि या कृतीनें
प्रीत्युक्त साह्या करितात मौनें. १
गोष्टी करी सतत जो सुहृदासमेत,
त्याचा समागम करूनिच जो रहात;
त्याच्यासवें सतत जो करि भोजनातें;
नाहीं सुखी इतर त्यासम जाण येथें. २
ज्याचें सुनिर्मल असे मन, जो उदार,
दुःखींसुखींसम, कथी गुणनीतिसार;
जो प्रीतिनें सरळ वागतसे अशातें,
सन्मित्र हें बहु विशेषण भूषवीतें. ३

### आर्या.

उत्सवसमयीं, व्यसनीं, राजद्वारीं, तसा स्मशानांत.
तिष्ठतसे जो जवळीं विद्वज्जन त्या सुमित्र म्हणतात. ४
आपत्तीपासुनी गरिबातें सोडवूनि मुक्त करी,
सन्मित्र तोचि जाणा व्यसनीं जो घे न पाय माघारीं ५

### श्लोक.

कित्येक हे औरस होति मित्र,
संबंधयोगेंच किती विचित्रः

---

[1] पापणी

वंशक्रमानें बहु मित्र होती,
साहाय्य द्यायास तसेच येती ६
रोगें जया फारच पीडियेलें,
द्रव्यें जया सोडुनि दूर केलें;
शोकानलें फाराचि दग्ध झाला,
सन्मित्र हें औषध त्या नराला. ७
ज्याच्या अहो! दर्शनसंगमानें,
किंवा जयाच्या मृदु वैखरीनें,
जातें द्रवूनी जरि सर्व चित्त,
सन्मित्र त्यातें जन बोलतात. ८

## आर्या.

माता, भ्राता, कांता, यांवरि किंवा न आत्मबुद्धिवरी
विश्वास धरिसि, कोकीं धरिं निष्कपटीं सुहृज्जनींच परी. ९

## श्लोक.

जो शत्रुंच्या पासुनि रक्षिताहे,
दुःखाब्धिमाजी नव नाव पाहे;
जो प्रीतिचें विश्वसनीय पात्र,
ऐसा असे तोचि खरा सुमित्र. १०
योजी हिता सकळ वारुनि दुष्कृतींतें,
गुह्यांस गुप्त करि सांगुनि सद्गुणांतें,
आपत्स्थितींत न कधीं त्यजितो जनातें,
सन्मित्र सुज्ञ ह्मणतात अशा नरातें. ११
आपत्ति येतां त्यजिती अज्ञांतें,
सांगूनि हेतूस सुमित्रही ते;

---

१ वंशपरंपरेनें २ भ. षण

बांधावया धेनुसुतर्णकातें,
जंघा तिची स्तंभसमान होतें. १२
पाहूनियां आपुलिया सखातें.
ज्याला मनीं फाराचें सौख्य होतें,
दुःखा पहातां करि जो सुदुःखा,
सन्मित्र हो एकचि तो विलोका. १३
आली विपत्ती जरि आपणातें,
सोडी न, देई परि जो धिरातें;
सन्मित्र ऐसा मिळवावयातें,
सद्भाग्य आह्मांस खरें हवें तें. १४

## आर्या.

बुद्धिगुणां खर्चुनिही मित्रपदाचा सदर्थ नच कळतो,
स्नेहाच्या योगें परि कार्य कराया सुमार्गही मिळतो १५

## श्लोक.

याचा तसा आणिक भेदहि गुह्यतेचा,
नैष्ठुर्य वा सतत भेद तसा मनाचा;
खोटेपणा सतत कोप तसा जुगार,
मैत्रीस दोष असतां जगिं सात थोर १६
तोंडावरी वाक्[3]सतेस पूर, ॥
मागेंचि जो नाश करील थोरः
त्यागा तयातें, न कधींच माना,
दुग्धाननांचा विषकुंभ जाणा. ॥ १७
घेतो तसें देइ पुन्हां तुह्मांतें,
ऐकोनि गोष्टी कथि गुह्य जें तें,

---

१ शद्बाचा २ काठिणपणा ३ वाणीचा गोडपणा ४ तोंडांत ज्याच्या दूध असा·

नेवी तसा घालिहि भोजनातें,
हीं प्रीतिचिन्हें कथिलीं तुह्मांतें. १८
वाणी अर्धी जोडितसे प्रियातें,
उत्पन्न माया जननी करीते,
सौंदर्यभावीं प्रियता कमी ती,
वाग्जातबंधु प्रिय फार होती. १९
नाहीं समागम हितावह दुर्जनांचा,
स्वर्गांत तो जरि असेल तरीहि साचा
त्याहूनि हो बहुत होय बरी खचीत,
शैलावरी वसति हिंस्रपशूसमेत, २०

छाया थोर जशी प्रभातसमयीं ल्हेवी पुढें होय ते,
मैत्री थोर तशी मुळीं असुनि जी पश्चात् क्षया पावते
देखा दुर्जनसंगती सतत हे मोठी अर्धी भासते,
पश्चात् होउनि अल्प, फार अपुल्या चित्तास दे त्रास ते. २१
जैसी मध्यदिनीं लहान दिसते छाया पुढें थोर ती
मित्र प्रीतिहि सान हो प्रथमतः होते पुढें ज्याजती
देखा सज्जनसंगतीहि गमते आधीं बहू अल्प ती,
वाढूनी सुख तें खरोखर किती दे आपणा पूढतीं. २२
पाण्याशीं सहवास अल्प घडतां दुग्धीं घडे एकता,
झाला ताप.तयास पाहुनि जला आधीं घडे नष्टता;
भक्षी अग्नि जलास पाहुनि असें ये दुग्ध रागें वरी,
पाण्या भेटवितांचि शांत बसतें मैत्रीहि ऐशी खरी. २४
प्रीती वाढवि आणि नित्य नयनां आनंद जो देतसे,
तैसा जो सुखदुःखपात्र असतो स्नेही खरा तो असे ;

१ सेखपणात २ झटलेला ३ डोंगरावर ४ लहान

येताती बहु सोबती जमुनियां भाग्योदयीं आपुल्या
आपत्काळदशा शिरे सकल तों जाती त्यजे.नी भल्या २१
गेलें पद्म जरी सुकून तरिही हंसी न त्या त्यागिते,
सोडूनी परि दुष्ट भृंग म्हणित्या होती कसे दूरते ?
मित्रातें त्यजुनी तसे गतधना जातात जे का दुरी,
जाणूनी अति नीच त्यांप्रति, दुरी त्यांपासुनी व्हा परी. १५

---

# इंद्रवज्राशतक.

## ( मोरो गणेश लोंढे )

### श्लोक.

उत्पन्न ज्या पासुन विश्व होई
ज्याच्यामधीं संतत ठाव घेई
अंतीं जयाच्यामधिं नाश पावे
तें ब्रह्म सोडून कुणास गावें १

ध्यायास तीं चुंबन एकवेळीं
मातापिता उत्सुक फार झालीं
काढी मुखा तों मधुनी गणेश
चुंबीतसे शंकर पार्वतीस २

तेणें तिघांला बहु हास्य आलें
शर्वाप्रती कौतुक थोर झालें
लज्जा करी म्लान तरी सतीला
मी वंदितों त्या कुतुकप्रियाला ३

---

१ गरीब कंगाल २ गणपतीला.

मी पार्वती औषधि शोधितों कीं
जीतें अपर्णा ह्मणतात लोकीं
प्राशून शूळीहि हलाहलाला
सेवून मृत्युंजय जीस झाला ४

पाषाणता साखर काय घेते
द्राक्षा पहा म्लानमुखी दिसे ते
गेली सुधा कायं नभांत साची
ऐकूनियां कीर्ति सुभाषिताची. ५

ज्याला नसे ज्ञान सुभाषिताचें
ज्ञात्यांमधीं स्थान तयास कैचें
मूकत्व येई सुसभेंत त्याला
ऐसा असे मान सुभाषिताला ६

लोकांत विद्येसम वस्तु नाहीं
राही तिच्यामाजि अपूर्वता ही
जों जों करावा व्यय वाढ घेते
संरक्षितां मात्र उणीव होते! ७

विद्येविणें जीवित होय तुच्छ
श्वानाप्रती भार तदीय पुच्छ
झांकावया गुह्य न योग्य होई
माशांस वारूं न शके कदाही ८

हातांत विद्या जरि एक साची
चिंता नसे पोट भरावयाची

१ पर्वतसंबंधीं औषधि किंवा पार्वती हीच औषधि २ पर्णरहित किंवा पार्वती ३ शूळरोगवान किंवा शंकर ४ मृत्युला जिंकणारा किंवा शंकर ५ तोंड सुकलेलीं ६ अमृत ७ विशेषपणा ८ खर्च

बोलूनियां पोपट रामराम
लाधे सुभक्ष्यास बसून ठाम ९
स्वर्गामधीं निर्जर[1] राहताती
आह्मांस या भूतळिं होय वस्ती ।
गोडी कशी थोर पुसूं कशांत
काव्यीं रसाळीं अथवा सुधेंत १०
तीं तीं पदें नित्य फिरून येतीं
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती
कौशल्य मोठें रचनेंत आहे
तें काव्य तेणें नव वाटताहे ११
वाणी कवीची असुनी रसाळा
गाई जरी ती प्रभुला कृपाळा
होईल मान्या सकलां बुधांला
मोत्यामुळें शुक्ति[2] जशी जनांला १२
लाटेवरी लाट नवी उठावी
सिंधूंत[3] केव्हां हि न ते खळावी ।
लाटा रसाच्या उठती न ज्यांत
तें काव्य कैसें वदवे दहांत १३
ज्याचें असे काव्य रसाळ फार
लोकां नवीना रुचि दे अपार
लोकांमधीं कीर्तिशरीर त्याचें
रोगाविणें तें चिरकाळ वांचे १४
काव्यें करावीं बरवीं कवींनीं

---

१ देव २ शिंपला ३ समुद्रांत.

ध्यावें गुणांलागिं सदा बुधांनीं
झाडें फुलें मात्र विकासवीती
वायू सुगंधा परि दूर नेती १५

काव्यांतलें मर्म जया कळेल
ज्ञाता जगीं या विरळा मिळेल
शोधूनियां पुष्परसास घेणें
भृंगा जसा केवळ एक जाणें १६

वन्दीन मी त्या कवि वाल्मिकीला
जो चंद्र कीं अन्य जनांस झाला
रामायणाच्या नवचंद्रिकेनें
सुज्ञां चकोरां भरिलें सुखानें १७

अर्थास लक्षून निघेल वाणी
सामान्य बोले जरि लोक कोणी
लक्षून वाणीप्रति अर्थ धांवे
ऐसें परी वाल्मिकिनें वदावें १८

कोणी कवींची गणना करावी
हें एकदां स्वीय मनांत भावी
बोलूनियां एक कनिष्ठिकेला
त्या कालिदासार्थ मिटून ठेला। १९
तैसा दुजा त्या कवि आढळेना
मोडावया बोट दुजें मिळेना
तन्नाम तेथून अनामिका हें
अन्वर्थ लोकांमधिं होय पाहें २०

---

१ त्या दुसऱ्या बोटाचें नांव.

वाणी गमे त्या भवभूति साठीं
घेई सुजन्मास नगेंद्र-पोटीं
कारुण्य[2] नाहीं तर ऐकुनीयां
ग्रावा न लागेल कधीं रडाया ! २१

जन्मून कन्या मग शीघ्र सांडी
कन्यापणालागिं जसा शिखंडी
प्रागल्भ्य[3] येवो बरवें ह्मणून
वाणीच वाटे मज होय बाण ! २२

अग्नी जगीं तीनहि वेद तीन
स्थित्यंतरा कारण देव तीन
आहेत लोकीं गुण तीन जैसे
दंडी करी ग्रंथ हि तीन तैसे २३

ऐके कधीं उत्तम गायनाला
वाचावया शास्त्र कधीं भुकेला
गुंतून राहून परोपकारीं
लोटीतसे काळ कधीं विचारी २४

दे त्रास भांडूनि सदां जनांला
निद्रा तशी फार रुचे जयाला
कीं घालवी तो व्यसनांत वेळ
ऐसे करी मूर्ख अनेक खेळ २५

---

१ भवभूति, कवीकरितां, शंकराच्या ऐश्वर्या करितां २ करुणा ३ धीटपणा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# स्फुट - आर्या.

( माकंद - कवि. )

## आर्या.

पतिसंनिध नवनीता नवनीतासमसुकोमळा मधुरा
वज्रकठिन कुचयुगुला ते सुकृती जे पिती तिच्या अधरा १
तुजहुनि सुंदरि! सुंदर असतिल नारी परी मला प्रिय तूं
पद्मिनिला त्यजुनि भजे रवि नलिनिस काय त्यांतला हेतू २
परपुरुषनिरतविधवा तारुण्यापगमभीरुमनतरुणी
उदरंभरि वेश्या या; तनयप्रसवें न होति मुदित मनीं ३
ऋतु येतां वल्लीपरि होते जी पुष्पिता मृगांकमुखी
हतभागी नर केवळ पुष्परसें अलि तदैव होति सुखी ४
सत्कारी तुज जी ती नलिनी तूं भृंग एक दैवाचा
काय नरांचें पातक न मिळे ज्यां एक शब्दहि सुखाचा ५
सायंकाळीं वेश्या प्रातःकाळीं तदन्य वेणिफणी
करितां वाटे विटशशि नलिनी त्या या पती न कैरविणी ६
मन हें शकट तयाला विकार हय नेउं बघति भलतिकडे
बुद्धिखलीन न यत्करिं भवभयकूपांत तो कसा न पडे ७
पुत्रापरि कलशा! तुज कटिं खांदीं घे शिरींहि रामा जी
तदुरोजस्पर्धेच्छा काय कृतघ्ना तुझ्या मनामाजी ८
दोन्ही हस्त शिरोगत धरावया कलश गुंतुनी गेले
दुर्दैवें प्रियनिकटीं अशांत वातें विवस्त्र कुच केले ९
शशिसम धवल, शशिकरांसम. शीतल, मध्यरात्रिसम शांत
रमणसिह रमणीयहि, जागीं दिसतें एक साधुचें स्वांत १०

---

१ लोण्यासारखा २ आसक्त ३ गाडी ४ प्रिय पुरुषासमीप ५ अंतःकरण.

राग क्षणांत येई, क्षणांत जाई, जिचा अशी कांता
क्षण कलहें, प्रणयें क्षण, दीर्घयुगा सम करि क्षणेंकांता ११
कांता असतां क्रीडा करितां करितांच रात्र संपावी
नसतां दुःखें मिळुनी कामिजनां झोंप काशि न ती ठावी १२
वारांगना नव्हे ही मूर्तिमती पापवासना वाटे
अथवा तद्घातक ही भुजगी जाईल जो हिच्या वाटे १३
गणिकासंगें भंगें बळ निर्मळही सुयश मळायाचें
ती कोंसानें काळिज कापिल केंव्हा न तें कळायाचें १४
सरितेशांतवरूनी दिसशी परि आंत नक्रसुसरीचे—
गण किति असातिल! नोहे कपट असें नारिहूनि दुसरीचें १५
गंडस्थालें निजमौक्तिक निजगुण झांकूनि ठेउनी द्विरद
भूपार्पितपुष्पस्रक्तुष्ट असशि काय यांत दोष वद १६
कांतामुखिचा तांबुल कामांधा काय सुरस वाटतसे
पिकपात्रिं तोचि पडतां शिवति न त्या स्थल महत्व हें ऐसें १७
अबलातनु कोमल तीसह ही स्पर्धा न तूं करूं चुकशी
कुसुमा! सुमनस्त्वाची ख्याती गाती तुझी तरीहि कशी १८
कष्टी न होइं घन तूं निर्जल तुज कोण चातकी लक्षी
कुंभा नको भिऊं तूं निर्धन तुज कोण भूमध्यें रक्षी १९
दिवसाहुनि या रजनी दीर्घ मला वाटतात पंथिका हे
तरि मज अनन्यगतिके हें दक्षिण अयन सांग कां आहे २०
वद काय कथुं पाथिक मज कर्मव्यावृत बघूनि मत्पति तो
'कांते पुरे पुरेगे' ऐसें मज ह्मणुनि ह्मणुनियां दमतो २१
चपल स्त्री ह्मणुनि तुझें मुख काळें होइ घन विलुप्तवें.
ती पारे कनकाभरणा इकडुनि तिकडे पहा कशी मिरवे २२

१ वेश्या. २ नदी. ३ हत्ती. ४ प्रासाद.

मेघा किमर्थ रडशी पडशी दुःखें किमर्थ भूवरतीं
अथवा काय निमित्तें लागात चपला निज अशा परतीं २३
घन एक शद्ब बोले तीं ती टाकी नभा दणाणून
चालुं न देती पतिचें चपल द्विगुणित बळास आणून २४
जगिं अस्तित्व सुखाचें दुःखाचा मूळ होय हा पाया
दुःखाच्या योगानें आला मोठेपणा सखे वांया २५
मदनें यौवनलक्ष्मी तव कुचकुंभांत ठेवेली आहे
दावि न ती इतरांला मुग्धे! आशि ती सुरक्षित न राहे २६
क्षणभर एक तरूवर पक्षि बसुनि जाति अन्य तरुवरती
सोडुनि एक पराला तरि युवतिमनें प्रतिक्षणीं वरती २७
जरि कूप खोल खणला तरि नच येई अन्यात्रिणें पाणी
धरणीला मात्र घडे व्यर्थचि तो त्रास हें मनीं आणीं २८
जोंपर्यंत विटाच्या निर्घृणतेचें न जाहलें ज्ञान
तोंवरि ताशी गणिका त्या तेवीं भज तूं सदैव भगवान २९

---

# मुक्तांजली- स्त्रीक्रोधशांतवन.

———00———

(एकनाथ गणेश भांडारे).

Fie! Fie! unknit that ... ... brow.
Shakspeare.

## आर्या.

छी! छी सखे! अशा तूं, आठ्या घालूं नको कपाळास
स्वत्प्राणप्रियहृदया, विधु नको क्रोधदृष्टिनें खात! १

---

१ कांहीं वर्षांपूर्वी विविधज्ञानविस्तारांत ह्याच विषयावर उमा व रमा यांचें संुदर भाषण आलेलें वाचल्याचें स्मरतें.

कारण तो तव ईश्वर, तव हृदयानंद तो तव स्वामी
एक सखे! तूं माझे, ह्मणुनि तुजा आज सांगतें जें मी! २
हें त्वदुलक्षण बाई! त्वत्सौंदर्यास डाग लावितसे
सुंदर चंद्रकलेला, तो बघ काळा कलंक जेंवि दिसे! ३
ही त्वाद्दुष्कृति करिते, गाते कुंठित गो!तुझ्या सुकीर्तीची
मोठाल्या वावटळी, स्थिति करिती जेंवि सुमनकलिकांची! ४
ऐशा कुटिल स्त्रीची, चाड तरी सांग कोण ठेवील!
प्रेम तरी तिजवरतीं,तत्पतिचें केंवि सतत राहील? ५
मधुर जलाचा आहे,अतिसुंदरसा जिवंत एक झरा
परि त्याचें जल ढवळुनि, केलें कोणीं गढूळ त्यास जरा ६
कीं तत्सौंदर्याची, माती झालीच हें मनीं समज!
मग कोण तृषित तिकडे, उत्कंठेनें बघेल सांग मज! ७
गोष्ट स्त्रीचीहि तशी, आहे हें मी किती तुला सांगूं?
बाई!तूं नवऱ्याच्या, आनंदाला कधीं नको भंगूं! ८
गे!स्त्री असली मोठी, सौंदर्याची मनोहरा खाणी
पण जर ती कोपिष्टा, असुनि नसे मधुरता तिच्या वचनीं! ९
कोण तिला मग पुसतो, ती खाया काळ धराणिला भार!
संसार तिज कशाचा! तद्गुण करि तिचाच बेजार! १०
कांत तुझा तव ईश्वर तव जिवलग, तव अतिप्रियप्राण!
त्याविण तव संरक्षक, तव भाग्याचा प्रभू असे कोण! ११
बाई! तुझ्याचसाटीं, त्वत्पति बाहेर सारखा खपतो
किति सांगुं मी तुजला, सतत तुझी काळजी मनीं करितो १२
तुजकरितां अतिप्रिय गे! केंव्हां केंव्हां जलप्रवास करी
हिंडे गांवोंगांवीं, चाकरिला करुनि भाकरी स्वकरीं १३

वरवसल्या तुजलागीं, सुख व्हावें ह्मणुनियां निरंतर तो
रात्रंदिनीं खपूनी, अगणित काबाड कष्ट गे! करितो! १४
असतां नौके माजी, अफाट झालें तुफान जलनिकरीं
तरि तो स्वतां जिवाची, तिळभर सहसाहि काळजी न करी १५
किंवा शीतल देशीं, चालायाचा प्रसंग जरि आला
तरि तो त्वदर्थ थंडी, सोसुनि बाई सहर्ष नौकरीला. १६
परि तूं इकडे सदनीं मांडी घालुन खुशाल बसतेस
असतां असें सखे! तूं, कां मग नवऱ्यावरीच रुसतेस? १७
सत्यप्रेम सदोदित, आनंदी वृत्ति, आणि नम्रपण
यांवेरिज तुजपाशीं मागत नाहीं दुजें तुझा रमण १८
आण मनीं तव पतिचे, तुजवर जे जाहलेत उपकार
दान तुझें हें[1] यांच्या पासंगासहि मुळीं न पुरणार १९
हें जरि देणें देऊं लागलिस प्रियसखे तुझ्या पतिस
उपकार त्यांत कैंचा? कर प्रजा देतसेच भूपतिस २०
करनकरी, अतितुसडी, खव्याळ, कुचरी, कजाग अभिमानी
बाइल असुनी ऐशी, प्रत्यहिं गे जो पतीस अवमानी २१
ती स्त्री नामें केवळ, बाकी प्रत्यक्ष पापिणी चंड
न कळे करील केव्हां, पतिचा विश्वासघात ती रांड २२
रत असणें पतिसेवीं, प्रेम पतीवर खरें असूं देणें
पतिच्या अर्ध्या वचनीं असणें हें युवतिचें पवित्र जिणें. २३
मग कां तुह्मीं[2] उठतां बसतां कलहास गे! प्रवर्तावें?
हार न मानुन इतरां, व्यर्थ तमाशे कशास दावावे? २४
तुम्ही बाया इतक्या, हलक्या आहां ह्मणून मजलागीं
दुःख अहा! जें होतें, बाई! तें किति वदेल अबलांगी[3]! २५

---

१ सत्यप्रेम इत्यादि २ तुझ्यासारख्या सर्व बायकांनीं ३ सरस्वती.

कारणपरत्वयोगें, कोपाग्नी भडकलाच जर पतिचा
मौनव्रता धरावें, ज्ञान न द्यावा तयास उत्तरातिचा २६
स्मितवदनीं, मृदुवचनीं, अथवा युक्ति प्रयुक्ति योजूनी ॥
शमवावा द्रुत पतिचा, राग सखे! पडाते बाजु घेऊनी ॥२७॥
स्त्रीजातीला नाजुक संदर. भयभीत आणि बलहीन ॥
देवानें कां केलें, सांग मला त्वरित वेळ पल ही न ॥ २८
तन्मन, लक्षद्गुण हीं, दोन्हीं त्यांच्या सुरेख रूपास ॥
पूर्ण उतरावीं, ह्मणुनि तुला मीच सांगतें खास, २९

---

# स्फुटपद्यें.

---

## सूर्योदय.

---

(यशवंतराव कमलाकर.)

श्लोक.

कोकांना सुख द्यावयास उडुंच्या वृंदास लोपावया
तेजालागि हरावयास विधुच्या, आशास भूषावया
अब्जांना उघडावयास कुमुदां झांकावयाला अहा!
येतो हा उदयाचलावरि कासा चंडांशु आतां पहा १
झालें असिक्त सारे अवनितल पहा कुंकुमाच्या रसांनीं
होते जे पद्मकारागृहगत सुटले भृंग ते त्यामधुनी
गोवृंदें व्यापिलेल्या दिसति दशदिशा शब्द होतो द्विजांचा
ऐंद्रीला पुत्र होतो ह्मणुनि सुरजनीं मानिला हर्ष त्याचा २

---

१ चक्रवाकपक्ष्यांना २ ताऱ्यांच्या ३ युक्त ४ पक्ष्यांचा.

गेले पद्मामधूनी भ्रमर उडानियां कोटरांतुनि गेले
पक्षी सारेचि तारे गगनतल कसें सोडुनी लुप्त झाले
गेल्या क्रीडागृहातें त्यजुनि युवति हा, नित्य कार्यास, येतो
हा तेजोराशि भानू उदयगिरिवरी अंधकारप्रहर्ता.

## वसंत.

### आर्या.

वृक्षावरि शाखेचा तरुणीजनमानसांत कामाचा
फुटला अंकुर मधुनें युवजनहृदयांतही विलासाचा १

### श्लोक.

कोकिल स्वरें वनीं करितात
आम्रवृक्ष फुललेचि समस्त
पुष्पगंध पसरोनि दिशांत
देतसे परम हर्ष मनांत २

आहे सांप्रत हा वसंत ह्मणुनी आकाशगंगेवरी
येतां हा विधु दिक्स्त्रियासह जलक्रीडा कराया बरी
हातीं घेउनि ये पुढें तंव गुलालाचा पुडा पूर्वेते
चंद्रें पाहुनि तो करें उडविला संध्याच ती वाटते ३

## ग्रीष्म

### आर्या.

तोषद हो जन परिचय गोपानिचे कर कठोर होतात
तृष्णाहि ज्यांत न शमे कलिसम असतात दिन निदाघांत १
अति तीक्ष्णत्व रवीनें, दिवसें दीर्घत्व, रात्रिनें लघुता
वरिली ग्रीष्मर्तुमध्यें या दाहीं दीनता पहा आतां २
त्याजिलें जलें तडागा जलासि कमलें तयास भृंगानें
वरिलें कीं लघुतेनें रात्रीला तेंवि चंद्रानें ३

---

१ झाडांच्या भोकांतून २ शद्ब ३ दिशारुपस्त्रिया. ४ संतोष देणारा ५ मुर्खाचा पक्षी जलाचा संग ६ कलियुगासारखे ७ सरोवराला.

## वर्षा

### श्लोक.

वर्षे वर्षेत तोयाच्या धाराधाराधर स्वयें
वने वनेंही भरली तेणें ते नेणती कसें १
गर्जे मेघ नभीं विजा चमकती वारा बहू सुटला
तेणें धुळि उडे सहस्र करही अभ्रामधें लोपला २
झाली व्याप्त मही तमें सुचविते ऐशारितीनें जनां
वर्षा स्वागमनास; पाहुनि बहू आनंद होतो मना ३

---

## शरत

### श्लोक.

वाटे काशसुमें करूनि वसुधा शुभ्रांबरा नेसली
मुक्तांची जणुं माळ हंसततिच्या व्याजें वरी घातली
हास्याचे नवकुंदकैरवमिषें घालूनियां डागिणें
आला कांत शरत् ह्मणोनि नटली वाटे क्षिति प्रीतिनें १

---

## शिशिर

### श्लोक

न बहु शीत न उष्णहि फारसें
सुखद मंदसमीर वहातसे
सकलही ऋतुमाजि विशेष हा.
शिशिर सौख्यद होय जनां अहा ! १

---

# १ ईशप्रार्थना.

——00——

(अण्णा देशपांडे)

——00——

विश्वातें जानिता सदैव असशी त्राताहि तूं ईश्वरा
सत्तेनें तुझियाच लाभति सुखें आबालवृद्धां नरां
लोकाच्या तनुला असो सुख, वसो तच्चित्ति सद्वासना
वंदोनी सदया! प्रभो! करितसें ऐशी तुला प्रार्थना १

विद्या, ज्ञान, तशी स्वधर्मरति, तूं देई जनां भारती[1]
देशाचा अभिमान शौर्यसमयीं सत्कार्यनिष्ठामती
वीरश्री, बल, राजनिष्ठपण ही धैर्यादि दे सद्गुणां
वंदोनी सदया! प्रभो! करितसें ऐशी तुला प्रार्थना २

उद्योगार्थ सुबुद्धि दे सतत तूं देशोन्नती व्हावया
व्यापारोद्यम दक्षता बहुत दे ईर्षाहि तैशी तयां
व्हाया ऐक्य जनीं झटोत अवघे दे बुद्धि ऐशी जनां
वंदोनी सदया! प्रभो! करितसें ऐशी तुला प्रार्थना ३

विश्वेशा! सदया! सनातन अशा धर्माचिया पालका
रक्षीं लोकपते जनांस षड्रीपासोनि दुष्टांतका!
बंधुप्रेम वसो निरंतर मनीं त्यागोत दुर्वासना
वंदोनी सदया! प्रभो! करितसें ऐशी तुला प्रार्थना ४

देशोत्कर्ष करावया स्वकलहा त्यागोनि ऐक्यास्तव
देशप्रीति वसो खरी जनमनीं मिथ्या न वाक्पाटव[2]
प्रेमें ऐक्यमतें झटोत अवघे हे आर्य हिंदूजन
वंदोनी सदया! प्रभो! करितसें ऐशी तुला प्रार्थना ५

---

१ भरतखंडांतील जनास २ वक्तृत्व.

# बोध.

——00——

## आर्या

कृपण कुणाला हंसती दानव्यय जो करीतसे सुमती
निंदिति त्या धनलोभी जैशा असती पतिव्रते हंसती १
दैवत कोण नराचें मातापितृ वंद्य असति मनु बोले
मातापितरां सेवुनि पुंडलिकें विठ्ठला उभें केलें २
नलिनीदलगतजलसम चंचल आहे जगांत हो काय?
दूरद्रष्टे वदती यौवन जीवित तसेंचि धन होय ३
भूषण काय नराला वदणें प्रिय तथ्यपथ्य जी वाणी
"अनृतान्न परं पापं" व्यासादी कथिति सत्य हे मानी ४
विद्या भूषण केव्हां विनय धरावा नरें जगीं अंगीं
शोभे विनयें विद्वान् जेंवि हिरा कोंदणांचिया संगीं ५
ऐश्वर्याचें भूषण अंगीं सौजन्य नम्रता असणें
होतो तरुवर नम्रचि फलभारें उच्चता कदा नेणें ६
गृहकलहातें कारण गृहिणीप्राबल्य मुख्य वदतात
न स्त्री-शिक्षण तोंवरि दूषण ठेणें नव्हेचि हें उचित ७
दुःखद बहु काय गमे मर्मवचनतें सदा मनीं सलतें
नाहीं बुजत कधीं ही वाग्बाणक्षत असह्य हें गमतें ८
स्नेह कसा सतत टिके न करि जरि वाग्विवाद मित्राशीं
व्यवहार धनाचा ही भाषण त्याच्या त्यजीं कलत्राशीं ९
त्याज्य जनीं कोण असे दुष्टा भार्या कुबुद्धि तो पुत्र
द्रुष्टा बंधु असद्गुरु अविवेकी नृप तसाचि शठ मित्र १०

---

१ दुराचारिणी स्त्रिया २ कमलावरील जलबिंदूप्रमाणें.

# जाहिराती.

वासुदेव शास्त्री खरे,

" गुणोत्कर्ष " व " समुद्र " या पुस्तकांचे कर्ते, यांनीं रचिलेलें

## यशवंतरायमहाकाव्य,

सर्ग २४-श्लोक १७२९

**हें काव्य दक्षिणाप्राईज कमिटीनें पसंत केलें असून ग्रंथकर्त्यास इनाम दिलें आहे.**

किंमत १ रुपया; ट० ख० ९ आणे. किंमतीचे पैसे पुणें येथें रा० रा० हरी कृष्ण दामले असिस्टंट मास्तर, न्यू इंग्लिश स्कूल यांजकडे किंवा ज्ञानप्रकाशाच्या म्यानेजरांकडे, मुंबई येथें रा० रा० वासुदेव मोरेश्वर पोतदार, हेडमास्तर, गिरगांव प्रायव्हेट स्कूल, यांजकडे- आणि मिरज येथें हायस्कुलांत ग्रंथकर्त्याकडे पाठवावे.

**पत्ता**—वासुदेव शास्त्री खरे,
मिरज.

(सौ० काशीबाई कानिटकरकृत.)

कै० सौ० डा० आनंदीबाई जोशी यांचें चरित्र.

सदर्हू पुस्तक लिहून तयार झालें आहे. बाळपणापासून तों अखेरपर्यंत सविस्तर लिहिलें आहे. पृष्ठें ३०० वर होतील. हें सुंदर खिळे छापानें छापलें जाईल. निदान ५०० वर्गणीदार मिळाल्याखेरीज छापतां येत नाहीं. आगाऊ किंमत दीड रुपाय. पुस्तक व्ह्याल्यूपेएबल पार्सलनें पाठवूं.

**पत्ता**—रामकृष्ण भिकाजी कुळकर्णी,
नूतन मराठी विद्यालय-पुणें.

# जाहिरात.

## काव्यरत्नावली.

प्रस्तुत मासिक पुस्तक १८८७ च्या जून महिन्यापासून सुरू झालें आहे. आजपर्यंत पुष्कळ प्रकारचे विषय प्रसिद्ध झालेले आहेत, यांत आलीकडील नामांकित कवींचीं काव्यें प्रसिद्ध होतात. ही रत्नावली अनेक कवींकडून गुंफली जात असल्यामुळें काल्पनिक, ऐतिहासिक, पौराणिक, संस्कृत व इंग्लिश काव्यांचीं भाषांतरें, वगैरे अनेक कविता प्रसिद्ध होतात. उत्तरोत्तर नवीन कवि जास्त मिळत आहेत.

नवीन काव्यरचना करून देणाऱ्या कवींचीं काव्यें तपासण्याचें काम पुढील (काव्यपरिक्षक) मंडळीनें पत्करिलें आहे.

रा० रा० लक्ष्मण रामचन्द्र वैद्य एम्.ए. एल्. एल्. बी.
रा० रा० जनार्दन बाळाजी मोडक बी. ए.
रा० रा० वामन दाजी ओक.
रा०रा० वासुदेव वामन शास्त्री खरे
रा० रा० गणेश बलवंत. मोडक

या मासाचीं प्रतिमासास २४ पृष्ठें प्रसिद्ध होतात. टपालखर्चासुद्धां फक्त दीड रुपया किंमत ठेविली आहे. मागाहूनचा दर मुळींच नाहीं. दुसरा अंक पोंचतांच वर्गणी आली पाहिजे.

पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा:—

**नारायण नरसिंह फडनीस**

जळगांव- खान्देश.

# काव्यरत्नावली.

पुस्तक २ रें. ] सपटेंबर सन १८८८ [ अंक १६ वा.

त एव पदविन्यासास्ता एवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



## जळगांव-खान्देश येथें
## प्रसिद्ध होत असतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हसिलामुद्धां दीड रुपया.

भुसावळ "खानदेशमित्र" प्रेस

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | वासवदत्ता .... .... .... .... .... .... | १ |
| २ | उजवा आणि डावा हात .... .... .... .... | ६ |
| ३ | इंद्रवज्राशतक .... .... .... .... .... | १० |
| ४ | देव्यपराधस्तोत्र .... .... .... .... .... | १४ |
| ५ | सतार .... .... .... .... .... .... | १६ |
| ६ | सापत्नमत्सरभाव ... .... .... .... .... | १ * |


---

* ह्या काव्याचा पृष्ठानुक्रम निराळा आहे.

## सूचना.

काव्यरत्नावलींत ज्या कविता प्रसिद्ध होतात, त्या कर्त्याशिवाय छापण्यास कोणास अधिकार नाहीं. कर्त्याच्या परवानगीशिवाय जो कोणी कविता छापून प्रसिद्ध करील त्याबद्दलची जबाबदारी छापणारा-वर आहे.

नारायण नरसिंह फडणीस
जळगांव खानदेश

चुकीची दुरुस्ती - पृष्ठ १ लें तिसऱ्या साकीच्या पहिल्या चरणांत " भूपतें" या ठिकाणीं "भूपति" असें वाचावें.

# काव्यरत्नावली

## अंक १६

## वासवदत्ता

( एकनाथ गणेश भांडारे )

( 'कथासरित्सागर' नांवाचा संस्कृतांत एक पद्यात्मक ग्रंथ आहे. ह्यास कोणी 'कथाग्रंथ'ही ह्मणतात. ह्याचा कर्ता सोमदेव भट्ट. पुढें लिहिलेली लहानशी गोष्ट ह्याच 'कथासरित्सागरां' तील एका वेचाच्या आधारानें रचली आहे. यौगंधरायण प्रधानानें आपला प्रभु जो वत्सराज्याधिपति उदयनराजा, त्यास हा वासवदत्ताजननवृत्तांत कथन केला. )

### साक्या

वसुधेचें केवळ भूषण जें, अमरावतिला जेणें,
सुधाधौतसुप्रासादांच्या, योगें हंसणें मानें ! १
कैलासाप्रति तुच्छ करूनी शंकर जो विश्वेश
महाकालरूपानें जेथें, स्थान करी वसतीस ! २
उज्जयिनी त्या नगरामाजी, होता भूपतें एक
यद्यश अभिनव गाजुनि सोडी, जगतीं देश अनेक ३
नृपोत्तमाचें नांव असें त्या, महेंद्रवर्मा होतें
तत्सम सुत जयसेन ह्मणूनि झाला त्या भूपातें ४
अतुलबाहुबलशाली झाला त्या जयसेना पुत्र
महासेन हें नाम जयाचें, सर्व भूप यन्मित्र ! ५
स्वप्रांतांचें पालन करितां करितां नीति सुखांत
एके दिवशीं सहजचि आलें, त्या भूपतिचित्तांत ! ६

मच्छौर्या अनुरूप असें मज एकाहि खड्ग नसे कीं
कीं अनुरूपा सुंदर भार्या नाहीं मज इहलोकीं ! ’ ७
तदनंतर तो भूप **चंडिका**- मंदिरिं जाता झाला
उपवासी राहून निरंतर, होता भजत तियेला ! ८
होम कराया शरिरांतूनी, काढुं लागला मांस
अकस्मात **चंडिका** तिथें तों, प्रगटलि वर देण्यास ! ९
‘ प्रसन्न झाल्यें वत्सा! तुज मी, खड्गोत्तम हें देईं !
‘ यत्सामर्थ्यें शत्रुपराभव, क्षणाभीतरीं होई ! १०
‘ त्रिलोकसुंदरि, मदनमंजरी, ‘ **अंगारवती** ’नामें
‘ **अंगारक**-राक्षस-कन्या बा ! वरील तुजला प्रेमें ११
‘ फार भयंकर कर्म तुवां हें, केलें कीं भक्तीनें
‘ **चंडमहासेनाख्या** ’ तव बा ! पुढतीं होइल तेणें ! ’ १२
ऐसें वदुनी खड्ग देउनी, देवी गुप्त जहाली
भूपतिमुखकमलावरि तेणें, हर्षें टवटवि आली ! १३
मदयुत होता त्या भूपतिचा, **नडागिरि**[3] करी भव्य !
आणि देविनें दिधलें होतें, खड्ग तयाला दिव्य ! १४
एके दिनिं तल्लाभानंदें, **चंडमहासेनानें**
मृगयेसाठीं प्रयाण केलें, घोर वनीं हर्षानें ! १५
विशाल ज्याचें शरीर आहे’ वर्ण जयाचा काळा !
वराह ऐसा त्या नृपतीच्या, दृष्टीसन्मुख आला ! १६
त्या भूपतिनें तीक्ष्ण शरांनीं, वराह जर्जर केला
मूर्च्छागत तो होउन भूवरि निश्चल पडता झाला ! १७
इकडे भूपति वेगें बैसे, स्यंदानिं जों तिकडे तों
धांवत धांवत बिळांत जाई सूकर सत्वर मग तो ! १८

१ देवीच्या देवळांत. २ येथून पुढें तुला लोक ‘ चंडमहासेन ’ ह्मणून ह्मणत जातील. ३ विशेष नाम.

अवलोकित हें असतां दारुण, कोप नृपाला आला
करिं दुसरें धनु घेउनि त्याचे, मागें धांवत गेला ! १९
रोष बळें तो जातां जातां, गेला पाताळांत
सुंदर कांतपुरातें बघुनी, होई थक्क मनांत ! २०
स्त्रिशतवेष्टित एक सुंदरी, सरस्तटीं नगरांत
दृष्टिस पडतां भूपति होई, मनिं विस्मित अत्यंत ! २१
तिनें पाहुनि नृपपुंगव हा, मानसिं मोहित झाली
प्रेमरसाची धाराचि तेव्हां, तन्नयनांतुनि आली ! २२
हंसा ऐसें मंद मंद पद, टाकित तेथें आली
खालीं घालुनि मान तदा ती नृपतिस पुसती झाली ! २३
सुभगा ! आपण कोण ? कोठुनी, येथें कैसें आला ?
परिसुनि ऐसें सकल तियेला, राजा कथिता झाला ! २४
अनुरागानें गहिंवर आला, कंठिं तिच्या दाटूनी !
मुक्ताहार जणों तत्हृदयीं, केला मुक्ताश्रूंनीं ! २५
उडूं लागलें धडधड काळिज, त्या सुंदर कन्येचें !
येउं लागले थोर उमाळे, तिजलागीं शोकाचे ! २६
असे कोणतें कारण तुजला रोदन करण्या सांग ?
तिजला पुसतां भूपति ऐसें, कथूं लागली सांग ! २७
'आपण ज्याच्यामागें येथें , धांवत धांवत आलां !
तो शूकर हो ! नव्हे परंतू, राक्षस थोर दयाला ! २८
नाम तयाचें "अंगारक" मी, त्याची कन्या आहे !
ह्मणती मजला "अंगारवती" त्वद्दासी झाली हे ! २९
वज्रसारमय देह तयाचा, शंभर राजसुता ह्या
धरुनि आणिल्या व्यर्थ तयानें, योजाया मम साह्या ! ३०
शापबलानें राक्षस झाला, हा माझा हा ! तात !
श्रमतृष्णेनें आर्त होउनी, हिंडत ह्या अटवींत ! ३१
आतां आला श्रमुनी ह्मणुनी, निद्रावश तो झाला

जागा होतां खचित अहो ! तो, निर्दय वधिल तुह्मांला ! ३२
तुमच्या अशुभा बघतां माझा जीव जाउं पाहील !
रडुनि रडुनि अश्रुजलानें, सर[4] भरुनी जाईल ! ३३
ऐशा अंगारवतीवचनां, परिसुनि राजा बोले !
प्रेम तुझें जर मजवर आहे, तर तूं ऐक रसाळे ! ३४
जाउनि तूं त्वत्तातापाशीं, नयनीं अश्रू आण !
स्फुंदस्फुंदुनि लाग रडाया, वदन करूनी दीन ! ३५
जर तूं त्याची प्रियतम मोठी, सत्कन्या आहेस !
तर तो तुजला त्वच्छोकाचें, पुसेल कारण खास ! ३६
"ताता ! ताता ! तुह्मांस वधिलें, जर कोणा दुष्टानें !
तर मी राहूं तुमच्यामागें, कोणाच्या साह्यानें !" ३७
आहे मजला दुःख येवढें, रडत असें तूं बोल !
तदनंतर तो स्वमृत्यु तुजला, निःसंशय सांगेल ! ३८
असें करुनि तूं तन्मृत्यूचें इंगित घे काढून !
तूझें माझें दोघांचें ही, यांत असे कल्याण ! ३९
भूपतिमंत्रें पापशंकिनी, अगादसुरकन्या ती
सत्वर गेली निद्रित, तातापाशीं, अंगारवती ! ४०
तिनें तयाला उठवुनि, पाणी आणीलें नयनांत
दैत्य पुसे तों तिला लाडके; कां रडशी अश्रांत ? ४१
" ताता ! ताता ! तुह्मांस वधिलें जर कोणी दुष्टानें
तर मी राहूं तुमच्यामागें, कोणाच्या साह्यानें !" ४२
असें ऐकतां प्रियकन्येचें, तें मृदुभाषण दीन !
अंगारक तो तात तियेचा, हांसत बोले तूर्ण ! ४३
अगे ! लाडके ! कोण असे जगिं, मजलागीं वधणारा ?
वज्रसारमय राक्षस मी हा, सकलांना खाणारा ! ४४

---

४ सरोवर.

ज्ञात न कोणा छिद्र असे जरि, माझ्या वामकराला
कारण युद्धप्रसंगिं माझें, धनु रक्षितसे त्याला ! ४५
ऐसें निजकन्येचें केलें, समाधान दैत्यानें
भूपतिला परि तेंच तियेनें, कथिलें विस्तारानें ! ४६
दुसरे दिवशीं प्रातःकाळीं, अरुणोदयसमयास
स्नान करूनी मौन धरूनी दैत्य बसे पूजेस ! ४७
तत्काल प्रकटे भूपति तो, घेउनि धनुष्यबाण
पाचारण करि रण खेळाया, त्या दैत्याला तूर्ण ! ४८
वामहस्त वर करूनि तेव्हां, त्या दैत्यानें मौनें
क्षणभर दम धर ह्मणून त्याला, सांगतसे संज्ञेनें ४९
'तत्क्षणिं साधुनि संधानातें, भूपति सोडी बाण
जाउन सत्वर भेदी तेव्हां, तदसुरमर्मस्थान ! ५०
मर्मस्थानीं बाण लागतांक्षणिं आक्रंदत लोळे
अंगारक राक्षस भूगत तो, होउनि त्याप्रति बोले ! ५१
तृषाक्रांत मी असतां मजला, निर्दाळिलें जेणें
तो जर माझें तर्पण न करी प्रत्यब्दीं नेमानें ! ५२
तर त्या भूपतिचे दर वर्षीं, पांच मंत्रि मरतील
मच्छापाचे शब्द अन्यथा, न कधींही होतील ! ५३
ऐसें दानव बोलत असतां, प्राण तयाचा गेला !
अवंतिला तों अंगावरती, घेउन भूपति आला ! ५४
तेथें त्याचा विवाह झाला, त्या सुंदर कन्येशीं
दोन जहाले पुत्र तियेला, नंतर सद्गुणराशी ५५
एकाचें गोपाल ठेविलें, पालक नाम दुज्याचें ·
इंद्रोत्सव बहु केला तेणें, जातक करितां त्यांचें ५६
चंडमहासेनाच्या स्वप्नीं, ह्मणुनी वासव गेला
पावुनि मनिं संतोष तयाला, ऐसें वदता झाला ५७
मद्वरदानें होइल तुजला अनन्यसदृशीकन्या

प्रसवुनि जीतें अंगारवती, त्रिजगीं होइल धन्या ५८
कांहीं कालानंतर होउनि, गर्भवती ती राणी
प्रसवति झाली सुता अपूर्वा लावण्याची खाणी ५९
निर्मुनि तिजला चतुरानन तो, चकित अहाहा ! झाला
पाहुनि सुंदर वदन तियेचें, चंद्रहि लाजुनि गेला ६०
तुष्ट होउनी नृपा वासवें, सुता दिलेली आहे
ह्मणुनि तियेचें वासवदत्ता, नांव ठेविलेंसे हें ६१

---

# उजवा आणि डावा हात

(केशव सदाशिव रिसबूड)

### श्लोक

स्वश्लाघा मिरवूनि जो निजमुखें, निंदूनि तुच्छी परा ;
वैगुण्याप्रति पावुनी, फजित तो आपाप होतो पुरा
कोणी बाह्यगुणीं दिसे जरि कमी तत्रापि अंतर्गुणें
तो त्या स्वस्तुतिपाठका करिल कीं कित्येक कामीं उणें १
डाव्या हातास बोले नित कर उजवा "ऐक बा वृत्त सारें
ग्रंथीं माझीच पाहीं अनुपम लिहिली थोरवी शास्त्रकारें
मी मोठा पूज्य, वंद्य, प्रशुचि, शुभ, जनीं फार माझी प्रतिष्ठा
आंगीं श्रेष्ठत्व माझ्या वहुतर ह्मणुनी मान्य मी सर्व शिष्टां २
पुण्यात्मा थोर दाता अवनिवरति मी; दक्षिणादानधर्मी
होता मी अग्निहोत्री विविध जप- जपी; स्नानसंध्यादिकर्मी
विप्रां संतर्पिता मी; सकल पितृगणां मीच पिंडांबु देता
मी मोठा देव भोळा नमुनि हरिहरां, मीच तत्तीर्थ घेता ३
द्रव्या संपादिता मी, सकल जानें असें घेतलें पारखून;
बांका मी सर्व कामीं; निरलस फरडा एक मी कारकून.

धंदेवाईक, कारागिर कुशल गुणी; धीट मी नेटदार;
दीर्घोद्योगी खरा मी, क्षितिवरि अवघा मीच माहितगार ४
मी भोक्ता राज- भोगां विविध मृदु- सुमां अगेजा अत्तरां मी
भेटीमध्यें अधीं मी सरसुनि मुजरा घेतसें रामरामीं;
सामोरा मीच होतों सविनय पुढतीं गौरवाया सुशीला;
मोडाया खोड वैऱ्यांवरि सरकुनि मी ताव देतों मिशीला ५
मल्लांच्या द्वंद्वयुद्धीं फुरफुरुनि अधीं मीच घेतों सलामी;
व्याख्यानीं, कीर्तनीं रे स्फुरण चढुनियां फारसा शोभतों मी
संकेतीं मी प्रहर्षी हरिहरभजनीं, देतसें दीर्घ टाळी
नाकीं मत्तर्जनीतें बघुनि अरि पहा घेति मी त्याच काळीं ६
झालें रे ! वामहस्ता ! मजकडुनि असें कोणतें काम नाहीं;
देतों मी तुष्टि सर्वां सकल पुरवुनी हेतु तत्कामनाही;
पायीं आल्यास कोणी, अभय वितरितों बैसुनी तच्छिरीं मी
मी लोकीं बोलिजेलों वरद-कर, मला मूल्य तें जें न हेमीं ७
आहारीं कीं विहारीं सकल खटपटीं उद्यमीं काजकामीं;
धामीं द्वारीं अरण्यीं मजशि चहुंकडे वेळ नाहीं रिकामी
सृष्टव्यापार सारा करुनि न मजला श्रांति वाटे त्रिकाळीं
ऐशी रे वामहस्ता ! तुजहुनि सगळी गोष्ट माझी निराळी ८

न मान जगतीं तुला अशुभलक्षणी तूं तरी
ह्मणोनि नच योजिलें तुजशि पुण्य-कार्यांतरीं
अशिक्षितहि आळशी बहुत मंद तूं उद्धत
सुभीरु तनुचोर तूं तुजशि रीत ना पद्धत ९
सुपान-मधु-गोरसीं तुजशि देति रे स्पशु न
अमंगल शिवावया द्विजगृहांत जैसा शुन
तुझ्यांत मज ना दिसे लव हुरूप ना तर्तरी
हळूहळु मदाश्रयें करशी काम तूं वर्वरी १०
न शक्ति उपजीविका तुज करावया आपुली

म्हणूनि तव कोंपरीं मधुकरीस झोळी दिली
कुबुद्धि तरि ईश्वरें तुजमध्यें कशी ठेविली!
म्हणूनि तुज आउत्या बनउनीच केलें हली ११
भेदूनि तीक्ष्णतर वाक्शर बांधवाचे,
तो वामहस्त वदला मग काय वाचे
आत्मस्तुतीस करुनी दुसऱ्यास निंदी
त्याला पहा समजती जगतांत नंदी १२
स्वच्छिद्र झांकुनि करी उघडें पराचें,
तो व्यक्त मात्र करितो निजगुह्य साचें
हर्षे शिखी निजपिसें मग जों उभारी
तों सर्व गुह्य-तनु ही उघडीच सारी १३
ऐसें तवाचरण दक्षिणहस्त! वाटे
वैगुण्य रे तव असे बहु हें न खोटें
मी हीन, मी अशुभ, मी अशुची असेन;
तत्रापि धिग्वचन ऐकवतें असें न १४
मत्साह्य पूर्ण तुजला असल्या शिवाय
तूं कार्य सांग मजला करिशील काय?
मत्संगतीं मिरवुनी दिन-रात्र साचा
मोठेपणा मजशिं दाखविशी कशाचा? १५
दीपप्रकाश उजळी निजभोंवतालीं,
अंधार भूतळवटीं परि त्याजखालीं
तैसाच चांगुलपणा वरुनी तुझा कीं
वैगुण्य त्यांत असलें दृढ पाहिजे कीं १६
दाता जसा, बहु अदत्ताहि तूं तसाच
तूं याचकां वदशि तुच्छुनि रिक्त जाच
ना ओळखूनि सुतबांधवआप्त सारे
एक्या पईस्तव तयां छळिशी कसा रे? १७

तूं वाहशी हरिहरांप्रति पुष्प गंध
चोरीहि तूं करुनि पावशी राजबंध
तूं कारकून फरडा ह्मणशी मिजाशी,
कारागृहीं करुनि लेख असत्य जाशी १८

तूं बोलशी "अशुचि" हा मज दोष खोटा
मी तों पवित्र बहु नैष्ठिक विप्र मोठा
यज्ञोपवीत रुळतें बघ हें मदंगीं
तूं मात्र रे ! जडमते ! दिसतो अभागी १९

सोनारकींत कुशलांग असें पुरा मी
मी डागिणे सकळ ते घडितोंचि नामी
माझी पहा गुण करामत सव्यहस्ता !
तूं मात्र रानवट सोनपिट्याच नुस्ता २०

मी काम पाथरवटी सगळें करीत
खोदीव काम करितोंहि सुतारकींत
ठोक्याच तूं वरुनि वांकस कीं हतोडा
रे सव्यहस्त तुजसा जन मूढ थोडा २१

मी सारमंडळ, सरोज, सतार, बीन,
सारंगि, तंतुमय-वाद्य-कला-प्रवीण
मी ऐकवीं मधुर गायन तें जनांला
तूं वाहतो फुकट गर्व गड्या ! कशाला? २२

नियुद्धाची वार्ता परिसुनि तुझें धैर्य पळतें
अरे भीरो ! षंढा ! किति मज पुढें त्वद्विभव तें
हयीं होतां स्वार प्रथम पद माझा रिकिबिला
लगामा तोंडीं मी, भिवुनि रुचलें पुच्छ तुजला २३

धनुष्या ओढूनी शर चढविता मी नर रणीं
धरूनी प्रत्यंचा दडसि, तव ही क्लीबकरणी
प्रसंगीं मी घावावरि सरसुनी ढाल धरितों

अरिष्टीं तूं शंखध्वनि अशुभ तो मात्र करितो २४
हा हस्तवाद उपदेशक होय लोकां
कोणी न गर्व करणें मग राव हो कां ?
कांहीं गुणांत असला दुसरा उणाही
तो कां निजाधिक नसेल दुजा गुणांहीं ? २५

## इंद्रवज्राशतक

मोरो गणेश लोंढे

### श्लोक

विद्वत्व भूपत्व न साम्य यांचें
विद्वत्व होई बहु थोर साचें
देशीं जरी मान मिळे नृपाला
चोहींकडे वंदिति पंडिताला २६
दोषांस कंठीं सुजनीं धरावें
शीर्षावरी स्थान गुणास द्यावें
कंठीं विषाला शिव ठाव देई
माथां शशीला मिरवे सदाही २७
गर्वें मनीं फार भरून राही
तोंडांत दुर्वाक्य वसे सदाही
भांडावयाला बहुधा तयार
हीं मूर्खचिन्हें असतीं अपार २८
संगें भल्याच्या न भलाहि होई
तो दुष्ट तो दुष्ट चि नित्य राही
वेणू सदाही मळयीं वसून

जैसा न घे चंदनतेस जाण २९
नाहीं जयालागिं मुळीं विचार
शास्त्रें जरी ज्ञात तया अपार
तो शास्त्रतत्वास मुळीं न नेणें
दर्वी जशी पाकरसा न जाणें ३०
आहे जरी सुंदर रूप फार
तारुण्य देई वपुला बहार
मोठ्याकुलीं जन्म तयास झालें
विद्येविणें व्यर्थचि सर्व गेलें ३१
वज्राहुनी चित्त कठोर यांचें
देतां जनीं त्रास मुळीं न कांचे
पुष्पाहुनी कोमल होय साचें
पाहूनियां दुःख सुदुःखितांचें ३२
मोठ्यास होई जरि सौख्य मोठें
सोडी तयां दुःखहि थोर कोठें ?
वाढे तसा क्षीण शशांक होई
तारांगणाला क्षय वृद्धि नाहीं ! ३३
दुःसंगती नित्य असूनियां ही
बाधा न होई सुजनास कांहीं
वेढी जरी सर्पहि चंदनास
तो आपुला टाकिल काय वास ? ३४
येतां जसा तो उदयास सूर्य
तैसाच अस्ता बहु रक्त होय
संपत्ति वा प्राप्त असो विपत्ति
साधू सदाही सम वागताती ३५
लीलेंत ही साधुमुखें निघालें
जैसा शिलालेख तसेंच झालें

घेऊन बोले शपथा अजाण
पाण्यावरी तें लिहिल्या समान ३६
वाटे बरी लाथहि केसरीची
इच्छा नको कीं खरवाहनाची
वाटे बरें भांडण साधुपाशीं
मित्रत्व तैसें न बरें खळाशीं ३७
* येईल वैधव्य ह्मणून शूरा
लज्जेमुळें मी त्यजितें उदारा
सापत्नभावें त्यजितें बुधातें
वाटे बरा फार कदर्य मातें ३८
वाणी जडा होय मुळीं दिसेना
ऐकावया लौकर शब्द येना
हा दोष वाटे न जया नराचा
लक्ष्मी विषाची भगिनी तयाचा ३९
आंगावरी ती जरि माद आणी
त्याचीं करीना तरि जीव हानी
आहे विषाची भगिनी जरी ही
त्या सारखी केवळ दुष्ट नाहीं ४०
स्त्रीरूप मोही तरुणा जनाला
मोहीतसें द्रव्य परी जगाला
षंढास कांता गरलासमान
तो द्रव्यपाशीं पडतो गुतून ४१
कांहीं नराचा नर दास होय
दास्यांत वाटे तरि गोड काय
नोहे नराचा परि त्या धनाचा

* हें लक्ष्मीचें ह्मणणें.

तो दास हा निर्णय होय साचा ४२
लक्ष्मी जयाची बहु होय दासी
त्या तो न जाणें परवेदनांशीं
भूभारयोगें थकला निजे तों
शेषावरी केशव झोंप घेतो ४३
द्रव्यार्जनीं कष्ट अपार होती
संरक्षणीं तापद काळजी ती
कीं प्राप्त होतां अनिवार मोही
संपत्ति हे सौख्यद होय केंवी ४४
कर्णाप्रती हे बधिरत्व देते
वाणीस मुकत्व सवेंच देते
डोळ्यापुढें वस्तु मुळीं दिसेना
संपत्ति हा दुर्धर रोग जाणा! ४५
होई लढाया समरीं तयार
घाली उडी अब्धिमधीं अपार
द्रव्यार्जनाला नर जो निघाला
तो काय कृत्यास करी न, बोला! ४६
द्रव्याभपा[1] घालिति साधु वेढा
काव्याधिपांचा तिकडेच ओढा
मित्रांस त्यालागें पडेन तोटा
हा तो धनापासुनि लाभ मोठा ४७
देती जनीं पंडितता तयाला
वक्ता जगीं उत्तम तोच बोला
मोठा गुणी आणि गुणज्ञताही
त्याच्या ठिकाणीं ह्मणतात राही ४८

---

१ द्रव्यवानास.

वाणी जरी गोड गरीब बोले
श्रीमंतवाणी परि ती न मोलें
वीणा जरी गोड रवास काढी
भेरीपुढें ती टिकणार थोडी ! ४९
देशील जें तूं धन सज्जनाला
कीं लाविशी जें अपुल्या सुखाला
आहे तुझें तें धन मात्र जाण
देशील बाकी इतरां जपून ५०

---

# देव्यपराधस्तोत्र

( शंकर शास्त्री पदे )

( अशी दंतकथा आहे कीं, आचार्यांनीं, सर्व देवतांचीं स्तोत्रें केलीं, त्यांचीं पूजनें वगैरे केलीं; परंतु देवीचें स्तोत्र किंवा पूजन असें केलें नाहीं; त्यामुळें तीस वारंवार राग येई, स्वतःशंकरानीं यांस असें करूं नको ह्मणून ही सांगावें पण यानीं तिकडे लक्ष्यच देऊं नये. शेवटीं एकदां आचार्य, गंगेंत स्नानार्थ बुडी मारित असतां त्यांच्या अंगास अग्नीप्रमाणें व्याधी सुरूं झाला. व ते एकदम तळाशीं गेले, त्या काळीं त्यांना असें दृष्टीस पडलें कीं सर्व देवांहीं जिचें सिंहासन आपल्या मस्तकावर धारण केलें आहे, अशी देवी त्यानां दिसली. तें पाहून आचार्यानां पूर्वीची आठवण होऊन त्यानीं देवीच्या अपराधक्षम्यर्थ त्या ठिकाणीं एक स्तोत्र रचून ह्मटलें व देवीप्रसादानें आपला व्याधि दूर करून घेतला त्याचें हें समश्लोकी भाषांतर आहेः—

न यंत्रा, त्वन्मंत्रा, अधिकाहि न जाणें स्तुति, तथा
न आव्हाना, ध्याना, तशिचाहि न जाणें स्तुति-कथा

न जाणें त्वन्मुद्रा, तशिचाहि न जाणें विलपना
तथापि श्रीअंबे ! शरण ! करि मत्कृष्ण-हरणा १

विधीच्या मोहानें, द्रविण-विरहें, आळसपणें
विधीच्या शक्यत्वें तव चरण-सेवास्मृति नुरे
क्षमा त्याची आतां जननि ! जगदुद्धारिणि ! करी
कुसंतानें होती; शिशुसम न माता कधिं परि २

जगन्माते ! केली तव चरणसेवा कधिं न मीं
न दीलें तूंतें कीं द्रविण कधि पूजेस्तव, नमीं
तरीही तूं स्नेहा मजवरि धरीशी निरुपमा
कुसंतानें होती; परि कधिं न माता शिशुसमा ३

तुझे या पृथ्वीच्यावरि तनय आहेत सरल
तरी त्यांच्यामध्यें तव सुत असे हा सुविरल
मदीय त्यागासी करिसि तरि हें नोचित तुला
कुसंतानें होती, भरिसि परि रागें न शिशुला ४

सुरांचीं दुःखें म्यां, विविध विधिसेवा त्यजियली
वयातें पंचो न श्रमि, परि शताब्दें गुदरली
परी झाली नाहीं तुझि अजुनि माझ्यावरि दया
निराधारें जावें तरि शरण कोणा ? करि नया ५

अति त्यक्ता वाणी, बहुगुणि परी होइ मधुरा
दरिद्री जो होतो धन-कनकसपन्नचि खरा
तुझ्या नामाचे हे गुण सकलची, देवि ! असती
परी नाहीं आह्मी स्मरत तुज आतांहि कुमती ६

कपालांची माळा गळिं धरि सदा वंद्य शिव तो
धरी कंठीं सर्पा, पशुपति जटाभार धरितो
चिता-भस्मा लावी, गरल पिउनी, दिग्वसन तें
वरी; हें त्वत्पाणी-ग्रहणिं फल आलेंचि गमतें ७

न मोक्षाची इच्छा, तशिच भव-वांच्छाहि मजला
न विज्ञानापेक्षां, शशिमुखिसुखेच्छाहि न मला
परी हें मी इच्छीं जनजननमृत्यूपशमनें !
मृडाणी ! रुद्राणी ! स्मरण तव होऊ मज मनें ८

आराधिलें तुज कधीं नच पूजनानें
किंवा करूनि तव चिंतन, सन्मनानें
माते ! करी परि कृपा, बघ या अनाथा
आहे तुला उचित ! गे ! किति सांगु आतां ९

दुःखीं बुडोनी, श्रवणा तुझ्या मीं
केलें नसे होउनियां नि-कामी
होती क्षुधाक्रांत तृष्णाकुलें कीं
बाळें, तसा मी, मज घेइ अंकीं १०

जननि हें किति होय विलक्षण ?
परिस बालकवाग्रस ये क्षण;
न करिसी करुणा सदये ! अतां,
निरखितां मज अंतरि कष्टतां. ११

# सतार

गणेश अनंत दारवेकर

( कोणी एक स्त्री शोक करिते )

श्लोक

हा ! हा ! काय करूं ? सखा सवतिला घेवोनि मांडीवरी,
मातें टाकुनि दूर तो निशिदिनीं बैसे सुखें मंदिरीं,

आनंदें कुरवाळितो परिसतां ते बोल कानीं तिचे
होतो तन्मय काय त्या सवतिची ही मात त्या नासुचे. १
उद्योगें दिन जाय हा, परि मला होते निशा वैरिणी,
मातें मन्मथ जाळितो, न करुणा लज्जा तयाचे मनीं;
सांगें मैत्रिणि ! काय मी करुं अतां ? घेऊं विषातें मरूं ?
किंवा काय दुज्या व्यथा शमविण्या कृत्यास आतां करूं ? २
जोडोनी करयुग्म मस्तक किती वेळां तयाचे पदीं
ठेवोनि स्तविलें, परंतु मजला लोटी विधी आपदीं!
बालोनी भुरळ स्वयें सवतिनें दावा कसा साधिला,
उद्योगांतर[१] त्यास कांहिं न सुचे घेवोनि बैसे तिला. ३
सांगें मैत्रिणि ! मद्विनंति पतिला " जोडोनि दोन्ही करां
दासी हे कथिते त्यजोनि अवघें ऐका विनंती जरा;
सोसावें किति दुःख म्यां अनुदिनीं ना धान्य धामीं पसा,
तैसें द्रव्य न आजि लेश उरलें हा वार[२] जावा कसा ४
आलां या स्थितिला तुझी प्रियकरा ! होईल कैसें पुढें ?
ही चिंता मनि लागली कथितसें आणा मनीं येवढें
आहे कारण या स्थितीस तुमच्या जी ती त्यजावी प्रिया
जोडी उद्यम, ईश दे यश तुझां, जातील विघ्नें लया. ५
देवाग्नि द्विजसाक्षिनें ममकरा त्वां स्पर्श केला जनीं,
त्यावेळीं किति घेतल्यासि शपथा ? कीं भ्रंश झाला मनीं
नाहीं दोष तुझा मृदुत्व मधुरा त्या जारिणी[३] भापणा
आहे फार, ह्मणोनि भूल पडली, आकर्षिलें त्वन्मना. ६
जो जो मित्र तिला धरी कवळुनी स्वांकीं स्वयें बैसवी,
त्यातें तुष्ट करी मनोहर रवें एशी तिची थोरवी;

---

१ इतर उद्योग. २ दिवस. ३ हरएकाच्या मांडीवर बसते ह्मणून जारिणी.

तीचा उद्यम होय हा प्रियकरा ! स्वार्थासि साधावया,
व्याली ती परि अंतरीं न करुणा तीतें जनां खावया. ७
अर्धांगी असतांहि लाजशि मशीं बोलावया तूं घरीं
घेतां त्या सवतीस लाज न कशी लोकांत अंकावरी ?
त्यागावें जग एकदां प्रियसख्या रात्रंदिनीं वाटतें,
मोठें दुःख परी उपाय न सुचे तैसेंच मी कंठितें ! ८
नादीं काय असे तुह्मी प्रियकरा ! सांगा तिच्या लागला ?
केली काय दशा सुदुर्घट तिनें संसार हा नासिला !
ज्ञानी होउनि लागलां नवल हें नादीं तिच्या सर्वथा,
नाथा ! हेंचि मनांत दुःख सलतें, नाहीं मनीं अन्यथा. ९
सोडोनि व्यवसाय सर्व बसतां कैसे तिला घेउनी,
संसारांत न लक्ष काय करुं मी, आश्चर्य वाटे मनीं,
जोडोनी कर सांगतें टवळिला टाकोनि द्या भूमिला,
रावाचे तुह्मि रंक होउनि पहा नाथा ! कि हो बैसलां. १०
ज्ञाते, थोर, गुणी, असे ह्मणवितां हें कां न यावें मनीं ?
नादीं लावुनि घेतलें करुनियां कैसें हसूं या जनीं ?
जी योगें अशि पातली अवदशा फोडी सतारीस त्या,
आलस्यादिक दुष्ट शत्रुंस तशा द्याव्या अतां पावत्या. ११
जो चाले सरळ, स्ववर्तन जगीं ज्याचें महा निर्मळ
जो वागे सदसद्विवेकवचनीं, जो भाषणीं प्रांजळ;
जो देवस्तवनीं रमे, जनहिता जो आयु वेंची सदा,
त्याचा नित्युपदेश कां न हरवी स्वांतांतली आपदा ? १२
धर्मानें वरिली सुखार्थ कुलजा भार्या सुरूपांगना,
तब्दोधामृत कां न रोग उपटी जो व्यापि त्याच्या मना ?
केला त्याग सतारिचा उपरती होतां मनीं सर्वथा,
जोडी उद्यम, मेळवी धन, वरी संसाररूपी पथा . १३

# सापत्नमत्सरभाव.

( गणेश अनंत दारवेकर कृत )

श्लोक

जो सृष्टिचा चालक एक जाण
कारुण्य तेजोबल भूतिपूर्ण,
ज्याच्या कृपें साधति अष्ट सिद्धि,
तत्पादपद्मीं मम देह बुद्धि. १
ज्यानें कृपें मानवदेह केला,
तत्साधनातें जन जो भुकेला,
विघ्नें तयाचीं लयिं शीघ्र जाती,
आनंदनिद्रा करि तत्प्रजा ती. २
त्याच्या गुणां वानिति चंद्र सूर्य
सृष्टिस्थितिच्छागतिहेतुकार्य,
जीवांस त्याच्याविण थार नाहीं,
पूजा तयाची करिजे जनांहीं. ३
जगां अनंतांसि पुरोनि राहिला,
कृपें तयांचा शिरिं भार साहिला;
असोनि पाशीं कवणें न पाहिला,
तया पदीं म्यां मम देह वाहिला. ४
जोडोनियां कर, पदीं शिर ठेवुनीयां;
देवा ! रिघें शरण किंकर, शक्ति दे या;

---

१ ऐश्वर्य. २ अणिमा महिमादिक आठप्रकारच्या सिद्धि. ३ त्याचीं मुळें. ४ हें देवाचें विशेषण. ५ अंतराळांतील पृथ्वी आदिकरून अनंत गोल. ६ सेवक, चाकर.

मूढा न अन्य तुजवांचुनि बुद्धिदाता,
हो साह्य, पूर्ण करिं हेतु मदीय आतां. ५

### आर्या

सापत्नमत्सराचा होतो परिणाम या जगीं कैसा,
हा हेतु मानसीं मम सांगावा, ह्मणुनि सुज्ञ हो परिसा. ६
लोभी, कपटी, निर्दय, मूर्ख, अमंगल, जगीं स्त्रिया असती,
साहस तसेंच, सा हे स्वाभाविक दोष त्यांमधीं वसती. ७
परि लपती दोषांना या, लज्जा एक जी तयांपाशीं
सांडुनि दिल्यास तीतें, लाजविती त्या स्त्रियाच पुरुषांसी. ८
वृत्तांत एक याचा कथितों अवधान त्याकडे द्यावें,
रसिकांनिं दोष टाकुनि गुण असती त्यांत तेचि वेंचावे. ९

### श्लोक

होती एक सुरम्य थोर नगरी क्षिप्रातटाकावरी,
जीतें "**कांचनपूर**" नाम बरवें तीतें न अन्या सरी;
उद्यानें किति भोंवतीं नगरीच्या, देवालयें शोभती,
व्हावा ही रचना अपूर्व बघतां आनंद चित्ताप्रति. १०
शौर्यसागर असें ह्मणती नृपा,
दक्ष फाराचि, जनांवरतीं कृपा;
होय त्या विधुकलाभिध अंगना,
तोषवी सतत जी पतिच्या मना. ११
बहुतसुंदररूपसमन्विता,
पतिपदीं अवघें लय लाविता
क्रमि दिनां पति दैवत मानुनी,
सुगुणकल्पलता मृदु कामिनी. १२

---

१ साह्य. २ उज्जयनीजवळ क्षिप्रानदीचे कांठीं.

होता योग्य नृपास त्या सचिवं, ज्या न्यूनत्व कांहीं नसे,
ज्याचे अंकित भूप मांडलिक ते, हा दर्प ज्याचा असे;
धर्मन्याय तसेच पूर्ण नगरीं, पुत्रापरी स्वप्रजा
पाळावी, नृपकीर्तिची पसरली सर्वत्र लोकीं ध्वजा. १३
धर्मप्राणधनादिरक्षक अशा भूपास पाहोनियां,
येवोनी किति राहिले धनिक जे हा लाभ साधावया,
आनंदीं निजते प्रजा चिर, नसे दारिद्र्य ठावें कसें,
लक्ष्मीचें जणुं केलिधाम नगरीं तो, न्यून त्या कायसें? १४
पूजेच्यासमयींच वीर सदनीं शस्त्रादिकां काढिती,
नाहीं कारण त्यांस याविण दुजें आच्छदनीं वाहती;
कीं ते मात्र सदा मनांत झुरती वैरी न झुंजावया,
लोकीं वीर न थोर एक उरला त्या शौर्य दावावया. १५
विद्यालाभ मिळावयास्तव मुलां विद्यालयें स्थापिलीं,
तैसे पंगुजनांस अन्न मिळण्या सत्रें किती घातलीं,
उद्योगांत निमग्न लोक अवघे, व्यापार मोठा असे,
कौशल्यादिक जाणत्यांस नृपती उत्तेजना देतसे. १६

गृहसुख अवघेंही प्राप्त होतें नृपाला,
अनुपमगुण भार्या देइ आनंद ज्याला,
परि मनिं नृपतीच्या काळजी एक होती,
उदरिं न सुत, टोंची हेंचि त्या शल्य चित्तीं. १७
बहुत वयहि झालें, पुत्र भुपा न झाला
अनुदिनिं परि होई शोक मोठा तयाला!
नवस सकल केले, यत्न केले, परंतु
कधिं न सफल झाला मानसांतील हेतु. १८
एके दिनीं उभयतां असतां महालीं,

३ प्रधान. ४ दरारा, प्रताप. १ खेळण्याचें ठिकाण. २ कांटा-दुःख.

चिंतेमुळें व्यथित नीज तयां न आली,
पाहोनि हा समय, जोडुनियां करांला,
राज्ञी ह्मणे " मम मनीं नव हेतु आला. १९
कितिक दिवस ऐशी व्यर्थ आशा धरावी ?
द्वितिय करुनि भार्या, देखिजे काय दैवीं,
अनुदिनिं मनिं नाथा ! वाहतां काय चिंता ?
सफळ करिल हेतु श्रीहरी साह्य होतां " २०
" धन्य धन्य अवनीवरि तूं खरी,
काय हें नवल बोलसि सुंदरी !
काय टाकुनि तुला दुजि अंगना
काय येइल तुझ्यासम मन्मना ? २१
पाहिं तूं मजहि तोषविलें किती ?
कां कृतघ्नपण मी करुं हे सती ?
प्राक्तनीं जरि असले, मजप्रती."
पुत्र होईल तवोदरिं सन्मती. " २२
" कोठोनियां सुख असें मज पापिणीला
नाथा ! असेंच ह्मणतां किति काळ गेला ?
कां घेतसां करुनियां पतिराय ! हानी
माझ्यामुळें ? अमित सुज्ञ तुह्मी असोनी. " २३
राजा असें वदुनियां पतिलागिं केलें,
पाहोनियां नववधू मग लग्न झालें;
रूपांत जी शशिकलेसहि लाज आणी,
लावण्यकल्पलतिका[1] गुणरत्नखाणी. २४

साक्या

१ सुंदरपणाच्या कल्पनेची वेली.

गर्भवती **शशिकला** जाहली प्रथम नृपाची कान्ता,
थोर हरीची माया न कळे ! घालविली नृपचिन्ता. २५
पहिलीस होइ न संतति, यास्तव अन्या भार्या केली,
इच्छा जी नृपमानसिं होती पूर्ण आज ती झाली. २६

## श्लोक

होवोनि पूर्ण नवमास **शशीकलेला,**
होतां प्रसूत सतिला सुत दिव्य झाला,
आनंद राजसदनांत तदा न मावे,
आणोनियां कितिक घालिति हेलें[1] भावें. २७
सकल लोक सुखी बहु जाहले
"सुत चिरायु असो !" वदुं लागले;
**शशिकले**प्रति ते बहु वानिती,
जन तिला अति धन्यचि मानिती. २८
जन्में सुताच्या यश ये घराला,
रूपें गुणें लाजवि जो स्मराला[2] !
तन्नाम ठेवी '**मदनांत**' भूप,
दानें धनें वांटियलीं अमूप. २९
कालक्रमें वाढुनि योग्य होतां,
झाला रिपु क्षिप्र सुबुद्धिमंतां;
विद्याकलांमाजि पटुत्व आलें,
डोळे नृपाचे अति हर्षवीले. ३०
**शशिकला** प्रिय होय नृपाप्रती,
परि न त्या दुजिला मुद[3] तत्सुतीं;

---

१ कोणास पुत्र झाला असतां शुभशकुनार्थ कुणब्याच्या स्त्रिया त्याचे वरीं दूध किंवा पाणी वगैरे घालतात तो. २ मदन. ३ आनंद.

६ व्हिक्टोरिआ महाराणीचें चरित्र– भाग पहिला– हिंदु युनियन क्लबच्या एका सभासदानें लिहिलें. किं. ३ आणे.

७ सुंदरेची सक्रांत– रा. रा. गणेश जनार्दन आगाशे बी. ए. यांणीं लिहिली. स्त्रियांस अत्यंत बोधप्रद आणि मनोरंजक. किं. १॥ आणा.

८ सौभाग्य रत्नमाला– भाग पहिला– स्त्रियांना वाचण्यास योग्य आणि त्यांस बोध होईल अशा गोष्टी रा. रा. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांणीं लिहिल्या– किं० ६ आणे.

९ सौभाग्य रत्नमाला— भाग दुसरा– निरनिराळ्या, विद्वानांनीं लिहिलेल्या गोष्टी. किं० ६ आणे.

१० सौभाग्य रत्नमाला–– दोन्ही भाग एकत्र– किं. ११ आणे.

११ अबलासंजीवन— डा० भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांणीं स्त्रियांच्या उपयोगासाठीं मुद्दाम लिहिलें. किं० १ रुपया.

१२ अभिनव कादंबरी— बाणकविकृत कादंबरीचें रा. गंगाधर रामचंद्र मोगरे यांनीं आर्यावृत्तामध्यें काढलेलें सुंदर सार– किं. ९ आ.

१३ वनस्पति शास्त्रांचीं मूलतत्वें– डा० भालचंद्र कृष्ण भाटवडेकरकृत— किं० १। रुपया.

१४ सद्गुणी स्त्री– वऱ्हाडांतील "ज्ञानसंग्रह" मासिक पुस्तकांत के० बजाबा रामचंद्र प्रधान यांणीं लिहिलेली गोष्ट किं० ४ आणे.

मुंबई ता. २० आगष्ट } म्यानेजर विविधज्ञान विस्तार, काळबा देवी
सन १८८८ इ. } रोड, मुंबई.

# काव्यरत्नावली.

## मासिक पुस्तक.

वर्ष २ रें.] आक्टोबर सन १८८८. [अंक १७ वा.

त एव पदविन्यासास्ता एवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



जळगांव--खानदेश येथें

प्रसिद्ध होत असतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हशिलासुद्धां दीड रुपया.

मुंबई: "सुबोधप्रकाश" प्रेस.

विषय. ## अनुक्रमणिका. पृष्ठ.


| | | |
|---|---|---|
| १ | ईशदर्शनकाव्य. | १ |
| २ | इंद्रवज्राशतक. | ४ |
| ३ | मुक्तांजली—विरहिणी. | ८ |
| ४ | रामनाम. | ९ |
| ५ | तमाखू. जासुंदीचीं आणि पारिजातकाचीं फुलें. | १० |
| ६ | आर्याशतक | ७* |
| ७ | भट्टवंश काव्य. | १५* |


* ह्या काव्यांचा पृष्ठानुक्रम निराळा आहे.

---

## काव्यरत्नावलीच्या संबंधानें सूचना.

१ वर्गणीदारांकडून जी वर्गणी येईल त्या बदल निराळी पावती किंवा पुस्तकांत पोंच हीं दिलीं जाणार नाहींत. मनीआर्डरीवर जी सही होईल तीच पावती समजावी.

२ जाहिराती करितां कांहीं स्वतंत्र पृष्ठें ठेवण्याचा विचार आहे, तर ज्यांस जाहिराती पाठवावयाच्या असतील त्याणीं खालील पत्त्यावर कळवावें, ह्मणजे त्यांस जाहिरातीचे दर कळविण्यांत येतील.

३ ज्यांस ही रत्नावली घ्यावयाची नसेल त्यांनीं ती परत करितांना एका चिठ्ठीवर आपलें नांव गांव स्पष्ट लिहून ती पुस्तकांत घालावी. पुस्तकावर नांव गांव कांहीं लिहूं नये.

४ हा अंक पोंचतांच वर्गणीदारांनीं आपली वर्गणी लौकर पाठवावी.

५ कविता करणारांनीं आपलीं काव्यें एकाबाजूवर स्वच्छ लिहून पाठवीत जावी. लहान प्रकरण अर्धवट पाठवूं नये.

६ या रत्नावलींत जीं काव्यें प्रसिद्ध होतील, त्यांची आवृत्ती काढण्याचा प्रसंग आल्यास त्यावर कविता करणारांचा हक्क राहील.

७ वर्गणीदारांचा पत्ता बदलल्यास त्याणीं तावडतोब कळवीत जावें.

नारायण नरसिंह फडणीस.

जळगांव—खान्देश.

# काव्यरत्नावली.

## अंक १७ वा.

## ईशदर्शन काव्य.

### गुच्छ ३ रा.

( विष्णु गणेश नेने. )

### श्लोक.

मुळें पाळें पानें कुसुम कलिका कंटक फळें
त्वचा काष्ठें शेंगा विविध तरूचे भाग सगळे
मनुष्याच्या केले असति उपयोगार्थ सगुण
कसे देवा फेडूं मनुज जड आह्मी तव ऋण. १

वसूनी जें प्रेमें रुचिर[1] ललनींच्या[2] तनुवरी
विलासी लोकांच्या हृदयिं बहुकामोद्भव[3] करी
महा मोलाचें तें कुठुनि इतुकें अत्तर मिळे
मिळे तें वृक्षाच्या दलकुसुमकाष्ठांत सगळें. २

महा रोगाचें जी हनन करण्याला क्षमें[4] पुरी
प्रभावें मोठ्या जी खचित मृतसंजीवन[5] करी
कुठें ती मोलाची बहुगुणयुता[6] औषधि वसे
मुळीं पाळीं काष्ठीं दलिं सुमिं फलीं ती वसतसे. ३

---

१ सुंदर. २ तरुण स्त्रिया. ३ रतिसुखेच्छा. ४ समर्थ. ५ मेलेल्यांस पुन्हा उठवणें. ६ बहुगुणांनीं युक्त.

नृपांचीं जीं मोठीं दिसति सदनें आठमजलीं
तयांमध्यें भिन्ना असति फळिका[1] युक्त शकलों[2]
कुठें या वस्तूंचा उगम इतुका विस्तृत असीं
तरूंच्या काष्ठांतीं उगम अवघा तो वसतसे. ४

तरूंनो वेलींनो प्रियकर तुह्मी खास हरिचे
कसें वर्णावें मी विमल अवघें भाग्य तुमचें
अहोरात्रीं तुह्मी परहित करायास झटतां
मनुष्यापेक्षांही अधिक तुमची हो सदयता. ५

मनुष्यांमध्यें जे परहित करायास झटती
अशा लोकां ज्ञाते जरि सतत देवांत गणिती
स्वदेहाच्या नाशें परहित करीतात तरु जे
अशा श्रेष्ठां कोठें स्थल उचित द्यावें न समजे. ६

कृतज्ञाबुद्धीनें तरुंस जन जे पूज्य गणिती
तया कांहीं पापी जन, समजुनी मूर्ख, हंसती
कृतज्ञा बुद्धी ज्यां नसुनि दुसऱ्याची हि न सहे
मनुष्यारी[3] ऐसे नरपशु न हे कोण तरि हे. ७

समस्त प्राण्यांना हितकर बहू नित्य असणें
बरें वाटे वृक्षां ह्मणुनि अति विस्तीर्ण तनुनें
समस्तांचें नानाविध हित करीती तरुलत
लतावृक्षांचा जो जनक[4] किती त्याची चतुरता. ८

तरूंच्या वेलींच्या त्रिभुवनिं किती जाति असती
किती कोठें कैशा वसति मनुजाला न कळती
मनुष्य प्राण्या तूं जरि चतुर आहेस बहुत
मती तूझी आहे प्रभुमतिपुढें क्षुद्र खचित. ९

१ लांकडाच्या फळ्या. २ तुकड्यांनीं. ३ मनुष्य जातीचे शत्रु. ४ बाप.

शिरें ज्यांचीं जाती गगनतल भेदूनि बहुधा
हजारों कोशांची तनु कारिति जे धारण सदा
असे वासस्थान[1] क्षितितल[2] अशा उंच गिरिचें
कसा वर्णाया मी क्षम सहनशीलत्व[3] महिचें. १०

हिमागारस्थानप्रमुख[4] गिरिनो शांति निलय[5]
करीताती तुह्मांवरि सुरमुनी शांत हृदय
नद्या गंगादी ज्या करिति जग हें पूत निखिल
तुह्मी आहां त्यांचे जनक तुमचें भाग्य अतुल. ११

महा शैला रे ज्या जनसुखकरा औषधिलता
तया सर्वांचा तूं सदय असशी रक्षक पिता
असे तूझा साक्षात् अतुलबल[6] जामात उदधी[7]
तुझें वर्णायाला विमल यश सारें मज न धी. १२

मुनींची देवांची सतत तुजला संगति गिरे !
नद्या कन्या तूझ्या सलिलनिधि[8] जामात तव रे
दिशा तूझीं वस्त्रें जिवलग तुझा मित्र अनिल[9]
कळे कीं थोरांचें खचित असतें थोर अखिल. १३

गिरे ! सिंहव्याघ्रादिक पशु महाकाय[10] अदय[11]
सदा जागोजागीं वसति न तया लेशहिं भय
मिळे तूझ्या गर्भांतरिं गुरु महामूल्य[12] उपल[13]
अशी तूझी काया जनहितकरा फार पृथुल[14]. १४

महाज्वाळा जेथें तव गुरु[15]मुखांतूनि निघुनी
दिशा होती धूम्राकुल[16] सकल मागूनि पुढुनी

---

१ रहाण्याचें ठिकाण. २ पृथ्वीचा तळ. ३ सहन करण्याचा स्वभाव. ४ हिमालय पर्वत मुख्य आहे ज्यांमध्यें. ५ शांतीचें घर. ५ अनुपम आहे बळ ज्याचें. ७ समुद्र. ८ समुद्र. ९ वायु. १० विशाल देहांचे. ११ क्रूर. १२ महा मोलाचे. १३ दगड (रत्नें) १४ विस्तीर्ण. १५ विस्तीर्ण. १६ धुरानें त्रासलेल्या.

दिसे तुझी काया मधुनि मधुनी पावकमय[1]
कळे ऐशा वेळीं असशि किति तूं रे प्रतिभय[2]. १९

---

# इंद्रवज्राशतक.

( मोरो गणेश लोंढे )

श्लोक.

दानें महत्वास नरें वरावें
रक्षून कैसें धन, तें मिळावें
दाता वसे मेघ नभांत पाहें
सांठा करी अब्धि तळींच राहे. ९१

आधींच लक्ष्मी चल फार आहे
देतां सुपात्रीं तरि मात्र राहे
येतां जसें फार तळ्यांत पाणी
फोडून देतां न करीच हानी. ९२

मारी पित्याला अथवा सुताला
मातेस बंधूस सुहृज्जनाला
स्वामीस कांतेस वधावयाला
लोभामुळें मानव सिद्ध झाला! ९३

लोभामुळें राग मनास येई
रागामुळें भांडण थोर होई
त्या भांडणापासुन नाश अंतीं
लोभास ठेवा न मुळीं स्वचित्तीं. ९४

---

१ अग्निमय. २ भयंकर.

लोभामुळें बुद्धि न शांत राही
लोभामुळें लोभाचि वाढ घेई
लोभी जगीं या न सुखास घेतो
लोभें परेशास चुकून जातो. ५५

लोभी बघे मात्र सदैव वित्त
दुःखाकडे जाय मुळीं न चित्त
दुग्धाकडे मांजर जेंवि पाही
त्याचें न काठीवर लक्ष राही. ५६

भोगावयाला धन द्यावयाला
होईन कीं धैर्य कदर्यु त्याला
हातें करी स्पर्श उगाच त्यातें
तो षंढ जैसा निजकामिनीतें; ५७

मागावयालागिं तयार झाला
तों देवता सोडिति पांच त्याला
शोभा सुलज्जा धृति बुद्धि चौथी
ती पांचवी पूज्य बुधांस कीर्ती. ५८

कांहीं करी जो न परोपकार
त्याहून वाटे तृण होय थोर
भक्षावया योग्य पशूंस होतें
मित्रयास दे आश्रय संगरीं तें. ५९

सोडी न जो द्रव्य अपार येतां
सोडी न जो दुःखनिमग्न होतां
जो साह्य द्यायास जपे सदाही
सन्मित्र तो स्वीय मनांत पाहीं. ६०

पीडी जसें दैव सदा नरांला
सोडो न तें तेंवि कधीं सुरांला

स्नेही शिवाला असतां धनेश[1]
लाधे[2] न कीं एकहि वस्त्र त्यास. ६१

धीरें[3] करावा व्यवसाय सर्व
एकाग्रचित्तें झटुनी अपूर्व
दैवाप्रमाणें फळ त्यास येई
होऊं नये खिन्न मनीं कधींही. ६२

दैवाप्रमाणें फळ नित्य येतें
यत्नास विद्येस बघे न कीं तें
केलें अशा काय पराक्रमाला
ईशत्व जेणें मिळतें शिळेला. ६३

केला जसा विक्रम शंकरानें
तैसाच केला जरि केशवानें
दैवें विष प्राशन शंकराला
सद्रत्न लाधे कमला हरीला. ६४

येतां जसा योग्य ऋतू तरूस
पुष्पें फळें भूषविती विशेष
येतां नराचा अनुकूळ काळ
त्याला सुखाचा मिळतो सुकाळ ६५

राजास मंत्र्यास भिषग्वराला[4]
तैशी जरा भूषविते यतीला
मल्लास वेश्येप्रति सेवकाला
ती दूषवी आणिक गायकाला. ६६

माथां धरी सांब कलानिधीला
क्षीणत्व त्याच्या तरि ये तनूला

---

१ कुबेर. २ मिळत नाहीं. ३ धैर्यवान मनुष्यानें. ४ वैद्याला.

मोठें जरी स्थान मिळेल पाहीं
अन्याश्रयीं सौख्य तथापि नाहीं. ६७

ज्याच्या कृपेनें सकलांस तोष
पोषीतसे बांधव जो अशेष
त्याच्या सुमित्रास उणें पडेना
तो धन्य तैसा दुसरा दिसेना! ६८

वाणी जयाची बरवी रसाळ
कांता सुतांची पुरवी हि आळ
लक्ष्मी जयाची सकलांस लाभे
तो एक वाटे सुकुलांत शोभे. ६९

ज्याची जगीं कीर्ति सदैव राहे
तो एक लोकांत जिवंत आहे
ज्याला जगीं अल्प असे न मान
लोकांत तो सत्य मृतासमान ७०

द्यावें विषाला विष नांव कां हें
ब्रह्मस्व[1] त्याहूनहि थोर आहे
मारीतसे तें विष एकट्याला
ब्रह्मस्व पुत्रादिक संततीला. ७१

पाहावया देश कधीं न गेला
केव्हां न सेवी वर पंडितांला
संकोच त्याची मति फार पावे
नीरिं न जैसा घृत बिंदु धांवे ७२

पाहावया देश असे तयार
सेवावया पंडित हौस फार

1 कर्ज.

त्याची मती पूर्ण विकास पावे
कीं तैलबिंदू उदकांत धांवे. ७३

कैचें खरें भाषण मद्यप्याला
भक्षीतसे मांस दया तयाला
कैंची सुविद्या विषयी जनाला
कोठून लाधे सुख निर्धनाला. ७४

दारिद्र्य गांठी मनुजास पूर्ण
सोडी तरी तो न तमाखु जाण
मार्जार मोजी न निवारणाला
मारी जसें देखुनि उंदिराला ७५

---

# मुक्तांजली–विरहिणी.

## (एकनाथ गणेश भांडारे.)

O my beloved! Art thou so near unto me?

Longfellow

### श्लोक.

"आहां काय खरेच मन्निकट हो! प्राण प्रिया! आपण
कां नाहीं तरिहि बघूं शकत हो मी आपणालागुन
आहां काय खरेच मन्निकट हो! माझ्या प्रिया! सुंदरा?
कां नाहीं मग तर्पित श्रुतिस ह्या ती आपली सद्गिरा! १

जाई मोहवनास साच वरुनी सर्पाकृती जो प्रिया!
केला पावन मार्ग तो कितिकदां युष्मत्पदांनीं तयां?

---

१ विशेष नाम. २ पवित्र. ३ तुमच्या पावलांनीं.

मत्संगें रमतां तुह्मी जिवलगा ! हो ! पावलों पावलीं
सृष्टीची रचना अहा ! अभिनवा प्रेमें सदा पाहिली ? २
होतां आपण येत फार दमुनी निस्यश्रमानें प्रिया !
आम्राच्या तलिं ह्या तुह्मी पहुडणें शय्येवरी माझिया !
हा ! हा ! मद्विषयीं तुह्मां प्रियतमा ! स्वप्नें पडावीं जधीं !
होतां आपण वाहत "प्रियसखे !" म्यां "ओ !" ह्मणावें तधीं ! ३
नाथा ! हे बघतील नेत्र कधिं हो ! युष्मत्तनू गोजिरी !
गाढालिंगन आपणा कर कधीं देतील माझे तरी ?
एकाएकिंच ती रडे गुरुरवें त्या चक्रवाकीपरी !
यन्मंजुस्वन वेणुनादसम तो कोंदे वनाभीतरीं ! ४
धांवे तद्रव तो परी झरझरां शेजारच्या काननीं !
झाडी दाट अती जिथें असति त्या विस्तीर्ण शाखांतुनी !
जाई दूरवरी प्रतिध्वनि पुढें त्या पर्वतांभीतरीं !
जाई आणखि लांब शेवटिं गडप्प्[1] तो होइ कोठें तरी ! ५

---

## रामनाम.

### ( विष्णुपंत सरवटे. )

### आर्या.

श्रीरामपादपद्मीं निस्य रमो चित्तभृंग दृढतरसें
न चळो भवकाननीं तें विषयकुसुम जरिहि मोहि बहुत रसें. १
श्रीरामपादतरिनें स्वाश्रितजन हीन दीन मोकलिला
भवसागरीं न, यास्तव जोडुनि ती मग ह्मणा नमो कलिला. २
रामरसायणमात्रा भवबाधेवर सुयुक्त सोपारी
भावें सेवी मनुजा ! व्यर्थ नको मृत्युच्या वसों दारीं. ३

---

1. गुप्त.

# तमाखू ( श्लोक. )

## ( बळवंतराव कमलाकर. )

नाहीं स्वादु, न औषधी, न नयनानंद प्रदायी बरी
आहे केवळ शुष्कचूर्णच, नसे सद्गंधयुक्ता तरी
नेत्रां रोग करी तमाखु, भजती तत्रापि लोकीं तिला
कीं येथें व्यसनाविना न दुसरा हेतू दिसे हो मला. १
बंधो ! कोण तुह्मी ? तमाखु, कुठुनी येतां ? समुद्राहुनी
कोणाचा करिं दंड हा ? कलिनृपाचा दंड जाणा मनीं
चातुर्वर्ण्य जगांत जें स्रजियलें धर्मार्थ पद्मासनें
त्यांतें एक करावयास्तव बळें आलों अह्मी पाहुणे. २

# जासुंदीचीं आणि पारिजातकाचीं फुलें.

## ( कोणीएक कवि. )

### श्लोक.

पहिलीं—मातींत खालीं पडणें तुह्मांला
'कैसें रुचे, हें न कळे अह्मांला
ही रक्तिमा स्वीय अह्मी, पहा रे,
शाखांवरी नाचवितों! अहा रे ! १

दुसरीं—ती रक्तिमा घेऊनिया खुशाल
शाखांवरी संतत का रहाल ?
म्हूनि वातींतचि या पडाल,
अज्ञात ऐशा थडग्यांत जाल ! २
दैवीं न तें यो अमुच्या ह्मणोन,
तो डौल शाखांवरला गणोन
खोटा, लिहाया थडग्यावरी ते
स्वनाम गंधें, झटतोंचि येथें.

हृदयस्थ भारतीच्या हंसें ज्यां चतुर पढवुनी केलें
नीरक्षीर विवेकी त्या कविवर्यां सदा यशें वरिलें ७४
संकटिं मित्रपरीक्षा, शूरपरीक्षा रणांगणीं होते
विनयें वंशपरीक्षा, सांगति ऐसें जनां सदा ज्ञाते ७५
रचुनि महाकाव्यें, कवि हिमधवला सकललोककमनीया
पावति यशा चिरस्था, तद्भाग्या शक्त कोण वर्णाया ! ७६
कटुवचनें पिशुन जसा, पीडी तैसा न तो विरोधानें
मशक श्रवणीं गुंगुनि गांजी तेवीं न शोणितादानें ७७
पडतां नभ, फुटतां महि, चळतां गिरि, उदधि सकळ मिळतां ही
अधरोत्तर जग होतां, हानि विरक्ता न वाटते कांहीं ७८
दायाद चोर वैरी निंदक असती समान साधूला
स्वायत्त चित्त ज्याचें जाणा जन वश्य त्या विरक्ताला ७९
निज जनकाशीं भांडति परि शिकविति जनकभक्ति पुत्रांतें
परदारां सेवुनि शठ शास्त्राज्ञा लाविति स्वदारांतें ८०
ऋतुकालीं हरिनिन्दा करुनी शिशुपाल पावला नाश
पूज्यजनाची गर्हा धाष्टर्यें लागो नये करायास ८१
भगिनीच्या तनुजांतें मारुनियां कंस खळ विनाशाला
पावे सहसा, यास्तव न करा कुत्सित कधींहि कर्माला ८२
कृष्ण धनंजय भीमा ब्राह्मणवेषी असें जरातनुज
क्षत्रियचिन्हें जाणे, सुचवी आकार इंगिता सहज. ८३
रणिं बभ्रुबाहनानें जित पार्थ अजिंक्य जाहला मुदित
'वांछिति सुज्ञ पराभव पुत्रापासोनि' तत्व हें महित. ८४
आहे सहिष्णु सज्जन ह्मणुनि तया त्रास नित्य कां द्यावा ?
देतो मधुर रसातें इक्षु तरि समूळ काय तो खावा ? ८५
क्षुद्र तरू तुला मानुनि चंपक ! केलें कधीं न मी आळें
तव गंधें घर भरलें, सत्य तुवां मजशिं फार लाजविलें. ८६
व्हावें तव हित ह्मणुनी कंटक हे बालपादपा ! तुजला
वेष्टिति त्यांचा आदर संशय टाकोनि पाहिजे केला. ८७

खातां मिष्ट पदार्था अवघे तव दिवस मक्षिके ! गेले
भावी सुखार्थसंग्रह केला न ह्मणोनि कष्ट दिन आले. ८८
ग्रंथा ! चातुर्याने करूनी ज्ञानोपदेश अज्ञांस
मिरविशि सुज्ञत्वातें, जाणसि परि काय सांग तूं लेश. ८९
घालोनि भोजनातें तरूणी रंजवि मनोहरें गानें
घिरटा ! तुजला, ह्मणुनि भ्रमसी सानन्द तत्करीं जाणें. ९०
येवो रविशत उदया अथवा येवो तसें मृगांकशत
परि विद्वद्वचनाविण अभ्यंतरतम न होतसे लुप्त. ९१
चंद्रार्क ज्या न पाहति पाहति ज्यातें न योगिवर पूज्य
पाही शिवहि न ज्यातें त्या पाही जगतिं एक कविवर्य. ९२
शुभदैवें कापुरुषा जरि कमला प्राप्त होय तरि त्यातें
सेवी दुःखितमानस कुलवनिता जेविं सेवि षण्ढातें. ९३
वीरांचें रणरंगीं विप्रांचें स्तवानें तेविं नारींचें
पतिकर्मीं शौर्य असे भूषण मोठें अवर्ण्य तेजाचें. ९४
दातेहि लोभ धरिती सरलाहि कोपें सुवक्रते वरिती
मतिमंत मूढ होती, दैवें ऐसे विकार जानें घडती ९५
यद्यपि नीरजमंडित नीराशय त्यांत ही जगन्मान्य
न रमे मानसमानस त्या न रुचे मानसाविणें अन्य. ९६
यद्यपि पीडा पावे परि सेवी मधुप केतकीकुसुमा
गुणलुब्धचित्त ज्यांचें ते दोषां पाहती न, गुणमहिमा. ९७
अतिपरिचयें अवज्ञा येते पदरीं असें सुधी वदती
लंकेंत लोक अवघे कनका टाकोनियां अया वरती. ९८
अतिपरिचयें अनादर होतो ऐसें सदा सुधी वदती
परि वारुणीपरिचयें तत्प्रेमाब्धीस येतसे भरती. ९९
प्रेरी धी वात हरी श्लेष्मा छेदीहि वाढवी रुधिर
ऐशा सद्गुणलशुनीं स्थापी दुर्गन्ध काय विधि चतुर. १००

आर्याशतक समाप्त.

# भट्टवंश काव्य.

## सर्ग २ रा.

### श्लोक.

करोनी पित्याची[1] क्रिया भट्ट गाजी[2]
नृपा[3] भेटले बंधु **बाजी चिमाजी**
करी दुःख **बाळाजि**साठीं नृपाळ
परी व्हा ह्मणे तत्सुता[4] शत्रुकाळ १
प्रधानत्व त्या देत होता धराप[5]
परी **श्रीपतीराय**[6]चित्तांत पाप
धरी, कोंकणस्था नको तें[7] अशाला[*]
ह्मणे ' द्या पुढें आज घाई कशाला? ' २
प्रसंगप्रतीक्षा करी दक्ष[8] राजा
वदे ठीक आहे सभास्थां[9] घरा जा
असे लोटले मास सा, काल गेला
प्रसंग प्रशस्त द्रुत प्राप्त झाला. ३
**निजामुल्मुल्क्** नाम **दिल्ली**पतीचा
सुभेदार विख्यात जो दक्षिणेचा
न दे द्रव्य[10] तो बादषाहास मस्त
ह्मणोनी करी सिद्ध सेना समस्त ४
मनीं फार भ्याला **निजामुल्मुल्क**
रवीतें विलोकूनि जैसा उलूक[11]

---

१ बाळाजीची. २ मोठे शिपाई. ३ शाहूस. ४ बाळाजीच्या मुलांस चिमाजीस आणि बाजीरायास ह्मणे. ५ शाहुराजा. ६ प्रतिनिधि. ७ तें प्रधानपद कोंकणस्थांस न मिळो असें पाप धरी. ८ चतुर. ९ दरबारांतील लोकांस. १० वसुल, रसद. ११ घुबड.

* अशा कोंकणस्थांस.

तदा शाहुसा मित्र त्याला[1] दिसेना
वदे शाहु देतों रहा स्वस्थ सेना. ५
पुसे शाहु सर्वा प्रधानांसि द्यावें
कशा उत्तरा मोंगलातें वदावें
न देतां सहायासिं जाईल नक्षा[2]
विचारोनि बोला ह्मणोनी स्वपक्षा. ६
कथी श्रीपतीराव तो 'सैन्य नाहीं
झुजे दिल्लिपाशीं दिसेना असाही
प्रवीर प्रतापी, रणीं ज्यासि[3] भ्यावें
वकीलासिं त्या संप्रती जाउ द्यावें'. ७
मनीं खिन्न उक्ती तशी ऐकुनी ती
वदे भूप ऐकूं नये हे कुनीती[4]
त्वरें बाजिराया महाराज आणी
निदेशा[5] पुसे तोहि[6] जोडोनि पाणी[7]. ८
रिपू दिल्लिभूपाळसा[8] प्राप्त होतां
धनी शाहुसा युद्धसें पर्व येतां
मिळे ज्यामुळें अप्सरांचाहि[9] संग
न षंढाविना कोणि टाळी प्रसंग. ९
असे सिद्ध मी सैन्यही वाट पाहे
रणाची, धनाची समृद्धीच[10] आहे
नृपादेश[11] हा भव्य झाला मुहूर्त
निघालों ह्मणे राव सभ्यांत[12] धूर्त[13]. १०

---

१ निजामास. २ कीर्ति. ३ ज्याला शत्रूंनी भ्यावें आणि जो बादषहाशीं लढेल असा वीर दिसत नाहीं. ४ कुत्सित नीति, दळूबाई सारखें भाषण. ५ आदेस. ६ बाजीराव. ७ हात जोडून. ८ बादशाहा सारखा. ९ अप्सरांची प्राप्ति-स्वर्गप्राप्ति इत्यर्थ. १० रगाडी. ११ राजाची आज्ञा. १२ दरबारांतील मंडळींत. १३ ऊनाड.

गमे [1]भावितच्छौर्यसूर्योदयाचा
पडे [2]द्योतें कीं दूत धांवे अयाचा[3]
महाराष्ट्रियांचा, द्विजात्युक्तिदंभें[4]
नृपांची[5] तदा पूर्ण नेत्रें मुदंभें[6]. ११
दिली तेधवां पेशवाई सवस्त्रा[7]
गमे झोंबला तद्विरुद्धांस[8] वस्त्रा
वदे शाहु शाबास! त्या बाजिराया
करी युद्ध दिल्लीपकंडू[9] निराया. १२
चिमाजीसही पंडितें क्षिप्र केलें
तदा सौख्य सर्वांस अत्यंत झालें
वकीलांसि देतां निरोपासि राजा
वदे सैन्य येतें निजामा कथा जा. १३
निघे घेउनी कर्ज ठेवून सेना
ह्मणे जाउं या शीघ्र निद्रा[11] नसेना

---

१ भावि-तत्-शौर्य-सूर्य-उदयाचा पुढें होणारा जो त्या बाजीरावाच्या शौर्यतल्लक्षण सूर्याचा उदय त्याचा. २ प्रकाश-सूर्योदयापूर्वीं प्रकाश पडतोच. ३ महाराष्ट्रीय लोकांच्या शुभ दैवाचा दूत (अयः शुभावहोविधिः) ४ द्विजाति-उक्ति दंभें-ब्राह्मण जो बाजीराव त्याच्या बोलण्याच्या मिषानें. ५ शाहुराजाचीं नेत्रें. ६ मुत्-अभें-आनंदाश्रूनीं-बाजीरावानें या प्रसंगीं जें भाषण केलें तें भाषण नव्हे तर पुढें होणारें जें बाजीरावाचें शौर्य तोच सूर्योदय त्या सूर्योदयाचे पूर्वी हा भाषण तल्लक्षण प्रकाश पडला अथवा पुढें बाजीरायाच्या शौर्यानें सर्व महाराष्ट्रीय जनांस येणारा जो अय ह्मणजे शुभ दैव-त्याचा या भाषणाच्या दंभानें ह्मणजे मिषानें दूतच आला काय इत्यर्थ तेव्हां शाहूराजाचे डोळे आनंदाश्रूंनीं भरले. ७ वस्त्रें वगैरे बहुमानपूर्वक. ८ बाजीरावाचे प्रतिस्पर्धी प्रतिनिधीस वढ्यासारखें झोंबलें बाजीरावास पेशवाई मिळाल्यामुळें वाईट वाटलें इतका अर्थ ९ बादशहाची खाज जिरावण्याकरितां १० हा किताब ११ निद्रा नाहीं मिळाली तरी चिंता नाहीं.

खरांडीवरी तो करी वस्ति तूर्ण
निजामा गमे जाहला हेतु पूर्ण. १४

## अनुष्टुप्.

औरंगाबादनगरासमीप ग्राम हा वसे
तेथें प्रधान तो बाजी निजसैन्यासवें वसे. १५
बाजीराव असे मंत्री वीर सुंदर जित्वरें
निजामांतःपुरीं ऐसा कळे वृत्तांत सत्वर. १६
झाल्या उताविळ्या नारी बाजीराया पहावया
निजामातें प्रार्थिती त्या भेटीसाठीं व्हावया. १७
दूष्यांत भेटिचा योग आणि मोगल उत्सुक
पाहे जवनिकांतःस्थयवनिजन कौतुक. १८
सवें सेवक दोघेच निघे घेऊनि यावया
बाजिराय करी वेष शोभेसा त्याचिया वया. १९
पदीं जोडा करीं खड्ग शिरीं फेंटा मुखीं विडा
स्त्रिया ह्मणति पाहोनी टळो याची इडापिडा. २०
लोडालागोनि बसतां राजे ते द्युतिमत्तर
गमे लोड धरा दोघे ध्रुव दक्षिण उत्तर. २१
अन्योन्य कुशल प्रश्नोत्तरें ऐकति नायका
पुसे निजाम बाजीतें अति अद्भुत आयका. २२
"बाजीराव तुह्मी भोळे आला हें काय एकटे
आतां येथूनि सुटका कराया कोण हो झटे? २३

---

१ खरांडी नांवाचा गांव. २ खरांडी गांव. ३ यशशाली. ४ निजामाच्या जनानखान्यांत. ५ बाजीरावास. ६ बोलवावयास. ७ राहुटींत. ८ पडद्यांत बसलेल्या यवनाच्या स्त्रिया. ९ तारुण्य वयास. १० तेजस्वी ११ पृथ्वी. १२ बाजीराव आणि निजाम.

कोठें होळकर ख्यात आहे शिंदाहि संप्रती ”
रावबाजी महामंत्री वदे त्या यवनाप्रती. २४

“जिथें मी सर्वही तेथें नव्हे अनृत हें कदा
हा होळकर हा शिंदा विलोका नीट एकदां.” २५

ऐसें वदोनि तें दावी जे सर्वे सेवकद्वय,
चित्तीं चकित तेव्हां तो करी मोंगल विस्मय. २६

ते गुप्तरूप हुजरे मुजरे करिती तदा
वदे मोंगल संतुष्ट बाजीचा जय सर्वदा. २७

बाजीराज खरा गाजी राजे पाजी दुजे महा
राजे हजाम हे सारे वदे बाजी निजाम हा. २८

चातुर्यं तेविं सौंदर्यं बाजीच्या हृष्ट मनां
मोत्यांची करिती वृष्टी निजामांतःपुरांगना. २९

मुक्तामिषें उडुगण नभा सोडुनि चालता
होय त्यांतें दिसे बाजी उडुराजचि खालता. ३०

बाजीराय स्वशिबिरा यवनसत्कृत येउनी
पाठवी स्वबला यवनापासुनी द्रव्य घेउनी. ३१

संकेत केला एकांतीं अंबाजीपंत धाडुनी
पुढें निजाम चालावे पेशवे पाठिलागुनी. ३२

---

१ मसलती. २ वीर-सरदार. ३ हा तूं निजाम. ४ चांगल्या मनाच्या सच्छील बायका. ५ निजामाच्या जनानखान्यनांतील स्त्रिया. ६ नक्षत्र गण. ७ नभा-आकाशास सोडून चालता होय-कारण त्यास बाजीराव हा खालीं ह्मणजे पृथ्वीवर चंद्रच दिसे. अर्थात् चंद्र खालीं गेला ह्मणून नक्षत्रें ही खालीं पडूं लागलीं. ८ चंद्र. ९ आपल्या गोटास. १० यवनानें-निजामानें सत्कृत. ११ आपल्यां फौजेस. १२ हे पुरंदरे पेशव्याचे मुतालिक.

गर्वाद्रिवरुनी[1] आर्धी अजंठ्यावरुनी मग
उतरोनि निघे हूण मार्गे बाजीहि शीघ्रग. ३३

निजामाचित्तीं भीतीनें तरंग[2] बहु ज्याहुनी[3]
धाले[4] लोक असे पुण्य नर्मदाजल पाहुनी. ३४

कोट्यावरीं[5] निजामातें भेटले सैन्यनायक[6]
येती जे[7] त्यां[8] धरायास सम्राडाज्ञाविधायक[9]. ३५

ते बोलती निजामातें कैसा झालासि मस्त रे
बादषाहासवें गर्व करुनी कोण रे तरे? ३६

कां न भेटसि शाहांस[10] धाडिसी तूं न कां धनें[11]
वद शीघ्र जरी कांहीं उत्तरायोग्य साधनें[12]. ३७

कृत्रिम प्रभुसी कैसें करीन जन हीनसे[13]
हूर्ण[14] बोले दक्षिणेंत स्वस्थता क्षणही नसे. ३८

एकामागोनि दुसरे वंडावे होति दांडगे
मराठे लागती पाठीं अजाच्या[15] जेविं लांडगे. ३९

यावें म्यां केविं भेटीला धाडावें कोठुनी धन
हा मी पळें पहा पाठीं मराठे लागले जन. ४०

इतक्यांतचि ये बाजी उज्जनीहूनि त्या स्थळीं
महाकालासि[16] नमुनी क्षिप्रेच्या[17] न्हाउनी जळीं. ४१

---

१ निजामासारखा गर्विष्ठ मनुष्य ही वेळ आली तेव्हां प्रथम गर्वपर्वतावरून उतरला ह्म० गर्व टाकिला. आणि नंतर आजंटा नांवाचा घाट उतरला–एवढा निजामही पळूं लागला इत्यर्थ. २ लाटा. ३ ज्या नर्मदाजलाहून. ४ तृप्त झाले. ५ बुंद्धकोटयावर. ६ निजामास धरण्यास दिल्लीहून आलेल्या फौजेचे सरदार. ७ सरदार. ८ निजामास. ९ बादशहाच्या आज्ञेप्रमाणें करणारे. १० बादशहास. ११ वसूल. १२ पुरावा. १३ हलक्या लोकांसारखे. १४ निजाम. १५ बोकडाच्या. १६ या नांवाचें उज्जनींतील ज्योतिर्लिंग. १७ उज्जनी जवळची नदी.

दिल्लीचें सैन्य उठलें बाजीरायावरी तरी
तरे कां न महा[1]वातक्षुब्धोदधिवरी तरी. ४२
पळवी रिपुतें बाजी-राय युद्धांत तत्वता
गमे दे[2]त्यांसि नमितां महा[3]काल निजात्मतां[4]. ४३
दिल्लीची पळतां सेना निजामाची न कां पळे
मार्गावरोनि सासूच्या सूनबाई कशी चळे. ४४
प्रधानानेंहि ती सेना दिल्लीपर्यंत हांकिली
दिल्लीसमीपगा[5] भूमी निज सैन्येंचि झांकिली. ४५
मर्यादाभंग व्हावा न सेनेकडुनि माझिया
ह्मणोनि राहिलों दूर करावी प्रभुनें दया. ४६
प्रधानाचा श्लेषयुक्त निरोप बहु हा सले
सगर्व दिल्लीनगरीं प्रवीर जन हांसले. ४७
न होय साह्य दिल्लीस्था दुर्बलाहि जनासि कीं
ग्लान हीन शलाकेला सोसे पंचास्य नासिकीं. ४८
उठले आठ हजार प्रवीर परि पेशवा
धाडी स्वर्गासि तज्जीवां ठेवी ईशकृपें शवा. ४९
बादषाहासहि कळे केला विप्रें[6] बलक्षय[7]
निजामानेंहि कथितां जो होय[8] गतसंशय. ५०
दिल्लीपासि गमे सत्य निजाम कथितो तसें
क्लेश होति दक्षिणेंत स्वस्थता पळही नसे. ५१
सम्राट्[9] वदे दिधला दिल्लीलाचि उपद्रव
माझ्या कर्णीं शिरविला बंडें या सैन्यपत्[10]रवं. ५२

---

१ मोठ्या वाऱ्यानें क्षुब्ध झालेल्या समुद्रावर ही नाव तरत नाहीं काय? तर तरतेच तसें ८००० फौज आली तरी बाजीराव लढताच इत्यर्थ. २ बाजीरावास. ३ शिव. ४ महाकालत्व, सर्व विनाशत्व. ५ दिल्लीजवळची जमीन. ६ ब्राह्मणानें—बाजीरावानें. ७ फौजेचा नाश. ८ बादषाह. ९ बादषाहा. १० सैन्याच्या पायाचा शब्द.

द्विजांमाजी नसे शौर्य आलें कोठूनि बाजिला
आश्चर्य गमतें मातें विष दंतांत राजिला[1]. ५३

## आर्या.

एके समयीं सम्राट् आज्ञा करि चित्रलेखकास[2] अशी
बाजीरावप्रतिकृति[3] आणी काढोनि तो दिसेल तशी[4]. ५४
साध्याचे सुवेषाची एका क्षेत्रीं[5] प्रधान भाँ[6] त्याला[7]
अश्वारूढ कदाचित्स्वस्कंधीं अडकवून भाल्याला. ५५
स्वकरें चोळूनि कणसें दाणे प्राणासि विप्र दे खाया
तों जाय त्याचि समयीं शिल्पी[8] त्या पेशव्यास देखाया. ५६
चित्र तसेंचि उतरिलें शिल्पिवरें[9] त्या त्वरेंकरूनि करें
दिल्लीश्वरें[10] तसें तें विलोकिलें चित्र यवनजननिकरें[11]. ५७
शाहें[12] निजामासि वदे अवलोकुनि चित्रें[13] लिखित तो बाजी
"ये तो सैतानाहि है मुझसे देखे न जाय तोबाजी! ५८
जल्द लगादो इसको दख्खनको तूंभि जा इसी वख्त
पर्वरदिगार[14] नकरें बम्मनके[15] हाथ दिल्लिका[16] तख्त." ५९
चवथाई मोकासा सरदेशमुखीहि खानदेश तसा
सारा स्वारी खर्चाहि संपादुनि ये प्रधान विजय असा. ६०
आला निजाम दक्षिण-देशीं बाजीहि सप्तर्षिनगरा[17]
बहु साधु साधुराजा शाहु वदे त्या प्रधान तूंचि खरा. ६१

---

१ दुतोंड्या सापास विष नसतें. २ चितान्यास ३. तसबीर. ४ तसबीर. ५ शेतांत. ६ शोभा-साध्या पण चांगल्या पोषाकाची शोभा. ७ धारण करिता झाला. ८ कारागीर-चितारी. ९ शिल्पी-श्रेष्ठानें. १० बादशहानें तसेच दुसऱ्या लोकांनीं ११ यवनजनांच्या समुदायानें तें चित्र पाहिलें. १२ बादशहा. १३ चित्रांत असलेला. १४ ईश्वर. १५ ब्राह्मणांच्या स्वाधीन. १६ दिल्लीची गादी. १७ सातान्यास.

राजाज्ञेनें सानुज[1] पुण्यग्रामीं प्रधान येऊन
प्रासादारंभ[2] करी वसवी गांवहि जनासि नेऊन. ६२
बुंदेलखंडभूपति होता जो छत्रसाल नामानें
रजपूत जाति ज्याची वृद्धवयें मान्य तो जना मानें. ६३
खान मुहंमद बंगष होय सुभेदार जो प्रयागाला
दिल्लीप त्यासि धाडी राजावरि त्या धरोनि रागाला. ६४
भीति शिरे नृपचित्तीं घालितसें सतत शांतिला खो[3] जी[4]
"बाजी! बुंदेलेकी जाती है बाजिराव राखो जी." ६५
दोहे[6] शंभर ऐसें बाजीरायासि लीहुनी पत्र
शाहूसही लिही कीं मजवरि राहो तुझें कृपाछत्र. ६६
ह्मणतांचि शाहुनें जा जाउनि अति शीघ्र बाजिराव करी
धुळधाण शत्रुंची तो व्याघ्र गमे रावँ परचमू बँकरी. ६७
अति हृष्ट वृद्ध नृपं तो सुतें तिसरा बाजिराव मानून
निजराज्यभाग तिसरा अर्पी त्या तद्बलासि वानून. ६८
गोविंदपंत[14] तेथें विप्र कऱ्हाडा जयासि ठेउनि घे
मित्र निरोप स्वीया देशा मग यावया प्रधान निघे. ६९
उत्कर्ष हा द्विजाचा धूर्तां क्षणसौहृदा निजामातें
सोसे न ह्मणे स्वमनीं होइल माझ्याचे विघ्न कामातें. ७०
शाहूचा सेनापति दाभाडा त्र्यंबकाख्य राव तया
अनुकूल, बाजिराया कथि वृत्ता गुप्त हेर धांवतयीं. ७१

---

१ कनिष्ठ बंधु चिमाजी आप्पासह. २ राजवाडा–शनवारच्या वाडयाचा आरंभ. ३ उठवण–घालविणें ४ भीति–भीति स्वस्थतेला–पळविते. ५ अजी बाजीराव, हे बाजीरावा! ६ दोहरे. ७ बाजीराव. ८ शत्रूंची फौज. ९ बकरी–शेळी–सारखी. १० राजा छत्रसाल. ११ त्यास (जगतरावजीदेव व हरदेव) असे दोन मुलगे होते आतां त्यांणीं बाजीराव तिसरा मुलगा मानून राज्याचा तिसरा भाग दिला. १२ त्याच्या सैन्यास किंवा सामर्थ्यास. १३ वर्णन करून. १४ हेच झांशी संस्थानचे मूळपुरुष. १५ क्षणिक–मित्र, शाळू सोबती. १६ दाभाडा निजामास अनुकूल झाला या वृत्तास.

रा[1]व सखेद वदे हो वागवि जो सेवका निजामानें
त्या शाहुचा धनानें वश केला सैन्यपति निजामानें. ७२
छत्रपतीस पुसाया वेळ नसे ह्मणुनि धाडिलें पत्र
कीं जड पडेल फाराचि होता सैन्यप[2] निजाम एकत्र. ७३
द्विज मग बाजीरावहि सत्वर करुनि स्वसैन्य चालु[3] निघे
पडतांचि गांठि डभईवरि तें अन्योन्य सैन्य चालुनि घे. ७४
चाळिस हजार सेना सेनापतिची हजार पंचविस
होती प्रधानसेना अल्पपरी सुदृढ कष्ट सह्य जिस. ७५
बाजी सद्वाजीवरि बसूनि धरि त्या रणाजिरी बाजी
तिकडे त्र्यंबक सेनापति बसुनी सद्रजीं करी आजी. ७६
सेनापति शर मारुनि चवदा भाते रिते करी स्वकरें
तीन प्रहर असें रण करिती द्विजशूद्र वीर ते निकरें. ७७
सेनापतिदल भंगे त्यजुनि रणस्थल निघे त्वरें जाया
स्वबलीं प्रधान सांगे सेनापतिला करुनि ये जाया. ७८
घोडा पिटीत जाउनि सेनापतिच्या समीप वायु तसा
बाजीराव प्रेषी उंटस्वारासवें निरोप असा. ७९
स्वीयांसी झगडासि कां माझी तरिही तुझीच हानी ती
झगडुनि असें परांसी संपादी देश बा पहा नीती. ८०
हा! हतभाग्या! सोडुनि शाहूतें मिळसि काय यवनातें
ते अल्पबुद्धि न कसे आपपराचें न गणिति यवं[10] नातें[11]. ८१
चुकलों असेन मी जरि करणें होती विनंति शाहूतें
नक्षत्रानें विधुतें जावें सोडोनि काय राहूतें ८२

---

१ बाजीराव चाकरास सन्मानानें वागविणारा अशा शाहू राजाच्या सेनापतीनें धनास मोहून परक्यास मिळावें काय? असें सखेद वदे. २ सेनापती. ३ सैन्यास चालू करून आपणही निघे. ४ हा गांव हल्लीं गायकवाडाकडेच आहे. ५ उत्तम घोड्यावर. ६ घोड्यास बाजी उडवीत. ७ लढाई. ८ सांढणी स्वाराबरोबर. ९ परक्यांसीं. १० यवभर—थोडकेंही ११ संबंध.

त्वां सैन्य आंवरावें आवरुनी मीहि मर्द्दुला आंगें
येतों भेटीस असें सेनापतितें प्रधान बहु सांगें. ८३
परि हटवादी न हटे सेनापति त्यांत दैवगति फिरली
गोळी एक कपाळीं सहसा त्याच्या रणांगणीं शिरली. ८४
बाजीराव सुदुःखित सेनापति पावतांचि निधनातें
स्वजनांसि वदे ध्यावें गोट लुटोनी न कोणि हि धनातें. ८५
शीघ्र प्रधान येउनि कळवी शाहूस वृत्त सर्व खरें
दुःखित शाहू वदला झाला स्वीयांत कलह हें न बरें ! ८६
यशवंतराव होता सुत सेनापतिस बायको होती
नाम उमाबाई जी दुःखित पत्यर्थ बहु असे हो ती. ८७
समजावी बहु त्यांतें जाउनि शाहू स्वतां तळेगांवीं
नलगे कविस कथाया ऐशा प्रभुचीं मुखें यशें गावीं ८८

## बाजी विजय नाम सर्ग २ समाप्त.

---

१ माझ्या सैन्यास. २ स्वतः हा दाभाडयाच्या लढाईचा इतिहास निरनिराळ्या बखरींत निरनिराळ्या प्रकारचा आहे. दाभाडयाच्या बखरींत पेशव्याकडून—आगळीक जाहली. शाहूनें दाभाडयास दिलेल्या मुलखांत पेशवे धांदल करूं लागले ह्मणून ही लढाई जाहली पेशव्यास फितूर करून जय मिळविला असें आहे. शाहूच्या चरित्रांत छत्रसालास साह्य देऊन येतांना निजामाचे मनांत विरुद्ध येऊन त्याणें दाभाडयास अनुकूल करून घेतलें असें आहे. ग्रांडफ आणि पेशव्याची बखर यांत छत्रसालास मदतीस गेल्याची स्वारीहून परत येतांना दाभाडयाची लढाई लिहिली नसून हा स्वतंत्रच स्वारी, तसेंच दाभाडयाचा गोट लुटला असें आहे. याकरितां दाभाडयाची बखर दाभाडयाच्या पक्षाची, पेशव्यांची बखर पेशव्यांच्या पक्षाची असेल असें कल्पून शाहूची बखर उदासीन असेल असें समजून तत्प्रमाणें हें वृत्त वर्णिलें आहे.

# भट्टवंशकाव्य.

## सर्ग ३ रा.

### श्लोक.

**बुंदेलखंडीं**[1] असतां प्रधान[2]
झाला **निजाम** स्फुट[3] साभिमान[4]
दिल्लीप[5] धाडी कळतांचि खान
**शाहाजतेति**[6] प्रथिताभिधान १

दे साह्य **शाहूसि** वदे निजाम[7]
चिंता करी शाहू मनीं निकाम[8]
**बाजी** नसे कोण करील काम
आपा वदे त्या समयास वाम[9] २

जायासि आज्ञा मजला असावी
चिंता मनीं लेश नृपा नसावी
ऐसें वदे पंडित[10] वीर पूर्ण
घेवोनि सेनासि निघाचि तूर्ण ३

चिंती **चिमाजी** स्वमनीं अजस्र[11]
पंचाधिका विंशती[12] ही सहस्र
अस्वल्प सेना झुजणार काय
मोठा असे शत्रु घडे अपाय ४

---

१ बुंदेलखंडाकडे-हिंदुस्थानांत. २ बाजीराव. ३ स्पष्ट. ४ गर्विष्ठ. ५ दिल्लीचा बादशाह. ६ शहाजतखान भडभुंजा ह्याप्रसिद्ध नांवाचा. ७ निजाम उल्मुल्ख शाहूस साह्य मागे. ८ अत्यंत. ९ सुंदर. १० पंडित पदवी मिळालेला चिमाजी आपा. ११ बहुतवेळ. १२ पांच आधिक वीस इतके हजार २५०००.

# जाहिराती.

-:o:-

## श्रीमान् व हौशी लोकांकरितां मनोरंजक वस्तु.

**कृतिजन्य सर्प**—हे दिसण्यांत हुबेहुब जीवंत सर्पाप्रमाणे पहाणाऱ्या मंडळीच्या मनांत भीति उत्पन्न करून मंडळीची दाणादाण होते, व हे कृतीनें तयार केले आहेत असें समजल्यावर मनास फारच आनंद व चमत्कार वाटतो किं० १ रु० ट० हा० चार आणे.

---

**कृतिजन्य किडा**—वरीलप्रमाणें हुबेहुब परंतु शेपटीच्या बाजूस धरून उचलला असतां हात दिडहात लांब होतो व सोडल्यावर बोटभर लांब दिसून चालूं लागतो किंमत ·।।। आणे ट० हा० चार आणे.

---

**पळणारा उंदीर**—हा धातूचा केलेला असून दिसण्यांत जीवंतप्रमाणें दिसतो यास टेबलावर उरफाटा टेवला असता तो आपोआप सुलटा फिरतो व जरा धक्का दिला असतां पुष्कळ अंतरावर चालूं लागतो. किंमत १।। रु० ट० हा० चार आणे.

---

**पुष्पगुच्छदर्शक इंद्रजालिक दुर्बिण**—यांत पाहिलें असतां निरनिराळे प्रकारची झाडें, फुलें, कमळें वेली, चित्रें वगैरे ५० सांवर चित्ताकर्षक देखावे दिसतात. किंमत -।।।- आणे ट० हा० चार आणे.

---

**मानसिकशक्ती वाढविण्यास व लहान मुलांस सोप्या रीतीनें हिशेब शिकविण्याचें चमत्कारीक गूढ**—कि. ३ रु० ट० हा० बारा आ.

**सूचना**—ह्या सर्व प्रकारच्या वस्तु आमचेकडे रोख किंमत अगर व्हाल्युपेएबलनें मागविल्यास पाठऊं.

**पत्ता**—दत्तप्रसाद मंडळीचे म्यानेजर.

मु० राजापूर जि० रत्नागिरी.

# जाहिरात.

## काव्यरत्नावली.

प्रस्तुत मासिक पुस्तक १८८७ च्या जून महिन्यापासून सुरू झालें आहे. आजपर्यंत पुष्कळ प्रकारचे विषय प्रसिद्ध झाले आहेत, यांत आलीकडील नामांकित कवींचीं काव्यें प्रसिद्ध होतात. ही रत्नावली अनेक कवींकडून गुंफली जात असल्यामुळे काल्पनिक, ऐतिहासिक, पौराणिक. संस्कृत व इंग्लिश काव्यांचीं भाषांतरें, वगैरे अनेक कविता प्रसिद्ध होतात. उत्तरोत्तर नवीन कवि जास्त मिळत आहेत.

नवीन काव्यरचना करून देणाऱ्या कवींचीं काव्यें तपासण्याचें काम पुढील [ काव्यपरीक्षक ] मंडळींनें पत्करिलें आहे.

**रा० रा० लक्ष्मण रामचन्द्र वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी.**

**रा० रा० जनार्दन बाळाजी मोडक बी. ए.**

**रा० रा० वामन दाजी ओक.**

**रा० रा० वासुदेव वामन शास्त्री खरे.**

**रा० रा० गणेश बळवंत मोडक.**

या सांचाचीं प्रतिमासास २४ पृष्ठें प्रसिद्ध होतात. टपालखर्चासुद्धां फक्त दीड रुपया किंमत ठेविली आहे. मागाहूनचा दर मुळींच नाहीं. दुसरा अंक पोंचतांच वर्गणी पाहिजे.

पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावाः—

**नारायण नरसिंह फडणीस.**

जळगांव-खान्देश.

# काव्यरत्नावली.

( मासिक पुस्तक )

वर्ष २ रें.] नोव्हेंबर सन १८८८ [ अंक १८ वा.

तएवपदविन्यासास्ताएवार्थविभूतयः ॥

तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



## जळगाव–खान्देश येथें प्रसिद्ध होत असतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हासिलासुद्धां दीड रुपया.

भुसावल "खानदेशमित्र" प्रेस

## अनुक्रमणिका.


| | | | |
|---|---|---|---|
| १ | स्वग्रामप्रीति पूर्वार्ध .... .... .... .... | १ – १९ |
| २ | जुना प्रेमांकुर .... .... .... .... | १ – ३ |
| ३ | सापत्नमत्सर भाव .... .... .... .... | * – ७ |


---

* ह्या काव्याचा पृष्ठानुक्रम निराळा आहे.


# महत्वाची सोयस्कर सूचना.

### जी. वी. नाईक आणि कंपनी.

### कमिशन एजंट्स आणि जनरल मरच्यंट्स

सर्व व्यापारी, चिटणीस, व्यवस्थापक, डाक्टर, कंपन्या, ऑफिसर वगैरे लोकांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं वरील नांवाची कंपनी सर्व प्रकारचा माल मुंबईहून बाहेरगांवीं खरेदी करून पाठविण्याचें काम अगर बाहेर गांवांहून आल्यास त्याचे विक्री करण्याचें काम कसोशीनें, सचोटीनें, नियमित वेळीं माफक व नेमस्त कमिशन ( अडत ) घेऊन करीत जाईल.

कमीशनचे दर, नियम आणि नेहमीं खातें ठेवणाऱ्यांचे ठराव वगैरे पाहिजे असल्यास ठराव पत्रक मागवा फुकट पाठवूं.

मुंबई—भायखळा.

# काव्यरत्नावली

अंक १८ वा.

## स्वग्रामप्रीति–पूर्वार्ध.

( धर्मराज नारायण गांधी )

श्लोक

जेथें स्वजन्म अणि पूर्वज भाग्यशाली
क्रीडा अनेकविध बालपणींहि केली
तो ग्राम सोडुन रमे नगरीं, न पाही
त्या नाठवे कधिंहि तो खलु भारवाही १

जें स्वर्ग होय जननीपितृबंधुदास
यांशीं सुख क्रमुनि काळ इथेंच खास
तें आपुलें गृह पुरातन जो न पाही
त्या नाठवे सहृदयत्व तया न कांहीं २

जे ग्रामवासि-जन त्या कटिलागिं घेती
जे खेळती शिशुपणींहि तया सभोंती
त्यां पाहण्यास नुपज मतिही कधीं तो
वाटे मला नर शिलाहृदयत्व घेतो ३

जे वृक्ष बालपणिं मित्रसमान झाले
छायेंत बैसुनि अनेक सुवाद केले
ज्यांच्या सुसेव्य फलपुष्पभरा हरून
ऐकूनि पक्षिगणसुस्वर ज्यांवरून ४

---

१ जेथें याकडे संबंध. २ ज्या वृक्षांचे छायेंत.

ज्यांचेवरून इकडे तिकडे फिरून
ज्यांचे सुरम्य नवपल्लव ते बघून
घ्राणाननश्रुतिकराक्षिपदांस देई
आनंद जो सतताचि श्रम सर्व नेई ५
ते वृक्ष जो प्रिय पुरातन आपुले न
पाहे तया नर कृतज्ञ वदेल कोण
त्यांतून एक तुटला समजून ऐसें
दुःखी न होय नर मार्मिक तो न भासे ६
ज्या ज्या स्थलीं शिशुपणीं बहु केलि केल्या
देवालयीं हरिकथा श्रवणींहि आल्या
तीं तीं पुराण जनताप्रिय लोचनांनीं
स्थानें बघे न नर तोचि अभावखाणी ७
तद्ग्रामवर्ति-घनदाट-सुरम्य राई
जेथें चरूनि बहु पुष्टशरीर गाई
नैसर्गिकप्रचुर-तोरणरूप-शाखा
याया जिथें स्थळ नसे बहुधा मयूखा ८
आन्दोलकाकृति जिथें रमणीय वेली
ज्यांचेवरी बसुनिया बहु केलि केली
राहे तलाव जलपूर्ण सरोरुहांनीं
आच्छादिला गमतसेचि शिरोरुहांनीं ९
त्याचे तटावरुनिया कमळें प्रभातीं .
काढावयास जन घेउनि यष्टि हातीं
चाले स्मरे हर मनीं शिवपूजनार्थी

---

१ केलिशब्द मूळचा संस्कृतांत पुंल्लिंगी आहे; परंतु प्राकृतांत प्राय स्त्रीलिंगी योजण्याचा संप्रदाय आहे, ह्मणून येथें स्त्रीलिंगी योजिला आहे. २ ज्या राईमध्यें आहेत १ ज्या राईमध्यें.

आधींच त्या उडुनिया अलिपंक्ति जाती १०
जेथें[1] सदा करुनि वन्यफलोपहार
कंठीं अनेकविध घालुनि पुष्पहार
मित्रासवें समय घालविला सुखानें
ती नाठवे दवडिलें स्मृतिसौख्य त्यानें ११
राहे नदी विपुलतोय तयाच गांवीं
सर्पाकृति क्रम मनोहर जीहि दावी
सावर्त[2] कृष्णजल डोह जिचे प्रभूत
हिंडावया जलचरां स्थल थोर जींत १२
कांठीं जिचे रुचिर घाट तयांवरून
नारीनरांस अवकाश फिरावया न
पाहूनिया विविध ते व्यवसाय ज्यांचे
एकाग्रतापर-मनीं बहु हर्ष सांचे १३
ते ते प्रभातसमयीं दिसतात घाट
येथेंच नाकशकलें अवतीर्ण थेट
तेजस्वि भागवतपंक्तिच जागजागीं
संसारसुप्त दिसते परमार्थि जागी १४
कांहीं यथेच्छ करिती अवगाहनातें
संध्यानिमग्न दुसरे जन, भास्करातें
अर्घ्यप्रदान करिती विधियुक्त कोणी
कोणी वदे श्रुतिसुखप्रद वेदवाणी १५
कित्येक धूत वसती निजवस्त्र हातीं
कांहीं करून मुखमार्जन नाम गाती
मुग्धा वधू कटिवरी कलशा धरून
घाटांवरून निवती विनयेंकरून १६

---

१ ज्या राईमध्यें. २ हें नदीचें विशेषण.

आचारदक्षललनानयनप्रसार
मार्गावरून न चले कधिं एकवार
त्या आपुल्या सकलशा लघुकन्यकांतें
आल्यात का ग पुसती बघती न त्यांतें १७
ऐशा पवित्र-जनतापहरस्थलांतें
पाहूनि नित्य रिझवी अपुल्या मनातें
जो स्नान कर्म उरकूनि जलप्रवाहीं
पोहावयास हारिखे मग लोलदेही १८
तीरावरून तदनन्तर वृक्षदेशीं
बैसूनि घे सतत जोचि उज्या तळाशीं
आघातशब्द परिसूनि तरुस्थ पक्षी
मासे तसेचि पळती अति चंचलाक्षी १९
शोभा विलक्षण जिची दुरुनी पहाया
तीरस्थ - शैलशिखरीं श्रमवी स्वकाया
तेथून दूरवर पात्र दिसे जयेचें
याकारणें स्थल अनेक चमत्कृतींचें २०
कोठें दिसे पुषितदेहं कुठें कृशाङ्गी
रम्या धरी कुटिल जी गति जागजागीं
केव्हां हळूच झषनेत्रकटाक्ष मारी
फेनस्मिता करुनियां खलु होय नारी २१
कोठें दिसे तरुगणें तनु झांकलेली
कोठें शिरोग्रथित जींत सपुष्पवेली
शोभा विचित्र कृश-मध्य- विमेखलेची

---

१ पुष्ट आहे देह जिचा अशी ती दिसे. २ मत्स्यरूप नेत्र. ३ विरल. ४ दिसे या अध्याहृत क्रियापदाचा कर्ता. ५ वि-- पक्षी.

दे भ्रांति तो खळखळ-ध्वनि नूपुरांची २२
तेथूनि संगम जिचा, अपुल्या पतीशीं
वाटे अनेकविध मौज पहावयासी
जों संगमीं खळखळे गमतें जया तें
ती सासरीं रडतसे खलु जावयातें २३
होऊन फेनरव-वेगवती समीप
भासे पतीस बघतांच सुखाल्प[1] बाप्प
ढाळूनि सस्मितमुखी अथवा तयातें
भेटावयास जणु वेग करून जाते २४
कोठें गुरें जल पिऊनि उभीं रहाती
कांहीं जलीं बुडुनियां वर शीर घेती
कोठें पतत्रिगण चंचुपुटीं जलातें
घे पंख निर्मल धुऊन करावयातें २५
जें स्थान मानवपदें मळलेंचि नाहीं
प्याया जला पशु धरीं भय त्या स्थळीं ही
मागें पुढें परतुनी परतूनि पाहे
कीं कोण आत्महननार्थच येत आहे २६
ऐसें अरण्यपशु थोर तसे लहान
तीरीं जिचे सतत भागविती तहान
त्यांचे बघूनि भयचंचलदृष्टिपाता
होतें दयार्द्र मन तें परतूनि जातां २७
कोठें अनेकविध आयुधपुंज हातीं
घेऊनि मत्स्यपटु धीवर पागताती
पाहूनि सैन्य अवघेचि दिसे तयातें

१ दुसरा पाठः --सुखोत्थ बाप्प

मत्स्योन्मथीं[1] सफल यत्न पहा कसे ते २८
थांबूनियाचि बघतीं गगनांतराळीं
मासे, लगेचि धरण्यास तयांस खालीं
येती त्वरें गमतसे जणु बाण कांहीं
त्यांचीं उडी फुकट जात कधींहि नाहीं २९
कोठें लपून बसतो गण लुब्धकांचा
मारावयास अडेई[2] मग बंदुकीचा
ऐकून शब्द पळती अवघ्या ह्मणून
ते पारधी स्वहृदयीं बहु होत खिन्न ३०
कोठें अनेकविध माल जयांत आहे
ऐसे सवेग मचवे बहु जींत पाहे
ते नांगरीत असतां दिसते त्वरा जी
पाहावया मन तिला बहु होय राजी ३१
मुद्रा भयंकर धरी नवमेघकालीं
आवर्तरूप-भृकुटी विलसेचि भाळीं
आरक्तवर्णजल-वेगवती बनून
कांपेचि काय निघते सवती बघून ३२
पाहावयास फिरते खलु जीस दृष्टी
जी ने करीत रव सभ्रमवृक्षयष्टि
जी दांत ओंठ जणु खात शिव्याहि देत
बोटेंहि मोडित पळे[2] गमतें खचीत ३३
जी या-परी विविधकौतुकपात्र झाली
ज्यातें तिची स्मृति निखालसही बुजाली

---

१ मासे मारणारा 'ढिसा' यानांवाचा पक्षी २ पक्षिविशेष. १ क्रियापदाचा अध्याहृत कर्ता 'ती नदी'. २ दुसरा पाठः--पळते.

तो वाटतें नर जिवन्त असूनि मेला
कीं लोपली प्रिय-पुराण-विचार माला २४
स्वग्रामसृष्टि[१]सुपमेस पहावयास
इच्छा ध[र्]ी सफल आणि करी तियेस
तो स्वाभिमान धरतो नर हो दुजे जे
मानावया स्वसुत त्यां वसुधाहि लाजे २५
भोगून वैभव नयें बहु दूर देशीं
जो जन्मभूमि निघतो नर पाहण्यासीं
तो पावतो खचित औरसपुत्रनाम
भेटावया पर कसे तिजला सकाम २६
तत्प्रेक्षणोत्सुक[१] असा नर तो निघाला
काढूनियां बहुत कष्ट[३] समीप आला
सीमेवरून दिसली मग जों तयाला
बाल्योपभुक्त-सुखसूर्य मनीं उदेला २७
तेथूनि वाट फुटते मग यावयातें
गांवांत, सांतवणशाल्मलि वृक्ष तेथें[६]
सीमानिदर्शक उभे जण राहतात
कीं द्वारपाल गमतें सहयष्टिहस्त २८
तो फार उंच पहिला पृथुसाल ज्याची
प्रत्येक-कांडगत-सप्तदळें तयाचीं
नामें स्थिरायु दुसरा घनराज वर्षे
त्याचेवरी सतत साठ हजार वर्षें २९
पाहूने ते तरु पुढें जणु आप्त आले

---

३ परम शोभेस. १ अभिलापयुक्त २ जन्मभूमि पाहण्याविषयीं उत्सुक ३ वाटेंत कष्ट काढून. ४ या क्रियापदाचा जन्मभूमि हा अध्याहृत कर्ता. ५ ग्रामसीमेपासून. ६ सीमेवर.

भासूनि हें, हृदय[७] हार्दनिमग्न[८] झालें
आलिंगिलें कडकडून तयांस भावें
थोरांस[१] जेंवि चिरनष्ट लहान भावें ४०
ज्यांचे बरोबर सदा घन खेळताती
जे सावली सतत पांथजनांस देती
ज्यांहीं शतावधि पिढ्या अवलोकिल्या ते
सन्माननीय नच होत कसे नरांतें ४१
तेथूनि शंभर पदें क्रमितां पुढें तो
स्वग्रामजन्हुतनया[२] स्वनदी पहातो
ऐश्वर्यसूचक-विलास जिचे पहातां
चित्रार्पितोपमचि[३] तो दिसला सुवेत्ता[४] ४२
कष्टें स्वदृष्टि फिरवून तिचेवरून
चाले पुढें परि तिला बघतो फिरून
याकारणें शिखरिवैभव पाहण्यासी
तो पातला न मिळतां गिरिपायथ्याशीं ४३
तों दिव्य पात्र[५] दिसलें जणु पोहताहे
तो आपुलें मन तयांत असेंचि पाहे
पूर्वोपभुक्त अवलोकनि तीं ठिकाणें
त्याचे मनीं ससुखदुःख वरी स्वठाणें ४४
जी कोरडी तड असे सजला दिसे ती
जी तोयपूर्ण तड तींतच शुष्क माती
कांहीं स्थळीं दिसत ना प्रिय डोह त्याचे
कोठें दुजे विलसतीच अनोळखींचे ४५
कोठें स्वकीय गति ती फिरवून राहे

---

७ त्या वृक्षांचें हृदय. ८ प्रेमनिमग्न. १ वडील भावास. २ जान्हवी. ३ चित्रालिखितवत्. ४ सम्यक् जाणणारा ह्मणजे मार्मिक. ५ आपल्या नदीचें पात्र.

पूर्वस्थळीं तरुसुशोभित-भूमि पाहे
ऐसें स्थलांतर तिचें स्मरवी तयातें
ही सृष्टि संतत धरीच नव्याजुन्यातें ४६
एकेक कौतुकपदा बघुनी क्रमानें
तो पातला रुचिर तीर्थजलीं त्वरेनें
स्नानादि-तोयपरिहास करूनि तेथें
नेलें तयें गतमनोव्यथ-शैशवातें[1] ४७
होतांच तें नयनगोचर तीर्थ आलें
वृद्धत्व लोपुनि शिशुत्व पुढें भुकेलें
स्वल्पाम्बुपान उपहार दिला तयातें
कीं स्नानभोजन करील अजीर्णततें ४८
सेवूनि सत्कृति अशी मग पैल तिरा
ठाके, तया अनुसरे परि थंड वारा
त्याचे मनीं द्विगुणितादर हा तियेचा
प्रेमा पुन्हा उपजवी तिस भेटण्याचा[2] ४९
मार्गावरी परिचित द्रुम ते दुतर्फा
एकेक-तीरगत-नूतन-धान्यवाफा
पाहूनि पिप्पलवटा जवळी तसे तो
आनंद-सिंधुलहरींत बुडून जातो ५०
लोकोपकार करिती पसरूनि छाया
सूर्यातपीं सतत तापवुनी स्वकाया
ते दोन वृक्ष पथिकांस गृहेंच होती
ते आश्रया पशुखगांस तसेचि देती ५१
भिक्षोपजीवि-पथिकांस समीप तोय
देती तसेंचि तरु ते जळणा स्वकाय

---

१ तीर्थजलीं. २ भेटावयाविषयीं.

याकारणें सतत झुंड वसे तयांची.
त्यां खालतीं, उपकृती खलु ही तरूंची ५२
त्यांच्या स्त्रिया निजविण्या निजबालकांतें
टांगून वस्त्र करिती वरें पाळण्यांतें
लोटून ते[3] शिजवितात निजान्न सांधें
तें एतदर्थ गरिबांस कधीं न बाधे ५३
अन्यस्थलीं रंवथ ते पशु सावलींत
आहेत निर्भय बसून सुखें करीत
पारीं बसून पुजती पहिल्या तरूतें
ग्रामस्त्रिया, सतत पुण्य जडे तयांतें ५४
ठाके क्षणैक मग त्या तरुसावलींत
वाटे तयास शिरलों अपुल्या गृहांत
ती ती विनोदपदवी बवुनी तयाचे
उल्हासवृत्ति हृदयीं अतिशीघ्र नाचे ५५
तेथून ते परिचित द्रुम लागताती
तीं पायवाट खडकाळ मधून जाती
ती चालतां अडखळे तरु एक एक ५६
पाहावयास अभिधीसह तो क्षणैक
तद्दर्शन प्रकटवी हृदयीं तयाचे
बाल्याहि–नैकविध–मानसवृत्ति–सांचें
तत्क्षिप्त तो मग करी सुरु बालचेष्टा ५७

---

२ त्या तरुचे खांदीवर वस्त्र टांगून पाळणे करतात. ३ पाळणे. १ त्याचे हृदयीं. २ द्रुमांचे मधून. ३ एक एका तरूचें नांव घेऊन तो पहावयास अडखळे; वाट खडकळ ह्मणून तो न अडखळे. ४ त्या वृक्षांचें दर्शन. ५बालपणाच्या अनेक मनोवृत्तींचे सांचे ६ त्या मनोवृत्तींनीं प्रेरित.

अझा दिसेल खलु ती दृढ भूतचेष्टा
तो स्वागता पुसतसे जवळून एका
मारी मिठी कडकडून दुज्या अशोका
तो सावलींत बसतो तिसऱ्या तरूचे
तो भोंवता बघुनियां चवथ्यास नाचे ५८

तें ढांक बाळपणचे बघतांच हांसे
टाकी, न तो प्रियतरू बघतां, उसासे
कांहीं तरूवर चढे इतरांवरी ही
फेंकी करें दगड पुष्पफलार्थ कांहीं ५९

पाहून नूतन तरूंस तटस्थ राहे
अत्यंत जे प्रिय तयां बहु वेळ पाहे
ऐकून पक्षिगणपूर्वसमानशब्द
ते भासले प्रथमचेच तया अभेद ६०

मैना चकोर कवडा चिमणी मयूर
धूम्याट[1] पोपट कबूतर चाष घार
लावा कपोत टिटवी पिक ताम्रचूड[2]
[3]व्याघ्राट काक शतपत्र[4] ढिसा गिधाड ६१

यांचा तई परिसतां रव ओळखीचा
जो हर्ष तत्स्तवनमूकच होय वाचा
ऐशीं पहात मग मौज परोपरीची
त्यानें लगुच धरिली पदवी गृहाची ६२

तेथून दूर जरि तें गृह होय त्याचें
त्या भासलें नच तसें, वल लालसेचें
प्रत्येक बाळपणची प्रिय गोष्ट जातां

---

१ मस्तकचूड पक्षी. २ कोंबडें. ३ कुकुडकोंबा. ४ सुतार पक्षी.

ये मानसीं मग कसा पदवीप्रमाता[1] ६३
तीं तीं घराजवळचीं अपुलीं ठिकाणें
ते वृक्ष तीं परगृहें जवळील रानें
यांहीं तदीय इतुकें मन वेधिलें कीं
त्यातें न भान कधिं तो निजपाय टाकी ६४
तो दृष्टिगोचर गृहाङ्गण होय त्याचे
त्यातें न तें शतपदान्तर ही न जाचे
मध्यंतरीं प्रियपुराण गृहा पहाया
त्याचें अधीर मन होय सरोमे काया[2] ६५
आकर्षिले पद तदीय गृहाङ्गणानें
डोळे परी हृदयजीवित-मंदिरानें
होऊन सद्गदित कंठ सहर्ष काया
प्रेमाश्रु देत न तयास पुढें चि जाया ६६
डोळे पुसून मग जाय पुढें क्षणानें
आलिङ्गनादि-स्तनमस्कृतिबुद्धिदानें
ओटीवरी त्वरित जों पद ठेवितो तों
तच्छैशवें स्वद वाङ्कांकि ठेविलें तों ६७
तें आपुलें चिमुकलें गृह, त्या समोंतीं
तें वाडगें, पनसचूतगवाक्षपंक्ती
आंदोलकादि-परिहास-पदें पुराणीं
तत्तत्स्थलान्वित जुन्या जिनसा बघूनी ६८
माता-पिता स्वजन आणि बहीण-भाऊ
तो पारधी शुनक अश्व तसा लढाऊ
यां आठवूनहि तदीय पवित्र चित्तीं[3]

---

१ मार्गज्ञाता किंवा मार्ग मोजणारा. २ रोमांकित शरीर.
३ दुसरा पाठः-यां आठवूनहि पडे भ्रम हा तयास
आहेंच पंचदशवार्षिक याल खास ॥ ६९ ॥

झाली जवें प्रकट शैशवकालमूर्ति ६९
[1]तत्कालबद्धसुविचारतरङ्गमग्न
सांगे न आपण गृहाधिपतीस कोण
येतां स्थितीवर वदे निज वर्तमान
झाला तया प्रणतिपूर्वकयोग्यमान ७०
तेथें कुणीच नव्हतें निज ओळखीचें
स्निग्धत्व यास्तव कमीच परस्परांचें
वंशाभिमान परि जों हृदयीं उदेला
तों बंधुवर्ग निजतोकसमान झाला ७१
आमृत्युजन्मगृहवासमनोरथाचें
साफल्य आज घडलेंच असें तयाचे
चित्तीं ठसून जडला बहु त्यास हर्ष
[2]वर्णावयास असमर्थ तयास शेष ७२
ती जन्मभूमि सकलेष्टमनोरथांची
त्या कामधेनु दिसली अणखी तयाची
प्रीती गृहावर अशी जणु त्या समोर
प्रासादहर्म्य दिसतात तया भिकार ७३
पाहून तें सदन जीर्णदशेस आलें
त्यातें अकालमरणासम दुःख झालें
हें गेह आमरणकाल टिकेल काय
ही तापवी सतत भीति तदीय काय ७४
जें मानसौन्नतिसुखप्रणयप्रसाद
यांतें सदा उपजवी धरुनी अभेद

---

१ शैशव काल. २ दुसरा पाठः— वर्णावयास न शके बहुशीर्ष शेष ॥ ७२ ॥

पोटाळणें सदभिमान तया जुन्याचा
हा होय धर्मच महाशयसज्जनांचा
जेथें स्वजन्म दिधलें चतुराननानें
जेथेंहि बालपण घालविलें सुखानें
देहान्त तेथचि घडो निज ही दृढेच्छा
बाणे मनीं सदभिमानपरा तयाच्या
तो धन्य होय खलु जो नगरस्थ वाडे
मित्राधिकारगजंतारथ आणि घोडे
यांतें त्यजून निजजीवितशेषकाल
स्वग्रामपूर्वजगृहीं दवडी सुशील ७७
ज्यांहीं केलें प्रमुदित ह्मणी जन्मुनी भूमिमातें
नेलें तीतें बहु करुनियां विक्रमां उन्नतीतें
दुःखाभावा सतत दिधलें निष्कलंकात्ममोक्षें[२]
त्या पूर्वांशीं[३] कृतिसदृश तो व्हावया कां न तोषे ७८
तेथें तया सौख्य रहावयास
वाटे ससंताप पुराधिवास
आयुष्य कंठीन सुवर्तनानें
संकल्प हाची धरिला मनानें ७९
पाहून सृष्टिक्रम हा विचित्र
मानी परी भीति मनांत फार
जगीं तशांतून युगांत याही
उत्कर्षतें सत्य सदान पाही ८०

---

१ दुसरा पाठः- तेथेंच जीर्ण निजदेह पडो अशी तो
इच्छा धरी सफल तीस करूं पहातो ॥ ७६ ॥
२ निष्कलंक देहत्यागानें. ३ त्या आपल्या पूर्वजांशीं.

व्याघ्रादिकांतें मृग खावयास
असंख्य लोकीं परि दुर्जनांस
मिळे अहिंसाव्रतसाधु एक
दहा हजारांत सजातिलोक ८१
याकारणें दुर्जन तें क्षुधेनें
होती अतिव्याकुल त्याच मानें
शोधून तो सज्जन काढितात
बचावतो त्यांत कसा अनाथ ८२
हा जाच दे त्यास सदा विचार
माझें कसें कार्य पडेल पार
फलावरी दृष्टि धरून मानें
आरंभिली सत्कृति ही कवीनें ८३
चराचराधारगुणानुचिन्ता
तदुद्भवात्मोन्नतिदार्ढ्यवांछा
तत्सिद्धिलोकोपकृति त्रयी ही
सायुज्यमुक्तिप्रद मध्यलोकीं ८४
याया करीं दुर्गमधर्मदुर्ग
शरीरचेतोबल पाहिजेच
तत्पोषकग्रामसमृद्धवास
याकारणें तो प्रिय होय त्यास ८५

# जुना प्रेमांकुर.

गोविंद वासुदेव कानिटकर बि. ए.

श्लोक

बाइ तात तव निर्दय भारी
ईश हा खचित गे अविचारी,
रत्न सोज्वळ मनोहर ऐसें
लोहयुक्त घडवी तरि कैसें ! १
मधुर सुंदर गोड तुझा गळा
शिकवि तात तुला विविधा कळा
मन सुसंस्कृत होउनि शोभलें
सुखवि अन्य जनाप्रति जें भलें २
हरिशि चित्त सखे झट आमुचें
श्रवण होइ यदा तव वाणिचें
हससि मन्द मनोरम त्या मुखें
अहह ! गे भलत्याप्रति तीं सुखें ३
तुजविणें करमे न गृहीं मुळीं
कधि बघेन गमे फुलली कळी !
सुखद मत्सहवास घडे तुला,
तव विलक्षण मैत्रि तशी मला ४
निजगृहांत विषण्ण घडे मन
करिति तीं वचनें ममसांत्वन;
अति मनोहर तो मुखचंद्रमा
मकल दु:खतमाप्रति ने शमा ५
कमल कोमल, काम्य, सुनिर्मळ

स्मरतसे मुख तें तव सोज्ज्वळ,
सुरकशी, हसशी, रुसशी परी
हृदय विंधिति चोज परोपरी! ६

सदा येत होतों गृहीं त्या तुझ्या गे,
न बोलावणेंही अह्मांलागि लागे
न आलों तरी धाडिशि सेवकातें
असा स्नेह होता तुझा चंद्रकांतें! ७

किती थोरवी ती गमे त्वन्मनाची
किती वर्णुं शालीनता मानसाची
किती सौम्य मुद्रा, किती प्रौढता ती
किती त्या शरीरीं वसे गोड कांती? ८

आधींच देहीं गुणसंनिवेश
त्यांतून तारुण्य, मनोज्ञ वेश!
ती अंजरी चोळि तटस्थ अंगीं
रम्यांगि! शोभे तुज त्या प्रसंगीं! ९

विविध नेसशि तूं लुगडीं किती?
न मज या समयीं करवे मिती
कधिं मनोहर चौकटि तांबडें
कधिं हिं काळिचचंद्रकळा, गडे! १०

कधि गुलाबि मनोरम पातळ
कळि गुलाबि गमे सखि केवळ!
जनक यापरि हौस तुझी करी
बहु असे ममता तव ज्यावरी ११

सुबक तांबुस गोंडस गाल ते
किमपि तत् तुलनार्ह न भासतें
सुभग ये स्तनगुच्छ लते पहा
टवटवीत किती विलसे अहा! १२

कनकघट असें गे नांव देती तयांतें
कवि, तदपि गमे कीं व्यर्थ दोषोपमा ते!

अति कठिण असे तें हेम कोठें जडांध ?
कुच मृदुल तुझे ते स्पृश्य कोठें सुगन्ध १३
मंद वायु हलवी जशि वेल ;
तेंवि यौवन करी तुज लोल ! ;
दृष्टिपात तव दुःसह झाला ;
वर्णवे न सखि साग्र कवीला ; १४
रसरसलि तुझीं तीं सर्व गात्रें मदानें
स्मरति मजसि आतां त्वच्चरित्रार्द्रगानें
सुखमय बहु गेले वासर प्रेमभावें
दिन परत न येती काय दैवा ह्मणावें ? १५
तुजसि कांति अ-कान्त मिळे अहा !
सुमन तें कु-मनोयुत हो पहा !
सकल त्या सु-कला सुकल्या तदा
पशु-कला कुशला जुपल्या यदा १६
बहुत देउनि लक्ष्य धनावरीं
करि अलक्ष्य पिता सुगुणांवरी
कशितरी बनवी तुज नोवरी
अहह ! कर्मदशा विलसे खरी ! १७
सौंदर्ययुक्त बनवी विधि आधिं जीतें
विद्या-विभूषित करी प्रिय-तात तीतें
अज्ञानराशि वर तोहि कुरूप ऐसा
कंठीं तिच्या जनक बांधुनि देइ कैसा ? १८
या दुष्टलोकीं अति नीच तात
हे शेंकडों खाटिक भासतात !
हे पाळिती जी बकरी स्वगेहीं
हा ! कांपिती कण्ठ तिचाच, पाहीं ! १९

बहुत हर्ष तिला मनीं जाहला. ३७
पाहोनि प्रियता हि त्या सवतिची आल्हाद झाला नृपां,
तेव्हांपासुनि पूर्विच्या न उरली भार्येवरी ती कृपा,
सोडोनी व्यवसाय सर्व नृपती राहे सदा मंदिरीं,
रूपानें जणुं मोहिनी नृपतिला घालीतसे सुंदरी. ३८
भूपास त्या कुटिलता न कधींच ठावी,
नेणोनि ह्या कपट मोह, कृपा करावी;
केला असा सहज अंकित भूप भोळा,
पाहेचिना शशिकलेप्रति आणि बाळा. ३९
सांगोनि यापरि तिचें भलतें पतीला,
त्याच्या मनीं बहुत विप्रियें भाव केला;
ऐशापरी कुटिलता करुनी, सतीतें
दुःखार्णवीं बुडविलें जननीसुतांतें. ४०

आर्या

पत्यकृपा नंवोनी, ती साध्वी मानसांत दुःख करी,
काय विधीनें भाळीं लिहिलें न कळे दिसे गती न बरी. ४१
" त्या मदनांता पाहुनि कंठितसें दिनहि संकटामाजी,
काय विभो ! अव पाहुनि केली माझ्यावरी हि इतराजी ? ४२
भोळ्या नृपास कैसें वेड तिनें लाविलें, तया न सुचे
दुसरा व्यवसाय, सदा पहात बसतो गृहांत तोंड तिचें. ४३
मी दुष्ट ! दोष पतिचा नाहीं तिळभर, गमे प्रभो ! मजला,
माझा उपदेशाचि मज दैवें कैसा बरें फळा आला ? ४४
मानसिं मानित होतें नाहीं मजसम जगांत अन्य सुखी,
शेवट दाखविला हा दैवा ! त्वां लोटिलेंस मज दुःखीं ! ४५

२ ढोंगीपणा-कपट. १ वाईट-नावड.

शक्ति न या नृपतिला उरली हा राज्यभार शिरिं घ्याया,
परिणाम मला न कळे. करिल कसें या पुढें दुजी जाया. ४६
दुष्कीर्तिचा न लागो राजमुखा डाग या अशा जरठीं,
काय करील कळेना आणखि याहूनि अधिक ती कपटी ४७

श्लोक

जिथें मीं सत्तेनें अगणित जनां अन्न दिधलें,
कशी तेथें देवा ! अजि विधिबळें दीन बनलें !
कसे हें जाळाया उदर परहस्ता प्रतिदिनीं
बघायाचे यावे दिन मजसि हे आज सदनीं ! ४८
देवा ! असे तव पदीं मागणें कीं,
ना सोसवे मजसि हा अपमान लोकीं,
देवोनियां निधन, ने मज उद्धरोनी,
इच्छा दुजी न हृदयीं मज चक्रपाणी ! ४९
प्रभो ! सांभाळावी धवलें जगिं जी कीर्ति पतिची
सुतातें देऊनी, सफल करिं इच्छा सवतिची;
कृपाळू होवोनी, प्रिय शिशुस या रक्षण करीं,
नसे त्राता कोणी मज तुजविणें सत्यचि हरी !" ५०
अनुदिनीं असा शोक ती करी,
विमल मानसें श्रीपदा वरी;
सवतिला सदा त्रास दे सती
विधिविचित्रता वर्णवे किती ? ५१
आनंदांत बघोनि भूप कपटी त्यातें वदों लागली,
" सांगावी मज वाटते! प्रियकरा जी गोष्ट मीं ऐकिली,
इच्छा त्या सवतीस घात तुमचा व्हावा अशी मानसीं,

२ ज्ञाता-त्याला. १ मरण. २ दैवाची विचित्र गति.

यावें राज्य करीं ह्मणोनि करिते ती यत्न हो राक्षसी ! ५२
नाहीं आजवरी तुह्मांसि कथिलें भीऊनियां अंतरीं,
कीं व्हावी न अशी प्रिया ! ह्मणउनी दुष्कीर्ति या भूवरी,
केला मीं उपदेश फार तिजला एकांतिं नेवोनियां,
झालें प्राप्त न हे प्रिया ! यश मला ते यत्न गेले लया ! " ५३

दिंड्या.

क्रोध आला ऐकोनि हें नृपाला,
तदा प्रातिबंधीं ठेविलें सतीला,
सदा ज्याची उभयांस दुजी जाया,
शक्ति गेली मम दुःख तें वदाया. ५४

हाल उभयांचे बघुनि तीस व्हावा
बहुत मानसिं आनंद, करुनि कावा
कसें दुःखार्णवं लोटिलें तयांला
धन्य मानी ती यत्न सफळ झाला. ५५

करी ताडण त्या दीन अर्भकाला,
पुरें देईना अन्न खावयाला,
छळी ऐशी अनुदिनीं राक्षसी ती,
होत नव्हता तरि तोष तिच्या चित्तीं ५६

अधिक होउनि छळ, जीव त्यांत जावे
उभयतांचे या, काय मीं करावें ?
अशा शोधीं मानसीं उपायातें,
व्यग्र चिंतेनें झोंप न ये तीतें. ५७

साक्या

बोलावुनि मग अंकित ऐशा दुष्ट जनां एकांतीं,
सांगुनि अवघें वृत्त तयांतें बोले त्यांस सती ती. ५८

" काय योजना यास करावी त्वरित साधण्या काज,
यातें मजला युक्ती सांगा सर्व मिळोनी आज. ५९
झाल्या हें निर्विघ्न कार्य, मग काय कमी तुह्मांतें ?
सहजाचि येइल राज्य हातिं मग, सुख होइल अवघ्यांतें. ६०
मजविषयीं कोणासि न येतां संशय, कार्य घडावें;
ही इच्छा ममगानसिं आहे, सांगा काय करावें ? ६१
दुष्ट जनांची रीत सज्जनां व्यर्थ जगांत छळावें,
अर्थास्तव ते काय न करितिल; सुज्ञांनीं समजावें. ६२
दुष्टांचे मग बहुत निघाले दुष्ट विचार, परी ते
मान्य न झाले, विकट कर्म हें बोलुनि रूपवतीतें." ६३

## दिंड्या.

पुढें निश्चय शोधून एक केला,
अग्नि द्यावा लावोनि त्या गृहाला,
मध्य रात्रीं होईल नाश त्यांचा,
साध्य होइल मग हेतु जो मनींचा. ६४
युक्ति त्यांतें ही मानवली वाटे,
फूट ईची परि होउं नये कोठें,
मनीं इच्छा कीं सिद्धि शीघ्र व्हावी,
राख उभयांची नयनिं लेंशु पडावी! ६५

## आर्या.

जाउनि काय करावें हें कोणीं सांगुनी गृहीं गेली,
स्मित करुनि नृपासि ह्मणे " इच्छा मम मानसीं अशी आली. ६६
मदनासं राज्य देउनि, स्वस्थ बसावें तुह्मीं गृहीं आतां,

१ पैशाकारितां. १ हें त्या मुलाचें नांव.

मातेच्या अपराधास्तव त्या वत्सास व्यर्थ कां छळितां ? ६७
प्रेम शिशूवर देखुनि, झाला आल्हाद मानसीं राया,
देवासि कठिण आहे काय मनुजमानसासि उलटाया ? ६८
उठली जशी प्रभातीं, गेली ती शशिकलेसि भेटाया,
बोले " मी अपराधी ! छळिलें तुजला उगेंच त्वत्तनया ! ६९
पतिवांच्छा त्वत्पुत्रा देउनि हें स्वस्थ राज्य बैसावें,
गेले दिवस अमंगळ खचित तुवां मानसांत समजावें" ! ७०
यापरि आनंदजनक बोलुनि गेली गृहासि रूपवती,
ऐकुनि माय शिशूला वृत्त असें हर्ष जाहला चित्तीं. ७१
घालविला तो अवघा दिन आनंदांत, रात्र जशि झाली,
निजलीं स्वस्थपणीं तीं, गाढ तयां नीज त्या दिनीं आली. ७२
होतांचि मध्यरात्री, दुष्टेनें डाव साधिला अ[१]कुला,
लावुनि अग्नि गृहासी मत्सर शिखरासि सत्य पोंचविला ! ७३

साक्या.

चोंहिकडोनी अग्नि पेटला, झाला धूम घरांत,
कांहिं दिसेना जाळ वाटलें करिल तयांचा अंत ७४
कैशि स्थिति मग असेल झाली त्या गृहिं मायमुलांची ?
स्त्रिया न करितिल काय गमे मज उक्तिच सत्य कवीची. ७५
जेव्हां शिशू खडबडोनि उठोनि पाहे,
अग्नीच सर्व ! निघण्यास्तव मार्ग नाहे !
पाहुनि विघ्न, बहु घाबरला, न सोसे
तो ताप ! आज न बरी गति त्यास भासे ! ७६
" हे माय ! माय ! उठ सत्वर, झोंप कैची ?

१ दगा-कपट.

झाली कशी स्थिति पहा तव अर्भकाची !
कीं वेष्टिलें सकल भोंवतिं अग्नि झाला !
दे एक वेळ तवदर्शन दीन बाळा ! ७७

ऐकोनि शोक शिशुचा, मनिं फार भ्याली,
टाकियलें स्वधृतितें ! तंव दृष्टि गेली,
तों देखिलें अनळ भोंवतिं आंत बाळा !
वक्षस्थळा धरुनि हाणि धरोसि भाळा ! ७८
जोडोनि हस्त सतिशीं मग बाळ बोले,
" पाहोनि शोक तव काळिज दग्ध झालें !
याया तुझ्याजवळ शक्त न मी ! अशाचें
घे माय ! हें नमन शेवटलें मुलाचें ! ७९
माते ! पहा जवळ वेष्टित अग्नि आला !
आलें खरें मरण, निश्चित घात झाला !
कीं वांचण्यास पळ आस न, सोड माया,
जा जा कशी तरि कथीं मम वृत्त राया ! ८०
सांगें निरोप मम जाउनि मत्पित्याला,
कीं वन्हिमाजि तुमचा प्रिय बाळ गेला !
झालें न दर्शन मला तुमच्या पदांचें,
अंतीं तरी नमन घ्या अपुल्या प्रियाचें ! ८१
जोडोनि हस्त नमितों कथिं आइ ! मातें
आतां रिवें, बघुं नको, अति दुःख होतें !
जाळील हा अनळ त्वत्तनु, हेंचि ध्यावें
प्रेमासि ठेवुनि मला, वैरि बोळवावें ! " ८२
हें ऐकतांचि, सतिनें उडि विस्तवांत

---

२ धैर्यास. ३ ऊर. १ स्वर्गास.

# अवश्य वाचा

काव्यरत्नावली संबंधानें पत्रव्यवहार करितांना पत्त्यावर "जळगांव खानदेश" अशीं अक्षरें अवश्य लिहा. नाहींतर कदाचित् "जळगांव वऱ्हाडला" पत्रें जातील !

काव्यरत्नावली कर्ते जळगांव खान्देश.

# जाहिरात

खालीं लिहिलेले विषय लोकांच्या सूचनेवरून विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकांतून स्वतंत्र पुस्तक रूपानें छापविले आहेत.

१ गीतार्थसार– रावसाहेब वामन आबाजी मोडक यांणीं लिहिलें. किंमत ४ आणे

२ गृहिणीकंठभूषण– स्त्रियांना अत्यंत उपयुक्त असे डा० सखाराम अर्जुन यांणीं लिहिलेले निबंध– १ रजस्वला स्त्रियांविषयीं, २ गर्भिणी स्त्रियांविषयीं, ३ प्रसूतीविषयीं ४ सूतिकावस्थेविषयीं, ५ बालसंगोपनाविषयीं, यांत आर्यवैद्यकांतील माहिती ठिकठिकाणीं घातली आहे. व पुस्तकाच्या आरंभीं डा० सखाराम यांचें चरित्र जोडलें आहे कि० १२ आणे.

३ ठगाची जबानी– पूर्वार्ध— मेडोज टेलर यांच्या कनफेशन आफ अ ठग या पुस्तकाचें रा.ब.आनंदराव सखाराम बर्वे यांणीं केलेलें भाषांतर. कि० १॥ रुपये.

४ दानत– भाग पहिला, स्माइल्स साहेबांच्या 'क्यारेक्टर' या पुस्तकावरून हिंदु युनियन क्लबच्या एका सभासदानें तयार केला. कि० १॥ आणा.

५ दोन गोष्टी– कै० बनाबा रामचंद्र प्रधानकृत "फारां दिवसां-

ची गोष्ट" आणि "झालें तें ठीक झालें" आरंभीं बजाबा यांचें चरित्र छापलें आहे. किं० ४ आणे

६ व्हिकटोरिआ महाराणीचें चरित्र– भाग पहिला– हिंदु युनियन क्लबच्या एका सभासदानें लिहिलें. किं० ३ आणे.

७ सुंदरेची सक्रांत– रा. रा. गणेश जनार्दन आगासे बी. ए. यांणीं लिहिली. स्त्रियांस अत्यंत बोधप्रद आणि मनोरंजक. किं. १॥ आणा.

८ सौभाग्य रत्नमाला– भाग पहिला– स्त्रियांना वाचण्यास योग्य आणि त्यांस बोध होईल अशा गोष्टी रा. रा. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांणीं लिहिल्या– किं० ६ आणे.

९ सौभाग्य रत्नमाला— भाग दुसरा– निरनिराळ्या, विद्वानांनीं लिहिलेल्या गोष्टी. किं० ६ आणे.

१० सौभाग्य रत्नमाला— दोन्ही भाग एकत्र– किं० ११ आणे

११ अबलासंजीवन–– डा० भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांणीं स्त्रियाच्या उपयोगासाटीं मुद्दाम लिहिलें. किं० १ रुपया.

१२ अभिनव कादंबरी— बाणकविकृत कादंबरीचे रा. गंगाधर रामचंद्र मोगरे यांनीं आर्यावृत्तामध्यें काढलेलें सुंदर सार किं. ९ आणे.

१३ वनस्पति शास्त्रांचीं मूलतत्वें— डा० भालचंद्र कृष्ण भाटवडेकरकृत— किं० १। रुपया.

४ सद्गुणी स्त्री– वऱ्हाडांतील "ज्ञानसंग्रह" मासिक पुस्तक कै० बजाबा रामचंद्र प्रधान यांणीं लिहिलेली गोष्ट किं० ४ आणे.

मुंबई ता. २० आगष्ट } म्यानेजर विविधज्ञान विस्तार, काल्बा देवी
सन १८८८ } रोड मुंबई.

# काव्यरत्नावली.

अंक १९ आणि २०

वर्ष २रें ] दिजेंबर, आणि जानेवारी सन १८८८।८९

तएवपदविन्यासास्ताएवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



## जळगांव--खान्देश येथें प्रसिद्ध होत असतें.

किंमत चार आणे..

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हासिलासुद्धां दीड रुपया.

भुसावल "खानदेशमित्र" प्रेस

# अनुक्रमणिका.

## अंक १९ वा


| | |
|---|---|
| १ जुवेली. | ४ विपद्ग्रस्त श्रीमानाचे उद्गार. |
| २ इंद्रवज्राशतक. | ५ एडिटरास पत्र. |
| ३ मानवकरप्रशंसा. | ६ पांथागमन. |


## अंक २० वा


| | |
|---|---|
| १ अग्निशलाका. | ५ पद्यमंजूषा. |
| २ स्वदेशदैन्य. | ६ बोध. |
| ३ विपत्ति. | ७ शर्करायुक्त तीळ. |
| ४ कापूस. | ८ सुभाषित. |


सूचना— मागसलेले अंक छापण्याचें काम चाललें आहे. तिसऱ्या वर्षापासून अगदी नियमितपणानें अंक मिळतील अशा तजविजींत आहों.

काव्यरत्नावली प्रकाशक

जळगांव खान्देश.

# काव्यरत्नावली.

अंक १९ वा.

## *जुबेली

( वासुदेव वामन शास्त्री खरे )

श्लोक

जगाची जी शोभा स्थिर वसति जेथें नय-दया
झकाके स्त्रीजातिमधिं अतुल जें रत्न विजया
बसे राणी गादीवरति अठराशं सदतिशीं
करी भू-गोलार्धाप्रत सुखित पन्नास वरुषीं १
राजे भू-वलयीं अनंत असति राज किती चांगले ?
जे द्याया सुख मानवांस तरुण पन्नासहीं मानले !
ईशाच्या पुरल्या दयेस विजया सत्पात्र वाटे खरी
कीं जीच्या असलें यश प्रकट हें चालून आलें घरीं।२
अकबर करि पूर्वी राज्य पन्नास वर्षें
सुखवि भरत-भूमि स्थां जनां हर्ष-वर्षें;
परतु छलित त्याचा लोक पन्नास वर्षे
ह्मणुनि अपयशातें पावला राज्य-नाशें ३
औरंगजेब चुकला मुकला यशास

---

* या कवितेंतलि वर्णन हिंदुस्थानांत सन १८८७ च्या फेब्रुआरी महिन्यांत जुबिलीचा समारंभ झाला त्या वेळचें आहे, ही गोष्ट वाचकांनीं कविता वाचतांना लक्षांत ठेवावी.

राज्यांत या न वसती क्षण तेहि दोष
ज्ञानें गुणें अकबराहुन फार थोर
कीर्ति दिगंत पसरी विजया अपार ४
दिवाळि दसरा दुजे सणहि कांहिं वर्षी निके
क्रमें पडति भोगिती सकल लोक तेव्हां सुखें
परंतु सण यापरी क्वचित येत भाग्योदया
विशेष मग कारण प्रमुदित प्रजा व्हावया ५
हिंदु ब्राह्म महंमदीय यहुदी खिस्ती तसे फारसी
हर्षानें झटतात दाखवुं जगा स्व-स्वामिनी-भक्तिसी
वाटे विस्मय हें बघून न मना कीं प्रीतिचा खेळ हा
प्रीतीनें जमतात भोंवति मुलें मातेचिया कीं पहा ६
सूर्याचीं किरणें धनाढ्य सदनां देती चकाकी नवी
चांडाळ गृहिं ही प्रकाश पसरूं वाटे तया थोरवी
सर्व-व्यापी तशीच तत्पर महाराज्ञी-मनींची दया
चिंता शोक विषाद दुःख पळवूं दारिद्र नेऊं लया ७
कोणा न प्रिय सूर्य! जो सजवितो सृष्टि करें आपुल्या
कोणा चंद्र न आवडेल! बघतां दृष्टी जया मोहिल्या!
दुर्भाग्या कवणा वसंत न रुचे? संताप नेता दुरी,
कोणाच्या नमना प्रसंग असला आल्हाद मोठा करी ८
अनुपमच सुखाचा सांपडे आज ठेवा
ह्मणुन नमुन सारे प्रार्थिती नम्र देवा
"त्रि-भुवनिं विजयेची सर्वदां कीर्ति नाचो
अजुनि बहुत वर्षे ती सुखीं पूर्ण वांचो"
विनविती नमुनी किति ईश्वरा
" प्रभुवरा विजयेस सुखी करा,

निशिदिनीं विजयेप्रत पोषिजे
नदरि मारुन सज्जन तोषिजे १०
गांवें खेडीं सधन नगरें बंदरें दुर्ग थोर
हिंदुस्थानीं पसरुनि तया देति शोभा अपार
तेथें तेथें ध्वज फडकती चालतें नृत्य गीत
जो तो लोकां रमवि रमतो आपण प्रीति युक्त. ११
हव्यास लागे दिनरात्र जेथें
निर्वाह होतो करितां जयातें
उद्योग ते टाकुन आपुलाले
" विश्रांति घेऊं " जन आज बोले १२
गरिब कुणबि सोडी नांगरा आज सैल
रंवथ करित त्याचे बैसले स्वस्थ बैल
भंवति वसति त्याचीं बायको लेंकरें तीं .
निरखुन सखि होते तन्मना पूर्ण शांती १३
पक्वान्नें रुचिरें, सुगंधि कुसुमें, नानाविधें सुंदरें
वस्त्रें, उज्वल भूषणें नवनवीं जीं रंगवीलीं, घरें
मार्गे स्वच्छ सुरेख, पुष्पित-लता-संशोभिते तोरणें
नेत्रांचें बनुनि सुरम्य असल्या वस्तु फिटे पारणें १४
कारंजीं उडतीं, जलें सुमधुरें पाटांतुनी चालती
वारा घेउन मंद सुंदर लता डौलामध्यें हालती
चाले दूर सुगंध बाग फुलले ते देखितां निर्भर
स्वच्छंदें फिरतात आज मिळुनि हे पौर नारीनर १५
जीं संपत्तिमदांव सुंदर पुरें शृंगारिलीं कौतुकें
सामंतीं, दरबार तेथ भरती ते भाग्यशाली सुखें
कीं निःशंकपणें तिच्या चिरकृपा-छत्राश्रयें नांदती

भक्ति-प्रेरित ते कृतज्ञ विजया-राज्योदया वांच्छिती १६
करि विधी करुणा न जयांवरी
बसलि मात्र विपत्ति सदा घरीं
गरीब दीन अनाथ असे जन
कितिक पावति आज सुभोजन १७
वस्त्रें पात्रें अन्न जें ज्यास नाहीं
तें तें त्यांतें लाभतें आज पाहीं
नाना जाती धर्म नाना तयांचे
राणीची जे कीर्ति गातात वाचे १८
केलेले अपराध आठवुनियां संताप जे पावले
पायीं वाजत शृंखळा खळखळां ऐकोनि जे कावले
डोकें टेकुनियां निराश हृदयीं निःश्वास जे सोडिती
दुर्दैवी तुरुंगांतुनी जन असे बाहेर येती किती १९
तोफा गर्जति धाडधाड विजया-नामास सन्मान हा
त्यांचा अंबर-मंडवीं दुमदुमे आवाज कैसा पहा !
धांवे कंदरिं काननीं प्रतिरवें त्यातें चढे थोरवी
राज्ञीची जणु कीर्ति गात फिरतां अन्यांसही गाववी २०
राणीचिया अजि करूं अभिनंदनासीं
जे लोक धाडिति निरोप तिच्या पदासीं
ते घेउनी पळत पांच हजार कोस
विद्युत्प्रवाह अति वेग असे जयास २१
हिंदुस्थान अमेरिका आणिक ती आस्त्रेलिया विस्तृत
या देशीं वसती प्रजा स्थिर असे ज्यां राज-भक्ति-व्रत
त्यांचीं तीं अभिनंदनार्थ वचनें घेऊन पाण्यांतून
तारा आदळतात लंडनपुर-प्रासादिं त्या येऊन २२

मनोहारि हारीमधें दीपमाळा
प्रकाशें दिगंतास धाडी तमाला
सुखावीत नेत्रांस त्यांचें सुतेज
दुरोनी दिसे काय नक्षत्रपुंज २३

कांहीं दीपक जे नदी तटिं तटाकाच्या तटीं लाविले
बिंबें सुंदर सांठवीति जपुनी त्यांचींच पोटीं जलें
दिपोत्साह सुरम्य भूमिवरती होतो असें पाहुन
राणीच्या जुगु दीप लावि वरुण प्रीत्यर्थ पाण्यांतुन २४

नवे बाण चक्रें किती चंद्रजोती
किती दिव्य तारे नभीं धांवताती
जनीं लाविले नेत्र आश्चर्य-मग्न
उडे दारुचें काम कौशल्य-पूर्ण २५

आनंदाचे हे दिन प्राप्त झाले
तेणें धाले सर्व संतुष्ट झाले
दारिद्र्यातें कंप झाला थरारा
कोठें व्हावा त्याजला आज थारा २६

विविध असति जाती धर्म नाना तयांसीं
अमित जन असेंही बांधिलें प्रेम-पाशीं
ह्मणुनिच विजयेच्या सद्गुणां पार नाहीं
श्रमति सुकवि-वाणी वर्णिता ज्यांस पाहीं २७

ऐश्वर्यें भुलले सुखांत खुलले दुष्कीर्तिते पावले
धूर्तांनीं छळिलें कुमार्गि वळले राजे किती पाहिले
जेव्हां स्वामिनि पुण्य-शील विजया अर्ध्या जगा जाहली
तेव्हां ती विनयें लवून फलिता वृक्षापरी शोभली २८

सुमति सचिवीं आज्ञा जीची सदां शिरिं वाहिली
हृदयीं अपुल्या लोकांनीं ही सदा बहु पूजिली
सदय दयितें राज्योद्योगीं सदा उपदेशिली
कितिक वरुषें ती धन्यत्वा जगामधिं पावली १९

या परि ऐहिक-सौख्य-सुधा-रस-पूर्ण अशी
पाहुन ती विजया नव-चंद्र कलाच जशी
निष्ठुर होय विधी अतिरुष्ट कसा विषम
यास्तव तो घडवी पतिमृत्यु विषास सम २०

सदय विजयशाली सद्गुणी मान्य भर्ता
वरित निधन तांच्या जीविता धन्य कर्ता
चिरतर विजया ही सज्जनां पूज्य नारी
व्यसन-विषम-घातें पावली शोक भारी २१

तेव्हां पासुन खिन्न-चित्त जगली लोकोपकारा करूं
राज्याचा भर सांवरूं निजकरें दारिद्र्य दुःखां हरूं
सोनें अग्नितुनी निवून वरितें कांती जसें अद्भुत
साध्वी तेंविच दुःख साहुन गुणां दावी जनीं वंदित २२

दुर्वार्य इच्छा समजून साची
जगन्नियंत्या परमेश्वराची
ती शांतचित्तें दृढ-भक्ति-योगें
भजे तया धैर्य धरून वागे २३

किरणीं प्रकाशि मुकुटासि कांतिच्या
जरि कोहिनूर शिरिं शोभतो तिच्या
रमणीय सद्गुण अमोल हे मणी
दिपवूं जगास शकती प्रभा-गुणीं २४

पूर्वीं जरी होति नृपाल मोठे

हीच्या यशाची तुलना न कोठें
जन्मासधन्या विजये समान
भोगावया वैभव येति कोण ? ३५

शास्त्रें, कला-कुशलता, नृपनीति-मार्ग,
व्यापार, शेति, दुसरे बहु वृत्ति-वर्ग
साधून कीर्ति विमला वरिली जयानीं
ते लोक इंग्रज हिला ह्मणतात राणी ३६

हिंदुस्थानीं जन शिरिं तिची सर्व आज्ञा धरीती
पातालांतीं जनपद तिला स्वामिनी मानितातीं
आस्त्रेलीयामधिल मुलुखीं पूर्ण सत्ता तियेला
बेटें किल्ले अमित असती काय वर्णू तयांला ३७

बलाढ्य विजया असे महिवरील राणी खरी
समुद्र जलिं मालकी पुरति होय तीची बरी
करील जरि मान-भंग भलता तियेचा नर
खरें बळ तिचें तिथें कमि न होय जें कीं कदा ३८

पंचवीस कोटि हिंदु, पांच कोटि इंग्लिश,
स्वामि-भक्त राणिच्या गुणांस राहती वश;
कोण राष्ट्र मंद-बुद्धि गर्व-मत्त जाहलें ?
मान-भंग राणिचा करावया बघे बळें ३९

श्रीमंताशीं उघडिलिं सदा निर्धना न्याय-दारें
काळे, गोरे वरिति समता न्याय दृष्टांत सारे,
ज्ञानी, मूर्ख, प्रबळ, दुबळे गोविलें एक नेमीं,
यत्नें दृष्टी अधिकृतनर प्रीतिनें देति कामीं. ४०

जे दुष्ट तस्कर भयंकर घात-पातें
लोकां छळून मिळवूं बघती धनातें,

त्यां उग्र शासन मिळे, न कधीं चुके तें,
येणें प्रजा सतत निर्भय-चित्त होतें. ४१
येऊन वक्र पर-चक्र करील ताप,
शंका नको, प्रखर तो विजया-प्रताप;
लक्षावधी रण-सुशिक्षित सज्ज सैन्य,
देई प्रजेस मग कोठुन शत्रु दैन्य? ४२
पूर्वीं दुर्भंग मार्ग देश ह्मणुनी शेजारचे ही दुर
आतां दूरिल देश होति जवळीं कैसें घडे दुष्कर?
तारायंत्र सुयंत्र अग्नि-रथ ही वेगें महा धांवती
डांका जाउन भू-जलावरून त्या स्व स्व-स्थळा पावती ४३
बंगाल पंजाब बहार देश,
काशी हि गंगा तट-वास जीस
हे देश पाहूं जरिबुद्धि होते
जावें तुह्मीं चार दिनांत तेथें ४४
विद्या, शास्त्रें आणि व्यापार यानीं
अज्ञानाची चालली होत हानी;
राज्ञी योजी स्वप्रजा ज्ञान-पंथा
लावूं युक्ती त्यां फळें येति आतां ४५
या राज्यांत सुखें प्रजेस मिळतीं, नाहीं तयांतें मिती,
प्रार्थूं यास्तव ईश्वरास विजया-राज्या असो उन्नती!
जावे शत्रु तिचे भयंकर बळी धाकें दिगंताप्रत,
फांको लोकिं तिचें यशोधन, असो आयुष्य वृद्धिंगत! ४६
प्रखर किरणीं अंधारातें जसा रवि घालवी
माहित विजया राज्यें दुःखें जगांतील मालवी;
म्हणुनि जनहो देवा धांवाकरा करुनी नति,
विजय विजया पावो! राहो सुखी सहसंतति! ४७

# इंद्रवज्राशतक

## मोरो गणेश लोंढे

### श्लोक

*तूं सर्वदा सर्व जनांस देसी
मिथ्या स्तुती होय जनांत ऐसी
अन्यस्त्रियांला रति तूं न देसी
शत्रूंस युद्धामधिं पाठ तैसी ७६

पाहून सत्पात्र करील दान
देईल जो मान गुणां बघून
स्वस्त्रीवरी प्रीति करील शूर
युद्धीं जगीं तो नृप होय थोर ७७

द्वेषी न कोणा न कधीं हि मागे
वर्मा दुजाच्या न जगांत सांगे
बोलाविल्यावीण कुठें न जाय
निंदी न कोणा तरि देव होय ७८

दुर्योधना मृत्यु अपार मानीं
जाला बळी बद्ध अपारदानीं
तृष्णेमुळें रावण नाश पावे
टाकूनिया यास्तव फार द्यावें ७९

स्पर्शो न केव्हां हि परस्त्रियेला
टाकी परद्रव्य हलाहलाला

* एक याचक राजास ह्मणतो.

वादामधीं जो न रमे कदा हीं
तीर्थांतुनी तो बहु थार पाहीं ८०
ज्यांच्या गृहीं वित्त समान राहे
ज्यांच्या कुलांची समकीर्ति आहे
त्यांच्यांत मित्रत्व विवाह होई
अन्यामधीं हीं घडती न पाहीं ८१
बुद्धि स्वकीया बहु दे सुखाला
तैशी गुरूची करिते हिताला
नाशी हिताला परबुद्धि जाणा
स्त्रीबुद्धिनें विघ्न न होय कोणा ! ८२
घ्यावें विषापासुन ही सुधेला
किंवा अमेध्यांतुन[१] कांचनाला[२]
विद्येस नीचा जवळून पाहीं
स्त्रीरत्न तें निंद्य कुलातुनी हीं ८३
युद्धीं परीक्षा वर सेवकांची
तैशी विपत्तींत सुबांधवांची
विघ्नागमीं[३] होइल सोबत्यांची
संपत्ति जातां युवती जनांची ८४
संपादिलें धान्य पिपीलिकांनीं
जो जोडिलास मधु मक्षिकांनीं
जें ठेविलेंसें कृपणें सुवित्त
तें जातसे अन्यकरीं समस्त ८५
संयोग होतां रिपु ताप देतो

---

१ अपवित्र वस्तूंतून २ सोन्याला ३ संकट आलें असतां.

तापा तसा मित्रवियोग होतो
दोघे हि होती बहु दुःखदाते
दोघांमधीं भेद दिसे न माते ८६

तारुण्य येतां मन शांत ज्याचें
वाचे करा वर्णन मात्र त्याचें
येतां जगा कोण न शांत होई
त्याचा वदावा बडिवार काई ८७

घोडा न ध्यावा गज ही न द्यावा
पंचाननालागिं बळी न द्यावा
द्यावा बळी कवळ बोकडाला
कैसा छळी ईश्वर दुर्बळाला ८८

वित्तास मानी तृण जो उदार
मृत्यूस मानी तृण शूर वीर
भार्या गमे कीं तृणशी विरक्ता
मानी जगा तेंवि यथार्थ वक्ता ८९

शांतिप्रमाणें तप अन्य नाहीं
तोषाप्रमाणें सुख तें न कांहीं
आशाप्रमाणें न विपत्ति आनें
तैसा नसे धर्म दयेसमान ९०

कोई न देतां यश खावयाला
कोठून ऐसा नर लाभण्याला
खाया मिळे अल्प कणीक पाहीं
नादें मना गोड मृदंग मोही ९१

---

१ मोडेपणा. २ दुसरा

लोभ्याप्रती याचक शत्रु सारा
वाटे रिपू नित्य शशांक चोरा
तैसा बरा हा पति जारिणीला
कीं बोधकर्ताजन दुर्जनांला ९२

शूरांस वीरांस गुणी जनांला
ज्ञात्यांस कीं रूपवती स्त्रियांला
सन्मान लोकीं मिळतो सदैव
ज्यात्या स्थळीं केवळ कीं अपूर्व ९३

शोभे मुकांता बहु शीलभारें
तैशीच वल्ली नवपुष्पभारें
वाणी तशी जीमधि फार अर्थ
तैशीच विद्या विनयासमेत ९४

नारी वदे अन्यमुखाकडे ती
ज्ञाता न जाणे व्यवहारनीती
रोगी न जो पथ्य करी कधीं ही
पावे जगीं या उपहास पाहीं ९५

ज्याच्या मनीं पूर्ण दया विराजे
वाणी जयाची जनि सत्य साजे
काया जयाची परकार्य साधी
देई तयाला कलि कवि आधी. ९६

विद्या तयाची ह्मणवे न मोठी
सत्कीर्ति त्याची वदवे न ओठीं
त्याच्या जगीं मान नसे तपाला
स्त्रीनें जयाच्या हरिलें मनाला ९७

भासे मला व्याधसमा कुमारी
भ्रूचाप हातांत धरून मारी
बाणां कटाक्षांस कशी जपूनी
चित्ता मृगा ठेवितसे धरूनी ९८
मीनांपरी लोचन वाटताती
कीं पादपद्में फुललीं जणूं तीं
शेवाळ वाटे मज केशभार
दे तोष नारी सरसी अपार ९९
वाटे मला हेमलता सुखाला
अंगें प्रसूनें गमती मनाला
वाटे कुचद्वंद्व फलद्वयाला
लोभूनियां चित्तमिलिंद गेला १००
या इंद्र वज्राशतका बघून
ज्ञाता स्वकीया तुकवील मान
आनंद तेणें मज फार होई
निर्मावया आणिक धैर्य येई १०१

---

## मालवकरप्रशंसा

(केशवराव पेठे कृत)

आर्या

नरहस्तराज ! नमितों लिहिता कीं काव्य आपुलें अंगें?
परगुण लेखनि जन बहु कृपण असे त्या मुळें न तें रंगे १
जेथें जेथें फिरतां लक्ष्मी सहवास तेथ करि मोदें
शुचितामंगलतादिक परिवार तिच्यासवें सदा नांदे २
प्रभु हस्तराज तुमची वर्णवेत मजासि योग्यता कैशी?
माझी सजना तुमच्या स्तवनीं वाटे पडेल तोंडघशीं ३
कर्ण,घ्राण,नयन,जरि मनुजांला फार सौख्यकर होती
तमचें साम्य नसे त्यां दुर्बल एकास्थळीं सदा वसती ४
कर्कश, दुष्ट अमंगल वच ऐकाया मनुष्य न रुचि धरी
अप्रिय कटु वच कानें ऐकावें लागतें तयास परी ५
दुर्गंध वा सुगंधहि नाकामाधें सारखेच शिरतात
दुर्गंध त्यागाया व्यर्थत्वा तत्प्रयत्न जातात ६
भयकर विरूप वस्तू दृष्टिस पडतांच त्या मनीं शिरती
जरि चर्मपटलें झांकी नेत्र तरी त्या न मागुत्या फिरती ७
वस्तु स्वीकार तुह्मी करिती जरि मानवां असे इच्छा
स्वाधीन सर्व तुमच्या कामांची पुरविता तुह्मी पिच्छा ८
जाज्वल्य उग्र रविकर नेत्रीं शिरतांच पापण्या मिटती
तेव्हां करराज तुह्मीं साह्य करायास जातसां सुमती ९
कर्ण घ्राण नयन जरि तुमच्या साह्येंचि रक्षिलें जाती
परि साह्म तुह्मां संकटिं नच करितीं बघति मौज ते वैरती १०
स्पर्शज्ञान तुह्मां जें आहे तें इतर अवयवां नोहे
स्पर्शास्पर्शाहि तुमच्या स्वाधीनचि गोष्ट होउनी राहे ११

---

१ नाकाचे २ पापणी ३ कामें करण्यास अविश्रांत श्रम करितां असा भाव. २ किरणें ३ शिरोभागीं.

वस्तूंची कोमलता, लघुता, गुरुता, तसेंच काठिण्य
स्पर्शज्ञानें तत्क्षणिं जाणतसां करविभो ! तुह्मी धन्य १२
मानवदेहावरती तुमचे असती अनंत उपकार
अपकार करूं येती त्याना करिता तुह्मीं प्रतीकर १३
अंधां डोळस करितां वाचवितां ग्रंथ त्यांकडून तुह्मीं
तुमचा प्रभाव पाहुनि करराज तुह्मांस होतों नत मी १४
करराज तुह्मी जेव्हां धरिता दुर्बीन तेधवां सारे
अत्यंत दूरचे ही नेत्रांना वाटती जवळ तारे १५
सूक्ष्मप्रेक्षणयंत्रीं दिसती अतिसान जंतु मोठाले
यंत्रांतुनी पहाया नेत्रांचें बळ तुह्माविण न चाले १६
दूरध्वनियंत्रानें शतयोजन दूर बोललें कळतें
मुखकर्णाला तुमच्या साह्याचें तें बरेंच बळ मिळतें १७
नाकीं वास जिचा त्या अर्पितसा घ्राणदेवतेस फुलें
ज्यांच्या मधुर सुगंधश्वासानें जो सदैव त्यांसि डुले १८
मूकांचें हृद्गत ही काढितसा कीं तुह्मीच बाहेर
वाणी प्रकट न जेथें तेथें तुमचेंच कार्य हो फार १९
आनंददुःखशांतिक्षुधातृषासमतीनकारमत
सकलहि वृत्ति मनांतिल मनुजांच्या प्रकट करितसा सतत २०
नटभटभाटसुवाग्मीवक्तृत्वीं हावभाव दावितसा
तें सकल मानवांला रोमांचित करुनि वेळ लावितसा १२
जिभली भली रसज्ञा चाखी अति मधुर मधुर पक्वानें
दंत तयां मर्दुनियां गिळविति मग उदरपूरणा जाणें २२

---

४ हस्तप्रभो (हें संबोधन) १ दुर्बल १ कटिक २ नाकांत पक्षी स्वर्गात.

ध्याया पदार्थ उचलुनि जिव्हेला शक्ति नच, न ती रदनीं
व्यर्थच झालीं असतीं अन्न तुह्मी घालितां न जरि वदनीं २३
मुखदुर्गंध हरितसा जलयोगें स्वच्छ करितसा त्यांस
घर्षण करितांच पहा देती द्विज शुभ्रहीरका भास २४
नथ चंद्रहार कंठीं घडवितसा अन्य भूषणें सारीं
लेवुनि ठाकठिकीनें करिता मोहक सुभूषिता नारी २५
मरकत हिरक पाचू कौशल्यें कोंदणांत बसवितसा
रत्नें सुरम्य करुनी टकमक त्या पाहण्यास लावितसा २६
मंजुळ सुस्वर कोमल रव करणारीं अनंत तीं वाद्यें
तुमची संगत सुटतां लोळति जणुं काय भूवरी मांद्यें २७
देहांतिल रोगांचा तुह्मी करा हस्तराज परिहार
काढे चूर्णें गोळ्या यांचा त्यांवरि करूनि भडिमार २८
मानवलज्जारक्षण करितां त्यां नेसवूनियां वसनें
विविधप्रकार त्यांचें ज्यांचें वर्णन न होय या रसने २९
पदमित्र सर्व देहा वागविती फिरविती बहुत देशीं
त्यांच्या त्राणार्थ तुह्मीं चर्माचीं वाहनें करा खाशीं ३०
केशाग्रांपासुनियां पादाग्रांवरि असे तुमचि सत्ता
कुरवाळाया किंवा तोडाया इंद्रियां तुह्मी शकता ३१
तळवार घेउनीयां शत्रूंचे कापिता तुह्मीच गळे
लेखनि धरूनि लिहितां ग्रंथ तुह्मी प्रथम ऐकदां सगळे ३२
नागर धरूनि शेतें नागरुनी त्यांत रोपणी करिता
धान्यें मळून त्यांचीं अन्नें सुग्रास करुनियां देता ३३

---

१ वेषधारी, योद्धे स्तुतिपाठक. वक्ते यांच्या वक्तृत्वांत ९ दंतांस करीत असतां. २ छापण्यापूर्वीं ग्रंथ लिहावे लागतात.

अतिसृष्टिचित्रंकवानिं दाखविता तीं तुह्मीच कौशल्यें
केवळ न ब्रह्मा सृष्टि रची रचितसा तुह्मी शल्यें ! ३४
ह्या लवणा विजेचा तार किती लांब घडविली आहे
कागेवर्णवाधनतांनि क्षिति चपला सत्वर लिहित राहे ३५
नत्रत्व दर्शवी जा करितां ता मिळुनियां नमस्कार
देव, द्विज, धनि, विद्वान् तोषति या अल्पसाधनें फार ३६
काय पराक्रम तुमचा वर्णावा मी तुह्माविणें अशक
सिंहव्याघ्रादिक ते हिंस्त्र पशू करुनि टाकितां शशक ३७
प्रभु काय काय केलें करणार तरी पुढें तुह्मी काय !
याव विचारें माझी विस्मित मति फार होउनी जाय ३८
ईशकृपा सृष्टीचें रूप तुह्मी फिरविलें असे आंगें
भेदुनि उंच नगांला सागरही हटविला तुह्मी मागें ३९
जे कृष्णवर्ण पर्वत भयंकर जगु काळ रूप सकळांला
त्यांचें हृदय विदारुनि गाडी चालावयास पंथ केला ४०
ज्यांतुनि प्रचंड नावा जाती ह्मणल्या अशा तुह्मी खाड्या
गाड्या चालायाला बांधितसा कीं नद्यांस पावाड्या ४१
चिरिलींत महाद्वीपें आत्र नदांचीं तुह्मी फिरविलात
उदधि प्रचंड त्याचा गर्व तया बांधुनी जिरविलात ४२
पोखरुनी पथ करिता गाडी चालावया नदीखालीं
खनि खोल खोल खणितां भोगावतिही पहा वरी आली! ४३
विपिनें साफ करोनी करिता त्याचींच रम्य उद्यानें

३ कलमानें. १ पर्वत, वृक्ष. २ मार्ग. ३ पूल. ४ सुवेझकालवा. ५ अमेरिकेंतील एक नदी. ६ व्याकरे ७ तेम्सनदीखालून आगगाड्या जातात. ८ पाताळ गंगा. ९ अरण्य. १० बागा.

दुर्गप्रासाद पहा जाती भेदुं नभास गर्वानें ४४
पृथ्वीवरील सगळीं नगरें केलीं तुह्मीच निर्माण
जें जें इच्छित त तें करावयाला नसे तुह्मा वाण ४५
जरि मानवांस असतें शतपटहीं ज्ञान आजच्याहून
नसतां साह्य तुह्मी हा खचित असति तीं पशूहुनी ऊन ४६
कल्पक मनुज खरा, परि त्याच्या त्या कल्पना तुह्मी जेव्हां
दावितसा प्रकट करुनि हाती उपयुक्त त्या जना तेव्हां ४७
अद्भुत शक्ति जयांची ऐशीं यंत्रें तुह्मीच केलींत
नेलींत उन्नतीला रमता व्यर्थचि तुह्मी न केलींत ४८
सागर नद नग अटवी दुर्गम अतिविकटशा स्थळांवरुनी
कळवाया वृत्त नरां चपला पळते पहा त्वरा करुनी ४९
आकाशयान मनुजां विहगांसम चालवीत आकाशीं
या सर्वांच्या किल्या असती करराज ! हो तुह्मांपाशीं ५०
कृत्रिम पदार्थ जितके तितके सारे तुह्मीच केलेत
नर-कामना पुरवुनी त्यांच्याही पुढें तुह्मीच गेलेत ५१
मानव सुखार्थ संतत कष्टतसां फार फार कराया !
येईल काय अल्पहि कृत्य नरांला तुह्माविण कराया ५२
नांगर कानस कुदळी करवत तरवार लेखणी ऐशीं
शस्त्रें चालविल्यावरि मानवविपदा उरेल हो कैशी ५३
तुमच्या पराक्रम यशश्चंद्राला डाग लागला आहे
वर्णूं कशास तो मी दीपाखालीं सदैव तम राहे ५४

---

११ उणा. १ कोंडेंत २ विमान. ३ मनुष्यांच्या इच्छेस अतर्क्य असे सुरेख पदार्थ तुह्मी केलेत ४ तैमुरलंगासारख्यांनीं भयंकर कृत्यें केलीं त्यागोष्टीकडे रोख आहे.

परलोकसाधनाला साधितसां करुनियां परोपकृति
किति यापरि वदूं मी तुमच्या बहु सान थोर अन्य कृति ९९
तुमच्या स्तुतिचे कांहीं तुमच्या करवीं मदीय उद्गार
लिहवून घेतल्यानें मानी तुमचेच मी सदुपकार ९९
लेखनि धरूनि लिहितां लिहितां थकलां असाल हो फार
तुमच्या साह्येंचि; तुह्मां,-रचित्यालाही करीं नमस्कार[१] १००

# विपद्ग्रस्त श्रीमानाचे उद्गार

( बळवंतराव कमलाकर )

श्लोक

ये ये प्रिये ! जवळ लाजशि कां मनांत?
नाहीं तुझी सवत सांप्रत गे ! जिवंत
आतां विपत्ति ! तुज वांचुनि कोण माझी
घेईल काळजि; असे मज तूंच राजी १
होती तुझी सवत आवडती मला ती
आतां तिची न परि लेशहि होय खंती
तूझी मला प्रिय तशीच असेन यांत
कांहींच संशय, न भीति धरी मनांत २
आलीस एकटि कशी परिवार गेला
कोठें तुझा, त्वरित आण अगे ! तयाला
दुर्वैद, भैक्ष्य कुसमागम, दैन्य, राग.

---

१ तुह्माला. [हस्तांला] व तुमचा रचणारा [तुह्मास निर्माण करणारा] जो परमेश्वर त्याला नमस्कार करितों.

गेला कुठें वद सर्व तव भृत्यवर्ग ३
माना ! तुला नमनि मी करितों विनंति
कोपूं नकास न धरींच मनांत खंती
होतास तूं परम मित्र परंतु आतां
लोकांसमक्ष मज भेटुं नकोच ताता ! ४
द्वारीं उभे असति जे बहु दंडधारी
होतास तूं तव तयासहि भीत भारी
नाहींत ते जन अतां न धरा भयातें
दैन्या ! तरी त्वरित येउनि भेट मातें ५
दैन्या ! प्रिया तुजविना बघ ! याचना ही
बोलावितों तरिहि सन्निध येत नाहीं
येये तिच्यासहित सत्वर मार्ग मातें
दावील कोण तुमच्याविण पोषणातें ६
होतास मारित कशा मजशीं बढाया
गर्वा ! अतां सकल कां घडल्यात वाया
विद्वान् धनाढ्य रणवीर अशा स्तुतीनें
होतें मला भुलविलेच असन्मतीनें ७
जे दोष ते गुण ह्मणूनिच भासवीले
माझ्या मुखांतुनि अवाच्य हि बोलवीले
हें सर्व विश्व मज तुच्छचि रे दिसावें
ऐसेंच तूं मज सदोदित भासवावें ८
द्वेषा ! कसा परम मित्र असूनि माझा
रागावलास मज सांग खरेंच तुझा
माझ्या कडोनि घडला अपराध कांहीं
तेणेंच कीं मम दया तुज येत नाहीं ९

ऐश्वर्य मान धन सर्व तुझ्या कृपेनें
म्यां भोगिले बहुत पूर्वि सख्या सुखानें
गेले क्षणामधिंच सर्व हि ते लयाला
कां रे असा मजवरी तरि कोप केला १०

---

# एडिटरास पत्र १

(“ चे ” कविकृत )

### ओव्या

साष्टांग वंदूनि चरणा ॥ विनवीतसे मित्र जुना
पत्र लिहिण्याच्या कारणा ॥ ऐकूनि ध्यावें १
बहुशा वाटलें मनासीं ॥ काय लिहावें आपणासीं
होईल गोड सर्वांसीं ॥ कोण काव्य २
कीं संस्कृत शद्ब भरावें ॥ कीं सुंदर वृत्त लिहावें
कीं भाषांतर मानेल तैसें करावें ॥ हवें त्याचें ३
कीं शृंगार रस गावा ॥ कीं शौर्याचा डांगोरा पिटावा
कीं कपटखेळ वर्णावा ॥ जादूगारी ४
लिहावें देशभाषेसाठीं ॥ कीं कोणाच्या पोटासाठीं
कीं आमच्या नांवासाठीं ॥ निश्चया नये ५
कीं चढाओढ धरावी ॥ कवित्वें झोंबी जिंकावी
कीं मना माने ती करावी ॥ बडबड ६
कवित्व कां करावें ॥ भलत्यासि भलतें म्हणावें

दृश्यीं डोळे मिटावे ॥ कल्पनाबळें
कवित्व अमूल्य वाटे मना ॥ कारण
अंतरीं बीज कल्पना ॥ तोचि जाणें ८
कवित्व कोणीं करावें ॥ कवित्व कैसें वाणें
कवित्वाचें घेणें देणें ॥ कोठें कैसें ९
ऐसे विचार वाहती ॥ कल्पना अनेक उठती
खऱ्या कवित्वाची पद्धति ॥ न साधे १०
भांबावलें अंतरंग ॥ वाटे होईल वचन भंग
ह्मणोनि कांहीं शब्दयोग ॥ कल्पना करी ११
पदासि पदांतर जुळावें कसें तरी काव्य फावे
परी तें पुढें ठेवावें ॥ कवणाच्या १२
करितां गुण गुण अंतरीं ॥ ती वर्णावी कोण्या अक्षरीं
कवित्व नामें मस्करी ॥ कैशी करूं १३
नियमिपदसमुच्चय ॥ रागरसस्थानलय
पढिकज्ञानाचा क्षय ॥ क्षणें होय १४
ह्मणूनि पाहिली वाट ॥ धीट अथवा पाठ
कवित्वाचा येईल लोट ॥ तेव्हां लिहूं १५
बाळवय मावळलें ॥ तारुण्य भरतें ओसरलें
संसारा मन उबगलें ॥ हळूहळू १६
दृश्यसौंदर्य अति झालें ॥ जिरून गेले विषयचाळे
कल्पना सौख्य हरपलें ॥ कोणीकडे १७
स्वतां वर्णवे न वाटे ॥ परवर्णनीं मन विटे
कीं हे वाखाणिती खोटें ॥ मायिक १८
कवित्वाचें मुख्य तत्व ॥ वाटे एक निष्प्रपंचत्व
त्याच्या पोटीं प्रसादतत्व ॥ साहजिक १९

काव्य कराया झटावें ॥ कीं तें अत्यंत रम्य व्हावें
सितश्मश्रूंचें डोलावें ॥ मस्तक जयें २०
जे विफळ करुनें पार गेले ॥ बालिशत्वा विमुख झाले
सारासार शोधूं लागले ॥ ब्रह्म गोळीं २१
कनक कांता बालिशलीला ॥ तृण तुल्य ज्या मनाला
त्यासि देई आनंद झाला ॥ तें अकवित्व २२
तें कवित्व जें उचली ॥ देहासवें झडपणी घाली
निमिषमात्रें निराळीं ॥ झोंकून देई २३
अहो ती कवित्व असिधारा ॥ विषयविषवल्लींचा पसारा
छेदूनि टाकी एकसरा ॥ महातीव्र २४
आह्मी ऐसें कवित्व करूं ॥ तरीच काव्यामती धरूं
नाहीं तरी गुदमरूनि मरूं ॥ खोंपटांत २५
आवेश ऐसा बाणे मना ॥ परी देहचेष्टा राहेना
फोल बोलणें रसना ॥ सोडीचना २६
ह्मणून वेडें वाकडें ॥ पत्र धाडिलें आपणाकडे
अवलोकनाचें सांकडे ॥ पाडियलें २७
आजि एवढेंच निवेदन ॥ सुज्ञांप्रती करी दीन
दासानुदास, शद्बकृपण ॥ आपुला २८

तारीख २६ । १ । ८९ }
मुक्काम पुणें }

आपला
जुना मित्र
"चे" कवि.

# पांथागमन

सदाशिव मोरेश्वर भिडे

### श्लोक

सुगंधें शीतत्वें श्रमहर असा मंद पवन
मनोत्साहा देतो विविध तरुवल्लीसुमंगण
तसे वृक्षीं पक्षी निजमधुरवें लाविति लय
प्रभातीं पांथातें अमित सुख हे देति विषय १
यदा तापे शीर्षी प्रखरतर चंडांशु किरणीं
नदे पृष्ठीं ठेवों चरण पथिका तत्पभरणी
तदा वृक्षच्छायास्थिति विमलशीतांबुनिचय
दुपारीं पांथातें अमित सुख हे देति विषय २
क्रमीं लागे मार्गा, रवि न जलदाच्छादित जरी
तयाच्या संतापा निववितिं तदा निर्झर झरी
पथीं जातां जातां मिळति करवंदादिक फळें
अशीं त्या वेळीं ही मिळतिच सुखें त्यास विपुलें ३
असा जातां सन्ध्यासमयिं रविही अस्तगिरितें
अनेका रंगांनीं जलदयुत आकाश सजतें
तदा जाया नीडीं विहग निघती सत्वरगती
असे संध्याकाळीं बहु विषय पांथा रिझविती ४
सकाळीं वा संध्यासमयिं कितिही यापरि परी
जरी पांथस्वांता सुखद गमती त्याहुनि तरी
यदा लाभे प्रेमोल्लसित नयनें स्वागत घरीं
तदा त्या पांथाचें मन सुखित होतें किति तरी ५

# काव्यरत्नावली.

अंक २० वा.

## अग्निशलाका.

( केशव वामन पेठे कृत )

### आर्या.

दैवी[1] अग्निशलाके ! तव महिमा वर्णवेल काय मज !
उल्हास मनीं भारी आला तव वर्णनीं अजी सहज ॥ १
श्वेता रक्तमुखी[2] तूं बहु सुंदर पेटिकेंत[3] वसतीस
घुडक्याविल्यास झाले बहु दिन त्या चकमकीस[4] सवतीस २
ती[5] दीन सवत आतां कोठें लपवुनि मुखास दूर पळे
तव वर्चस्वा पाहुनि मात्सर्याग्नींत काय होरपळे ! ३
ती लोपतां न वाटे खंती मज, तूंच फार आवडशी
करिशिल काय माझें जरि संतत राहशील तूं धिडशी[6] ४
बहु सुंदर शीर्ष[7] तुझें वर्णानें लाल शोभते फार
नाजुकपणा किति तया शीतें[8] तें फार होय बेजार ५
ऐशा स्थितींत घर्षण करितां तें व्यर्थ भंगुनी जातें
ज्वाला न टिके भंगे दावी अत्यल्प मात्र तेजातें ६

---

१ आगकाडी ! २ आगकाडीला जो लाल गुल असतो ३ आगपेटी ४ विस्तव पाडण्या करितां गारगोटीवर ज्या लोखंडानें घर्षण करितात ती ५ ती चकमक. ६ चांमली. ७ डोकें. ८ ओलेपणानें.

तव शीर्ष मंगतां सखि ! घर्षणिं जन कोपती पहा भारी
गालिप्रदान देउनि चुरडुनियां दूर ग ! तुज झुगारी ७
किंवा वात दिव्याची साराया योजितो पुढें तुजला
दीपकतैलें संतत सखये ! तव देह राहतो भिजला ! ८
परि उष्णें शीर्ष तुझें राहे जरि खडखडीत दमदार
प्रस्तुत या कवनाची आहे सगळी तयावरि मदार ९
उपमा सुरेख देतों अंडें मन वाटतें तुझें शीर
झालें तयार उबुनी फोडाया काय तो नणु उशीर १०
किंचित् घर्षण करितां जाय निघोनी तयावरिल कवच
ब्रह्मांडा जाळिलसें बाळ निघे अतिशयोक्तिचें न वेच ११
स्तंभीं प्रहार करितां प्रकटे त्यातुनि नारसिंह जसा
करितां प्रहार तुझिया शीर्षांतुनि प्रकट होय वन्हि तसा १२
लगुडप्रहार करुनी करिती यज्ञार्थ पूत वन्हि मला
त्याच्याच जातिचा हा शुद्ध असे अग्नि वाटतें मजला १३
कर सात, चार शिंगें, सात जिभा, पाय तीन, दोन शिरें;
अग्निस्वरूपवर्णन श्रुति करि परि तें जना गमे न खरें १४
परि बालसूर्य जैसा त्यासम ही नूतनसंभवा ज्वाळा
वदण्या नसे भय मला ह्मणतों ही त्याहुनीहि तेजाळा १५
तत्क्षणिं दहन कराया ज्वाळेसम रविकरांस शक्ति नसे
चपलेसमान घर्षणिं उपजे ज्वाला, गमे न चोज कसें ! १६

९ बोलणें. १० काष्टदंड, यज्ञकालीं ज्या दंडानें अग्नि उत्पन्न करितात तो. लगुडप्रहार. ११ पवित्र १२" सप्तहस्तश्चतुःशृंगः सप्त जिव्होद्विशीर्षकः। त्रिपाद प्रसन्न वदन इत्यादि" वैश्वदेव. १३ नवीन १४ सूर्य किरणांस. १५ वीजेसारखी.

तव शीर्ष रक्त किंवा कृष्ण असो अन्यवर्ण धरणारें
नचि शीर्ष-वर्ण कारण; ज्वाला रूपांत भेद करणारें १७
नरशीर्षासम वर्तुळें[१६], शीर्ष चतुष्कोण[१७] तव अह्मांस दिसे
परि भिन्नाकृति शीर्षज्वालांमाजी मुळींच भेद नसे १८
नानाविध रंगांचा गोंडीला सारखाच हलवा[१८] गे !
दाहकता गुण तैसा अखिलें[१९] ज्वालांत सारखा वागे १९
त्या भिन्नवर्ण[२०] मानवशीर्षीं उगवति समान वृत्ति जशा
तव शीर्षज्वालाही उद्भवती सम समान वृत्ति तशा २०
लघु शीर्षीं शक्ति असे गुप्त तुझ्या तेविं मानवाच्याही
होता प्रकट भरुनियां टाकितसे अवनिच्या दिशा दाही[२१] २१
तें अल्पबीज कोठें वटवृक्ष नभास भेदितां कोठें
वाटे त्याहुनियां मज तुझिया शक्तींत बल असे मोठें २२
गे ! त्वच्छक्ति पराक्रम वर्णाया शक्त मी नसे दीन
अपरंपार उदधिजल सकलहि पोहेल काय गे ! मीन २३
शोधक बुद्धि नराची वाढे करि हस्तगत सकल भूतां
करि हस्तगत जगाला ज्वाला वर्धिष्णु नूतन संभूता २४
तव शक्तिबीज मानवशक्तिबिजाहूनि आगळें वाटे
जरि धड शीर्ष निराळें नरबल भंगे तुझें परि न आटे २५
धडविरहित शीर्ष परी आहे भारी पराक्रमी राहू

---

१६ तुर्की लोकांचीं डोकीं वाटोळीं गरगरीत असल्याची प्रसिद्धि आहे. १७ अमेरिका खंडाच्या पूर्वेकडील कित्येक बेटांतील पूर्वीच्या रहिवाशांचीं डोकीं चौकनी करण्याचा प्रघात असे. १८ संक्रांतीच्या दिवशीं वाटतात तो. १९ सर्व २० ब्राह्मण क्षत्रियादि किंवा काळे गोरे वर्ण. २१ जाळणारी.

गगनविहारी शशिला ग्रहणीं ग्रासी सदा असीं पाहूं २६
तो चांडाल विधुग्रति भंगुनि प्रकटवि बहल अंधारा
अंधारा भक्षया तव शीर्षांतुनि निघे अनले-धारा २७
फुरफुरणारी ज्वाळा वातें घे नागमोड गति गमनीं
तम भेदरून जाई धांवि भुजंगीं बघुनि भवि पथिक मनीं २८
पीत भुजंगम धांवे ग्रासाया कृष्ण मंडुका जैसा
ज्वाळाप्रवाह धांवे वेगानें भक्षण्या तमा तैसा २९
ऊर्ध्वप्रसवा कैंदळी तिजसम तूं अन्यगर्भ नव धरिशी
सिंहीसम जननाऱ्या कष्टें परलोक तूर्ण मग वरिशी ३०
जन्मांत एकदांची वेळुसम पाहसी अपत्य-सुख
प्रसवानंतर सत्वर लोपसि निर्जीव होउनी विमुख ३१
हरिवोतं दंतिंयूथीं तमयूथीं वन्हि जन्मतां प्रगटे
तेजस्विता वयावरि देहावरि नच; विभांतुनी प्रगटे ३२
उपजत रवि भक्षाया धांवे नभिं जोवीं अंजनीसुत तो
तूं धन्य वीरमाता उपजत तव सुत तमा गिळू बघतो ३३
नच बघुनि राहतो परि भक्षुनि तम टाकितो पहा वेगें
टिकतीस पाहण्या तरि तव हृदयीं प्रेमपूर यावे गे ३४

---

२१ विस्तव. २२ सर्पीण २३ बेडुक २४ केळ २५ सिंही प्रसवानें मृत होते अशी कविप्रसिद्धि आहे, आगकाडी वन्हिप्रसवानंतर मळून जाते. २६ लौकर. २७ कळकाचे बेटास बी आलें ह्मणजे तें बेट मृत होतें या गोष्टीकडे लक्ष्य आहे. २८ सुख विरहित, पक्षी दुःखी २९ छावा- ३० हत्तीच्या कळपांत. ३१ मारुति, हा जन्म- कालीं सूर्याला खाण्यास गेला होता अशी पुराण प्रसिद्धि आहे

वन्हिप्रवाह संतत खालीं करिती बर्के वरिच जाय
बरनदपण सोडुनियां मानी, अवनीत कधीं वरिला काय! ३५
तैल नको वात नको वन्हिस्पर्शाविणें तनुज दावी
दीपक घाटी संतत नवलाई कार्य याहुनि वदावी ३६
वन्हिशलाकाविद्या साह्य करिति सतत दुर्जना सुजना
नच भेदभाव ठावा सुजन कुजन सारखेच साधुजना ३७
दुर्जन तव साह्यें किति जाळिति उडव्या घरें गवत कुरणें
दे बहु मोद तयांला धनमान विलाप शोक हुरहुरणें ३८
किति उपयोगीं पडशी गतपणें दुष्ट-कृति करायाला
ओढुनि हळूच छुपसनि देतां तुम डाग खाक गे! झाला! ३९
हा दोष दुर्जनाचा सखये! नच दोष हा तुझा कांहीं
"जैसा याजक तैसें कर्म घडे" वृद्धवचन हें पाहीं ४०
गुणदोषारोप जरी मजला तुजवरि करावयास नये
परि शक्ति विक्रम-गुणा वर्णाया भीति अल्पही न सये! ४१
नाना यंत्रोत्पादक-शक्ति अलिकडेस बाष्पें हा गवसे
ती बाष्पवन्हियोगें; अनलशलाकेंत वन्हि-बीज वसे ४२
गिरण्या गोद्या नावा गाड्या चालक जगांत बाष्प असे
जागृत तयां कराया अग्निशलाके! तुझ्यांत शक्ति वसे ४३
अरणा समान करितां अन्याला साधुदीप ही जैसा
अग्निशलाकाजीवाला विक्रमही गमतसे मला तैसा ४४
जठराग्नि तृप्त करण्या नर, वन्हि चुलींत पेटवूं लागे
तेव्हां प्रथम तयाला अग्निशलाके! तुझी गरज लागे ४५
कोण न भक्त विडीचे वागविती सतत गे! तुला जवळी

३२ जाळ. ३३ नम्रपणा. ३४ बाफ.

जे धूम्रपान करुनी तिळतिळ तनुचाच देति नित्य बळी ४६
जळती विडी मुखांतिल पहा अस ज्वलतपर्वतासम ती
धूम्र निघे राख उड मलांतकड थुंक कढत पंक अती ४७
ज्वालामुखी सखे ! ती करिशी एकाक्षणें प्रदीत पहा
वाहे सुधि त्यांतुनि [35]औष्ठ्या समवेत येत बाहिर हा ४८
जे धूम्रपान करिती पाळति गे ! त्यांत अग्निहोत्रास
व्रत खडतर नच सोडिती जरि बहुत तयांस नित्य हा त्रास ४९
वास्तव्य तुझें जरि या भूगोलावर मुळींच सखि ! नसतें
तरि धूम्रपान इतुक्या जोरानें काय चाललें असतें ? ५०
नसतीस जगीं तैशाच तरि अडचण किति तरी जना पडती
अग्न्युत्पादक तुजसम अति सुलभ जना न वस्तु सांपडती ५१
[36]पावक तव तनुज परी कर्मठ अपवित्र मानिता तुजला
नच स्पर्शतांत शिवती न वनस्पृति याहुनी गमे मजला ५२
मळमूत्रादिक पशुचे देहज जे अति पवित्र गणतात
ते पावक-जननीला काय ह्मणुनियां अशुद्ध ह्मणतात ? ५३
[37]मृगाजिन दंत [38]कारेचे गौ[39]शृंगाणा[40]सु मक्षिकोच्छिष्ट[41]
उत्तम गुणाधिकारें यांसम तूं शुद्ध भाससी स्पष्ट ५४
कर्मठ अपवित्र ह्मणो तव भक्त जगांत वाढती फार
दिवसें दिवस जगीं तव अधिकाधिक तरिच होय संचार ५५
जों जों जुन्या मताचें अभिमानाचें निघोनि जाय बळ

---

३५ लाव्हा ज्वालामुखांतुन जो द्रव पदार्थ बाहेर निघतो तो. ३६ अग्नि पर्शी पावन करणारा. ३७ हरिणाचें कातडें. ३८ हत्तीचा. ३९ गव्याचे शिंग व ऊर्णवस्त्र ४० मध. ४१ उत्कृष्टपणामुळें शुद्ध मानितात.

करिशी प्रवेश हळुहळु पाकस्थानीं सखे ! चुलीजवळ ५६
तवसुतजननकुतूहल बालां वा प्रेक्षकांस तें वाटे
त्याहुनि कविहृदय पहा शतपट मोदें भरोनियां दाटे ५७
सामान्यजना त्याचें नच कौतुक वाटतें तसें बाई !
त्याचा विषाद न धरीं रुक्षहृदां न उमगेचि नवलाई ५८
नच कौतुक ज्यां वाटे बघुनि मनिं हिरण्यगर्भ रविबिंबेन
वन्हिशलाके तो तव सुत जननि मुदें कसें करिल मनन ! ५९
पेटींत साठ बहुधा काड्या तितक्याच रचियल्या आर्या
तव वर्णन संपवितों ! आतां मी लागतों दुज्या कार्या ६०

---

# स्वदेशदैन्य.

(सदाशिव मोरेश्वर भिडे)

श्लोक.

एके दिशीं मी असलों करीत
स्वदेशदारिद्र्य विचार, शांत
मन्मित्र तेथें इतक्यांत आला
" सोचित कां ? " हें पुसता जहाला १
" देशस्थिती फार कठीण वाटे
°दुष्काळ माजे धनवारि आटे

---

५२ सूर्योदय. १ द्रव्यरूपपाणी.

चिंता जना स्वोदरपूरणार्थ
पडे " असा मी वदलों निजार्थ २

" कशास चिंता करिशी उगाच
कठीण नाहीं स्थिति जाण साच
पूर्वील पेक्षां निज देश आतां
संपन्न आहे, नच अन्नचिंता ३

व्यापार वाढे पहिल्यापरीस
जमीन आली बहु लागणीस
उद्योग धंदा मजुरांस लाहे
पूर्वील पेक्षांहि सुखांश आहे ४

पाश्चात्य देशांतिल सर्व युक्ती
कामीं इथें ते जन आणितातो
विद्या किती वाढतसे जनांत
कशास चिंता धरिशी मनांत " ५

अशापरी देउनियां प्रमाणें
संपादिलें स्वीय मतास तेणें
देणार मी उत्तर, तों भिकारी
भिक्षार्थ कोणी तव येत दारीं ६

झिंजा शिरीं विस्तरल्या भुतापरी
काळी प्रभा फांकत कोळशापरी
विरूप, तें वस्त्र मळीण फाटकें
स्त्रीजात ती पाहुनि भीति बालकें ७

" भिक्षा, बया, भाकर कोर वाढी

---

२ उपयोगांत. ३ सांगितलें. ४ आपलें.

असा तदा कर्कश शद्ब काढी
" तूं कोण ग ! " " शिकलगार आगा "
" कां मागशी भीक " " न अन्न खाया " ८
" असे तुझा को पति ? " " होय तो ही
बगाबरीं मागत भीक राही "
" उद्योग धरा त्यजुनी भिकेला
कां लागला ? " मी पुसिलें तयाला ९
" बाबा पुढें शिकल होय हल्लीं
झालीच सर्वांचि हि पायमल्ली
कोठें असेना तरवार आतां
तो काढला शिकल हो पहातां १०
सर्वां करीं जैं तरवार होती
पूर्वी तदा शिकल हात होती
या इंग्रजानें तरवारि नेल्या
बाटा खल्या सर्व भिकस केल्या ११
मन्मित्र तेव्हां वदला तियेला
किंचित् सलज्ज[६]स्य असा जहाला
" तूं बोलशी ' शिकल काय अर्थ
नये कधीं ,, तो वदली तदर्थ १२
"घांसानियां त्या तरवारि सांणे[७]
पाणी चकाकी बहु त्यांस देणें
त्या बोलती शिकल तोच होता
धंदा अता तो नच हें पहातां" १३

---

६ लज्जायुक्तमुख, ७ सहाणेवर, चरकावर.

" भिक्षा, बया, भाकर कोर बाढी "
असा पुनः बेगूर शद्ब काढा
आंतुनिया भाकर कार आली
घेऊन तीं दीन निघन गली १४
मित्रा पहा उत्तर मूर्तिमंत
कसें तुळ वाटतसें मनांत
स्वदेशदारिद्य कसें असे हें
विचारुनी तूं स्वमनींच पाहें १५
विद्यारेशी " शिकव अर्थ" जेव्हां
कां होशि लज्जायुत सांग तेव्हां
अशापरी नैकविधी स्वदेशीं
दिनोदिनीं दैन्य करी पदासी १६
मित्रांनो ! ही गोष्ट चित्तीं धरून
वागा ऐसें कीं हरो देशदैन्य
नोहे आतां काळ हा आळसाचा
नाहीं पेक्षां ग्रासितो काळ साचा १७

---

# विपत्ति.

( बळवंतराव कमलाकर )

श्लोक

कोणी बरें न ह्मणती तुमच्या मनांत

सर्वत्र सत्र तुम घिकून लोपितात
कोणा मिळाने पळती इरुनाच तूतें
कोणी तझा टपति मौक्तिह ध्यावयातें                    १
श्रीमन लोक तुज येउ न देति गाहीं
ग्रामादि ही तव रिघावचि होत नाहीं
तें हा असे, परि असत्य गमतें वाटते ही।
की श्रवर्ईह जगांत "नको ! नको ! ! ही"               २
गे मंद मंद पद टाकित येशि जव्हां
रम्या किती नारे बरें ! दिसतेस तेव्हां
सेवमधे सुमति आणि विरक्ति ऐशा
दोघी सख्याहि दिसती किति रम्य खाशा !               ३
आहेस तूं मुजनसत्वपरीक्षणाची
वाट शिवा, तुज समा जगिं नान्य साक्षी
कीं पायरीच अशी त्रिदिवालयाची
किंवा ध्वजाग्र गमते यशभूपतीची                     ४
सामान्य काय तव पुत्र विवेक लोकीं
भूपाल संत कविहा नमितो जगा कीं
वैराग्य मैत्रिण तुझा तव कन्यका हे
ज्योत्स्नासमान सकळां रिझवीत आहे                  ५
त्वत्संगमीं हळुहळू प्रभुच्या पदाची
होते स्मृती दिसतेस मग मूर्ति त्याची
दुर्वासनेसह विरे स्वपुण्याभिलाषा
पाप जरासह लया सहसा दुराशा                       ६
प्रेमा क्षणैक चपळेसम दाखवून
लोकां कशी फसवितें स्थिर भासऊन

कावत्व हें सकळ अंबुधिकन्यकेचें
येतें कळोनि तम इतरां जनांते ७
अन्याय नीति, सुख दुःख दुवृत्तवृत्त
तें पाप पुण्य मग तें स्मरतें समस्त

कारुण्य सर्व झडुनी मन शुद्ध होतें
सद्बुद्धि शांति करुणा उदयास येते ८
उन्माद गर्व अति हर्ष असे अनेक
संपाले संगमवश मज मित्रलोक

होतेंच वाङ्मधुर त्या समयीं मिळाले
त्वद्दृष्टिपात घडताचि लयास गेले ९
ऐशी सखे ! गुणवती असतां जनास
कां गे ! न तूं रुचशि सांग खरें कुणास ?

हो ! हां ! खरेंच मज आठवलें अतां तें
ज्याकारणास्तव न तूं रुचशा जनातें १०
पाप्यांतरीं करशि तूं अनिवार रोष
उग्र स्वरूप धरुनि छळिशी तयास

दारिद्र्य, रोग, भय संकट हेच दूत
होऊनि निर्दय तयां बहु पीडितात ११
कीं तो जरीहि असला नृप चक्रवर्ती
तत्रापि हे न तव दृत तयास भीती

त्वद्दृष्टियाग घडतां नृप रंक होतो.
कोणी न त्या पुसति तें बिजनीं फिरे तो १२
खाण्यास अन्न पुरतें न मिळे तयाला
चिंध्याहि तें न मिळती तनु झांकण्याला

त्या व्याधि तीव्रतर रूप धरूनि जाची
कोणा न त्या समयिं ये करुणा तयाची १३

ढुंकूनि पाहति न कोणि तया जनाला
दाणेहि मुष्टिभर देति न कोणि त्याला १४
हा चोर चोर ह्मणुनी उलटे तयास
बांधूनि नेतिच बळें नृपमंदिरास
व्याधीमुळें न बसवे उठवे तयाला
विश्वास ये न, परि ढोंग गमे दुज्याला १५
तेणें तया नृपतिदूत उपोशिताला
कैदेंत ठेउनिहि मारिति तें कशाला
ऐशापरी स्मृति भयंकर यातनाते
तो भोगितो परि न मृत्युहि ये तयाते
ऐसें भयंकर महोग्र तुझें स्वरूप
दे कंप कां न मग पाहुनि ते सदर्प १६
या कारणास्तवाचि गे ! तुज लोक भीती
पापी जनास्तवाचि गे ! परि यातना ती
ऐसे भल्या न छळिसी मग कां तयानें
भ्यावे ? तुला करुनि खेद वृथा सुखानें १७
हें विश्वचक्र सुखदुःखमय प्रसिद्ध
आशेपरी निखिल जीव तयांत बद्ध
आली विपत्ति तरि त्या पुढती सुखाचे
आहेत खास दिन हे वच सज्जनाचे १८
देवादिकांस तव जाच न काय झाला
थोडा तुझ्या अनुभवा परि राम आला
संतोषवृत्ति धरितां मन शांत होई
जाती सुखें मग न कां दिन माय ! बाई १९

# कापूस.

( केशव सदाशिव रिजबूड )

श्लोक

सर्वां जो वंद्य आहे श्रुतिहि म्हणाति जो क्षुद्र वस्तूकडून
मोठाल्रीं सृष्ठकार्यें सहज निजबलें आणवीतो घडून
इच्छेवांचूनि ज्याच्या इकडिल तिकडे नाढळे एक पत्र
वंदूनी त्या प्रभूतें कथन करितसें कापसीचें चरित्र १

भो! विश्वेशा! वनस्पति-द्रुम-लता-वल्यादि जीं उद्भिजें
लोकीं निर्मियलीं ! विभो ! पुरविण्या जीवांस जें पाहिजे
तीं सारीं सुख-तुष्टिपुष्टिफलदें. शंका मना ना, परी
त्यामध्यें लघु कापशी सुफलदा आह्मास नानापरी २

कोणी शेती श्रम करुनिया अर्पिती धान्यराशी !
कोणी देती निपजुनि मळीं कंदमूळां फळांशीं;
कोणी देती मधुरुचि फळें वृक्ष उद्यानवासी;
साऱ्या जीवां द्रुम वितरिती पत्रपुष्पें सुवासी ३

कोणी रुग्णां विगद करुनी वाढि दे वृद्धि रक्तीं
कोणी वल्ली श्रम हरुनि दे चित्त-शरीर-शक्ती
कोणी वल्ली विष उतरुनी होतसे प्राणदात्री
कोणी वल्ली व्रण बुजवुनी दे क्षणीं दाढर्च गात्रीं ४

कोणी देहा झिजवुनि करी सौरभें लोक राजी;
कोणी देहा पिळवुनि जनां सद्रसा वृक्ष पाजी;
कोणी देहा चिरवुनि ह्मणे लोक-तापा निवारूं;

कोणी देहा वितरुनि जलीं होतसे पाणवारू. ५
कोणी आंगा क्षत करवुनी प्यावया दे सुरा ती;
कोणी बोंडा चिरवुनी अफू खावया देत हातीं;
कोणी पत्रां खलवुनि जनां ओढण्या देत नास;
ऐसे नाना तरु निजगुणें सौख्य देती जनांस ६
महीवरि वनस्पती द्रुम असंख्य चोंहींकडे,
न एक परि कापसे ! तुजसमान दृष्टीं पडे.
समस्त तरु या जगीं असति एक·एके गुणें
असंख्य गुणयुक्त तूं असासि गे ! नको सांगणें. ७
करूनि जन कापशे ! मृगजळीं तुझी पेरणी
तुझा भरभराट हो ह्मणुनि वांटिती शेरणी
तुझी प्रथमच्या पिकीं स्वतनु बारकी ठेंगणी
तथापि तव ! कापशे ! तुजासि थोर जो तो गण. ८
फुलूनि मग भादवीं तुज फळें फुटूं लागती
न गोल, परि गे ! तुझें फळ असेचि शंकाकृति
द्रुमां सकळ कापशे ! फळ असे फुलाखालतीं
तुझें फळ फुलावरी नवल लोक हें बोलती ९
फळांस तव कपाशे ! वदति एक बोंडें जनीं
दिवाळिस फुलूनि तीं फुटूनि लागते वेंचणी
पिकास वदती रुई जन कपाशि रू कापुस
तुझा धवलिमा कसा ? मज नको, बलाका पुस १०
शेतीं बोंडें उलूनी मधुनि बहु खुले श्वेतता स्वच्छ रूची
ती शोभा काय वर्णूं ! परि मजासि गमे शुभ्र रू तो नसेची.
" कैसे हे लोक माझ्या गुपचिप बसले वेंचणीच्या प्रसंगीं "
या योगें दंतपंक्ती दिसति मज तुझ्या हांसतां जागजागीं ११

यावेळीं नित्य देशी कळवळुनि गमे शेतवाल्यास हाका
" या रे ! या वेंचणीतें झडकरिच करा. स्वस्थ ऐसे अहा कां?
स्वातीची वृष्टि होतां, धुळिस मिळुनि मी, व्यर्थ जाईल साल.
हातीं येईल माती. मग रडत तुझी निश्चयें हो बसाल " ! १२
दिलें खाया प्याया वसवुनि गृहीं विश्रम दिला.
अह्मी नेणों कां ह्या सकल-तरुवर्गोपकृतिला.
कुणी आच्छादी ना परि अमुचिया नग्न तनुला,
कपाशे ! हे नेत्रीं बघुनि, उपजे कींव तुजला १३
जगाची राखाया सकलपरि लज्जा तदुपरी
कापसे ! तूं स्वांगें सरलिस पुढें या क्षितिवरी
पिळूनी पिंजूनी, करुनि तनु तंत्वान्वित पुरी,
जगीं गे ! झालीस प्रकट पटरूपें झडकरी १४
कपासे ! तुझा लांबसा एक धागा
जगाची रिती सर्व वेष्टील जागा.
खरी तूंच चिच्छक्ति या भूमिलोकीं
ह्मणोनी तुझा पंथ जो तो विलोकी १५
त्वदितर तरु जे गे ! " आपली हीं परावी "
मति धरुनि, विभेदें वर्तती रंकरावीं.
फलति बहुत कोणा, अल्प कोणा मुळीं न
सकल तरुंस ऐशा काय बोलूं कुळीन ? १६
परि इथुनि तिथूनी तूं समें थोरदीनें
समजुनि, जन-हस्तीं अर्पिशी ठाण मानें
तुजसि जन कपासे ! ठाण मागो गिरा गे !
तरि कधिंहि पहाशी त्याकडे तूं न रागें १७
परि जगज्जननी द्रुम कापसे !

तव कृपेस जगीं उपमा नसे
रुचिरसें चिर तूं चिर देउनी
करिशि रक्षण उष्णहि मीं दिनीं १८
नृप असो धनहीन असो परी
म्हणसि त्या "पट जीर्ण न वांपरीं"
तव जिवंतपणींच कृपा नव्हे
वसन लेववितेस मृता नवें १९
या लोकीं रावरंका, शिशुयुवजरठां, स्त्रीनारीनरांतें
धट्यां कट्यां, अशक्तां, अगदतनु-महाव्याधिसंपीडितांतें
बैरागी कानफाटे फकिर यति तपी ब्रह्मचारी गृहस्थां
या प्रत्येका कपाशे ! जतन करुनि तूं ठेविशी तव्यवस्था २०
व्योमीं यानें उडो वा, जलनिधिंत जलस्तंभनें संस्थिरो वा,
धामीं राहो, अरण्यीं तप करित असो, तीर्थ यात्रीं भ्रमो वा
कोठें राहोहि जावो निरसु घडुनि कीं देह पोंचो स्मशाना
राहूं देशी कपाशे ! क्षणभरि न कधीं नग्न कोणा अशांना २१
भरतभूमित जन्म तुझें घडे
क्षितिवरी बहु वाजती चौघडे
चहुंकडे बहु हेरुनि धुंडितां
तुजविना न निवास दिसे रिता २२
लघु परी तव कीर्ति विशाळ ती
तुजवरी जन चामर ढाळिती
तुजविना उपचारहि शंभर
तरि अम्ही असतोंचि दिगंबर २३
राखूनि भीड अवरू पत लाज सारी
झालीस तूं सकल शीत निवारणारी,

लागो न शीत, न रुतो कण मृत्तिकादि,
तूं कापशे ह्मणुनि झालिस लेप, गादी २४
विप्रत्व संवितरणी द्विजजाति पुत्रा
यज्ञोपवीत नटलीस विरंचिसूत्रा
जाणूनिया वधुवरा अपुल्याच सूत्रें
लग्नांत बद्ध करिशी दृढ तूंच पात्रें २५

जागोजाग तुझ्या प्रसिद्ध गिरण्या, ते कारखाने किती.
मध्यें स्त्रीपुरुषें मुलें अगणित त्वच्छुश्रुषीं वागती.
चक्रे रूळहि, बाष्प-यंत्र फिरवी. ती कापशे सत्कला
पाहूनी, जन विस्मयेंचि ह्मणती, इंग्रेज युक्ती भला २६
जाऊनी चरकीं निघूनि सरकी, होऊनिया पिंजणी,
होऊनी मग शीघ्र तंतुमय तूं, ठोकूनिया पांजणी,
चालूनी शत माग, तूं धरुनियां वस्त्रावतार क्षणीं,
होतेस प्रकट स्वयें मग जगल्लज्जेचिया रक्षणीं २७
लुगडीं पर्कर पातळें उपरणीं धोत्रें दुपटें बरे
बंड्या आंगरखे खमीस सदरे चोळ्या झगे अंबरे
पागोटीं पगडया रुमाल चपण्या मंदील टोप्यां, असे
नानावेष नटूनि लाज अमुची त्वां राखिली कापशे २८
गाद्या लेप उशा सुरंग-दुलया गिर्द्या रुजामे जमे
तक्के लोड तिवाशिया हि सुतडे सत्रंजिया जाजमे
अभ्रे मच्छरदाणिया मसनदी पड्दे छतें चांदण्या
डेरे तंबु कनाति दोर कसण्या रश्शा तशा काढण्या, २९
वेषानंत असे नटूनि अमुच्या खालीं उशापायथीं
लोळोनी, वरती बहू विलसुनी होशी अह्मां माय तीं
दाते सर्वच वृक्ष त्यांत परि तूं एका वदान्या खरी

गाया त्वद्गुण कापशे नच पुरे हे के. स. री.-वैखरी ३०

# पद्यमंजूषा.

( लक्ष्मण गणेश लेले )

श्लोक

वृत्तें मनोहर विचित्र मला न येतीं
एक्या रसांतहि गती न असे अहो ! ती
वाणी रसाळ मधुरा जनरंजनाला
नोहे, दिसे कृति अशक्यचि ही मनाला १

जसें जनानिश पहा स्वशिशुचें नवें बोबडें
निरर्थक तथापि ते वच कसे बहू आवडे
तसेंच मम कृत्य हें जरि विचक्षणांला न तें
रुचेल,तरि माउली प्रतिस काव्य देवीस तें २

आहे निर्मळ वारिपासुनि तुझें हें जन्म पद्मा!पहा
वास श्रीहरिच्या करामधिं मनोहारी सुरां वास हा
जात्या सुंदरता पहा किती असे रामामुखस्पर्धिनी
यःकश्चिद्भ्रमरानुराग धरिशी आश्चर्य वाटे मनीं ३

सदा चिंती रामा, परि न कधिं रामा सुविमला
सदा प्यावें रामाधर परि न रामांघ्रिसलिला
नमी रूष्टा रामा परि न कधिं रामास विनती

अहा ! गेलें सारें वय सरुनि कैशी मम गती ! ४
अशोकाला आला रुचिर घन पाला बघ ! कसा
अपूर्वा कांतीनें बहुत विलसे येथ सरसा
फुलें कांहीं कांहीं मधूनि दिसती सुंदर वरी
मृगाक्षी नारींचा पदयुगुलसंपर्क न तरी ! ५
कर्पूर, केतक, तसे चल हो अपांग,
मंदाकिनी विमल फेन, विमुक्त-भृंग
कुंद. त्रिनेत्रशिरिं इंदुकला सुरेख
याहूनियां धवल कीर्ति तुझीच देख ! ६
भागीरथी बहुत पावन पाप हारी
तापास शीतकर इंदु पहा निवारी
दैन्यास कल्पतरु तोहि वदान्य वारी
हे तीन ताप परि एकाचि साधु सारी ! ७
ललाटीं कस्तूरीतिलक, नयनीं कज्जल रुची
दिसे अंगीं पाहे सतत नव दिव्यांबर शुची
गळां मुक्तामाळा बहुताचि विशाला सुविमला
धरीं नारी कर्णीं विमल मणिताटंक युगलां ८
आला वसंत बघ संताप दे बहुत संतास संतत खरें
वाटे पसंत बहु कामीजनांस परि आनंद सौख्यद हि रे
मंदानिलेंहि अति कंपायमान तरु वंदावयास भुवनीं
स्त्रष्ट्यास काय जणुं ! हर्षें स्वमस्तकाचि खालीं करी निशिदिनीं ९
आधींच हें वपु किती रमणीय साजे
तैसाचि सस्मित मुखेंदु तुझा विराजे
वेणी नवीन नयनें नलिनासमान
सालंकृता मग तुला उपमा न जाण १०

संसाररूप कटु पादप यास दोन
आहेत सुंदर फळेंचि सुधेसमान
आस्वादन प्रतिदिनींच सुवाग्रसाचें
तैसें दुजें सुजनसंगति सौख्य साचें ११

पुरवला गिरिकंदरीं वास हो
वनचरांसह तोचि सुवास हो
परि नको कधिं मुर्खजनांसह
अहह ! संगति नाकिंहि दुःसह १२

जशीं दिनमणी पहा उदयशैलसानूवरी
हळू हळु चढे तया बहुत ताम्रता तोंवरी .
तशीच वरि ताम्रता जरिहि जाय अस्ताचला
असे सतत सारखी सुजनवृत्ति ना चंचला १३

बघ, जलधिंत जातसे पतंग !
बघ, नवतामरसांत मत्त भृंग !
बघ, पादपकोटरीं विहंग
बघ, कामीजनमानसीं अनंग ! १४

श्रीरामचंद्ररमणी बहु वैभवांत
तीतें निवास दशकंधरमंदिरांत
तेव्हां पहा उलट कीं परिणाम होतो.
हें सत्य पूर्वकृतकर्मवशें अहो तो ! १५

# बोध

(अण्णा देशपांडे कृत)

## आर्या

प्रापंचिकास तापद निर्धनता ही असे पहा फार
द्रव्याविण संसारीं देहाचाही न साहवे भार १
मान्य जनीं कोण खरा ज्याचें भाषण तसेंच वर्तन ही
यांचा संगम जेथें वंद्य जनीं तोच होतसे पाहीं २
व्यर्थ मिळे मान कुणा मानिति धनिकास लोक हे सर्व
अंतरिं वाटे त्यांतें धनिकादर हें जणू महा पर्व ३
कोणाचे दुर्गुण गुण, लक्ष्मीची प्रीति ज्यावरी मोठी
श्रीमंताचे दुर्गुण गुण-गण गणिती न गोष्ट ही खोटी ४
कोणा सुपुत्र वदणें तोषवुनी जो पित्यास सच्चरितें
पित्राज्ञा नुल्लंघी पावे तो जागिं सुपुत्र-पदवीतें ५
कोणा मित्र ह्मणावें संकटिं कामास जो बहू येतो
नाहीं तरि काय वृथा तोंडानें मित्र मात्र जो ह्मणतो ६
सुस्त्री कोण ह्मणावी इच्छी केवळ सदैव पतिहित जी
पति-सेवा-धर्में ती पतिला सुखवी सदा गृहामाजी ७
बंधु खरा कोण जनीं संकटकालींहि जो न दे पाट
बंधु न ते करिती जे गृहकलहाचा घडा सदा पाठ ८
सुलभ कोण सुरेसम भुवनीं पंडितवरादिकां लोकां
पुत्रस्नेह पहा हा मोही धनिका तसाचि निर्धनिका ९
असुनी जिवंतहि जनीं मृततुल्यचि कोणकोण ते पाहीं
व्याधिग्रस्त अकिंचन असमंजस पांथ आणि सेवकही १०

काव्यरत्नावलीस कविता सखीकडून संक्रांतीचे

# शर्करायुक्त तीळ.

( बळवंतराव कमलाकर )

## आर्या.

बाई ! रत्नावलि, मी किति तरि उपकार आठवूं तुझे
असमर्थ फेडण्यातें मी , म्हणुनि सलज्ज होय मन माझें १
अल्पवयांतचि मजला मज्जनकें त्या मुकुंदरायानें
वेदांत शिकविला जो झालें वैराग्यशील मी तेणें २
हळुहळु होतां मोठी साधु तुकोबादिकीं मला कांहीं
दाखविला भक्तीचा मार्ग, किती गोड सांगु तो बाई ! ३
यौवनदशेस माझ्या झाला आरंभ तरि मला नव्हतें
ठावें कांहीं बाई ! सांसारिक वृत्त. गे ! खर वदतें ४
वामनमोरोपंतादिक कविंनीं शिकविलें मला गे ! तें
व्यवहारयोग्य तेणें झालें मी कांहिंशी असें गमतें ५
नव्हतें अवडत जें जें सांसारिक विषय पूर्वि त्यावरतीं
मन जाउं लागलें मग जडली तेथेंहि कामना पुरती ६
सांप्रतच्या कविंनीं तर मजला केवळ विलासिनी केलें
वैराग्यशील असतां न कळे बाई !, अशी कशी झालें ७
झाला अशांत कांहीं परिचय यूरोपजेसवें जव्हां
तीणें प्रेमें कांहीं तिजसम पोपाख मज दिला तेव्हां ८
सांप्रतचे कवि माझे भुलले आहेत तीजला फार
तरि करिती मजवरही ममता तैसे अनेक उपकार ९

---

१ इंग्रजी भाषा.

पडलें होतें त्यांच्या आजवरी मी कशी तरी गेहीं
त्यांच्याविण इतर मला नव्हते जन अन्य गे ! विचारितही १०
ग्रंथोत्तेजक मंडळि तरि मज देईल आश्रया म्हणुनी
गेलें तिच्याकडे तों हताश होवोनि परतलें सदनीं ११
गे ! सखि ! खरेंच वदतें ऐशा समयांत साह्य करुनि मला
धीर दिला त्वां केलें लोकीं विख्यात सर्व रसिकांला १२
ती दक्षिणा सभा गे ! जरि करिते लोभ धनाहि मज देते.
परि वर्षत्रयभारें मज बरोबरीं फिरविण्यास लावीते १३
काय असें कामाचें धन तें मजला नको नको बाई !
येतांच करिशि आदर तूं ह्याची सखि न होय उतराई १४
निजवृत्त हेंच तिळगुळ संक्रांतिनिमित्त देतसें तुजला
प्रेमें स्वीकारुनि हें बोलावें गोड ! ठेवि लोभ मला ! १५

---

# सुभाषित

(वामन दाजी ओक)

## आर्या

विधु चंद्रिकाप्रसारें सिद्ध असे सुखविण्या चकोरांला
परि दुर्दैवें वारिद अडविति येवोनि आड ते त्याला १
जलकण हि अब्धिचा ज्या तृषित नरांच्या मुखीं पडे न कधीं
त्याला नदीनें[१] ऐसें, हा ! हा ! म्हणती किमर्थ अज्ञ सुधी २

---

१ नदीचा स्वामी.

## जाहिरातींचे दर

आठ ओळींपर्यंत एक रुपया. या मानानेंच पुढें आकार पडेल. अ-क्षय राहणाऱ्या जाहिरातीबद्दल वेगळा ठराव केला जाईल.

प्रकाशक काव्यरत्नावली

जळगांव खानदेश

## जाहिरात

श्रीमंत सौभाग्यवती कमाबाई साहेब राजे शिरके यांच्या आश्रया खालीं.

कामिनी प्रकाश" या नांवाचें डेमी द्वादशपत्रीं, जें बालवृद्धांस उपयुक्त असें मासिक पुस्तक लौकरच निघणार आहे. वर्षाची आगाऊ वर्गणी एप्रिल अखेरपर्यंत टपालखर्चासह फक्त १ रुपया ११ आणे ठेविली आहे.

विशेष माहिती खालील पत्त्यावर पत्रद्वारें विचारा.

म्यानेजर कामिनी प्रकाश, ठिकाणा फाकलंड रोड पोष्ट भाय-खळा, मुंबई.

प्रसिद्ध करणार

कृष्णाबाई

फारच स्वस्त!!!

# जाहिरात.

# काव्यरत्नावली.

प्रस्तुत मासिक पुस्तक १८८७ च्या जून महिन्यापासून सुरू झालें आहे. आजपर्यंत पुष्कळ प्रकारचे विषय प्रसिद्ध झाले आहेत. यांत आलीकडील नामांकित कवींचीं काव्यें प्रसिद्ध होतात. ही रत्नावली अनेक कवींकडून गुंफली जात असल्यामुळें काल्पनिक, ऐतिहासिक, पौराणिक, संस्कृत व इंग्लिश काव्यांचीं भाषांतरें वगैरे अनेक कविता प्रसिद्ध होतात. उत्तरोत्तर नवीन कवि जास्त मिळत आहेत.

नवीन काव्यरचना करून देणाऱ्या कवींचीं काव्यें तपासण्याचें काम काव्यपरीक्षक ] मंडळीनें पत्करिलें आहे.

रा॰ रा॰ लक्ष्मण रामचंद्र वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी.

रा॰ रा॰ जनार्दन बाळाजी मोडक बी. ए.

रा॰ रा॰ वामन दाजी ओक.

रा॰ रा॰ वासुदेव वामन शास्त्री खरे.

रा॰ रा॰ गणेश बळवंत मोडक.

या सांचाचीं प्रतिमासास २४ पृष्टें प्रसिद्ध होतात. टपालखर्चासुद्धां फक्त दीड रुपया किंमत ठेविली आहे. मागाहूनचा दर मुळींच नाहीं. दुसरा अंक पोंचतांच वर्गणी आली पाहिजे.

पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

नारायण नरसिंह

जळगांव -- खान्देश

# काव्यरत्नावली.

( मासिक पुस्तक )

पुस्तक २ रें.] फेब्रुवारी सन १८८९ [अंक २१ वा.

तएव पदविन्यासास्ताएवार्थविभूतयः ।
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथन कौशलात् ॥



जळगांव—खान्देश येथें
छापून प्रसिद्ध होतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हशिलासुद्धां दीड रुपया.

मुंबई "सुबोधप्रकाश" प्रेस.

## अनुक्रमणिका.

तुकोजीराव होळकर .... .... .... ... ... ... १
ईशदर्शन काव्य ... ... ... ... ... ... ... ५
मुक्तांजली ... ... ... ... ... ... ... ८
खऱ्या प्रेमाची खूण ... ... ... ... ... ... ९
स्त्रीरत्न ... .... .... .... .... .... .... .... १०
अर्थसादृश्य ... ... ... ... ... ... ... ११
भट्टवंश काव्य* ... ... ... ... ... ... ... २७

* ह्या काव्याचा पृष्ठानुक्रम निराळा आहे.

# जाहिराती.

**श्रीधरकृत पांडवप्रताप किंमत ४ रु. ट. ह. ८१४.**

**श्रीधरकृत रामविजय किंमत ३ ट. ह. ८१४.**

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, थोडें बहुत शिकलेल्या लोकांस व स्त्रियांसही वरील दोन्ही ग्रंथ वाचण्याची उत्कंठा होत असते. परंतु ग्रंथांत शब्द वेगळे वेगळे नसल्यामुळें कोठें कोठें अर्थाचा अनर्थही होतो. असा अनर्थ न व्हावा ह्मणून शब्द वेगळे वेगळे तोडून आणि कठीण शब्दांवर अर्थ बोधक टीपा देऊन ते ग्रंथ आह्मी मोठ्या टाइपांनीं जाड्या कागदावर सुंदर चित्रांसह छापिले आहेत. हे ग्रंथ आपल्या घरांत फार वर्षे रहावे व वाचतांना डोळ्यांस त्रास पडूं नये व अर्थही चांगला समजावा अशी इच्छा असेल त्यांनीं हे ग्रंथ घ्यावे ह्मणजे त्यांस फार सोईवार पडतील. ज्या कोणास नमुना पाहणें असेल त्यांनीं आह्मांस पत्र पाठविलें असतां पाठवितां येईल.

# काव्यरत्नावली.

## अंक २१ वा.

## *तुकोजीराव होळकर.

### (गणेश बळवंत मोडक.)

श्लोक.

जें नंदनीं[1] सुख पिके चिर देवलोकीं,
तें भूवरी भरतखंडि[2] मिळे विलोकीं ;
तल्लालसा[3] धरुनियां परदेशवासी
अन्नार्थ धांवति नृपा ! जणुं सूपर्वासी ! १.

व्यासादिकीं वरिलि संस्कृतवाक्[5] समस्त,
तन्मांडितीं नृपजनीं नचि हो तद्ध्वस्त[6] !
कीं पुण्यभूमि[7] ह्मणती इसें आर्य सर्व,
आर्यार्भकीं[8] मग न कां वसु हाचि गर्व ? २.

विद्या, कला, कुशलता, वसुं[9], दिव्यरत्नें,
जेथें विहार करितात सुखें सुयत्नें ;
ते व्यापिली परजनीं नवखंडभूमी[10],
सीता दशाननगृहीं करि घोष रामीं ! ३.

भूपांत भर्तृहरि सद्गुणसिंधु वाटे,
यद्गुणनीं बुधजनीं मुद[11] फार दाटे ;
बाजीकुळीं प्रथम बाजि[12] अतुल्य वीर,
शास्त्रज्ञ[13] भीष्म वितरी प्रकृतीस[14] धीर ! ४.

---

* श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर हे तारीख १७ जून सन १८८६ इसवी रोजीं कैलासवासी झाले. यांविषयीं हा स्मरणलेख आहे.

१. नंदनवनांत. २. हिंदुस्थानांत. ३. त्याची इच्छा. ४. भुकेले. ५. भाषा. ६. तिचा ऱ्हास. ७. ज्या हिंदुस्थानास. ८. आर्यलोकांचीं मुलें, ( हिंदुस्थानांतील लोक. ) ९. सोनें वगैरे धातु. १०. हिंदुस्थान. ११. आनंद. १२. बाजीराव बल्लाळ पेशवे. १३. युद्धकलानिष्णात. १४. प्रजा व प्रधान मंडळी.

शोभे तयांसम जगीं नृप इंदुराचा,
जो पालनार्थ अवतार पुरंदराचा;[1]
यन्मानसीं रुचि विशाल गुणार्थ साजे,
तन्नाम उज्वलें[2] न कां अवनींत[3] गाजे ? ५

कीं होय पुस्तक पवित्र तरंगिणी[4] ते
यत्तोयसेवन समस्त मळा हरीते ?
विद्याक्षर प्रकट होय मनांत ज्याच्या,
तीचा प्रभाव[5] विलसे प्रकृतींत त्याच्या. ६.

स्वयंभू ज्ञानानें नृपहृदय संपूर्ण विलसे,
कला नानाविद्या—नवगुणसहस्रीं भरें दिसे;
नृपन्यायें[6] कोटिक्रमनिपुण[7] नैय्यायिक[8] रमे,
रसें झाला भुंगा लुलित मग तो काय विरमे ? ७.

जया• ये भेटाया अभिमत[9] सुवैय्याकरण[10] जो,
नृपालोंपीं[11] माझें मन बहु ह्मणे नित्याचि रिजो;
किती तत्वज्ञानें नृपहृदय वेदांत शिकलें ?
तसें तें काव्यानें अनुपमगुणें क्षिप्र उकले ! ८.

परीक्षा करी नित्य मीमांसकांचि,[12]
क्षणें तेंवि आकाशविज्ज्योतिष्यांची;[13]
नृपें स्थापिल्या राजनीतिप्रकाशें
नृपां अन्य आवेश ये सावकाशें. ९.

---

१. इंद्राचा. २. प्रकाशित, प्रसिद्ध. ३. जगांत. ४., नदी. ५. विपुलता, माहिती. ६. राजाच्या न्यायशास्त्रावरील भाषणानें. ७. वादविवादांत प्रवीण. ८. न्यायशास्त्री. ९. पाहिजे तो. १० व्याकरणशास्त्र जाणणारा. ११. राजाच्या भाषणांत. १२. मीमांसाशास्त्र जाणणारे. १३. खगोलशास्त्री यांची.

गीर्वाणशास्त्रज्ञर जाणुनि लोकपत्री
गीर्वाणवाक्पटु समस्त करीति मैत्री,
सौरस्यपानें करि निर्मळ सर्वकाळ,
कीं काव्यमानससरीं विलसे मराळ ! १०.

रसालाचा वृक्ष प्रणत बहु होतो फलभरें,
नृपालाच्या अंगीं विनयगुणसौजन्य उतरे ;
अहा ! ज्याच्या गोत्रीं[10] निपजलि अहल्या स्तुतमती,
तिच्या पुत्रीं पौत्रीं मग कुठुनि ऐश्वर्य कमती ? ११.

स्वदेशाभिमानी नसे अन्य भूप
असा, लोककल्याण साधी अमूप ;
सदा आश्रयो दे स्वदेशाभिमान्या,
गुणींच्या गुणीं कर्णतो[12] दावि धन्या ! १२.

तुझी वृत्ति संतोषशांतींत पोहे,
गृहीं देवभक्तींत ती नित्य राहे ;
खरी योग्यता जाणतां सेवकांची[13],
उपेक्षा न केली कधीं त्वां तयांची ! १३.

वृथा गर्वभारा न डोईं वहावें,
तुवां लोभपूर्णे[14] प्रजेतें पहावें ;
मनें वर्तनें आपुल्या आदरावें
[15]सुविद्यां जनां वंदनीयां लवावें. १४.

---

१. संस्कृत भाषेतील शास्त्रास जाणणारा ( ज्ञरा ). २. लोक हेच हंसपक्षी ३. संस्कृत बोलणारे पटाईत. ४. गद्यपद्यांतील गोडी पाहणारा रसिक. ५. काव्यरूपी मानस सरोवर. ६. हंसपक्षी. ७. आंब्याचा. ८. नम्रपणा. ९. भलेपण. १०. कुळांत. ११. जिची बुद्धि लोकांनीं वाखाणिली आहे. १२. उदारपणा. १३. राज्यांतील कामगार मंडळीची. १४. मायेनें. १५, विद्वान्.

कारुण्यभक्तिविनयान्वित भाषणांनीं,
झाला सुवंद्य गुरु. पूज्य अशा गुणांनीं,
जो साधु निर्मळ परोपकृतिप्रभाव,
त्या ठेविलासि यशवंतिं अनन्यभाव. १५.
त्वां जाणिलें अनुभवें कृषिमूल्य साचें,
संसारजीवितदशेसि कृषीवलांचे,
होतां अवर्षण महीवरि पाहुनीयां !
हेलावलासि करुणार्णव होउनीयां ! १६.
तुवां राजभक्ती मनानें करावी,
खऱ्या नीतिची वाट लोकीं धरावी;
कुळाचा खरा मान तूं राखियेला,
स्वहेतु प्रयत्नें नयें साधियेला १७.
तूं वाहिली कळकळ प्रभु ! जी सदैव,
आह्मांस ठाउकि असे अमुचें सुदैव !
वंदूं तुला नमवुनी विनयें स्वपाणी
वाखाणितां तव गुणौघ पुरे न वाणी; १८.
त्वदौदार्या, श्रद्धे, विनयनयसंयुक्त चरितां,
विलोकोनि स्वांतां तव कुजनवादार्थ विरतां;
क्षमाशीला वृत्ति, प्रकटित दया, बुद्धि महती
स्वधर्मी सद्धर्मी; तुज बुध असें थोर ह्मणती। १९
पंचत्व ये वपुस हा जडवस्तु धर्म,
आत्मा असे अमर, हें परि मुख्य मर्म;

---

१ यशवंतरावमहाराज देवमामलेदार. २ शेतीची योग्यता. ३ शेतकरी यांचे. ४ महाराणी विक्टोरिया इजविषयीं निष्ठा. ५ नीतीनें ६ काळजी ७ नम्रपणानें ८ आपले दोन्हीहात. ९. नम्रपणानें, व नीतीनें सांगितलेल्या मार्गानें धरिलेली वर्तणूक. १०. मनाला. ११ नास्तिकादिकांच्या वाईट वादास न लागणारें मन १२ मोठी. १३ मरण.

तूं भाससी तव सुतीं सकलांस सांगें, ××
भूवंद्य पूज्य सुसनातन वेद सांगे, २०
गेलासि भू[1] त्यजुनि विष्णुपदीं[2] सुखांत,
त्वत्कीर्तिपुण्य फिरतें भुवनत्रयांत !
केल्या तुझें स्मरण या भुवनांत कोणीं,
येतें सदा खळखळां नयनांस पाणी ! २१
वियोगानें पुष्टिप्रद जलझराच्या सुमलता[3],
प्रजा तेंवी घेई बिकट अनिवार्या विकलता[4] !
जनीं सेवा[5]मग्नीं प्रकट, परि आनंद विनतीं[6]
तुझ्या पुत्रीं होवो द्विगुणित नृपा ! हेंचि विनती. २२

---

# ईशदर्शन काव्य.

## गुच्छ ४ था.

### ( विष्णू गणेश नेने. )

### श्लोक.

शिरोभागांतूनी घन[7]तरुलतायुक्त गिरिचे
झरे येती खालीं पळति जणु कीं देह[8] फणिं[9]चे
अशा सौंदर्याचें कथन करितांना सुकविही
ह्मणे " वर्णाया हें सकल मति माझी क्षम[10] नही " १.

---

× × मूर्तिमंत-प्रत्यक्ष, " आत्मा वै पुत्र नामाऽस्ति, " हें वेदवाक्य आहे. पित्याचा आत्माच पुत्ररूपानें जन्म घेतो, असा गर्भितार्थ.

१ इहलोक. २ स्वर्गात. ३. फुलांची वेली. ४. अवकळा, निस्तेजता. ५. मनापासून जे नौकरी करितात त्यांच्या ठिकाणीं. ६. नम्र जे त्यांस. ७ दाट अशा झाडांनीं आणि वेलींनीं युक्त. ८ शरीरें ९ सर्पाचीं १० समर्थ.

गिरी कांहीं स्थानीं असति चढण्या फार कठिण
असे कीं थोडीही सरळ न जयांना उतरण
अशाही शैलांच्या शिखरिं नर जाऊनि बसतो
अशीं मोठीं कार्यें नर मतिबळें नित्य करितो २.
गिरी जो निःशंक प्रबल जडसृष्टींत रुचिर
तसा जीवसृष्टिप्रमुख नर जो फार चतुर
तयां दोघांना जो सतत करि उत्पन्न सहज
कशी त्याची बुद्धी बल सकल जाणेल मनुज ३.
फळांनीं पुष्पांनीं सुभग विहगांनीं परिवृत
तरू मोठे नानाविध असनि जेथें अगणित
मनुष्याचें जेथें कधिंहि न दिसे एकहि घर
वनें ऐसीं लक्षावधि असति मोठीं महिवर ४.
वनीं ऐशा झाडी अतिशय असे किर्र जिकडे
पशू सिंहव्याघ्रप्रमुख असती हिंस्र तिकडे
असे कीं यद्घोरध्वनितसमयीं गर्भपतन ५.
करी धेनू तैसें नरहृदयही जाय भिउन
बिळें मोठीं तेथें करुनि तरुमूलांत बहुत
रहाती नागादी विषमय महा जंतु अमित
असे कीं फूत्कारें करुनि अपुल्या जे अकरुण
क्षणामध्यें एका करिति मनुजप्राणहरण ६.
वनीं कोठें कोठें असति उदकाचे बहु झरे
जयांतील स्वादू विमल जल केव्हांहि न सरे
मनुष्याचें तेथें मन रमतसे फार अखिल
रमे रम्यस्थानीं नरमन तयीं काय नवल ७.
तपस्वी भस्मालंकरण करुनीयां तनुवरी

---

१ निर्जीव सृष्टींत २ सजीव सृष्टींतला मुख्य ३ युक्त ४ रानीं ५ ज्याच्या घोर-गर्जनेच्या वेळीं ६ गाभ टाकणें ७ सुस्कान्यानें ८ निर्दय ९ रुचकर १० भस्म हाच दागीना.

जटा चक्राकारा[1] बहुत करुनी धारण शिरीं
तरूंच्या वल्कांचीं[2] रुचिर वसनें[3] नित्य करुनी
करी चित्तस्थैर्यें[4] तप बहु अशा घोर विपिनीं ८.
ध्रुवश्रीवाल्मीकिप्रमुखऋषिंनीं याच विपिनीं[5]
फळीं मूळीं कंदीं विमल सलिलें[6] देह धरुनी
करुनीयां नानाविध बहुतपस्यां[7] शुभकरी
उभा केला कालें करुनि अपुल्या सन्मुख हरी ९.
वनीं नाना वृक्षांवरि असति पक्षी अगणित
तयांमध्यें कांहीं सुभग[8] नयनां मात्र बहुत
न शोभा कांहींनां परि करिति ते शब्द मधुर
कितीकांनां शक्तीविण गुण न कांहीं हि इतर १०.
क्वचित् पक्षी स्वर्णासम तनुशिरोभागीं[9] पिंवळा
नभाच्या[10] तो रंगासम सकल मध्यामधिं निळा
प्रभातींच्या बालद्युमणिसम[11] मूळांत अरुणें[12]
प्रभूर्वाणें नान्या रुचिरजगदुत्पादनगुण[13] ११.
मयूरादी पक्षी मृदुतनु मनोवेधक किति
पिसाऱ्यांचे त्यांच्या अनुपम किती रंग असती
गुणज्ञा शिल्प्याला श्रम करुनि आयुष्यभरही
असे रंग प्रायः कधिं न करितां येतिल गृहीं १२.
मनुष्याच्या नेत्रा सुखकर असें रूप रुचिर
तयाच्या कर्णाला सुखकर असा शब्द मधुर
निसर्गानें[14] ऐसे अनुपम महा दोनाहि गुण
शुकादी कांहींशा विरळ खगिं येताति दिसुन १३.

1 चाकासारख्या वाटोळ्या 2 सालींची 3 वस्त्रें 4 चित्ताच्या स्थिरतेनें. 5 वनांत 6 पाण्यानें 7 तप 8 सुभग 9 सोन्यासारखे शरीराच्या वरल्याभागीं 10 आकाशाच्या 11 बाल सूर्यप्रमाणें 12 तांबडा 13 सुंदर जग उत्पन्न करायाचा गुण. 14 स्वतःसिद्ध.

तनूनें शक्तीनें खचित खग जो क्षुल्लक दिसे
जयांमध्यें ज्ञानांकुरलव निसर्गेंच न वसे
किती कंठीं त्याच्या श्रवणहर माधुर्य असतें
अहाहा विश्वेशा अतुल तव चातुर्य दिसतें १४.
प्रभातीं गाणारा खग जंव सुखें गायन करी
मनामध्यें येती फिरुनि फिरुनी सौख्य लहरी
बघूं जातां त्यातें परि बहुत दुर्दर्शन दिसे
स्वरूपाभावीं तो अनुपमगुणालंकृत असे. १६.

---

# मुक्तांजली.

( एकनाथ गणेश भांडारे. )

## मृतशय्या.

We watch'd her breathing thro' the night.
T. Hood.

### श्लोक.

सारी रात्र तिच्यासमीप बसलों होतों अह्मी जागत !
श्वासोच्छ्वास तिचा मृदू हळु हळू होता जयीं चालत !
तेणें ती उघडून नेत्रयुगुलें होती पुन्हां झांकित ।
ऊर्ध्वें तद्हृदयास थोर तिडका होत्या जणों लागत ? १.
'होवोनी परि ती बरी लवकरी ऐशा प्रसंगांतुनी !
लागावें धरणीस पाउल तिचें ! आनंद तोची मनीं—
आम्ही मानुं ;' ह्मणून सर्व बसलों होतों मुके होऊनी !
नाहीं श्वासहि सोडिला घरभरीं त्या चालतांना कुणीं ! २.

---

१ कर्णेंद्रियाचें हरणकरणारें २ कुरूप ३ स्वरूपाऐवजीं ४ अतुल गुणानें युक्त.

आह्मां आस तिची खरोखर मनीं होती बहू सर्वथा !
भावी चिंतित कल्पनांहिं तिजला केलें परी अन्यथा !
जेव्हां झांकुन लोचनें पहुडली शय्येवरी सुंदरी !
गेला प्राण तिचा अह्मां समजलें तेव्हांच लोकांतरीं ! ३.
जातां, कारण, जों निशा सरुनि तों आली उषा सत्वरीं
आह्मां निष्प्रभ, शून्य, धूसर, अशी ती भासली अंतरीं !
झाडें, पर्वत, गोपुरें हि सरिता झांकी धुकें अंबरीं !
येतो बारिक थांबुनी झिमझिमा तैं पावसाच्या सरी ! ४.
वामांगानयनांग तत् सकलही त्या पापण्या झांकिती !
ज्यांची शांत सुरेख कोमल अशी आहे निसर्गाकृती !
आह्मी धूसर जी प्रभात बघतों सध्यां उदासें मनें !
त्यापूर्वीं दुसरी उषा बघितली स्वर्गीं असावी तिनें ! ५.

---

# खऱ्या प्रेमाची खूण !

If I should die before you, love !

Battersby.

दिंड्या.

तुझ्या आधीं जर मरण मला आलें !
बाष्पसलिलें करशील वस्त्र ओलें !
नको परि गे! तूं शोक करूं फार!
तयानें कीं फाटेल तुझा ऊर ! १.
शोक सरितेला पूर तुझ्या आला !
गिळुन टाकीं तर सत्वरीं तयाला !
मनीं ह्मण तूं " मी आपल्या प्रियातें
शून्य मंदिरिं या रडत आठवीतें " २.

चिता माझी रचतील सखे! जेथें !
मोगऱ्याचें तूं झाड लाव तेथें !
तुझ्या गोंडस सुकुमार ह्या करांनीं
वाढवी तूं घालून तया पाणी ३.
आणि ह्मण कीं ' मत्प्राणसख्याला हीं
मोगऱ्याचीं कळिदार फुलें बाई !
मनापासुन अति आवडतीं होतीं!
निगा करितें मी ह्मणुन तयांची ती '! ४.
वसंताचा येतांच तो बहार
हर्ष होतो मजलागिं सखे! फार!
सर्व धरणी तरुलतापल्लवांनीं
होय हिरवी; वर खुलत वनश्रींनीं ! ५.
जिथें होइल मम देह भस्म बाळे !
तिथें जाई तेधवां तूं रसाळे !
ऐक माझ्या तूं एक विनंतीतें !
नको जाऊं गे ! साश्रु परी तेथें ! ६.
फुलें जर तूं बघशील फुललि खाशीं !
वदत राहीं तर तूंच आपल्याशीं !
' प्रेम अझुनी मजवरी वसे त्याचें !
असे प्रत्यंतर मोगरा तयाचें ! ' ७.

## स्त्रीरत्न.

She is my own.
Shakspeare.

### श्लोक.

ही माझी शशिवदना असे स्वताची !
यद्रूपाप्रति रति लाजते स्मराची !

हें माझें मज नवरत्न लाधल्यानें !
वाटे मद्गृह परिपूर्ण इंदिरेनें ! १.
पीयूषापरि सुरसत्व यज्जलाचें !
ज्यामाजीं गिरिवर वृंद कांचनाचे !
मोत्यांची अभिनव वालुका जयाची !
ज्यामाजी अगणित मिश्रणें हिऱ्यांचीं ! २.
ह्या साऱ्या जलनिधिचेंच निंबलोण !
टाकावें करून सखे ! तुझ्यावरून ।
त्वल्लाभें प्रमुदित होउनी अतां मी !
त्वत्संगें चिरसुख भोगिन स्वधामीं । ३.

---

# अर्थसादृश्य.

## ( दंडीकृत. )

### श्लोक.

सृजति तावदशेषगुणाकरं
पुरुषरत्नमलंकरणं भुवः
तदपि तत्क्षणभंगिकरोति चेत्
अहह ! कष्टमपंडितता विधेः १.

भर्तृहरि.

### भाषांतर ( श्लोक. )

पृथ्वीस भूषण तसा गुणरत्नयुक्त
निर्मी विधी पुरुषपुंगव तो जगांत
अल्पायुषी तरि तयास करी पहा हा !
भ्रांती पडे कशि अशी विधिशी अहा ! हा !

The good die first and they whose hearts are dry as summerdust burn to the socket.

WORDSWRTHE.
EXCURSION.

### श्लोक.

धन्या सा गृहदेहली स्पृशति या त्वत्पादपद्मप्रभां
जाता सा सरसीरसाद्विशति सा यस्यां विहारेच्छया
वंद्यःकोऽपि सएव यः खलु तया नेत्रेण संभाव्यते
धिग्धिग्वेधसमेषु मां यदनयन्नैकं कथांचित्कथम् २

### भाषांतर ( श्लोक ).

तीचे लागति पाय देवडिस ज्या ती धन्य वाटे मला
तैसी पुष्करणी जिथें करि जलक्रीडा मुदें कोमला
वाटे वंद्य जगांत तोच नर, ती प्रेमें निरीक्षी जया;
केलें यांतिल एकही न मजला, धिक्कार! या धातया

See how she leans her cheek upon her hand? O that I were a glove upon that hand that I might touch that cheek.

SHAKSPEARE
ROMEO & JULIT.

### श्लोक.

मर्य येभ्योजाताश्चिरपरिगता एव खलु ते
समं यै संवृद्धाः स्मृतिविषयतां तेऽपि गमिताः
इदानी मेतेस्म प्रतिदिवसमापन्नपतना
गता तुल्यावस्था सिकतिलनदीतीरतरुभिः ३ भर्तृहरी.

### भाषांतर ( श्लोक )

पिता माता गेले बहुत दिवसांपूर्वि मरुनी
तसे गेले बाल्यांतिल सकलही मित्र निधनीं
नदीतीरीं जैसे जरठ वसती पादप अहो!
तसें कंठीतों हे दिवस अति कष्टेंकरुनि हो!

I have had playmates, I have had companions, In my days of childhood, In my joyful school days, All all are gone.

The old familiar faces.

* * * * *

How many they have died
and some they have left me,
and some are taken from me,
all are departed;
all all are gone, the old familiar faces.

( C. LAMB. )

साह्यार्थ जातों तरि मी न चित्र
आहे निजाम क्षणमात्र मित्र
शाहाजता तुल्याचि तो अनीय
दोघेहि मातें असती प्रतीय ५.

आधीं समाचार शहाजताचा
घेऊनि घेऊं मग मोंगलाचा
ऐसा करी निश्चय विप्र बाटे
शाहाजताची धरि नीट वाट ६.

ज्या मंत्र **बाजी** शिकवी शके तो
कृष्णा ह्मणाया चिप वीशकेतो
**आपा** तसा शिक्षित **बाजि**पाशीं
योजी पहा युक्ति सुरेख खासी ७

गेला निजामाप्रति तो न आधीं
**शाहाजता**ची हुत भेट साधी
तो त्या पुसे कोण तुह्मी कथावें
**आपा** मनीं काय ह्मणे वदावें ८.

मिथ्योक्ति शत्रूसि नव्हेच पाप
मिथ्या वदाया न मना चपाप
स्वार्थार्थ मिथ्या मनुजें कथावें
नीती असे शत्रुजना मथावें ९.

---

१ निजामाची मैत्री क्षणभरच असणार यांत आश्चर्य नाहीं तो कपटीच आहे इत्यर्थ २ स्वभावाचे हलके ३ फसवावयास योग्य ४ निजामाचा ५ लबाड–कारस्थानीं विप्र–चिमाजी आप्पा ६ ज्या मनुष्यास बाजीराव मसलतींत तयार करील तो कृष्णासारख्या मसलती मनुष्यास ही, हे वीशकेतो, गरुडध्वजा कृष्णा तूं चिप उगीच बैस असें म्हणेल ७ अरे कृष्णा वी ईश–केतो–वी–पक्षी–ईश–श्रेष्ठ–पक्षिश्रेष्ठ जो गरुड तो ध्वजावर ज्याचा–हे गरुडध्वजा ८ लवकर.

आपा वदे सस्मित बाजिराव
ज्याचें असे ख्यात जगांत नांव
शाहू प्रधान द्विज एक निष्ठ
त्याचा असे सोदर[1] मी कनिष्ठ १०.

बंधुद्वयातें कधिं एकचित्त
होऊन देतें पितृदत्त वित्त[2]
प्राधान्य[3] आल्यावरि वत्सरानें[4]
वागेचि तो मत्सह मत्सरानें ११.
*बंधूसि मी आवडता असेन
भेटीस आलों तुमच्या ससेन
ठेवाल राहीन करीन काम
शत्रूंसि मारून वरीन धाम १२.
जाणे न तत्भाषणतत्व[5] खान[6]
त्या पंडिता[7] ठेवि करोनि मान
कीं त्या[8] चमू वाढाविणें अवश्य
होतें, कराया विजया[9] स्ववश्य १३.
एके दिनीं सर्वहि उष्णतप्त
वृक्षातळीं जागृत कोणि सुप्त

१ सख्खा भाऊ २ वडिलार्जित धन मान इत्यादि ३ प्रधानत्व मिळाल्यावर ४ वर्षानें ५ चिमाजीच्या भाषणाचा खरा अर्थ ६ शहाजतखान ७ चिमाजीस ८ खानास ९ विजय आपल्यास वश्य व्हावा म्हणून-निजामावर आपली खाचिती फत्ते व्हावी म्हणून खानास सैन्य वाढविण्याची अवश्यकताच होती म्हणून त्याणें आपा साहेबांस ठेविलें.

* मीं बंधूस आवडता न असें म्हणून तुमचे भेटीस आलों, मला ठेवाल तर तुमचें काम करीन, शत्रूंस मारून तेज राखीन, हा उघड अर्थ—जर मी बंधूस आवडता असेन आणि सैन्यासह तुम्हांकडे आलों असेन आणि जर मला ठेवाल तर तुमचें काम करीन—काढीन तुह्मांस मारीन कारण आपल्या शत्रूंस मारून आपला प्रभाव वाढाविणें वीरांचें कर्तव्यच हा गुप्त अर्थ.

स्वस्थ स्वचित्तीं जन अव्यवस्थ
क्रीडा अनेका करिती वनस्थ १४.

लावी मुखा कोणि सलील हुक्का
स्वांगासि मर्दी जन कोणि बुक्का
मस्तानिचा[1] घे मधु खान मुक्का[2]
खाशी ह्मणे पंडित[3] वेळ लुक्का[4] १५.

सेनोसि संज्ञा करितांचि सारी
एकत्र झाली करुनी तयारी
म्लेंच्छांवरी ती पडली तुटोनी
जाग्यावरोनीहि न दे उठोनी १६.

भांबावले[5] ते सहसा अरिष्ट
कैसें उदेलें[6] ह्मणती गरिष्ट[7]
आतांच येथें नव्हते स्वशत्रू
हे आमुचे फोडिति कोण जत्रू[8] १७.

हें येतसें वृंदाचि[9] कीं पिशांचें[10]
हीं माणसें कीं असती पिशांचे[11]
अश्वादि शस्त्रादि समीप नाहीं
कैसें लढावें न सुचेचि कांहीं १८.

जाणोनियां दैवगतीस मस्त
तैसेहि[12] ते वातगती[13] समस्त
जाती पळोनी यवन स्वनाश
टाळावया जे निजजीवनाश[14] १९.

---

१ गोड २ मस्तानी ही शाहछत्रसाल यांची राख होती. ३ चिमाजी आपा ४ लबाड. ५ मुसलमान ६ उत्पन्न झालें ७ मोठें ८ मानेचीं हाडें ९ समुदाय १० वेडयांचें ११ भूतें १२ तैसेही म्हणजे अत्यंत मस्त असे ही यवन १३ वायुगती वाऱ्यासारखे १४ आपला जीव जगविण्याची आशा ज्यांस असे

[1]**द्रौणी** [2]निशीथीं तरि विप्र **आपा**
घाली पहा हा दिवसास छापा
लोभादिकां होति मनुष्य वश्य
दोषास देती स्थल ते अवश्य २०.

अन्या नरा दृ[3]ष्टिस ही अगम्या
**मस्तानि** नामें भुवनैकरम्या
[4]स्वःस्त्रीसही किंबहुना [5]सुनम्या
वेश्या असे **शाजत**खानें[6] गम्या २१.

नष्टाश्रया ती विषभक्षणास
इच्छी कराया जरि त्या क्षणास
येता लुटाया न **चिमाजि गोटँ**[7]
[8]घेती विषाचा तरि खास घोट २२.

कंटाळुनी जी बसली जनूलीं[9]
हस्तावरी ठेवुनियां हनूलीं[10]
दुःखी हि जी भासवि[11] ती तनूला
बाण स्मराचा लँगटें[12] धनूला २३.

[13]यत्कंचुकीबंधनिबद्ध एक
होता हिरा थोर, गमे मृगांक[14]
चोरावया तन्मुखकांति आला,
बांधोनि ठेवी स्वकरें तयाला २४.

---

१ अश्वत्थामा २ रात्रीं ३ इतर पुरुषांस दृष्टीनें ही अगम्या न दिसणारी. ४ अप्सरेसही ५ नमस्कारास योग्य जीचें रूप पाहून अप्सरांनीं माना वांकवाव्या ६ या सरदारानें ठेवलेली ७ शाहाजतखानाचा गोट–शिबिर ८ घेत होती ९ जन्मास कंटाळलेली १० हनुवटीस ११ वाटवी–पाहणाऱ्यांस इत्यर्थ १२ ही स्त्री नव्हे मदनाचा बाणच आतां तो मदन धनुष्यावर आरूढ होऊन कोणावर तरी सुटतोच काय ? अत्यंत मोहकर्त्री इतकें तात्पर्य. १३ जिच्या चोळीच्या बंदानें बांधलेला १४ चंद्रच.

आपा पुसे तीस तिची अवस्था
पाहूनि जैसी हरिणी दवस्था
इच्छा तुझी काय वदें मला गे
तीही तदा स्फुंदत बोलुं लागे २५
खातें महाराज विषास हातें
गेला धनी पोशिल कोण मातें
स्वीकार माझा न जरी कराल
मातें न जो मृत्यु जगा कराल २६
आतां मला भोग न सौख्य देती
ऐसें बहू वारवधू वदे ती
वाक्यें जरी त्या पुरुषे द्रवावें
आपा मनीं तीस न ये शिवावें २७
ऐकूनि तद्वाक्य वदे **चिमाजी**
बुद्धि त्वदुक्तीस न घेचि माझी .
चिंता नको वाहुं परंतु कांहीं
हो स्वस्थ येथें भय लेश नाहीं २८.
माझ्यासवें भेट मेंदग्रजातें
सांगेन वृत्तांत समग्र ज्यांतें
वाटेल तें तो तुजला कथील
चिंता तुझी सर्वहि गे हरील २९.
स्त्रीरत्न ऐसें पडतां गळ्याला
लोकस्थितीच्या नर जो अळैयाला
संभाळितो धन्य न कां ह्मणावा
साध्वग्रणी कां न जगीं गणावा . ३०.

---

१ जो मृत्यु जगास कराल म्हणजे भयंकर दिसतो तो मला दिसत नाहीं- तुम्ही माझा अंगीकार केला नाहीं तर मी मरणार-२ वेश्या-मस्तानी. ३ तुझें भाषण माझी बुद्धि घेत नाहीं–तुझें म्हणणें कबूल करवत नाहीं ४ मत्-अग्रज माझ्या वडील बंधूस ५ ज्या बंधूस ६ लोकलज्जेच्या मर्यादेस ७ साधूंत श्रेष्ठ

रुक्मांगदे क्ष्माप गणेशभक्त
किंवा दुजा पंडित हा विरक्त
येतां परस्त्री शिवती न तीतें
हे मात्र सत्पात्र सदा नतीतें ३१.
शाहाजताची अवशिष्ट सेना
मस्तानि ही घेउनि तो सवें नां
आला निजामा जवळी चिमाजी
झाली ह्मणे चाकरि सर्व माझी ३२.
आधीं तुम्हांतें कळवूनि जावें
रोधी परी द्विट् कडवा स्वभावें
भंगोनि युद्धीं सहसा जयास
आलों कथायास तुह्मा जयास ३३.
देशीं नृपांदेश ससैन्य याया
द्यावें निरोपासि ह्मणोनि जाया
भूपें पुनः साह्य तुह्मा करावें
तच्चित्त ऐसेंच तुह्मी धरावें ३४.
चिंताकुलस्वांत निजाम झाला
गेला जरी एक दुजा उदेला
शत्रू, ह्मणे युक्ति सुचे न कांहीं
युद्धासही संप्रति शक्ति नाहीं ३५.
तो दौलताबाद सुदुर्ग देश
जो साठ लक्षास उणा न लेश

---

१ या नांवाचा राजा या राजावर एक स्त्री कामुक झाली असतां त्यानें तीस झिडकारिलें ही फार सुंदर कथा गणेश पुराणांत आहे २ नमस्कारास पात्र. ३ नापुरुष तो चिमाजी ४ शत्रुशहाजतखान ५ ज्या शाहाजत खानास ६ विजयांस. फत्ते झालेली कळविण्यास ७ नृप–आदेश–शाहूचीआज्ञा ८ शाहू–प्रसंगीं पुनःतुम्हांस साह्य करील असें त्याचें चित्त धरावें ९चिंतेनें आकुल मन ज्याचें १० किल्ला.

आपास सर्वानुमतें निजाम
दे खर्च ही सर्व करूनि सीम ३६.
आपा खरा पंडित कीं महाधी
स्वारींत एक्या जय दोन साधी
केला खरा न्याय जगांत सिद्ध
एक क्रिया द्व्यर्थ करी प्रसिद्ध ३७.
आपा स्वदेशीं विजया वरून
बुंदेलखंडाहुनिही प्रधान
दोघेहि आले करिती जयाचे
वांटे, परी बंधु न ते धनाचे ३८.
सामान्य बंधू करिती धनाचे
वांटे, परी उन्नत जे मनाचे
वांटून उद्योगचि मात्र घेती
तत्प्राप्तलाभासि मिळून खाती ३९
आपा नमी जोडुनियां करांस
बाजीहि लावी अनुजा उरांस
आनंद मावे न मनीं जयांच्या
अन्योन्य गोष्टी करिती जयांच्या ४०
ह्यांचा प्रवासश्रम सर्व गेला
आपांमनानेंहि विचार केला
जी अप्सरांनीं रुचिरा स्तवावी
मस्तानि ती बंधुस भेटवावी ४१

---

१ सल्लाकरून २ मोठ्या बुद्धीचा ३ लोकांत प्रसिद्ध असलेला न्याय ४ बाजीराव ५ अमक्यावर मीं जय मिळवितों अमक्यावर मीं मिळवितो असे जयमात्र त्यानीं वांटून घेतलेले पण राज्य वांटून घेतलें नाहीं ६ मोठे ७ उद्योगाचे मात्र हिस्से करितात द्रव्याचे करीत नाहींत. थोर मनुष्यांस आपलें नांव व्हावें अशी इच्छा असते पण पैसा मिळवावा असें फारसें वाटत नाहीं ८ धाकट्या बंधूस ९ विजयांच्या १० चिमाजी आपाच्या मनानें.

## मालिनी

सुखकरसमयीं त[1]न्मालिनीवृत्त कां न
कवि कथुनि करी हो मौ[2]लिनीवृत्त कान
हृदय स[3]हृदयांचें तृप्त, कीं अन्य कांहीं
मधुरतर ग[4]मेसें याहुनी वृ[5]त्त नाहीं ४२.
ऋतु रुचिर तशांत प्राप्त झाला **वसंत**
वदति निजमनातें ज्यां[7]मधें लाव संत
विषयरुचिस जिंव्हा, कां बरें लोक अन्य
ह्मणति न विषयातें सेवुनी होउं धन्य ४३.
सु[8]मसुरभिमिषांनीं हास्य वी[9]रुत्कटाक्ष
रचिति, न[10]वदलांनीं होति आर[11]क्त वृक्ष
जडहि ऋतुमधें या उन्[12]मदत्वास दावी
मग किति दुर[13]वस्था चेत[14]नांची वदावी ४४.
भ्रमरनिकर होती गुं[15]ग गुंजारवांत
मल[16]यें शिशिर वाहे वात तो गंधयुक्त
विधृ[18]तमणि तृणाग्रा भासवी हैम[19] बिंदू
उठवि करसमूहें रात्रि कामास इंदु ४५

---

१ त्या मालिनीचें- मस्तानीचें. वृत्त २ मालिनी नावचें वृत्त छंद ३ चतुरजनाचे कान आणि हृदय- मस्तानीचें वृत्तानें ह्रदय आणि मालिनी छंदानें कान. ४ वाटेलसें ५ वृत्तांत आणि छंद ६ वसंतांत ७ जिभेस विषयाची रुचि घेण्यास लाव असें साधूही आपल्या मनास ह्मणती ८ फुलें आणि सुगंध यांच्या मिषानें- हास्याच्या ठिकाणीं उमललेलें फूल आणि कटाक्षाचे ठिकाणीं सुगंध समजावा ९ वेली १० नव्या फुटलेल्या पालवींच्या रूपानें ११ तांबडे पक्षीं कामुक १२ मादकत्वास १३ दुःखप्रदअवस्था १४ प्राण्यांची १५ दंग १६ मलपर्वतावरचा थंड १७ मजेदार १८ धारण केलें आहेत मोती वगैरे मणी ज्यांनीं १९ धुक्याचे थेंब गवताच्या शेंड्यावर पडलेले धुक्याचे थेंब मोत्यासारखे दिसत होते इत्यर्थ.

निरखुनि कुतुकें स्त्री[1]गणातें समोर
वर करुनि पिसारा दावि नृत्यास मोर
परिसुनि जन कामी कोकिलाकूनितातें[2]
वदति बाविसि आह्मां कां स्मरा[3] तूं जितोंतें[4] ४६
दिनकरकिरणाचा ताप भारी घरांत
व्यथित करि ह्मणोनी या ऋतूंच्या भरांत
वन वसति मनुष्य[5]स्वांत संतोष दायी
द्विज[6] नृपति वसे तो[7] दाट पाहोनि रा[8]यी ४७
विषय[9] हयगजांच्या ह्रेषितें[10] बृंहितांनें[11]
गमति बहु निषादें[12] कोंदलें धैवतानें[13]
सुधवल[14] पटसद्म[15] भासती स्थूल मानें[16]
हिमगिरी[17] शिखरेंशीं छन्न[18] झालीं हिमानें ४८
हतिधृत[19]जलसेकें नीरजस्का[20] करोनी
धरणि, सुपट जीच्या हंतरीले वरोनी
पटसदन[21]वितानीं मंच मांडोन खासे
वसति वरि जयांच्या बंधु ते दोन खासे[22] ४९

---

१ लांडोरांचा समुदाय २ कोकिल- आकूजितोंत- कोकिलांचा शब्द ऐकून ३ अरे मदना ४ जिंकलेले जे आम्ही त्यां आम्हांस. वसंतऋतुनेंच आम्हांस जिंकिलें आहे त्यांत तूं ह्या कोकिलांचा स्वर ऐकवून कां मारितोस ५ मनुष्यांच्या मनास संतोष देणारा ६ ब्राम्हणराजा ७ बाजीराव ८ झाडी ९ प्रांत १० हिंसण्यानें ११ हत्तींच्या ओरडण्यानें १२ या नांवच्या स्वरानें १३ या नांवच्या स्वरानें ज्या वनांत बाजीराव राहिले होते त्या वनां चे प्रांत. भाग हती घोडयांच्या ओरडण्यानें नव्हे तर विषाद आणि धैवत या स्वरांनीं भरले. घोडे धैवत स्वरांत आणि हत्ती निषाद स्वरांत ओरडतात असें आहे. १४ शुभ्र १५ राहुटया १६ प्रमाणानें मोठीं १७ हिमालयाच्याशिखरा-प्रमाणें १८ छादित १९ पखालीच्या पाण्यानें शिडकांव २० धुरळारहित धरणी करून २१ राहुटया पुढें षामियाना असतो त्याच्या खालीं २२ सरदार बाजीराव, चिमाजी.

द्विरद तुरग उष्ट्र व्रातही सिद्ध सर्व
करिति गणवधू त्या ऊन गंधर्वगर्व
कथिति कनक दंडा घेउनी वेत्र धार
जनकृत नमनातें, सांगती वृत्त चार ९०
फिरविति तुरगातें चाबुकस्वार तेंव्हां.
हयमयचि दिसे तें *वर्तुलीं फेर जेंव्हां
तुरगमयचि रेखा धावतां वाह|| वाटे|||
द्विमुख उजवि डावी फेरतां अश्व वाटे ९१
रुचिर समय सायंकाळचा दे सुखातें
रवि विधुहि दिशांच्या रंजविती मुखातें
जवळ करिति विश्रांत्यर्थ पक्षी स्वसद्में
प्रकटिति कुमुदें औत्फुल्य मौकुल्य पद्में ९२.
द्विजजन हित मातें, होय वाजी परी हा
सुनिरत यवनीसीं काय पाहूं अहाहा
ह्मणुनि रवि समुद्रीं काय द्यायास जीव
जवळ जवळ गेला सागराच्या अतीव ९३

---

१ हत्ती घोडे सांडण्याचे थवे तयार होते. २ वेश्या ३ हेर वर्तमान सांगत होते. चोपदार ललकारीत होते. ४ घोडा मंडळावर फेरीत असतां सर्व मंडळ अश्वमयच दिसे. इतकें मंडळ लहान आणि इतका जलद घोडा फिरत होता. ५ उभ्या पाळींत सर्व रेषा म्हणजे ज्या वाटेनें घोडा पळत होता ती सर्व वाट अश्वमय दिसत होती. ६ पलटे किंवा अढाई उलट घेतांना जसी काय घोड्यास दोन तोंडें आहेत असेंच वाटे. जुना एक संस्कृत श्लोक याच अर्थाचा उत्तम आढळल्यावरून त्याचें हें भाषांतर केलें आहे तो श्लोक मंडले मंडलाकारः रेखावी जिमयाजवे सव्यापसव्य द्विमुखा न कुलाधिष्टितो हयः || १ || ७ पश्चिम दिशा सुर्यानें आणि पूर्व दिशा चंद्रानें लाल केली. सुर्य अस्तास चालला आणि चंद्र उदयास आला इत्यर्थ. ८ घरटी ९ फुलणे १० मुकुल भाव. चंद्र विकासी कुमुदें फुललीं. सूर्य विकासी कमलें मिटूं लागलीं. ११ कमलें. १२ प्रिय—आवडतें. १३ आसक्त होणार. १४ अगदीं जवळ. * वर्तुल मंडळ || घोडा ||| वाटेला उभ्या पाळीवर.

धरुनि बहुत येते मानसी जी[1] हुरूप[2]
द्युतिस हरुनि वेश्या[3] ती करावी कुरूप
तिजवरि न जडाचें बाजिचें चित्त लेश
पसरुनि कर आला याचसाठीं कलेश[4] ५४.
करुनि ललित[5] गोष्टी क्रीडिनें[6] मंद हास्य
रमवित मन होतें बंधुंचें[7] त्यां[8] वयस्य
मृदुतनु यवनी ती त्याच वेळेस आली
ह्मणति जन तिलाही अप्सरांचीच आली[9] ५५
प्रथमचि भिजवीतां स्वानना आसवांनें[10]
तनु इचि[11] परिपूर्णा मोहका आसवांनें
द्विजहि[12] बघुनि कामासक्त तत्तू[13] दृष्टि वाटे
प्रमुदित उतु आलें मद्य ऐसेंच वाटे ५६
तरलें[14] हृदय बाजी होय पाहोनि तीतें
लवुनि करि सलील स्त्री मृगाक्षी नतीतें[15]
नृप करि तिस संज्ञा शीघ्र हस्तें बसाया
क्षण न उशिर लागे तन्मनी ती ठसाया ५७
यवनकुलजनी ही नीच न स्वीकरावी
द्विजनृपतिवरें या म्यां ह्मणोनी करावी

---

१ जी मस्तानी ती २ उमेद ३ मस्तानी ४ कलानाथ चंद्र—बाजीरावानें यवनी सक्त होऊ नये ह्मणून त्या मस्तानीची कांति हरण करून तिला कुरूप करण्यासाठींच किरणतल्लण हस्त पसरुन चंद्र आला. ५ थट्टामस्करीच्या गोष्टी ६ खेळ ७ चिमाजी आणी बाजीराव यांचीं मनें ८ खेळगडी ९ सखी १० अश्रूंनें ११ इची मस्तानीची सर्व तनुमोहक अशा आसवानें. मद्यानें भरली आहे असें वाटे. असा अन्वय १२ बाजीराव ब्राम्हण असून ही १३ तिच्या डोळ्यावाटे आंत सांठवलेलें मद्य उतूच आलें काय १४ चंचलचित्त १५ मुजऱ्यातें.

खटपट मानें आणि यापरी जो प्रवेके
झडकरि शिरला तो बाजिचित्तीं विवेक ९८
स्मरहि मम ह्मणे हा तीक्ष्ण मस्तानिबाण
विफल जरि घडे मच्छौर्य वानील कोण
ह्मणुनि तिजवरी या लुब्ध विप्रा कराया
स्मर न उशिर लावी बाजिचित्तीं शिराया ९९
झुजति जसजसे ते* तद्दिजस्वांतरंगीं
उठति बहु तरंग ब्राह्मणस्वांतरंगीं
नरवरहि परस्त्रीसक्त पावेल हानी
उचित विषयसेवा ही पुनः तोचि मानी ६०
स्मर वरि सुकुमार क्रूर अभ्यंतरांत
प्रखर वरि विवेक प्राज्य जो शांत आंत
द्रुत ह्मणुनि पळाला तो[१०] तसा लोकपूज्य[११]
स्मर करि मग बाजीचित्तदेशीं स्वराज्य[१२] ६१
द्रुत निघुनि विवेकप्रद्य[१३] जें रत्न गेलें
तिमिरमयचि[१४] बाजीचित्त तें शून्य झालें
वश न शरशतें हा शत्रुसंघासि झाला
मृदुयुवतिकटाक्षें वश्य तो वीर केला ६२.

---

१ उत्तम बाजीरावानें यवनीवर लुब्ध न व्हावें ही खटपट करण्यास विवेक त्याच्या मनांत शिरला २ या ब्राम्हणास (बाजीरावास)मस्तानीवर लुब्ध करण्याकरितां *विवेक आणि मदन ३ तत्-द्विज-स्वांत-रंगीं-त्याद्विजाचें-बाजीरावाचें स्वांत म्हणजे अंतःकरण तोचरंग म्ह० आखाडा त्यांत ४ लहरी- कल्पना ५ बाजीरावाच्या अंतःकरणीं ६ नरश्रेष्ट- राजाही ७ विषय सेवन विवेकाचा जोर होई तेव्हां पर स्त्री निंद्य वाटे कामाचा जोर होई तेव्हां विषय सेवण्यास हरकत नाहीं अशी कल्पना करी ८ आंत ९ थोर असा विवेक १० विवेक ११ लोकमान्य १२ विवेक नाहींसा जाल्यावर काम बाजीरावाचें चितांत हवे तसें नाचूं लागला इत्यर्थ १३ विवेक नावाचें १४ अज्ञानमय आणि शून्य-ओसाड झालें.

**वाल्मीकि रामायण सटीक**-( संस्कृत ) हा ग्रंथ पुस्तक रूपानें दोन भागांत छापून तयार आहे. प्रत्येक भाग उत्तम रंगीत कापडानें बांधिला असून वर सोनेरी नांवें वगैरे सुंदर रीतीनें छापिले आहेत किंमत रु. ८ ट. ह. ०१४.

**कथासरित्सागरः**-सोमदेवकृत ( संस्कृत ) हा संपूर्ण ग्रंथ पुस्तक रूपानें छापिला असून उत्तम रंगीत कापडानें बांधिला आहे. किंमत ६ रु. ट. ह. ०८.

**स्त्रीगीतः**-जुन्या व नव्या दोन्ही पक्षांच्या मंडळींतील स्त्रियांस गावयास योग्य अशीं गाणीं ह्या पुस्तकांत नवीन रचून घातलीं आहेत भाषा स्त्रियांस समजण्या जोगी आहे. व आंत सुंदर चित्रें आणि उखाणे आहेत. किंमत ०३ ट. ह. ००६

**कादंबरी कथासार**—किंमत ०२ ट. ह. ००६.

**वासवदत्ता कथासार**—किंमत ०१ ट. ह. ००६.

**मुद्राराक्षस कथासार**—किंमत ०२ ट. ह ००६

हीं सर्व पुस्तकें खालील ठिकाणीं मिळतील.

जावजी दादाजी-

" निर्णयसागर " छापखान्याचे मालक-मुंबई-


## मुलें सशक्त करा !

### बाल संजीवनामृत.

फक्त मुलांकरितांच. **ओक, आंव, अतिसार, खरूज, दमा, खोकला, फेंपरें, माती खाण्याची संवई, दुधापासून आलेली पांढुरकी, आंगावरील फोड, आईपासून होणारे व्याधी, जंत, डबा,** हे सर्व रोग नाहींसे होऊन मुलें सशक्त होतात. जास्त माहिती बाटलीबरोबर. बा. किं. ०१२ वं. क. ०४ बंगी नाटपेट.

## केंस वाढण्यास रामबाण सुगंधिक तेल.

केंस-वाढतात, पुन्हां येतात, काळे तुळतुळीत रहातात. त्रास होत नाहीं. नेहमी सुवास रहातो. **टक्कल** भरतें. स्त्रीयांच्या डोक्या-

वर टक्कल पडतें, तें या तेलानें भरून येईल. शोकीन लोकांस आनंद देणारें आहे. बा. किं ८१२ वं. क. ८४. बंगी नाटपेट.

## शरम ठेऊन—रोग वाढवूं नका.

## परम्यावर गोळ्या.

पू, रक्सा, परमा, तिडीक, कंडू त्वरित नाहींसा होतो. किंतीही जुना अगर नवा असला तरी हटकून गुण. आळस केल्यानें परिणामीं हा रोग नुकसान करितो. डबींत गोळ्या २० किं. ८१० वं. क. ८२ बंगी नाटपेट. जास्त माहिती—औषधा सोबत.

**गजकर्णाला वस्ताद दवा** किं. ८४

**एतद्देशीय तापावर पुड्या ३** किं. ८७

**दांतव्रण—दांत मजबूत करा.** किं. ८९

हीं तीन्हीं औषधें अमोल्यगुणकारक आहेत. जास्त माहिती—विचारा—किंवा औषधा बरोबर.

**म्यानेजर**

**न्यू इंग्लिश मेडिकल यूनियन. कॉन्हेल स्ट्रीट—रामवाडी मुंबई.**

## जाहिरात.

सर्व लोकांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं, जळगांव येथें आमचा पूर्वींचा शिळा प्रेस असून हल्लीं आह्मी टाईपाचा प्रेस आणविला आहे. यास्तव कोणतेही प्रकारचे फार्म वगैरे फारच सुबक आणि स्वस्त दरानें छापून देण्याचें करूं. तसेंच शिळा प्रेसवरही-काम सुरेख आणि माफक किंमत घेऊन छापून देऊं. चित्रांचें अगर मोठ्या अक्षराच्या जाहिराती यांचे काम आमचेकडे शिळा प्रेसावर फारच उत्कृष्ट तयार होतें. वर्तमान पत्रांत नोटिसा आणि जाहिराती स्वस्त दरांत छापल्या जातात.

**विनायक रामचंद्र पुराणिक—म्यानेजर.**

**" बावजी प्रिंटिंग प्रेस " . जळगांव.**

# काव्यरत्नावली.

( मासिक पुस्तक. )

पुस्तक २ रें. ] मार्च सन १८८२ [ अंक २२ वा

त एव पदविन्यासास्त एवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



जळगांव-खान्देश येथें
छापून प्रसिद्ध होतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशिलासुद्धां दोन रुपया.

जळगांव " बावजी प्रिंटिंग ,, प्रेस.

## अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | कूट. | १ |
| २ | कन्या. | १४ |
| ३ | कविजनांस वंदन. | १५ |
| ४ | मातेचें प्रेम. | १७ |
| ५ | वसंत. | १८ |
| ६ | अनुरागमीमांसा. | १९ |
| ७ | पद्यमंजूषा. | २० |
| ८ | उपेंद्रवज्राशतक | *१ |


* ह्या काव्याचा पृष्ठानुक्रम निराळा आहे.


# जाहिरात.

**श्रीधरकृत पांडवप्रताप किंमत ४ रु. ट ह. ८१५.**

**श्रीधरकृत रामविजय किंमत २ ट. ह. ८१४.**

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, थोडें बहुत शिकलेल्या लोकांस व स्त्रियांसही वरील दोन्ही ग्रंथ वाचण्याची उत्कंठा होत असते. परंतु ग्रंथांत शब्द वेगळे वेगळे नसल्यामुळें कोठें कोठें अर्थाचा अनर्थही होतो. असा अनर्थ न व्हावा ह्मणून शब्द वेगळे वेगळे तोडून आणि कोणत्या शब्दावर अर्थ बोधक टीपा देऊन ते ग्रंथ आह्मी मोठ्या टाईपांनी जाड्या कागदावर सुंदर चित्रांसह छापिले आहेत. हे ग्रंथ आपल्या घरांत फार वर्षे रहावे व वाचतांना डोळ्यांस त्रास पडूं नये व अर्थ ही चांगला समजावा अशी इच्छा असेल त्यांनीं हे ग्रंथ घ्यावे ह्मणजे त्यांस फार सोईवार पडतील. ज्या कोणास नमुना पाहणें असेल त्यांनीं आह्मास पत्र पाठविलें असतां पाठविला येईल.

# काव्यरत्नावली.

## अंक २२.

### कूट.

( बळवंतराव कमलाकर. )

### श्लोक.

जें योग्यांच्या राहतें हृत्सरांत
सद्भक्तालीं ज्यावरी गुंजतात
हेरंबाच्या त्या पदाब्जास भावें
वंदीं मीं कीं मन्मनीं तें वसावें. १

निरभ्र आकाश, दिशा प्रसन्ना
सर्वत्र पृथ्वी नवसस्यपूर्णा
निष्पंक झाले पथ, वायु, शीत
हळू हळू ये तनु कंप देत २

जलाशयें निर्मल तोययुक्त
वनीं बहु शोभति तीं समस्त
जयामध्यें क्रीडति हंसपंक्ती
विलोकितां मानस हर्षवीती ३

विकासलीं कुंद सुमें वनांत
सुगंध त्यांचा पसरे दिशांत
शरदृतू हा अति रम्य ऐसा
येतां जनां हर्ष न होय कैसा ?

येतो शरत्काल सखा ह्मणोन
नेसूनि काशांबर शुभ्र वर्ण
घालूनिया कैरवमुक्तमाला
झाली धरा सिद्ध समागमाला. ५

## साक्या.

रम्य अशा ह्या शरदृतूच्या रात्रीं एके दिवशीं
कोणी दोघे मित्र सुखानें बोलत परस्परांशीं ६
सिंधुतटाच्या नगरीं एका गृहीं बैसले होते
पडलें होतें स्वच्छ चांदणें तेव्हां सुखकर हो ! तें ७
तारा चमकत होत्या गगनीं वायुहि मन्द वहात
त्यासह विकासित कुसुमांचाही सुगंध होता येत ८
ऐशासमयीं गोष्टी करितां करितां एक दुज्याला
ह्मणे सख्या ! मी आज एक अति चमत्कार निरखीला ९
कथितों तुज तो ऐकुनि आधीं विस्मय जरि वाटेल
विचार करितां शेवटिं तुजला आनंदचि होईल १०

## श्लोक.

झाला होता अस्त जेव्हां विधूचा
तारांचाही लोप तैसा तमाचा
झाल्या होत्या शुभ्र आशा; नभांत
होते पक्षी शब्द तेव्हां करीत ११
मित्रा ! ऐशा आज मी रम्य वेळीं
गेलों होतों बा फिराया सकाळीं
सिंधूतीरीं; तों तिथें तारवांत
होता कोणी आर्य बैसूनि जात. १२

लहानसा तो जरि आकृतीनें
तरी गमे थोर बहू वयानें
शरीर त्याचें जरि पुष्ट होतें
तथापि भासे रमणीय हो तें १३

## साक्या.

होता गौरचि पारि तो पिंगट भासत होता वर्ण
झालीं होतीं वार्धक्यानें गात्रें शिथिलचि पूर्ण १४
अंगावरती मलिन वस्त्र; मुख उदास भासत होतें
हातीं धरुनी एक फिरंगी होता उभा तयातें १५

## श्लोक.

विलोकूनि त्या वाटलें मन्मनास
असावा स्वदेशस्थ हा कोणि खास
तदा जाउनी वंदुनी मी तयाला
बहू आदरानें असा प्रश्न केला १६
अहो महाराज ! तुह्मास पाहुनी
अहा स्वदेशस्थ असेंच ये मनीं
पुसावया कांहिं तुह्मास इच्छितों
असेल आज्ञा तरि हो विचारितों १७

## आर्या.

तंव तो ह्मणे विचारा असेल तुमच्या मनांत जें मातें
तैं मी विचारलें कीं आपण कोठील कोण सांगा तें १८
परदेशास कशास्तव जातां; दिसतें उदास कां वदन
दुःख असें काय असे स्वजन मला समजुनी करा कथन १९

## श्लोक.

ऐकूनि या ह्या मम भाषणातें
कांहींच तो उत्तर दे न मातें
तेव्हां पुन्हा प्रार्थियलें तयाला
मत्पूर्व पृच्छोत्तर द्यावयाला २०
मग ह्मणे पुसतां मज काय हो
परिसुनी वच हें अति खेद हो
विसरलांत तुह्मी मजला कसें ?
नवल हें गमतें मज ये हंसें २१
हर ! हर ! प्रभुजी करणी तुझी
विधि रमेश शिवाहि अतर्क्य जी
तव विचित्र चरित्र विलोकुनी
परम विस्मय वाटतसे मनीं २२
मी गुरू सकल आर्य कुलाचा
सर्व संकट निवारक त्याचा
त्या मला विसरले जन माझे
कोण हो तुह्मि असें पुसती जे २३
कोठें गेला काळ तो आजि देवा
होते माझे आर्य हे भक्त जेव्हां
कोठें त्यांचें राज्य विज्ञान शौर्य
कोठें गेलें वैभव द्रव्य धैर्य २४
विचारितां काय तुह्मी अह्माला
सांगूं तरी दुःख कसें तुह्माला
पाहूनिया आर्य जनां समस्तां
वाटे मला खेद नितान्त आतां २५

मज्जन्मभू भारतभूमि हीच
होतों सुखें नांदत मी इथेंच
परी न आतां रुचते मला ते
जाणार मी यास्तव आंग्लभूते[१] २६
अनेक मद्देह अनेक नामें
अनेक मद्वर्ण अनेक धामें
अनेक मन्मार्ग अनेक जाती
अनेक मद्धर्म अनेक रीती २७
मी छोटका मध्यम उंचही मी
मी पुष्ट भारी कृशही बहू मी
मी वृद्ध मी प्रौढ किशोर[२]-ही मी
मी षंढ मी पूरुष कामिनी मी २८
सुरूप मी तेविं कुरूपही मी
सुरम्य तैसाच अरम्यही मी
सलज्ज तैसाच विलज्जही मी
पवित्र तैसा अपवित्रही मी २९
गर्विष्ठ मी फारचि सौम्यही मी
मी शूर भारी भितरा असे मी
मी ज्ञानवान् केवळ मूर्खही मी
बलाढ्य मी निर्बल दीनही मी ३०
रूपें अशीं फार विचित्र माझीं
आश्चर्य वाटे अवलोकितां जीं
ज्याचें असें ज्ञान तसें तयास
माझें दिसे रूप जगांत खास ३१

---

१ इंग्लंड २ बालक

न तोंड मातें तरि बोलतों मी
न पाय मातें तरि चालतों मी
अनेक रूपें धरितों जरी मी
तथापि नाहीं नट नाट्य कामी ३२
सुमनपत्रफलोद्गम होतसे
मज मधूनि परी तरु मी नसे
रमतसे परकामिनिच्या सवें
परि न बा ! विटता मजला शिवे ३३
उत्पन्न हे सृष्टपदार्थ सारे
होती कसे ते कळतें मला रे
सूर्येन्दु राहुज्ञ बुधादिकांच्या
गती मला त्या कळती ग्रहांच्या ३४
सिंधू तराया गगनीं उडाया
क्षणांमधें वृत्ताहि दूर न्याया
रसातळीं वा त्रिदिवांत१ जाया
मी जाणतों सर्व कृती कराया ३५
मी जाणतों भूत भविष्य बा ! रे !
भूपृष्ठगर्भांतिल वृत सारें
पाताळभूमी सुरलोक ह्यांत
ते ज्ञात होते मजला समस्त ३६
मी श्रेष्ठ योग्यापरि सर्व वेत्ता
मी कल्पवृक्षापरि सर्व दाता
मी विश्व सारें हृदयीं धरीतों
मी २सर्गरक्षालय ही करीतों ३७

१ स्वर्गांत २ उत्पन्नकरणें, रक्षणकरणें, नाशकरणें.

मला कळेना; त्रिजगांत कांहीं
वस्तू अशी एकहि गुप्त नाहीं
सांगूं किती मद्गुण विश्वमान्य
नाहीं त्रिलोकीं ममतुल्य अन्य ३८

माझ्याशीं जो जोडितो मित्रता तो
तीन्हीं लोकीं श्रेष्ठ सन्मान्य होतो
होतों त्याचा दास मी इच्छितो तो
तें तें त्यातें आणुनी सर्व देतों ३९.

मी मागेना अल्प ही वेतनातें
मी मागेना [1]खाद्यपेयादिकातें
नाहीं कांहीं देत मी त्रास त्याला
आज्ञा त्याची सिद्ध बा! पाळण्याला ४०

जेथें जेथें बैसतों झोंप घेतों
तेथें तेथें त्यासवें मी रहातों
जेव्हां जेव्हां तो मला आठवीतो
तेव्हां तेव्हां त्यास मी साह्य देतों ४१

केव्हां सांगें नीति त्या [2]तातसा मी
केव्हां मातेसारिखा रक्षितों मी
केव्हां कांतेसारिखा रंजवीतों
केव्हां मित्रासारिखा तोषवीतों ४२

कधीं हांसवीतों कधीं खेळवीतों
कधीं गाववीतों कधीं नाचवीतों
कधीं योजितों न्याय त्याला कराया
कधीं दानपुण्यादिकां आचराया ४३

---

१ खाणें, पिणें २ पित्यासारखा

कधीं नाटकाचे कधीं गारुड्याचे
कधीं १भांड वा २इंद्रजालादिकाचे
तमाशे असे नित्य नानापरीचे
उभे त्यापुढें मी करीतों मजेचे ४४

स्वदेशांत वा अन्य देशांत होतें
नवें वृत्त जें सांगतों त्यास मी तें
कुठें युद्ध होतें कुठें ३संधि होतो
कुठें होतसे काय तें दाखवीतों ४५

मी सह्य विंध्यादिक पर्वतांतें
सरोवरें तीर्थ नद्यादिकांतें
क्रीडावनें देव मनुष्य यांचीं
त्यां दाखवीतों भुवनत्रयींची ४६

कुबेरापरी द्रव्य मी त्यास देतों
४गुरूसारिखा विज्ञ त्यातें करीतों
तया मान देतों तया राज्य देतों
तयाचे बळीही रिपू मारवीतों ४७

मिळासवें यापरि मिळतेनें
मी सर्वदां वागतसे सुखानें
शिष्यासवें वागतसे गुरूसा
भक्तांसवें केवळ देव ऐसा ४८

कोणी गुरू इष्ट सखाहि कोणी
कोणी पिता पुत्र सुताहि कोणी
नानाप्रकारें मनिं भावनेतें
धरूनिया सेविति लोक मातें ४९

---

१ भाट २ नजरबंदीचे ३ तह ४ बृहस्पतिसारखा

ज्या बुद्धिनें सेविति लोक मातें
तसेंच मी ही फल दे तयातें
मद्भक्त वा मत्प्रिय यांस लोकीं
१अदेय कांहीं नच बा ! विलोकीं. ९०
ते इंद्र चंद्रादि समस्त देव
ते व्यास वाल्मीकि ऋषीहि सर्व
ते भूपती विक्रम भोज ऐसे
ते कालिदासादि कवीहि तैसे ९१
विख्यात झाले पृथिवीतलांत
माझ्याच योगें न असत्य यांत
अद्यापि सेवा मम जे करीती.
विख्यात ते ही जगतांत होती ९२
अमेरिका फ्रान्स इटालि चीन
इंग्लंड इत्यादिक देश जाण
माझ्या प्रसादें उदयास आले
सर्वत्र ज्यांहीं यश गाजवीले ९३
देवर्षि राजे नर पूर्वि येथें
सप्रेम मद्भक्ति करीत होते
होतों तदा नांदत मी सुखानें
होते सुखी तेहि मदाश्रयानें ९४
पुढें सोडुनी भक्ति माझी जनांनीं
दिला त्रास मातें अहा ! फार त्यांनीं
वदूं काय तें आठवे तोचि मातें
भरे तापही जीव जाळी अहो ! ते ९५

---

१ न देण्यासारखे.

कोणी मला कैद करोनि टाकिले
कोणी १गुणीं आकळूनीच बांधिले
कोणी शिरीं ही गुरू काष्ट ठेविले
कोणी स्वगेहांतुनि हांकुनी दिले ५६
कोणी जमीनींत पुरूनि टाकिले
अत्यल्प मूल्यांत विकूनिया दिले
जळामधें मी बुडतां न तारिले
अग्नीमधें मी जळतां न वारिले ५७
दिलें दुःख ऐसें अनेका रितीनें
न माझी परी जाहली हानि तेणें
तुह्मी मात्र रे भोगितां तत्फलातें
पहा कीं कसे कष्ट होती तुह्मातें ५८
ते तूमचें वैभव राज्य शौर्य
गेलें लयातें बल वित्त धैर्य
झाला पराधीन दरिद्र मूर्ख
निस्तेज निर्वीर्यचि सर्व देख ५९
असूनिया २आर्य अनार्य झाला
आतां न कोणी पुसती तुह्माला
धनार्थ विद्यार्थ कलार्थ आतां
३यांचाच अन्याजवळी करीतां ६०
करोनिया दास्य निजोदरातें
भरीतसा धिक् जन हो तुह्मातें
केला तुह्मी त्याग मदीय त्याचें
भोगीतसां हें फल; जाण साचें ६१

---

१ दोरानें २ श्रेष्ठ ३ याचना.

# दिंड्या.

तुह्मां आर्यांचा गुरू मी समर्थ
असुनि कां रे भोगितां व्यर्थ कष्ट
करा भक्ती मम सोडुनी पराला
उणें कांहीं नाहींच मग तुह्माला ६२
दिलें भारी रे दुःख तुह्मी मातें
मनीं नाहीं आणीत मी अतां तें
अमेरिका यूरोप भक्त माझे
पहा कैसे आहेत हो सुखी जे ६३
लोक इंग्लिश हे पूर्वी कसे होते
कसे आतां आहेत पहा हो ! ते
यत्न करुनी ते शरण मला आले
अति प्रेमें मद्भक्त ते जहाले ६४
दिवा रात्रीं ऊठतां बैसतांना
पितां खातां बोलतां चालतांना
श्रवण मनन ध्यानहि सदा मातें
त्यांहि सेवियलें विसंबले नां ते ६५
अशी त्यांची पाहुनी भक्ति धालों
भक्तवश मी अत्यन्त तुष्ट झालों
दिलें त्यांना मग बुद्धि वित्त शौर्य
शक्ति कीर्ती उत्साह तेज वीर्य ६६
देउनीया बहु अशा सद्गुणांला
चक्रवर्तित्वहि म्यांचि दिलें त्यांला
भक्त माझे हे अति प्रियचि मातें
नेति मजला आज हे स्वदेशातें ६७

तुह्मी मूढांनों अज्ञानि तरी माझी
भक्ति करुनी धन्य व्हा जगामाजी
तुष्ट होतां मी नष्ट वैभवातें
क्षणामध्यें अर्पीन रे तुह्मातें ६८
असें माझें वृत्त हें थोडक्यांत
तुला कथिलें तें धरीं बा ! मनांत
दूर दृष्टीनें करीं विचारातें
जाण आतां तूं स्वयें कोण मी तें ६९
बरें व्हावें तूमचें याचि भावें
परुष वदलों तेणें न रुष्ट व्हावें
स्वजन ह्मणुनी तूमची ही विपत्ती
पाहुनीया वाटतो खेद चित्तीं ७०

## श्लोक.

असें बोलुनी तो पुढें स्तब्ध झाला
तदा मी असें बोललों कीं तयाला
महाराज ! मी दर्शनें आपुल्या ह्या
बहू धन्यता पावलों हो जगीं या ७१
मन्महत् पूर्व पुण्यानें झालें दर्शन आपलें
निःसंशयचि मद्भाग्य आजीं उदय पावलें ७२
त्यजिली आपुली भक्ती तेणें आर्य–कुलास या
आली विपत्ति पावो कृपेनें आपल्या लया ७३
गुरो ! क्षमा करा आतां आमचे अपराध ते
दया करा हरा क्लेश आर्य हे भोगितात जे ७४
आतां नच कधीं सोडूं आह्मी ती भक्ति आपली
तोपर्यं आपणा साधूं स्वकार्यें कीर्ति ही भली ७५

माझ्या अशा ऐकुनि भाषणाला
तो तैं स्वकार्यार्थ निघूनि गेला
मी ही स्वगेहीं परतोनि आलों
ऐकूनि तद्वृत्त मनांत धालों ७६
मित्र—वाक्य हें सर्व ऐकुनी
हर्ष पावला मित्र हा मनीं
बोलला तया कीं विचित्र हा
कोण भेटला तूजला अहा ! ७७
गुण जे कथिले तुवां असे
असती बा ! मनुजांमधें कसे !
असतील तयांत ते जरी
नच देवाहुनि भिन्न तो तरी ७८
कुल गुरू अपुले असुनी असे
मज न आठविती अझुनी कसे
असाति कोण सख्या ! मज सांग वे
परम उत्सुक मी श्रवणास वें ७९

## आर्या.

बोले हा मी कथितों,
नांव तुला त्या महानुभावाचें
ज्याचे गुण वर्णाया,
असमर्थचि तो सहस्र मुख वाचे ८०
जनक जयाचा ज्ञान,
प्रसिद्ध ती लेखनी असे जननी
ऐसा जो तो हाची
ग्रन्थ असे ह्मणति ज्यास सर्व जनीं ८१

# कन्या.

( वामन दाजी ओक. )

## आर्या.

रुचिरे बाले ! असती, तूं फल गे ! आमुच्या प्रमोदाचें
त्वत्फुल्ल नेत्र पाहुनि, आनन्दित हृदय होय गे ! साचें १
देखुनि तुजला वनये ! प्रेमाच्या ऊर्मि मानसीं येती
होशिल कुलद्वयाचें तूं मंगल हे विचार मन हरिती २
होई दुःखतमानें माझें हें व्याप्त हृदय गे ! सकल
परि तें तव मुखचन्द्रें विकसित होतें न लागतांचि पळ ३
स्मितमुखकमला तव मी बाले ! चुंबोनि सेवि जें सुख तें
पीयूषरसीं न वसे, ऐसें वर्णाविया न भय गमतें ४
कोमल आनन वत्से ! शोभे तव रुचिर दंतपंक्तीनें
बाले ! हिरकणि त्यांशीं तुलना पावेल केविं कान्तीनें ५
होशिल विवाहयोग्या देऊं तैं चतुरधी वरा बघुनी
श्वशुरश्वश्रू गृहिंचें सुख सेवुनि राहसील तूं स्वजनीं ६
येशिल अमुच्या गेहा जातां तुज मास पांच वा चार
होउनि सुखप्रसूता रमसिल वत्सान्वितांमधें फार ७
जाशिल पतिसदनाला संगें घेवोनि लाडक्या बाला
पाहिन तुजला तैं मम आनन्दा केविं वर्णवे कविला ८
पतिची गांठ पडोनी प्रेमें घेइल सुहास्य तोकाला
गालीं हंससिल तेव्हां दावुनिया रूपसाम्य गे ! त्याला ९
देखुनि तनयक्रीडा कुतुकें जो हर्ष होय तव पतिला
तो लाजविल वाटे नन्दनवनिंच्याहि सौख्यसंततिला १०
होइल पुत्र तुझा मुलि ! लोकीं विद्वान् सुधी धनी कुशल
देइल तुम्हां दोघां वाहुनि संसारभार सुख विपुल ११

# कविजनांस वंदन.

( नारायण अनंत चिटणीस. )

## श्लोक.

होती जे पुरुषार्थवैभव सदा, जे ईशमाहात्म्य त्यां,
नीरंकुश सरस्वतीसदन जे जे शब्दरत्नाब्धि त्यां,
नाना चित्रकळांसि जीवनचि त्या विद्यांचिया मंदिरा,
वंदूं आधिं कवीश्वरांसि अवघ्या त्या शब्दसृष्टीश्वरा १

जगीं बहू खेळति धर्म जे जे
त्यांस कर्ते कविराज गाजे
कवामुळें भक्ति जनांस ठावी
भक्ती जनां ईशपदासि दावी २

जेव्हां विलास करिते कविवाग्वधू ती
साल्हाद लोलुपच नाचति सर्व भूवीं
जैं तुंबळे श्रवणीं ओघच वाग्रसाचा
नाचेल कां न जन तो रसिकाग्र साचा ३

आहेत हे सुकवि सृष्टिस भूषणें तीं
शृंगार जे सतत अब्धिसुतेस होती
भाग्यास भूषण सभेप्रति मंडने तीं
भाषा सदा जगतिं कुंकुमभाग्य लेती ४

देवास देति कवि दैवतता जगांत
त्या निर्गुण प्रभुसि रूपाहि लावितात
शास्त्रांचि ती महति वाढविती कवी हे
सृष्टीस आश्रय कवी दिसतात पाहे ५

होतो ना कवि ते तरी जगत हें भासे सदा शून्य सें
व्युत्पत्तीहि विवेक पंडितपणा तो कोठला हो दिसे ?
पूर्वींच्या कुठल्या कथा; वसतते होते कुठें पूर्वज;
झाली गुप्त कुठें स्थिती; नच्चि कळे तें धुंडिल्याही रज | ६
कैंचा रावण जो सुरांस अवध्या नेत्रीं सदा खूपवी !
कैंचा राम दशास्यकंदन कसा रातिंचरा संपवी |
कोठें तो पवमान–पुत्र कुठलें दास्यत्व मोठें जनीं
कैशीं तीं बहु साहिलीं अतितरें रामेंहि दुःखें वनीं ७
कैंचें भारत पाहुं भागवत तें गीतासुधा कोठची ?
कैंचे ते इतिहास ते नृपतती सर्वा दिशा वोसची |
कैसें तें "पहिल्यास ठेंच दुसऱ्या ज्ञातृत्व येई भलें"
ऐसें तें वदणें ? जगीं कविविना कैसें अहो शोभलें | ८

१कविजलधर वर्षे अमृतातें सदा तो
नवरससरितांचा ओघ तो धांव घेतो
रसिकजनतडागीं तैं २सुखोर्मी उदेती
ह्मणुनि कविगणांला लोक ते मान देती ९

## दिंडी.

पूर्व–पुण्यें प्राप्त ही कवीमाला
नमन माझें त्या सृष्टि–पालकाला
मधुर त्यांचे परसोत काव्यबंध
रसिक निपजो ते नको बुद्धिमंद | १०

---

१ कविमेघ २ सुखाच्या लाटा.

# मातेचें प्रेम.

( विठ्ठल भगवंत लेंभे. )

## श्लोक.

आहे पैल समुद्र, १तत्तल तुवां बा काय रे पाहिलें ?
किंवा २तत्तसिकता कणां निज बळें आहेस कां मोजिलें ?
पाहें ३अंबर हें ४वरी, गणियली उंची तयाची तरी ?
नाहीं ? धिक्! गणिशी अगाध जननी प्रेमा कसा यावरी ? १
आकाशीं प्रभुचा ५निदेश वरूनी राज्यीं तयाच्या फिरे,
त्या सूर्यासह दोन शद्ब वदुनी आलास तूं काय रे ?
स्वर्गी इंद्रसभेंत तूं बवितलीं कार्यें सुरांचीं तरी ?
नाहीं ? धिक्! मग जाणशील जननीप्रेमा कसा यावरी २
पाहे ६तत्परतें खपोनि जमवी रात्रीं दिनीं जी मधा
ऐशी ती मधुमाक्षिका त्रिभुवनीं मान्या असे सर्वदा
तीचे ते श्रम सर्वही बुधवरा आहेत ७तीकारणें
मातेचे श्रम निष्कलंक अपुल्या बाळार्थची जाणणें ३
जाईं तूं फिरण्या कुठेंहि जगतीं, भूगर्भदेशीं, जळीं,
जाईं उत्तर दक्षिण ध्रुवपथें, वा तारकामंडळीं
नौकेमाजि बसोनियां जळनिधी ओलांडुनी जाय रे
प्रेमें वत्सलचित्र तें जननिचें संगें तुझ्या बा फिरें ४
८प्रेमाचें अति दिव्य कोमळ असें वारें बघूं पाहसी ?
बुद्धिचे आंत शुद्ध, सत्य, अवघे, सिद्धांत तूं मागसी !

---

१ समुद्राचें २ वाळू ३ आकाश ४ डोक्यावर ५ हुकूम ६ तत्परतेनें ७ मधमाशी करितांच ८ प्रेमाचें वारें

तूंचें शुद्ध अगाध वत्सल असें बा पाहिजे चित्त रे ?
पाहे प्रेमळ दृष्टि ती जननिची ! ब्रह्मांड तेथें भरे ५
ऐशी प्रेमळ दिव्य दृष्टि जग हें, निर्माण झालें जधीं
तेव्हांपासुनि नीतितें १शिकवुनी विद्वान् करी धीरधी
संतां, यापरि, दुस्तरा भवजलीं नौकाचि ती जाहली
धन्या इच्छित कामदा त्रिभुवनीं ही कामधेनू भली ६
वायूच्या पटलीं, धरा तळवटीं, नीलांबरीं सारिखे
शोभे ईश्वरवैभव ! क्षण सुधी जे पाहती कौतुकें
ऐसें अद्भुत तेज दे, करि कृपा ईशावरी जी भली
धन्या प्रेमळ दृष्टि ती त्रिभुवनीं ! धन्याचि ती माउली ! ७

---

# वसंत.

( दण्डीकृत. )

## श्लोक.

समस्त ऋतुंच्यामधें ऋतु वसंत हा भासतो
पसंत, नृपतीपरी बहु विलास जो भोगतो;
वनूस अणु बाधते कधिं न शीतता, तो पहा,
प्रसन्न अवघा दिसे मजसि सर्व भूगोल हा १
मनोहर तरूगृहां आणिति रम्यता फारशी
गृहस्थ ह्मणुनी मनीं धरिति तोषवृत्ती तशी;
सुखें पळाति कोंकरें, वसति मेंढराच्या तती
सुखें करिति गायना मधुर, मेंढराचे पती २

---

१ नीतीचा कित्ता मातें पासून प्रथम मिळतो.

विचित्र अति गालिचा पसरलाच चोंहींकडे
मळें फुलति ह्यापरी अमित जीकडे तीकडे;
सुवास सुटतो तसा बहुत तोषदायी जनां
विहंगम तरूंवरी सकल काढिती सुस्वना; ३

सुमें विकसती वनीं; उपवनीं मुदें क्रीडती
थवे तरुणिचे, घरीं जरठ बायका बैसती;
पथीं फिरति सोत्सुकें तरुण, खेळती बालकें
विनोद करुनी मना रिझवितात तीं कौतुकें ४

# अनुरागमीमांसा.

( दण्डीकृत. )

## श्लोक.

मिसळती नदिशीं चिमणे झरे
कवळिती सरिता जलधी त्वरें;
मधुर गान करीति परोपरी
मिळति वायु सदोदित अंबरीं १

जगिं न वस्तु असा मीच एकटी
विधिकटाक्ष गमे मज, गोरटी!
जरि तुझ्यावरि लोभ जडे, गडे!
तरि न संगम कां अपला घडे? २

गगन उच्च महीधर चुंबिती;
चपल वीचि परस्पर भेटती;

वनीं न पुष्प दिसे मज एकलें
परि दुज्यासह संयुत रेखिलें; ३
महिवरी रविचे कर धांवती;
जलनिधीस शशीकरसंगती
गमति निष्फल हीं सगळीं, सये !
जरि न चुंबन देशि मला प्रिये ! ४

---

## पद्यमंजूषा.

( लक्ष्मण गणेश लेले. )

### श्लोक.

लताकुंजीं गुंजारव करि सुखें रे भ्रमर हा
अनंगाच्या रंगांतुनि रमतसे सप्रिय पहा
मृणालीं बैसोनी पिउनि मकरंदा मग उडे
नभामध्यें, तेव्हां पडति बिसतंतू चहुंकडे. १
हा मंद मंद मलयानिल वाहताहे
चूतद्रुमावरि किती हरितत्व राहें
न स्वांग वर्ण चिरगर्व विडंबनेला
साहे ह्मणोनि खुडितो शुक मंजरीला २
ऐकोनि भूपाल तुझ्या यशातें,
न कोण बा कांपवितो शिरातें
वसुंधरा भंग भयें विधाता
कणों न देई बघ सर्पनाथा ३

# उपेंद्रवज्राशतक.

( मोरो गणेश लोंढे. )

## श्लोक.

दिसे जयाचें बहु शांत रूप
असूनिया शाश्वत जो अरूप
क्रिया करीना अगदीच कांहीं
मनांत तें ब्रम्ह सदैव पाहीं ॥ १

दिसे बरा एकच दंत ज्यातें
करी सुमातृद्वय चुंबनातें
तिन्ही गुणांपासुन जो निराळा
भुजा बऱ्या शोभति चार ज्याला ॥ २

विराजती ते कर पांच ज्याला
जयाप्रती षण्मुख बंधु झाला
जयास सप्तच्छदगंध वेधी
रमो तयाच्या गुणगायनीं धी ॥ ३

सरस्वती जी निकषासमान
परीक्षिते कीं मति हेम जाण
निवारिते जी जडता मतीची
पदें सुखानें नमितों तियेचीं ॥ ४

पिनाक हातांत, फणी कटीला
ललाटिं बालेंदु हि भस्म त्याला
मृडाणिचा कांत असून मूर्ती
पवर्गयुक्ता अपवर्ग देती ॥ ५

बसे भवानीस धरून अंकीं
जटेंत गंगा दुसरी विलोकीं
भव स्वता नांव असूनिया ही
भवास वारी स्मरतांच पाहीं ६
कळे शिशूला अथवा पशूला
फणीस वा गायन सारिकेला
कळावयां सार सुभाषितांचें
भवास ही दुर्घट जाण साचें ७
सुभाषितांच्या रसमाधुरीनें
विलासिनींच्या सुविलासपानें
जरी मना मोह न ताप देतो
असेल साधू अथवा पशू तो ८
करूनिया नाशहि संशयाचा
सुपंथ जीं दाविति ईश्वराचा
जनांस नेतें गमतात शास्त्रें
जशीं सुवीरांप्रति तीक्ष्ण शस्त्रें ९
शिकावयां योग्य हि शस्त्रविद्या
तसी नराला वर शास्त्रविद्या
त्यजील आद्या जरठास पाहीं
दुजी न सोडी परि केधवां ही ! १०
जशी नदी सान हि सागराला
हळूच नेई तरि वाहकाला
तशी सुविद्या हलक्या नराला
क्षणांत नेते नृप–मंदिराला ११
करी जरी काव्य रसाळ एक
अनार्य ही मान्य तरी विलोक !

धरी जरी भिक्षुक इक्षु हातीं
उणी न होते रसमाधुरी ती ११
सुकाव्यमाधुर्य कळे कवीला
तसे कळेना दुसऱ्या नराला
सुवर्णकाराविण अन्य जाती
न जाणती कंकणाचित्रता ती १३
कवी बुडी स्फूर्तिजलांत देती
नमीन त्या मानस मी स्वचित्तीं
मराळ पक्ष्यांसम जेथ हो तीं
समग्र चौदा भुवनें रहाती १४
सदूषणा दोष नसून साजे
सुकोमला ही स खरा विराजे
अशी रची रम्य कथा तयाला
करीन मी वंदन वाल्मिकीला १५
दुजा विधाता ह्मणती कवींत
नमीन मी व्यासपदा मनांत
सुजन्म देई विधि भारतांला
रचीतसे व्यास हि भारताला १६
कवींत येई वर कालिदास
तशीच संज्ञा मिळते दुजास
पदार्थ अद्री हि अणू हि आहे
तरी हि साम्या न तयांस पाहें १७
गुणांप्रती पंडित नित्य घेती
तसेच दोषांप्रति मूर्ख घेती
ह्मणूनियां मूर्खशतांत एक
न जाणता लाभतसे विलोक १८

अभाव जेथें वर पंडितांचा
सुबंध अल्पज्ञहि तेथ साचा
असे तरूंचा बहु जेथ तोटा
लहान एरंडच तेथ मोठा १९
कुलीं जरी जन्म विशाल ज्याला
तरी न विद्येविण मान त्याला
कुलीं जरी हीन हि जन्म होई
मिळेल विद्या तरि देव गाई २०
शुभाशुभा उक्तिस आयकोनी
गुणांस घ्यावें बहुधा बुधांनीं
जलास टाकून पयास घेई
जसा मुखें हंस सदैव पाहीं २१
मुळीं जया बुद्धि नसे सहाय
तयाप्रती शास्त्र करील काय
जयाप्रती नेत्र न पाहण्याला
करी तरी दर्पण काय त्याला २२
शमे सुशास्त्रें मद शाहण्यांचा
शमे न तेणें परि दुर्जनांचा
मनुष्यनेत्रां रवि तेज देतो
उलूकनेत्रां परि आंध्य दे तो २३
नमीतसे वैद्यवरा तुह्मां हा
तुह्मी यमाचे जणुं बंधु आहां
हरीतसे मात्र जिवास काळ
तुह्मी धना आणि जिवा खुशाल ! २४
बघूनिया प्रज्वलिता चितेला
भिषग्वरा विस्मय फार झाला

वाल्मीकि रामायण सटीक (संस्कृत) हा ग्रंथ पुस्तक रूपानें दोन भागांत छापून तयार आहे. प्रत्येक भाग उत्तम रंगीत कापडानें बांधिला असून वर सोनेरी नांवें वगैरे सुंदर रीतीनें छापिले आहेत. किंमत रु. ८ ट. ह. ०१४

कथासरित्सागरः--सोमदेवकृत (संस्कृत) हा संपूर्ण ग्रंथ पुस्तक रूपानें छापिला असून उत्तम रंगीत कापडानें बांधिला आहे. किंमत ६ रु. ट. ह. ०८.

स्त्रीगीतः--जुन्या व नव्या दोन्ही पक्षांच्या मंडळींतील स्त्रियांस गावयास योग्य अशी गाणीं ह्या पुस्तकांत नवीन रचून घातलीं आहेत भाषा स्त्रियांस समजण्या जोगी आहे. व आंत सुंदर चित्रें आणि उखाणे आहेत. किंमत ०३ ट. ह. ००१.

कादंबरी कथासार--किंमत ०२ ट. ह. ००१.

वासवदत्ता कथासार--किंमत ०१ ट. ह. ००१.

मुद्रा राक्षस कथासार--किंमत ०२ ट. ह. ००१

हीं सर्व पुस्तकें खालील ठिकाणीं मिळतील.

जावजी दादाजी.

" निर्णयसागर " छापखान्याचे मालक--मुंबई.

मुलें सशक्त करा !

बाळ संजीवनामृत.

फक्त मुलांकरितांच. ओक, आंव, अतिसार, खरूज, दमा, खोकला, फेंपरें, माती खाण्याची संवई, दुधापासून आलेली पांढुरकी, आंगावरील फोड, आईपासून होणारे व्याधी, जंत, डबा, हे सर्व रोग नाहींसे होऊन मुलें सशक्त होतात. जास्त माहिती बाटलीवरोवर. बा. किं. ०१२ बं. क. ०४ वंगी नाटपेड.

केंस वाढण्यास रामबाण सुगंधिक तेल.

केंस--वाढतात, पुन्हां येतात, काळे तुळतुळीत रहातात. उष्ण होत नाहीं. नेहमीं सुवास रहातो. टक्कल भरतें. स्त्रियांच्या हो

क्यावर टक्कल पडतें, तें या तेलानें भरून येईल. शोकीन लोकांस आनंद देणारें आहे. बा. किं. ॥१२ वं. क. ॥४. बंगी नाटपेड.

# शरम ठेऊन–रोग वाढवूं नका !

# परम्यावर गोळ्या.

पू, रक्त्या, परमा, तिडीक, कंडू त्वरित नाहिंसा होतो. किंतीही जुना अगर नवा असला तरी हटकून गुण. आळस केल्यानें परिणामीं हा रोग नुकसान करितो. डबींत गोळ्या २० किं. ॥१०. वं. क. ॥२ बंगी नाटपेड. जास्त माहिती–औषधा सोबत.

**गजकर्णाला वस्ताद दवा किं. ॥४**

**एतद्देशीय तापावर पुड्या ३ किं. ॥७.**

**दांतवण–दांत मजबूत करा. किं. ॥९.**

हीं तीन्हीं औषधें अमोल्यगुणकारक आहेत. जास्त माहिती–विनामा–किंवा औषधा बरोबर.

म्यानेजर.

न्यू इंग्लिश मेडिकल युनियन्. कॉव्हेल स्ट्रीट–रामवाडी–मुंबई.

# जाहिरात.

सर्व लोकांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं, जळगांव येथे आमचा पूर्वीचा शिळा प्रेस असून हल्लीं आह्मी टाईपाचा प्रेस आणविला आहे. यावर कोणतेही प्रकारचे फार्म वगैरे फारच सुबक आणि स्वस्त दरानें छापून देण्याचें करूं. तसेंच शिळा प्रेसवरही काम सुरेख आणि माफक किंमत घेऊन छापून देऊं. चित्रांचें अगर मोठ्या अक्षराच्या जाहिराती यांचें काम आमचेकडे शिळा प्रेसावर फारच उत्कृष्ट तयार होतें. तैलपानपत्रांवर नोटिसा आणि जाहिराती स्वस्त दरांत छापल्या जातात.

विनायक रामचंद्र पुराणिक–म्यानेजर.

" बावजी प्रिंटिंग प्रेस " जळगांव

# काव्यरत्नावली.

( मासिक पुस्तक. )

पुस्तक २ रें. ] एप्रिल सन १८८२ [ अंक २३ वा

त एव पदविन्यासास्त एवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥



जळगांव—खान्देश येथें
छापून प्रसिद्ध होतें.

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हांशिलासुद्धां दीड रुपया.

जळगांव "बापजी प्रिंटिंग" प्रेस.

## अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | कृष्णाकुमारी. | १ |
| २ | शंकरसागरसाम्य. | ८ |
| ३ | दीनपत्नि. | १० |
| ४ | सुभाषितावली. | १२ |
| ५ | धन्यनग. | १४ |
| ६ | पद्यमंजूषा. | १५ |
| ७ | सापत्नमत्सरभाव. | ✽१३ |
| ८ | सुरतरंगिणी. | ✽१ |


✽ ह्या काव्यांचा पृष्ठानुक्रम निराळा आहे.


# जाहिराती.

**श्रीधरकृत पांडवप्रताप किंमत ४ रु. ट. ह. ८१४.**

**श्रीधरकृत रामविजय किंमत ३ ट. ह. ८१४.**

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, थोडे बहुत शिकलेल्या लोकांस व स्त्रियांसही वरील दोन्ही ग्रंथ वाचण्याची उत्कंठा होत असते. परंतु ग्रंथांत शब्द वेगळे वेगळे नसल्यामुळें कोठें कोठें अर्थाचा अनर्थही होतो. असा अनर्थ न व्हावा ह्मणून शब्द वेगळे वेगळे तोडून आणि कठीण शब्दांवर अर्थ बोधक टीपा देऊन ते ग्रंथ आह्मी मोठ्या टाईपांनीं जाड्या कागदावर सुंदर चित्रांसह छापिले आहेत. हे ग्रंथ आपल्या घरांत फार वर्षे रहावे व वाचतांना डोळ्यांस त्रास पडूं नये व अर्थ ही चांगला समजावा अशी इच्छा असेल त्यांनीं हे ग्रंथ घ्यावे ह्मणजे त्यांस फार सोईवार पडतील. ज्या कोणास नमुना पाहणें असेल त्यांनीं आह्मास पत्र पाठविलें असतां पाठवितां येईल.

[library stamp]

# काव्यरत्नावली.

## अंक २३.

## कृष्णाकुमारी.

( जयपुरचा राजा जगत्सिंग याजकडे एक दीन क्षुधार्त विप्र येतो व भिक्षा मागून संतुष्ट होऊन त्याच्यापाशीं कृष्णेच्या गुणरूपसंपदेचें वर्णन करतो. )

### आर्या.

होता जयपुरनगरीं १महित जगत्सिंग भूप या नांवें
सद्वर्तना तयाच्या लोकांनीं फार फार वानावें १
व्यसननिमग्न जनाला नृपति करी यत्न उद्धरायातें
सत्कृति ऐशी दे यश अतिदुर्लभ विपुल शुद्ध रायातें २
तावाऐसें रक्षी ह्मणुनी संतुष्ट सर्व यश गाती
झाली प्रजाजनाची इच्छादेवी तयास वशगा ती ३
औदार्यवृत्ति सेवुनि रायें त्या विमल पुण्य सांचविलें
आश्रयहीन जनाला देउनि धनधान्यवसन वांचविलें ४
हर्षें भजती त्यातें भिन्नरुचि श्रीसरस्वती नित्य
स्वाभाविकनिजवैरा तत्सहवासेंचि विसरल्या सत्य ५
बुध वर्णिती तयातें कीं ऐसा निश्चयी न आढळला
मोठ्या दारुण समयीं निजवचनाला न लेश ही ढळला ६
जयपुरपालक ऐसा बसला असतां सभेंत, ये २दून.

---

१ प्रसिद्ध २ विव्हल झालेला

आक्रोश करी मोठा दुःखें करुणस्वरें निवेदन ७
प्रभुला नमन करोनी तो खिन्नवदन अतिथि उभा राहे
प्रार्थी " ऐकावें मम वृत्त नृपा ! दुःखवनकुठारा ! हे ८

# श्लोक.

दीनाढ्या ! परिसोनिया गृहिं तुझें औदार्य मी धांवलों
दारिद्र्याग्निसुताप आज वरुषें बारा खरें पावलों
माता पंगु सुवृद्ध, अंध गृहिणी, बालें लहानी सहा
मध्यान्हीं जगतीपते ! मज सदा तीं गांजिताती पहा ९

नाहीं अन्न घरांत भूप ! ह्मणुनी मत्बालकें वाळलीं
त्यांच्या पोषणसाधनार्थ सदया ! ही वृत्ति मी सेविली
गेले प्राण जरी प्रवास करितां जावोत ते एकदां
वत्सांचा परि ना विलाप सहसा मत्कार्णि यावा कदां १०

मायामोह पहा अनावर असे, त्यांच्यामुळें हिंडतों
संसारीं बहु दुःख होय, परि त्यां कांहीं न मी मोजितों
तातें प्राणविसर्जना करुनिया शोकार्णवीं लोटिलें
तें हीं दुःसह दुःख धैर्य धरुनी राजर्षभा ! सोसिलें ११

गेला तात सुरालयास ह्मणुनी आकांत मोठा घडे
माता दीन अनाथ होउनि नृपा ! शोकाब्धिमाजी बुडे
ये ऐसा मज वीट, जीवित नको, कोणास हें आवडे
ईशेच्छा अनुलंघ्य जाणुनि इथें आहों खरें बापुडे १२

तातें जधीं बा त्यजिलें तियेला
तत्धैर्यसिन्धू तइं लुप्त झाला
माझ्यावरी ठेउनि लोभ भारी
दुःसह्य दुःखें रडते बिचारी १३

दुःखावस्थिति ही नृपाल ! हृदया झोंबोनि गेल्यामुळें
बाष्पें ढाळुनि भूतलीं, उदक हें नेत्रांतलें आटलें
ताताच्या मरणें कधीं अजुन ही ये पूर शोकार्णवा,
नाहीं अर्थ रडोनि, अल्प तरि ये ऐशी दशा मानवा १४
शोकाचें अतितीक्ष्ण शल्य हृदया लागोनिया विव्हल
होवोनी नरनाथ ! मी बरळतों जें ये मुखीं केवळ
युक्तायुक्त विचार तो नच कळे, राहे न कीं भान तें
शोकावर्त निमग्न होउनि पहा मच्चित्त हें भोंवतें १५
या संसार सुखांत पुत्रसुख हें मी आद्यसें लक्षितों
त्याच्याहूनि विशिष्ट अन्य न असे ऐसें सदां मानितों
त्यांचें पोट भरावयास न शकें, याश्वा ह्मणोनी अशी
सेवावी मज लागली, न समजे माध्यान्ह जाई कशी १६
मी येथें परि जीव सर्व तिकडे हे भूपते ! गुंतला
मायापाश कसा दुरत्यय महा तो ज्ञात आहे तुला
बा ! मेघा ! घनवृष्टिनें अधनतातापास या नाशवी
प्रार्थी चातक या पराङ्मुख न तूं रुष्टें मनें घालवी १७
केले पूरितकाम याचक तुवां लक्षावधी राजया !
येवो दीन अनाथ मी द्विज, तुला माझी समर्था ! दया
दे दे दे धनधान्यवस्त्र मज दे, जें दुःख अन्ताप्रती
देवो दीन हुवा तुला इह, परीं लोकीं सुख श्रीपती १८
रोगग्रस्त अनाथ पामर असे बा ! आश्रया पावती
आतिथ्यादर पाहुनि तव गृहीं, गाती तुझी ते स्तुती
पात्रीं दान करोनि होशि गमतें, भूपाच ह्या भूमिला
होवो त्वन्मन आज आर्द्र नृपते ! तारावयाला मला" १९

ऐकोनि दीनवचना प्रभु दीनबंधू
हेलावला तइं दयारससारसिन्धु

देई द्विजा वसनधान्यधनास फार
आनन्दवृत्ति वदनीं खुलली अपार २०

## आर्या.

हें देखतांचि भूपें होउनि संतुष्ट पाहुनी फिरुनी
पुसिलें तयास जें तें परिसाया योग्य कुतुहला धरुनी २१
द्विजवर्या ! तव आशा झाली कीं पूर्ण, राहिली शेष
मागोनि इष्ट घ्या हो ! संकोच धरूं नकाचि लवलेश " २२
भूपाश जाणुनीया पाहुनि पुनरपि तयास अनुरागें
मार्गस्थ वृत्त सारें नरपति कुतुकें पुसावया लागे २३

## श्लोक.

" आलां कोठुनि ? देश कोण तुमचा ? कोणीकडे चाललां
कोठें काय विलोकिलें ? नवल तें, सांगा अहो कीं मला
आहे दुःखपद प्रवास परि तो दावी विचित्रें किती
तीं चित्ता रसिकांचिया वितरती आनन्द, नाहीं मिती " २४
" राजा ! जीव मुलांकडे तरि तुझी आज्ञा ह्मणूनी जरा
थांबोनी तुज एक गोष्ट कथितों ऐकें कृपासागरा !
निर्वाहार्थ अनेक देश फिरलों मेवाड ही पाहिला
तेथें भीमकराज राज्य करतो, तें वर्णवेना मला २५

सारी प्रजा निज पिताच तयास मानी
अन्याय शब्द हि पडे न कदापि कानीं
विश्वेश्वरा स्मरुनिया जन वागताती
वर्णूं किती विविध जें सुख भोगिताती २६

गाई व्याघ्र अजा अशीं सकलही एके स्थळीं नांदती
नाहीं वैर तयास ठाऊक कसें ? स्वच्छंद त्यांची स्थिती

विश्रामार्थ अनेक सुन्दर अशीं तेथें स्थलें निर्मिलीं
ती त्याची नगरी सुरम्यसदना यक्षेन्द्रभू भासली २७
राजा धीर उदार शूर रसिक ज्ञाता महात्मा तसा
सार्वी नित्य निज प्रजाहित ह्मणें या ब्राह्मणातें बसा
सत्कारी, नृप ! विश्वपालभजनीं रंगे तयाची मती
पाहोनी रिपु कांपती थरथरां, पायां पडों लागती २८
द्वारीं प्रभो ! अमित याचक तृप्त होती
आशीर्विचा मग तया नृपतीस देती
तो त्यांजला कलियुगांतिल कर्ण वाटे
देशांत तद्यश नृपाल ! असोनि दाटे २९
त्याची भार्या प्रियकर सती सुज्ञ लावण्यखाणी
पातिव्रत्याविण न दुसरी गोष्ट चित्तांत आणी
कृष्णा कन्या अनुपम तिला जाहलें एक रत्न
ऐके भूपा ! टवटवीत हें पुष्प आहे अलून ३०
वाणी ऐकुनि सारिका निजमनीं आश्चर्य कीं मानिती
पाहोनी नयन तशाच हरिणी खेदाप्रती पावती
आहा ! तद्गति लाजवी क्षणभरी ऐरावतीच्या गति
ज्याचें दैव विशाल होइल खरा तो भीमजेचा पती ३१
ओष्ठाची विशदप्रभा सुतनुच्या सद्विद्रुमा भूषवी
दंताची सुषमा खरें नरपते ! रत्नप्रभे लाजवी
तन्वीची कटि पाहुनी मृगपती राहे वनाभ्यंतरीं
जाणों त्या मृगपास वैभव तिचें साहे न तें अन्तरीं ३२
तारुण्यांकूर तीच्या उगवति रुचिरीं कोमलांगीं मनोज्ञ
सौंदर्याची सुरेख छवि तइं विलसे, मोहवी चित्त कां न
हेमाच्या वल्लरीला फिरफिरुनि जरी पाहिलें दीर्घ काळ
नेत्रांची तृप्ति नोहे, कथनिं मज श्रमे जाहला फार वेळ ३३

पुष्पानीं पल्लवानीं नव रुचिर खुले वल्लि उद्यानिं जेवीं
रूपानें यौवनानें अकपटमधुरें भीमकन्याहि तेवीं
भूषावृध्यर्थ भूपा । किमपि न सजवी भूषणानीं वपूला
जात्या जें रम्य आहे, गरज खचित ना मण्डनाची तयाला ३४
शुभांगी ती १आसेचनक समजें कीं नृपवरा ।
तिच्या पाणी खेळे नयनिं सुभगा हालवि जरा
तदा तीरा हाणी, अचुक हृदयीं घाव बसतो
अहा तल्लीलेतें वदुं किति तरी, वेळ पळतो ३५
राया । मार्गीं सहज फिरतां एकदां मित्रसंगीं
प्रासादाच्या अवनिपतिच्या चन्द्रशालान्तरंगीं
त्या तन्वीला बघुनि मजला चंचला वारिदाला
टाकोनी, ये नृपतिसदनीं वाटलें राहण्याला ३६
तारा जणूं सजवनीं नृपाच्या
राहे, तया मानवरूपवाचा
वाटे विकास उपकारिकेंत
तारुण्यतेजें चमके जनांत ३७
स्मरभरें नरपालकुमारिका
विकसली जणुं ती नवमालिका
टवटवी मुखिं शोभतसे पहा
ललित सौम्य मनोज्ञ दिसे अहा ! ३८

## साक्या.

अनुपम रूपा पाहुनि तीच्या देवातें नवसावें
प्राप्त करोनी घ्यावी रमणी स्वस्थ तुवां न बसावें ३९

---

१ अपूर्व सौंदर्य.

फिरलों बहु परि ऐसें नाहीं दृष्टिस कोठें पडलें
रत्न कोठुनी न कळे कैसें भीमातें सांपडलें ४०

## श्लोक.

राया ! प्रवासीं ललना अनेक
म्यां देखिल्या त्यांत असे न एक
मनोहरा सुंदररूप अन्या
हिच्या परी, प्राप्त न हो त्वदन्या ४१
पूर्वी पुराणीं कवि ज्या अनेक
देवांगना वर्णिति एक एक
हीच्या स्वरूपीं सर नाहिं त्यांस
आली नृपा ! मद्वच जाण खास ४२
ऐकोनी नृप ! रूपवर्णन किती चित्तामधें गुंगलें
कोणी ती श्रमसाध्य मानुनि मनीं आशाभरें रंगलें
कोणी तद्विरहें सुजाण असतां वेडे जहाले पहा
कामाचे बहुरंग चित्र दिसती लोकांमधें हे अहा । ४३
राया ! तुला ती रमणी मिळावी
वाटे तुझीया पदरीं पडावी
तत्संगयोगें तुज लाभ व्हावा
दीनावरी लोभ तुझा असावा ४४
विप्रोक्ति ही जयपुराधिप ऐकुनीया
बोले तया स्मितमुखें अवलोकुनीया
"बोला अहो द्विजवरा मज इष्ट सांगा
जे वांछिती सतत अंतरिं तेंचि मागा ४५
आनन्दलें मन अहो तुमच्या कथनें
तीच्याहुनी अधिक रम्य न कांहिं जाणें

पुष्पानीं पल्लवानीं नव रुचिर खुले वल्लि उद्यानिं जेवीं
रूपानें यौवनानें अकपटमधुरें भीमकन्याहि तेवीं
भूषावृथ्यर्थ भूपा! किमपि न सजवी भूषणानीं वपूला
जात्या जें रम्य आहे, गरज खचित ना मण्डनाची तयाला ३४
शुभांगी ती १आसेचनक समजें कीं नृपवरा!
तिच्या पाणी खेळे नयनिं सुभगा हालवि जरा
तदा तीरा हाणी, अचुक हृदयीं घाव बसतो
अहा तल्लीलेतें वदुं किति तरी, वेळ पळतो ३५
राया! मार्गीं सहज फिरतां एकदां मित्रसंगीं
प्रासादाच्या अवनिपतिच्या चन्द्रशालान्तरंगीं
त्या तन्वीला बघुनि मजला चंचला वारिदाला
टाकोनी, ये नृपतिसदनीं वाटलें राहण्याला ३६
तारा जणूं सेजवनीं नृपाच्या
राहे, तया मानवरूपवाचा
वाटे विकास उपकारिकेंत
तारुण्यतेजें चमके जनांत ३७
स्मरभरें नरपालकुमारिका
विकसली जणुं ती नवमालिका
टवटवी मुखिं शोभतसे पहा
ललित सौम्य मनोज्ञ दिसे अहा! ३८

## साक्या.

अनुपम रूपा पाहुनि तीच्या देवातें नवसावें
प्राप्त करोनी घ्यावी रमणी स्वस्थ तुवां न बसावें ३९

---

१ अपूर्व सौंदर्य.

फिरलों बहु परि ऐसें नाहीं दृष्टिस कोठें पडलें
रत्न कोठुनी न कळे कैसें भीमातें सांपडलें ४०

## श्लोक.

राया ! प्रवासीं ललना अनेक
म्यां देखिल्या त्यांत असे न एक
मनोहरा सुंदररूप अन्या
हिच्या परी, प्राप्त न हो त्वदन्या ४१
पूर्वीं पुराणीं कवि ज्या अनेक
देवांगना वर्णिति एक एक
हीच्या स्वरूपीं सर नाहिं त्यांस
आली नृपा ! मद्वच जाण खास ४२
ऐकोनी नृप ! रूपवर्णन किती चित्तामधें गुंगलें
कोणी ती श्रमसाध्य मानुनि मनीं आशाभरें रंगलें
कोणी तद्विरहें सुजाण असतां वेडे जहाले पहा
कामाचे बहुरंग चित्र दिसती लोकांमधें हे अहा ! ४३
राया ! तुला ती रमणी मिळावी
वाटे तुझीया पदरीं पडावी
तत्संगयोगें तुज लाभ व्हावा
दीनावरी लोभ तुझा असावा ४४
विप्रोक्ति ही जयपुराधिप ऐकुनीया
बोले तया स्मितमुखें अवलोकुनीया
"बोला अहो द्विजवरा मज इष्ट सांगा
जे वांछिती सतत अंतरिं तेंचि मागा ४५
आनन्दलें मन अहो तुमच्या कथेनें
तीच्याहुनी अधिक रम्य न कांहिं जाणें

दारिद्र्यदुःखलय होइल आज सुज्ञा !
देतों अशी त्वरित हो द्विजराज ! आज्ञा !" ४६

## साकी.

यापरि भाषण होउनि गेला याचक अन्य गृहाला
ऐका कैसा भूपति तेव्हां कामें व्याकुळ झाला ४७

---

# शंकर–सागर साम्य

( केशवराव पेठे. )

## आर्या.

शंकर सागर यांची मैत्री समता व निकट सोयरिक
वर्णितसें परि बुध हो क्षमा करा जरि घडेल आगळिक १
शंकर तापट भारी वातकुपित उदधि ही तयासम हा
शंकर भस्म शरीरीं वागवितो, धवल फेन सिंधु पहा २
संहारक हे दोघे दोघां जवळी [1]भुतें बहुत वसती
दोघे गम्भीराशय दोघांची ही कळे न उत्पत्ती ३
करि सिंहनाद शंकर तापे कोपें बहुत हो जेव्हां
गर्जे फार तुफानीं सागर भयकर दिसे जना तेव्हां ४
शिवहृदयीं कोपानल वडवानल सागरांत सतत वसे
शिवतप अगाध तेवीं सागरतलभाग नच नरां [2]गवसे ५

---

१ पिशाच्चें पक्षीं उत्पन्न झालेले पदार्थ २ येथें समुद्राची खोली घ्यावयाची नव्हे तर समुद्राच्या तळीं जे चमत्कारिक अनंत प्राणी, वनस्पती, इ० सांपडतात त्यांकडे लक्ष आहे.

प्रतिदिनिं शंकर लावी नूत चिताभस्म आपुल्या देहा
तापस सागर त्यासम नररक्षा १नित्य लाभतो पाहा ६
शंकर सागर दोघे असति दिगंबर विशाल तनुधारी
तो नीलकंठ शंकर आहे हें नीलवर्ण निधि–वारी ७
हृदयांतिल मावळती कोपलहरि शंभु तेधवां साधा
सागर तुफान सरतां दिसतो बहु सौम्य न करितो बाधा ८
उदधींतून निघालें गरल तया सांब ठेवि निज जठरीं
ठेवी यास्तव निधि हा शिवकोपानलच वाडवा उदरीं ९
गंगावनिता वागवि शिव निज शीर्षावरी सुखें सतत
जलनिधि पहा तयासम २तरणीक्रीडिमधें असे रमत १०
३पर्वतकन्या सुंदर वरिती शंकर व सागर सुखानें
हे सम समान साडू नच वर्णवती मला निज मुखानें ११
शंकर हिमाचलावरि नांदे श्वशुरालयींच आजवरी
जों परशुराम पळवी दूर तंवरि उदधि ४सह्यवास करी १२
लक्ष्मी दुहिता अर्पी शिव बांधव विष्णुला उदधिराजा
श्वशुरालयीं न कां तो रमेल जरि फांकडी मिळे भाजा १३
शंकरगलीं वसति ज्या ५पन्नगतति खुलवितात शिवतनुला
निधिच्या गळीं पडतिया भूषविती ६आपगावली निधिला १४
निधिसुत विधु बहु सुंदर शंकर रक्षीतसे सदां भाळीं
त्र्यंबकजटोद्भवा ती गंगा निधि निकट नित्य सांभाळी १५

---

१ मनुष्यें जाळून त्यांची राख समुद्रांत उडवितात ती राख समुद्रास बहुतकरून नेहमी मिळते. २ समुद्रावरून नावा चालतात तिकडे लक्ष. ३ पार्वती पक्षीं नद्या. ४ सह्य पर्वत हा समुद्राचा सासरा. ५ सर्पपंक्ति. ६ नद्यांचा समुदाय.

निधिसुत शंख अजागल शिवसुत तो वक्रतुंड एकरद
तरिच रडे निधि संतत मानी शिव १मृतवनांत आनंद १६
शंकराशिरीं विराजे कृष्णधवलवर्णयुत जटाभार
आकाशांत निधिशिरीं दिसति तयासम ढगें मज अपार १७
अनुसूयासुत झाला अभ्युदरज शिव असे, असें ह्मणतों
श्रीघटजमुनी ज्याला प्राशुनिया पुनरपी पहा निधि तो १८
कल्पांतकालसमयीं खवळे नाशावयास जग रुद्र
त्याचें साह्य कराया निज नैष्ठुर्यास दाखवि समुद्र १९
रुद्रसमुद्रस्तुतिला वर्णाया कोणता कवि टिकेल
२नारीकेल निधीला अर्पी हित साधण्या शिवा वेल २०

---

## दीन पत्नि.

( विठ्ठल भगवंत लेंभे. )

## साक्या.

नाहीं आला जिवलग अझुनी, शिणलें वाट बघोनी
हळुं हळुं जरि हा जाय चंद्रमा क्षितिजा ओलांडोनी १
नाहीं नाहीं निष्ठुर झालें ऐसें तन्मन मागें
खळखळ खळखळ अश्रु गळति हें कोण तयाला सांगे २
नगरामाजीं मित्रांसह तो धूम उडवितां; त्यातें—
स्मरण नसे हीं या बाळाचें, कोण पुसे मग मातें ३
वाटे, येइल कठोर वचनें बोलुनि रडवुनि मातें

---

१ स्मशानांत २ नारळ.

प्रेमें चुंबुनि, हलवुनि उठविल निद्रित मम बालातें ४
त्याच्या कोमल आक्रोशातें मिळतिल अश्रुहि माझे
दुःख सुखाचे एके समयीं खुलतिल तैं दरवाजे ५
जरि दुःखाचे डोंगर मजवरि कोसळले दुर्दैवें
तरि या चिमण्या बघतां माझें प्रेमळ हृदय विसावे ६
चिमणे डोळे झांकुनि कैसें निजलें बाळक माझें
निद्रेमाजी वरि वरि हसतां कोमल मुख हें साजे ७
प्राणसख्याचें होतें मजवरि, अतुल प्रेमचि मागें
अढी कपाळा आतां घालुनि तोचि बघतसे रागें ८
निजलें जाणुनि हळुंच उठुनियां चोरुनि गेला नाथ
प्रिय दयिताविण बाइ सुनी ही दिसते शय्या येथ ९
वारवधूचें प्रेम जळों तें कुसुमाचि विषवल्लिचें
लोलुप व्हावें तेथें मानस माझ्या ह्या मधुपाचें १०
द्वेष तयाचा करुं मीं ? अंबे ! बुद्धि न ऐशी देई
सुखी असो तो छळो छळिल जरि सोशिन मोदें बाई ११
आनंदाच्या शिखरावरुनी लोटियलें जरि वांया
कोण तयाविण करील पुनरपि पूर्ण कृपेची छाया १२
प्रेम बहुतचि अन्योन्यावरि होतें; दिवस अहा ! ते—
आनंदाचे झरझर गेले, ठावे ह्या हृदयातें १३
उत्कंठा ही उपजे अझुनी, सुहास्यमुख तें त्याचें
देखावें; मी कैसें विसरूं, विलासते प्रणयाचे १४
धिक्कारुनि मज तीक्ष्ण विषारी भाले टोंचुनि माझें—
हृदय विदारिल, सुखें विदारो, पति, अबलांचे राजे १५
अपराधी मी नाहीं जाणुनि शांतपणें बहु ऐशीं—
दुःखें सोशिन, परि बाळावरि निष्ठुरता ही कैशी ? १६

या विश्वासु प्रियदयितेचा केला जरि अव्हेर
येतां दुखणें दयिता अवघ्या रांडा होतिल दूर १७
त्यासमयीं हें सदय हृदय बहु कळकळुनी तव सेवा
ही करिल जल वारिवारि नयनीं प्रेमें आणुनि देवा १८
दीन मतीची किम्मत तुजला कळोनि येइल जेव्हां
पाणी नयनीं येइल, बोचिल तुझेंचि मन तुज तेव्हां १९

---

# सुभाषितावली.

( दण्डीकृत. )

## श्लोक.

वाहीन चिंता जरि मी प्रियेची
मातें न आशा मग जीविताची;
वांचेन मी आठवितां न तीतें
वाटे वृथा तें जगणेंच मातें १
नेत्रें जरी ती मजला निरीक्षी
माझें तरी चित्त हरी मृगाक्षी
देतों जरी मी हृदयास तीतें
होतो तरी मन्मथताप मातें २
‘ सौंदर्य जेथें गुण राहताती ’
भासे कवीची मज फोल उक्ति;
चित्तीं सदा राहुनि चारुगात्री
पीडा वियोगें मज सर्व गात्रीं ३

स्नेहें जरी वरिशि दीप भुलोनि त्यातें
तूं तच्छठत्व मनिं नेणसि, अल्प, वाते !
हा दीप उज्वल अती तरि ही पुकार,
स्पर्शी न वस्तु उपभुक्त पुन्हां चुकार ४
हो पावका विनत टाकुनि धूम सारा,
कां सत्वरें भडकशी अवरी पसारा,
ज्याते प्रियाविरहवन्हि न अल्प बाधे
तेथें प्रयत्न करुनी तुज काय लाधे ? ५
माझा पती चतुर फार असे सखी गे
ज्याचें न अक्षर दुजास कदापि लागे;
त्याहूनिहीं मम पती चतुरस्त्र आहे,
ज्यातें निजाक्षर पराक्षर भासताहे ६
ससंारकानन भयानक भासताहे,
तैसें शरीरगृह छिद्रिव दीसताहे;
ठाके सदा निकट काल वलिष्ट चोर;
दाटे निशा तशिच मोहभरें अपार; ७
तूं ज्ञानखड्ग करिं घेउनि शांति ढाल
लेवोनि शलिकवचा जरि राहशील
जागा सदा, तरि सुसत्वर पाहशील
बा, पैलतीर, मग तूं सुख भोगशील ८
भूमंडलीं अखिल ब्रह्मचि नांदताहे
ब्रह्माशिवाय मजला परभाव नोहे:
जारावरी निज पतीवरि तुल्यभाव
ठेवीं तरी असति कां मज निंद्य नांव ? ९

# धन्यनर.

( कोणीएक कवि. )

## श्लोक.

हें दुःख हें सुख न भाव कळे जयाला
मानापमान गमतो सम ज्या नराला
आशा न तेंवि सुख दुःखहि दे जयाला
तो एक धन्यनर भूषण भूतलाला १
द्रव्यास ज्यास अणुमात्र न संपदेचा
होईन ताप लव यास्तव आपदेचा
या कारणें उभयता शिवती न ज्याला
तो एक धन्यनर भूषण भूतलाला २
ज्याला महत्त्व पदवी धन वैभवाची
वांच्छा कदापि अपवित्र न लेश जाची
सर्वत्रही दिसतसे समता जयाला
तो एक धन्यनर भूषण भूतलाला ३
रानीं सुगंध नगरींहि तसाच देती
पुष्पें सुवास सम वृत्ति अशी धरीती
ज्याच्या दिसे उचितही उपमा मनाला
तो एक धन्यनर भूषण भूतलाला ४
ज्याची कधीं अचल वृत्ति न भंग पावे
जो दुःख कष्ट सुखसें गणितो स्वभावें
वागे स्मरूनि दिनयामिनि ईश्वराला
तो एक धन्यनर भूषण भूतलाला ५

माता पिता सुत कलत्र असूनि ज्याला
मी एकला मनिं अशा धरि भावनेला
गेली अहंमति विरक्तपणें लयाला
तो एक **धन्यनर** भूषण भूतलाला ६
जो प्राणधारण करी न सुखोपभोगे
घ्याया असे सतत वर्तन वीत राग
लोकीं वसूनिहि सदैव असे निराळा
तो एक **धन्यनर** भूषण भूतलाला ७
ज्याला नसे प्रिय मुळींच जगांत कांहीं
कांहींहि अप्रिय तसेंच जयास नांहीं
भावें सदैव भजतो हृदयीं प्रभूला
तो एक **धन्यनर** भूषण भूतलाला ८

---

# पद्यमंजूषा.

( लक्ष्मण गणेश लेले. )

## श्लोक.

सांगे कुरंगनयने मजलागिं मोठें
हें चौर्यकर्म करण्या शिकलीस कोठें
लांबोनि जागृत नरास कटाक्षपातें
वेडे करोनि दिनिं तन्मन हारिशी तें १
रे रे निर्दय दुर्निवार मदना बाणास या आवरी
खालीं टाकुनि दे धनुष्य अपुलें नोहे कृती ही बरी
आधीं हें वपु फार होरपळतें कांतावियोगाग्निनें

त्याला त्यावरि योग्य बा न दिसतें तीव्रें शरें मारणें २
अगस्ति मुनिनें पहा पिउनि टाकिला एकदा
तसाचि मुरवैरिनें मथुनि नम्र केला सदा
अरे पवनसूनुनें त्वरित लंघिला जो हटें
कुठें वद तवांबुधी मम यशोंबुधी तो कुठें ३

राया प्रतापानल हा त्वदीय,
शोषोनि सप्तार्णव सर्व जाय
पुन्हां करी पूर्ण, सपत्न–कांता—
नेत्रांबुनें ही स्तुति सत्य नाथा ४

करांतिल सुकंकणध्वनि सदा जयांच्या निघे
तसाच पदनूपुरीं श्रुतिस कुंडलें ही बघे
अशा वधु जनांचिया सुमुखसारसाला रवी
स्वतां जणुं पहावया हळुंहळू रथा चालवी ! ५

ज्या माझ्या उरिं हस्तिदंतमुसलेंही चूर्ण कीं जाहली
तेथें तीव्र कपालभृत्परशुची धाराहि ती बोथली
तें आतां उर नारसिंहनखरें तेव्हांचि हो ! फाटतें
दैवाची गति पालटे ह्मणुनि हें होतें असें वाटतें ६

संसारारण्य आहे बहु भययुत पैं, देहगेहास भोंकें
भारी हा चोर काल प्रबल, तमयुता मोहरात्री, हि धोंके
ज्ञानाचा खड्ग घेई करिं मनुज तशी शांतिची ढाल वेगें
शीलातें पांघरोनी कवचसम सदा धीर होवोनि जागे ७

हें चित्त चिंतन करी हरिच्या पदांचें
जें कीं विनाशक असेंचि भवापदाचें
स्त्री पुत्र मित्र धन वैभव मानसा रे
कीं हें अशाश्वतचि या जनिं जाण सारें ८

टाकोनि घातिलि मिठी शिशुच्या गळ्यांत,
बाळा ! न अन्य अपुला जगीं विघ्नहंता,
वारील तोचि विभु संकट साह्य होतां " ८३
ऐसी ही स्थिति पाहतां शशिकला झाली बहू घाबरी,
वत्सा ! " काय करूं, " ह्मणोनि पडली केळी जशी भूवरी !
" नाहीं या जगतांत काय उरला त्राता अह्मांला अतां,
व्हावा कां परिणाम आजि असला या पावकीं तत्वता ? ८४
या या कोणी, अनळ विझवा, वांचवा बाळकातें,
नाहीं आशा मजसि दुसरी, हेंचि द्या आज मातें,
धांवा धांवा, त्वरित दुसरा या जगीं कोण १पाता. !
दैवीं ऐसें लिखित करुनी बैसला कां २विधाता ! ८५
गेलें गेलें, सुख हरपलें, रत्न माझें जगीं या,
कैसें केलें मजसि अगदीं दीन लोकांत राया !
वत्सा ! आतां मदन ह्मणुनी हांक मारूं कुणाला ?
कैसें आलें अवचित विभो ! विघ्न माझ्या मुलाला ? ८६
रक्षूं कशी तुज अतां मजशी सुचेना,
वत्सा ! तुझें मरणदुःखहि पाहवेना !
जाणें घडे त्वरित निश्चित आजि वाटे !
पाहोनि दुःख तव काळिज मात्र फाटे ! ८७

## दिंड्या.

कसा केला हा कोप देवराया !
योग्य नाहीं कां साह्य अह्मां द्याया ?
काय पाहुनि अपराध दंडितोसी ?
दीन आह्मी कां व्यर्थ दुःख देसी ? ८८

---

१ रक्षण करणारा २ ब्रह्मदेव.

करिसि संकटिं दीनांस साह्य, ऐशी
कीर्ति तुझी, मग आज कां न येशी ?
नको पाहूं तूं अंत देवराया !
जवळ आला हा अग्नि खास खाया ! ८९
व्यर्थ उदरीं मम जन्म घेतलासी !
ह्मणुनि तनया ! तूं दुःख भोगितोसी
जरि होतें तव जनन तिच्या पोटीं
ती न लागति मग सत्य तुझ्या पाठीं ९०
मनीं लग्नाची आस तुझ्या बाळा !
तोंचि आलें तव विघ्न हें कपाळा !
दुष्ट सवतीनें करुनि काल कावा !
कृत्य केलें तव जीव ज्यांत जावा " ९१
प्रखर अग्नीचा ताप त्यां न साहे,
करिति निघण्या बहु यत्न, मार्ग नोहे;
सदा नृपसंगें सौख्य भोगणारी
सती लोकां साह्यास हांक मारी ९२
घेइ चुंबन हनु[1] धरुनि, मुला बोले,
" आज सारे मम हेतु लया गेले !
कसा नाथा ! हा कोप तुह्मी केला ?
व्यर्थ बंदीमधिं ठेविलें प्रियांला ! " ९३
असो आशा उरली न तया कांहीं,
दुःख उदरीं नृप भेट मात्र नाहीं,
असें बोलुनि, घेवोनि शिशू अंकीं,
सिद्ध झाली जायास सती नाकीं ! ९४

---

१ हनवटी.

## साक्या.

ऐकुनि हे अग्नीची वार्ता, घाबरला नृप चित्तीं,
हर हर ! होइल काय कळेना, आतां त्यांची १आर्ती ! ९५
धांवुनि आला भूप त्या स्थळीं, ऐकुनि विलाप त्यांचा;
" कैसा निर्दय होउनि केला घात कलत्रें साचा ! ९६
दुष्ट तरुण या भुललों स्त्रीला ! सर्वस्वा मी मुकलों !
कृतघ्न हा मी, पतिव्रतेचा छळ करण्यासि न चुकलों ! ९७
संशय मम मानसिं नच यावा, ह्मणवुनि या दुष्टेनें
प्रेम दाविलें शिशुवर, वदली काल मशीं प्रेमानें ९८
ऐसें बोलुनि यत्न करी नृप अग्निदग्धसदनांत
मुक्त कराया सतीस लोभें कवळाया मदनांत. ९९
" वत्सा ! जाशी त्यजुनि आजि मज विष्णुपुरीं सुखधामा
पावूं कैसा २कृष्णमुखें मी जगीं या सुख विश्रामा ! १००

## श्लोक.

वार्ता क्षणांत नगरीं पसरोनि गेली,
साह्यास धांवति भले जन त्याचि काळीं,
पाहोनि माय शिशुची स्थिति, शोक लोकां
होवोनि, साह्य करण्यास्तव देति हांका १०१
आल्या स्त्रिया, पुरुष, टाकुनि तान्हि पोरें,
आणोनिया उदक घालिति कुंभिं सारे,
काढीयलें करुनि शांत पळांत अग्नी,
येरीति त्या उभयतांसि पहा जनांनीं १०२

---

१ दुःख २ काळ्या तोंडानें.

धांवोनी शिशुनें तदा नृपतिच्या कंठा मिठी घातली,
" कां ताता ! अमुच्यावरी अवकृपा झाली बरें आपली ?
पाहोनी अपराध काय अपुल्या सांगा मनीं वाटलें ?
कां आह्मांवरि रुष्ट होउनि, अशा कारागृहीं टाकिलें ? १०३

बहुत सद्गद होउनि अंतरीं,
कवळिलें सतिला शिशुला करीं;
" कपट हें कळतें मज तेधवां,
शिणविलें असतें तव कां जिवा ? १०४

## आर्या.

करितां शोध कळे कीं, त्या दुष्टेचेंचि सर्व हें कपट,
" मत्प्रिय जायेस, शिशुस माराया मजसि मोहिलें[१] निपट १०५
परिणाम आज त्याचा हा केला प्रेमकपट दावोनी
परि ईश्वर साह्य खरा, वांचविलीं उभयतां कृपा करुनी. १०६
हनु धरुनि शशिकलेला, बोले सति " मीं तुह्मां वृथा छळिलें,
अपराध हा क्षमा करिं, नयनीं अनुतापबाष्पजल आलें १०७
आणविलें दुष्ट जनां रूपवतीसह तदा समोर नृपें
खालीं करुनि मुखें तीं लज्जित ठेलीं समस्त अनुतापें. १०८
पाहुनि रूपवतीला दीन अशी, शशिकला नृपासि ह्मणे
" झाला अनुताप बहू नलगे शासन हिला दुजें देणें ! १०९
ऐकुनि वच साध्वीचें, राय ह्मणे " धन्य धन्य तूं जाये !
छळिलें जिणें असें तुज, करिसी तिजवर बघोनि कीं माये ११०
शिक्षा यांसि न केली, तरि अन्यायी ह्मणोनि जन मजला
ह्मणतील, कसी साहूं ती अपकीर्ती नको महीत मला ! १११

---

१ खरोखर.

# सुरतरंगिणी.

## प्रसंग पहिला.

( विठ्ठल भगवंत लेंभे. )

### श्लोक.

१भेडा नामक एक पर्वत असे त्या नर्मदेच्या तिरीं
रम्यस्थान असें दुजें न नयनीं देखीयलें भूवरी
२चित्तानंदद धौत धौत गिरिच्या शृंगावरोनी झरे
धों धों धांवत येउनी घुमविती श्रीशंभुचीं मंदिरें १
स्वच्छंदें अतिरम्य गर्द हिरव्या झाडीतुनी तोषदा
आली फोडित शुभ्र अद्रिशिखरें जी स्वैरिणी नर्मदा
झाली केवळ दुग्धसागरचि, ती फेंसाळुनी या स्थलीं
स्वर्गींतलि यशें समस्त हरुनी जाणों जवें चालिली २
वाहे शुभ्र शिळा मधोनि गिरिच्या अत्युच्च रांगांतुनी
सारा तो ३धवल प्रवाह विलसे, अंभीं शिळा ४बिंबुनी
येतां ५नाव हळू हळू गमतसे या भव्य कोटांतरीं
व्यूहीं सांपडलों दरींत पडलों वा खंदकाभीतरीं ३
कोठें ये खडकीं खळाळत, कुठें गंभीर घोषा करी
कोठें ६निम्नजळीं तरंगनिकरीं पुष्पें झणी सावरी
कोठें शुभ्र विशाल रम्य पुलिनामाझारि वाहोनिया
देई स्थान पुरस्त्रियांसि सलिलक्रीडासुखें घ्यावया ४

---

१ प्रसिद्ध भेडाघाट २ चित्तास आनंद देणारे झरे ३ शिळांच्या प्रतिबिंबामुळें सर्व प्रवाह पांढरा दिसत आहे ४ पाण्यांत शुभ्र शिळाचें प्रतिबिंब पडलें होतें ५ नौका ६ खोल पाण्यांत.

नाना कोमल बिल्व,फुल्ल तरुंही ज्या पर्वतीं नांदती
गौरी–शंकर–मंदिरें हळुंच तीं तेथोनि डोकाविती
शोभे दूरवरी प्रचंड सिकता पात्रांतुनी नर्मदा
झाली, नाशुनि पापराशि, सकलां, जी सर्वदा [1]शर्मदा। ५
स्वच्छंदें लहरीवरी फिरुनिया ये, गार वारा सखा
लीलें हालवुनी प्रफुल्ल तरुतें दे सौरभाच्या सुखा
ठायीं ठायिं मयूर नाच करिती एक्या सुरें पांखरें
गाती, होय विलास मंदिरचि हें श्रीनर्मदेचें खरें ६
आनंदें चरतां, बघोनि हिरव्या रानामधें गोधनें
पांवे वाजविती तरूतळवटीं गोपाळ मंजुस्वनें
कोणीं खेळति लोण पाट हुतुतू, कोणीं उड्या मारिती
बाळां खेळ असे अपूर्व, न शिवे ज्यां काळजी वा क्षिती ७
गौरी शंकर दर्शना वरि वरी नारीनरांचीं कुळें
येती, धांवति त्यासवें दडदडा सानंदचित्तें मुलें
मारा रम्य नदिप्रदेश गिरिच्या शृंगावरोनी झणी
पाहातां क्षणिं, तर्जनी [2]हनुवरी त्या ठेविती कामिनी। ८
भेदाया गगनासि जातिल अशा वृक्षावली [3]भोंवतीं
जागोजाग अनंत गार हिरवीं शेतें मधें शोभतीं
पाटाचें जल लाधुनी टवटवी उद्यान रोपांवरी
येई; तेथ जनासि आश्रमपदें आल्हाद देतीं खरी ९
वेदी सारवुनी कुशादि अवघी पूजा झणी मांडिती
कोणी आणुनि वल्कलें मुनिचिया दर्भासनीं ठेविती
कोणी बांधुनि होम धेनुसि तिची सेवा करूं लागती

---

१ कल्याण कारक २ आश्चर्य दर्शक स्त्रियांचें चिन्ह ३ सभोंवतीं वृक्षावली असून मधें शेतें होतीं असा भाव.

नाना आश्रम कन्यका जणुं दिसे सिद्धीच त्या राबती १०
काढाया समिधा पलाश तरुच्या स्कंधीं मुलें वेंघती
कोणी पाठ करीत मंत्र हिरव्या दर्भांकुरां तोडिती
कोणीं तोडित बिल्व आणि कुसुमें हर्षें वनीं हिंडती
उष्णें, म्लान तशींच रक्त वदनें झालीं, न त्याची क्षिती ११
स्वच्छंदें बटु खेळ खेळुनि पुन्हां पारावरी बैसती
आनंदें हरिणें हळूहळु तयां येवोनिया हुंगितीं
त्यांतें प्रेमभरें धरोनि हृदयीं आनंद १ते मानिती
प्रेमावाचुनि शून्य विश्व; न चले प्रेमाविना ही २क्षिती १२
वेदाचे गुरु घोष नित्य निघती सर्वत्र ऋष्याश्रमीं
ब्रह्मानंद तयां सदैव भरला झाले ३भवीं जे श्रमी
नाना तत्व विचार येथ करुनी वेदांतवेत्ते सुधी
गेले ब्रह्मपदीं अखंड तरले लीलें ४भवांभोनिधी १३
गौरी शंकर मंदिरीं दणदणा वाजे नगारा जधीं
" भो विश्वंभर, " पूजनीं, वरिवरी ते गर्जती पुण्यधी
आनंदें उधळोनि ५भद्रकरशीं द्रव्यें, ६सुमें, ७श्रीदळें
शंभूच्या हृदया प्रसन्न करिती ते एक निष्ठाबळें १४
८शीर्षीं दीर्घ जटा कसोनि धरिल्या रुद्राक्षमाळा गळां
सर्वांगाप्रति राख लावुनि फणी लंगोटही लाविला
ऐसे, ९लावुनि ओवऱ्यांतुनि धुन्या, १०वैराग्यशाली किती
संसार त्यजुनी अखंड सुभगा सच्चित्पदा लागती १५
पुष्पें गुंफुनि साजिरीं करुनिया वेणी फणी नेटकी
कंठीं हार तसेच शुभ्र गजरे घालोनिया हस्तकीं

---

१ बटु २ जग ३ संसारांत ४ संसार समुद्र ५ कल्याण कारक ६ फुलें ७ बेल ८ मस्तकीं ९ पेटवून १० बैरागी.

कर्णीं घालुनिया शिरीषकुसुमें नेसोनिया पातळा
येती गौर नितंबिनी हळुंहळूं ज्या कोमळा सोज्वळा १६
न्हाणोनी प्रभुलागि कोमल करीं वाहोनि गंधाक्षता
पूजा सारुनि शुद्ध भाव धरुनी आर्तिक्य ओवाळितां;
एकोनी १करकिंकिणीरवचि, तो होय प्रसन्न प्रभू
२मोळावा उपचार त्यांसि नलगे सौंदर्य ज्यां दे विभू १७
स्वच्छंदें करितां विहार रमणी पुष्पें गळोनी तळीं
मांडे मंगल चूर्ण भूवरि, तयें; सर्वत्र ती रंगली
लीलें झोंकुनि ३अब्जनालवलयें, लावोनि ४नादी स्त्रिया
जातां हंस धरूं, जरा सरकुनी ते चाळवीती तयां १८
चारा घेउनिया करांत, हरिणां, लोभें कुणीं धांववी
कोणी घेउनि, गोड गोड बदरें हस्तीं शुकां खाववी
गाणीं गात सदैव हात पतिच्या खांद्यावरी टाकुनी
आनंदें फिरती, पहात गिरिची शोभा सुरम्या, कुणी १९
लीलें दावुनि वांकुल्या भिवविती, नारी जनां वानरें
टाकोनी, करिच्या फळासि, पतिला आलिंगिती त्या त्वरें
लावोनी फळ वानरासि, पतिला आल्हाद हो ५जाहला
ज्या योगें स्वपरार्थ साधन; कशी खोडी ह्मणावी तिला २०
६अद्रीच्या गुरु गव्हरीं घुमत ये विस्तीर्ण ती नर्मदा
होती चूर्ण ७तरी, इथें, उसळुनी लाटा सदा सर्वदा
वेगें निम्नजळीं सदा गरगरा ते भोंवरे फीरती
वेगें घेउनिया ८तरू, वरिवरी अंभीं बुडो लागती २१

---

१ बांगड्यांचा आवाज २ षोडशोपचारांपैकीं ३ कमळाच्या देंठाच्या बांगड्या ४ खाण्याच्या नादीं ५ आलिंगनामुळें ६ पर्वताच्या गुहेंत ७ नांवा ८ नदींत उन्मळून पडलेले वृक्ष.

वाल्मीकि रामायण सटीक (संस्कृत) हा ग्रंथ पुस्तक रूपानें दोन भागांत छापून तयार आहे. प्रत्येक भाग उत्तम रंगीत कापडानें बांधिला असून वर सोनेरी नांवें वगैरे सुंदर रीतीनें छापिले आहेत. किंमत रु. ८ ट. ह. ०१४.

**कथासरित्सागरः**—सोमदेवकृत (संस्कृत) हा संपूर्ण ग्रंथ पुस्तक रूपानें छापिला असून उत्तम रंगीत कापडानें बांधिला आहे. किंमत ६ रु. ट. ह. ०८.

**स्त्रीगीतः**—जुन्या व नव्या दोन्ही पक्षांच्या मंडळींतील स्त्रियांस गावयास योग्य अशी गाणीं ह्या पुस्तकांत नवीन रचून घातलीं आहेत भाषा स्त्रियांस समजण्या जोगी आहे. व आंत सुंदर चित्रें आणि उखाणे आहेत. किंमत ०३ ट. ह. ००६.

**कादंबरी कथासार**—किंमत ०२ ट. ह. ००६.

**वासवदत्ता कथासार**—किंमत ०१ ट. ह. ००६.

**मुद्राराक्षस कथासार**—किंमत ०२ ट. ह. ००६

हीं सर्व पुस्तकें खालील ठिकाणीं मिळतील.

जावजी दादाजी.

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक—मुंबई.

## मुलें सशक्त करा !

### बाल संजीवनामृत.

फक्त मुलांकरितांच. ओक, आंव, अतिसार, खरूज, दमा, खोकला, फेंपरें, माती खाण्याची संवई, दुधापासून आलेली पांडुरकी, आंगावरील फोड, आईपासून होणारे व्याधी, जंत, हगा, हे सर्व रोग नाहिंसे होऊन मुलें सशक्त होतात. जास्त माहिती बाटलीबरोबर. बा. किं. ०१२ वं. क. ०४ बंर्मा नाटपेठ.

## केंस वाढण्यास रामबाण सुगंधिक तेल.

केंस—वाढतात. पुन्हां येतात, काळे तुळतुळीत रहातात. नाश होत नाहीं. नेहमीं सुवास रहातो. टक्कल भरतें. स्त्रीयांच्या के-

ज्यावर टक्कल पडतें, तें या तेलानें भरून येईल. शोकीन लोकांस आनंद-देणारें आहे. बा. किं. ८१२ वं. क. ८४. वंगी नाटपेड.

# शरम ठेऊन—रोग वाढवूं नका !

## परम्यावर गोळ्या.

पू, रक्त्या, परमा, तिडीक, कंडू त्वरित नाहिंसा होतो. कितीही जुना अगर नवा असला तरी हटकून गुण. आळस केल्यानें परिणामीं हा रोग नुकसान करितो. डबींत गोळया २० किं. ८१०. वं. क. ८२ वंगी नाटपेड. जास्त माहिती—औषधा सोबत.

गजकर्णाला वस्ताद दवा किं. ८४

गतद्वेशीय तापावर पुड्या ३ किं. ८७.

दांतवण—दांत मजबूत करा. किं. ८९.

हीं तीन्हीं औषधें अमोल्यगुणकारक आहेत. जास्त माहिती—विचारा—किंवा औषधा बरोबर.

म्यानेजर.

न्यू इंग्लिश मेडिकल यूनियन्. कॉव्हेल स्ट्रीट—रामवाडी—मुंबई.

# जाहिरात.

सर्व लोकांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं, जळगांव येथें आमचा पूर्वीचा शिळा प्रेस असून हल्लीं आम्ही टाईपाचा प्रेस आणविला आहे. यावर कोणतेही प्रकारचे फार्म वगैरे फारच सवक आणि मनमाफक दरानें छापून देण्याचें करूं. तसेंच शिळा प्रेसवरही काम मुखत्यारी माफक किंमत घेऊन छापून देऊं. चित्रांचें अगर मोठ्या अक्षरांच्या जाहिराती यांचें काम आमच्याकडे शिळा प्रेसावर फारच उत्कृष्ट तयार. शिवाय वर्तमानपत्रांत नोटिसा आणि जाहिराती स्वस्त दरांत छापल्या जातात.

विनायक रामचंद्र पुराणिक—म्यानेजर.

“ बालजी प्रिंटिंग प्रेस ” जळगांव

# काव्यरत्नावली.

( मासिक पुस्तक. )

पुस्तक २ रें. ] मे सन १८८२ [ अंक २४ वा

तएव पदविन्यासास्तएवार्थविभूतयः
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात्



## जळगांव-खानदेश येथें छापून प्रसिद्ध होतें.

---

किंमत चार आणे.

वर्षाची आगाऊ वर्गणी टपाल हशिलासुद्धां दीड रुपया.

चापजी प्रिंटिंग, प्रेस जळगांव.

## अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | काव्यरत्नावलीस सरस्वती मातेची भेट. .... .... | १ |
| २ | सालअखेर .... .... .... .... .... | १ |
| ३ | सापत्नमत्सरभाव. .... .... .... .... | १७ |
| ४ | मुखपृष्टें ( चार ) .... .... .... .... | |
| ५ | अनुक्रमणिका. .... .... .... .... | |


चुकीची दुरस्ती—सालअखेर पृष्ट दुसरें यांत कित्येक ठिकाणीं मुद्रणस्वातंत्र्य असा शब्द आला आहे; त्या ठिकाणीं मुद्रणानुकूल्य असें वाचावें.

# सूचना.

वर्गणीदारांकडे आज रोजीं या अंका सोबत २१, २२ आणि २३ असे अंक पाठविले आहेत ह्मणजे दुसरे सालचे अंक वर्गणीदारांस सर्व पोंचले आहेत पांच सहा दिवसांत तिसऱ्या वर्षांचे मागसलेले अंक २६ आणि २७ मिळून पुढें लौकरच चालू महिन्यापर्यंत अंक वाचकांस मिळतील.


# जाहीराती.

श्रीधरकृत पांडवप्रताप किंमत ४ ट. इ. ८१४

,, रामविजय ,, ३ ,, ,, ,,

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, थोडें बहुत शिकलेल्या लोकांस व स्त्रियांसही वरील दोन्ही ग्रंथ वाचण्याची उत्कंठा होत

# अंक २४.

## काव्यरत्नावलीस सरस्वती मातेची भेट.

### आर्या

मातेची कन्येवर असते सांगावया नको ममता
मत्कांत मात्र किंचित् परि न तिची या जगीं दिसे समता १
मातृप्रेमा धांवे स्वापत्तिं, कळावया समाचार
मन परि आपत्याचें न तसें मातेकडेस साचार २
बहु दिन झाले नाहीं मजला रत्नावली तुझें कळलें
कुशल, तुझ्या भेटीस्तव म्हणून मच्चित्त कीं ब्रये वळलें ३
मातापितरें माझ्या कविवर्गाच्या करीं दिलें मजला
माहेरच्या सुखाचा लाभ मला त्या क्षणींच अंतरला ४
भर्त्याचा मजवरती होता प्रेमा तया नसे सीमा
कामीं निमग्न यास्तव गेलें सोडून मी न तद्धामा ५
सुख सासरीं असो परि अवलेला प्रिय कसें न माहेर
तरि तेंहि ती विसरते गोड तिला लागतां स्वसंसार ६
माहेरीं जन्म तिचा, स्वकुल तिचें तेंच पर तिला गमतें
निजकुल सासर मानुनि संसारीं ती सदा सुखीं रमते ७
ऐशी स्थिति अनुभवितां काळ किती लोटला न तो गणवे
जन्मुनि कृतार्थ झालें धन्य गमे मज पुरें न तें वदवे ८
पतिनें मज, मीं पतिला असतां अत्यंत निकडिचें काम
न त्यजिलें पळ एकहि होतें उभयांत यापरि प्रेम ९

भर्ताच देव मजला भर्त्यास एक देवता मीच
स्वर्ग प्रेमें ऐशा आम्हालां वाटला नको साच १०
तेजस्विता न ढळते सूर्यापासून ती तशी पतिला
नाहीं विसंबिलें गे वास्तव मी पात्र धन्य वादाला ११
माहेरचें विसरलें सगळें कुळ गोत काय सांगावें
कोणा एकाचें ही नुसतें मज नांव कीं नसे ठावें १२
मग कोठें कोण असे, नसणें ठाऊक काय हें नवल
एक परी निष्ठुरता वाटे मजला अशी जगीं विरळ १३
वागविलें अत्यल्पहि मज्जननीचें मनीं न वात्सल्य
माझ्या हृदयीं होउन बसलें सलतें सदैव तें शल्य १४
माझ्या निष्ठुरतेचा होतो अनुताप फार मजला गे
स्मरतां प्रमादधारा वाहू नयनांतुनी सदा लागे १५
आई निरोप देईं, मद्भगिनीबांधवास भेटाया
विविधज्ञान कथोनी, करितो विस्तार मजवरी माया १६
झाले बहूत दिन गे ! त्या केरळकोकिलास पाहूं दे
उल्लंघुनी निधीला दावि चमत्कृति गृहीं मला मोदें १७
सन्मान्य मनोरंजन सुगुणी ती चंद्रिका स्वसा ज्याची
क्रीडासुखार्थ येती स्तौत्य तरी मी करूं किती वाची १८
नाट्यकथार्णव मोही रसिकजनांतें स्वकीय लीलेनें
परि दुर्दैवें त्यातें; मोहीलें जवनिकेंत निद्रेनें १९
काव्येतिहाससंग्रह, लोकीं धन्यत्व पावला तोच
हा हा परि रसिकांनीं मृत्यु–मुखीं लोटिलें तया साच २०
बा बालबोध बाळा ! सौंदर्य तुझें गुणास तें साजे
चित्रचरित्र विलोकुनि चित्त व्यामोह पावलें माझें २१
ये कुशला शिल्पकला, कुसुमांजलि, पथ्य, नाट्यमाला हीं
उपकार किती वानूं भिषक्, महाराष्ट्रकोकिलांचेही २२

---

# सालअखेर.

मना या साक्षीसी झाली सांगो मात
सकळ वृत्तांत आपला तो ॥ १ ॥

तुकाराम.

प्रस्तुत अंक हा दुसऱ्या वर्षाचा शेवटचा आहे, तेव्हा अर्थात् आज आह्मी ईश्वराच्या कृपेनें वाचकांच्या ऋणांतून मुक्त होत आहों. याबद्दल त्यांचे उपकार स्मरून साल अखेर संबंधानें " सकळ वृत्तांत ,, वाचकांस कळवितों.

गेल्या वर्षाच्या अनुभवावरून पहातां आमच्या कित्येक बंधूंचेंच भाकीत खरें झालें. अर्थात् तें भाकीत ह्मटलें ह्मणजे रत्नावलीची शोचनीय स्थिति हें होय. ह्या स्थितीचें दिग्दर्शन जरी कदाचित् चर्वित चर्वण केल्या सारखें होईल, तरी या संबंधाचा उल्लेख, प्रस्तुत लेखाचा मूळ उद्देश असल्यामुळें तो वाचकांस अग्राह्य वाटणार नाहीं; अशी आशा आहे.

या लेखांत ज्या गोष्टींचीं विधानें येण्यासारखीं आहेत, त्यांत रत्नावलीचा अनियमितपणा हें एक प्राधान्य होय. आजपर्यंत वाचकांच्या हातांत ज्या महिन्याचा अंक त्या महिन्यांत कधींच मिळाला नाहीं. आमच्याकडे जीं मासिक पुस्तकें निघतात, त्यांत नियमानें निघणारीं अशीं फारच थोडीं. ज्या दिवशीं इकडे मुद्रणकलेची उच्चावस्था होईल, त्या वेळेस नियमितपणाचें महत्व खास वाढेल. मुद्रणकलेची उन्नति, ग्रंथ प्रसार, आणि नियमितपणा हीं सर्व राष्ट्राच्या सुशिक्षतेवर अवलंबून आहेत. आमच्याकडे ज्या गोष्टींची हाकाटी आहे, त्यांत पुस्तकांचा अनियमितपणा हें एक होय. अनियमितपणाचें खरें कारण मुद्रणकलेची संकुचित स्थिति हें आहे. त्यांतून ज्या

मासिक पुस्तकास मुद्रणस्वातंत्र्याचा स्पर्श नाहीं, त्याची दैना तर कांहीं पुसूं नये. प्रेस एकीकडे आणि लेखक किंवा प्रकाशक दुसऱ्या ठिकाणीं अशी स्थिति असली ह्मणजे मग पुस्तकाचें दैन्य काय विचारावें. असलीं नियमितपणाचीं कामें होण्यास स्वतंत्रच प्रेस पाहिजे, किंवा मोठ्या छापखान्याचें तरी सान्निध्य पाहिजे. ही गोष्ट बालबोध पुस्तकावरून चांगली लक्षांत येईल. प्रस्तुत **बालबोध** नियमानें भेटतो, याबद्दल लोक **जावजींचें** मोठें कौतुक करितात. आणि त्यांचें तें करणें यथार्थ आहे. परंतु त्यांच्या त्या अवाढव्य कारखान्याशीं बालबोधाचें अत्यल्पत्व तोलून पाहिलें तर हास्यास्पद होईल अशीं मासिक पुस्तकें **जावजी** शंभर सुद्धां काढूं शकतील, परंतु केवळ नियमितपणा आणि ठाकठिकी यांनींच **बालबोध** इतकें लोकप्रिय झालें आहे. फार कशाला **रत्नावलीचा** गेल्या फेब्रुवारीचा अंक त्याच महिन्यांत ज्या प्रेसांत पाठविला होता, तो आज वाचकांना मिळत आहे! यावरून पारतंत्र्य स्थिति किती शोचनीय आहे ती पहा. ह्या पारतंत्र्य स्थितीचें **विविधज्ञानविस्तार** हें एक चांगलें उदाहरण आहे. तरी तें आतां बरीच मजल मारीत आहे. शेवटीं सांगावयाचें ह्मणून इतकेंच, कीं यापुढें अशा प्रकारचे उद्योग करणारांनीं मुद्रणस्वातंत्र्य किंवा मोठ्या छापखान्याचें सान्निध्य असल्याशिवाय आतत्यई करूं नये. हें आह्मी स्वानुभवावरून सांगतों. आणि ह्मणूनच **रत्नावलीचें** नियंतृत्व कायम राहण्यास मुद्रणस्वातंत्र्याचा अंगिकार करावा लागला. मागमलेले अंक छापण्याचें काम चाललें आहे. व ह्मा रकांम लौकरच मागमलेले अंक मिळून प्रत्येक पहिल्या तारखेस अंक त्यांच्या हातीं पडेल असें करितों. ईश्वर कृपेनें निश्चय सिद्धीस जावो.

रत्नावलीच्या अंतर्स्थितीच्या संबंधानें पाहतां २७ कवींचे लहान मोठे मिळून ६० विषय प्रसिद्ध झाले आहेत. यांत अर्धा भाग स्व-

तंत्र कवितेचा आहे. भाषांतर हीं तितकेंच ह्मटलें तरी चालेल. या भाषांतरांत संस्कृत कवितेचीं भाषांतरें विशेष असून इंग्लिश कवितेचींही आहेत. शिवाय किरकोळ प्रकरणें आहेत. हीं लहान प्रकरणें वजा जातां स्वतंत्र अशी कविता फारच थोडी प्रसिद्ध झाली आहे. स्वतंत्र कवितेचीं जीं लहान मोठीं प्रकरणें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत **स्वग्रामप्रीति, दुष्काळ–वर्णन, अग्निशलाका, शंकरसागरसाम्य, विपद्ग्रस्तश्रीमानाचेउद्गार, कूट, ईशदर्शनकाव्य, जुनप्रेमांकुर. निष्काळजीबालक, आशाभंग, एडिटरासपत्र** आणि **कन्या** हीं प्रकरणें आणि अशींच इतर प्रकरणें यांची संख्या जर पाहिली तर मागील वर्षापेक्षां या वर्षांत स्वतंत्र कवितेचें पाऊल जरा पुढें आहे असें दिसून येईल.

**स्वग्रामप्रीतींत** नानाविध चमत्कार आणि स्वग्रामप्रेम यांचे चित्र सर्वोत्कृष्ट रेखलें आहे. विद्यापीठें, कलाकौशल्य धनवैपुल्य आणि अनेक चमत्कृति, अशा अनेक गुणसंपन्न राजधानींत ज्यांचा व्यवसाय आणि कालक्रमण हीं चालतात; त्यांची जन्मभूमीच्या दर्शनाविषयीं केवढी जबर उत्कंठा असते हें पाहिलें ह्मणजे **स्वग्रामप्रीतींतील** स्थलें कसा व्यामोह उत्पन्न करितात हें दिसतें. **दुष्काळवर्णनांतील** हृदय भेद करणारे प्रसंग, कुटुंबांतील ऐक्य, कामांधाचें वर्तन त्या वेळची उद्वेगस्थिति हीं वाचलीं ह्मणजे कसाही पाषाण हृदयी असला तरी त्याचें अंतःकरण द्रवीभूत झाल्याशिवाय राहणार नाहीं. **अग्निशलाका** आणि **शंकरसागरसाम्य** ह्या दोन प्रकरणांवरून कवीला विषय कसलाही असला तरी चालेल हें दिसून येतें. **ईशदर्शन** ही कविता काव्यांत शिरोभागीं शोभणारी आहे. कसलाही अनीश्वरवादी असला तरी परमेश्वराच्या आस्तिक्याविषयीं त्याचें अंतःकरण प्रस्तुत **ईशदर्शनावरून** जागें झाल्यावांचून खास राहावयाचें नाहीं. यांतील प्रत्येक पद्य साक्षात् ईश्वराचें दर्शन दाखवितें. ह्या विषयाचें

साहित्य इतकें अपरंपार आहे कीं कवीस हा विषय पाहिजे तितका वाढवितां येईल. कविवर्गाचें रत्नावलीवर असेंच प्रेम राहील तर जुनेप्रेमांकुर पुष्कळ उत्पन्न होतील. निष्काळजी बालक, आशाभंग, विपत्ति, उद्गार, तीळगूळ आणि कूट हीं प्रकरणें ही वाचनीय आहेत. आपत्याविषयीं पित्याच्या मनांत प्रेमा कसा उत्पन्न होतो याचें चित्र कन्या कवितेंत चांगलें दाखविलें गेलें आहे. कन्येविषयीं पित्याची भावी आशा, तिचा संसारोत्कर्ष वगैरे गोष्टी वाचल्या ह्मणजे " प्रेमाच्या उर्मि ,, आल्यावांचून राहत नाहींत. एडिटरास पत्र ही ही कविता किती साधी आणि हृदयंगम उतरली आहे. आजपर्यंत रत्नावलींत जितके विषय प्रसिद्ध झाले, त्यांत ही कविता एक मासला होय.

सापत्नमत्सरभाव ही साधारण कविता आहे. रसिकांस ही कदाचित् आवडणार नाहीं. परंतु रत्नावलीस अझून रसिकांचा जसा आश्रय मिळावा तसा नसल्यानें मधून मधून कन्याविक्रयनिंदा मत्सरभाव किंवा दुसऱ्या अशा साधारण प्रकरणांनीं मालागुंफन करावें लागतें. रत्नावलीवर अभिप्राय देतांना कन्याविक्रयनिंदेच्या संबंधानें एका एडिटरानें असें ह्मटलें आहे-कीं, " शंभर व्याख्यानापेक्षां अशा वाचनानें चांगला उपयोग होईल. ,, असो या शिवाय राहिलेल्या स्वतंत्र कविता सतार, कापूस, संध्याकाळ, स्वदेशदैन्य, पांथागमन, कविजनांस वंदन, धन्यनर हीं लहान मोठीं प्रकरणें रुचिवैचित्र्यानें वाचकांस आवडणारीं आहेत.

ऐतिहासिक विषयाच्या संबंधाचें पहातां भट्टवंश, कृष्णाकुमारी, तुकोजीराव होळकर आणि जुबेली अशीं चार प्रकरणें आलीं आहेत. यापैकीं भट्टवंश काव्य हें सर्वांत मोठें असून तें पुष्कळ दिवस चाललेलें. आजपर्यंत या काव्याचे तीन सर्ग प्रसिद्ध झाले आहेत. व पुढें ही ते क्रमानें प्रसिद्ध होतील या काव्यांतील गुणाविक्याविषयीं आणि क-

विषयीं निराळें लिहिण्याची गरज नाहीं. या कवीचीं **गंगावर्णन** आणि **गणेशपुराण** हींच काय तीं दोन मोठीं काव्यें प्रसिद्ध झालीं आहेत. कविराजांनीं पौराणिक काव्यावरील व्यासंग सोडून अलीकडील लोकांस आवडेल अशा रीतीचें वर्णन करावें. अशी पुष्कळ दिवसांपासून वाचकांची उत्कंठा होती. ती उत्कंठा प्रस्तुत **भट्टवंश** काव्यानें बरीच दूर झाली, यांत कांहीं संशय नाहीं विषय योजना आणि रचना विशेष हीं पाहिलीं ह्मणजे **भट्टवंशाचे** रचनाकर्तृत्व **श्रीमंताच्या** हातीं गेलें ही गोष्ट मोठी समाधानकारक समजली पाहिजे. बाकी राहिलेलीं तीन काव्यें हीं ही आपआपल्या गुणांची चांगली साक्ष देत आहेत. **कृष्णाकुमारींतील** विप्रदैन्य कृष्णेचें लावण्य हीं दोन स्थलें वाचकांचें अंतःकरण गार करून सोडतात. त्याचप्रमाणें **होळकराविषयीं** कवीची गंभीर वाणी आणि **जुंबेलींतील राज्ञीचें** राज्य लोकांची शांतस्थिति आणि समारंभवर्णन हीं ही वाचनीय आहेत.

भाषांतराच्या संबंधानें पहातां इंग्लीश कवितेच्या भाषांतरापेक्षां संस्कृत काव्यांची भाषांतरें पुष्कळ आहेत हें वर सांगितलेंच आहे. **किरात, श्लोकशतक, आर्याशतक, इंद्रवज्रा, ऋतुसंहार** आणि **पद्यमंजुषा** अशीं मोठीं प्रकरणें प्रसिद्ध झालीं आहेत. यापैकीं **किरात, श्लोकशतक** आणि **ऋतुसंहार** हीं तिन्ही प्रकरणें पुरीं व्हावयाचीं आहेत. हीं प्रकरणें कवीच्या हातून लौकर पुरीं होतील अशी आशा आहे. **इंद्रवज्राशतक** हें साधें आणि सरळ उतरलें आहे. त्याचप्रमाणें ह्या वर्षापासून **उपेंद्रवज्राशतक** हें त्याच कवीनें शुरु केलें आहे. **पद्यमंजुषा** ही ही कविता चांगली सरस उतरली आहे. यांशिवाय **स्फुटपद्यें, सुभाषित, देव्यपराधस्तोत्र** वगैरे प्रकरणें बरीच प्रसिद्ध झालीं आहेत. तेवीसाव्या अंकापासून **सुरतरंगिणी** या नांवाचें एक स्वतंत्र काव्य शुरु झालें आहे यांतील चमत्कार आणि

वर्णनात्मक स्थलें पहातां कवीचा प्रयत्न फार चांगला आहे. या काव्याचे बरेच प्रसंग काव्य लोलुपांस पाहावयास मिळतील.

**जीवितस्तोत्र**, **मुक्तांजली**, **अर्थसादृश्य दीनपत्नि** आणि **मातेचें प्रेम** हीं इंग्लिश कवितेचीं भाषांतरें होत. यांत **अर्थसादृश्य** हें नवीनच एक सदर या वर्षापासून आलें आहे. अशा प्रकारचा उद्योग कविमित्रांकडून झाल्यास फार उत्तम होईल. **जीवितस्तोत्रांतील** विचार, **मुक्तांजलींतील** निरनिराळे वेंचे, **मातेचें** अगाध प्रेम दीनपत्नीची सौम्य वृत्ति आणि पतीचें नैष्ठुर्य वगैरे इंग्लिश कवींच्या मनोरम ह्रद्गतांचा लाभ मराठी वाचकांस मिळत आहे, यास्तव कविवर्गाचा यत्न स्तुत्य आहे. असो. कवितेच्या संबंधानें थोडक्यांत जें काय कळविण्यासारखें होतें तें कळविलें आहे.

हा समाप्ती लेख संपविण्यापूर्वीं आणखी एक गोष्ट कळवावयाची आहे ती कळवून हा लांबत चाललेला लेख आटोपतों

आधुनिक कविवर्गांपैकीं **धर्मराज नारायण गांधी** व **घंटय्यानायडू** याणीं हा लोक सोडून परलोकाचा मार्ग धरिला ! हें कळविण्यास आह्मास फार वाईट वाटतें. हे दोन्हीही कवि चांगले होते, व ते गत झाल्यानें **काव्यरत्नावलींची** बरीच हानी झाली आहे पण

**जातस्तच ध्रुवो मृत्युः ।**

—या वचनावर निर्वाह करून स्वस्थ बसणें भाग आहे ! या दोघा कवींच्या कविते विषयीं निराळें लिहिण्याचें कारण नाहीं. दोघांची कविता वाचकांच्या पुढे आहे. **गांधी** यांच्या **स्वग्रामप्रीतीचा** उत्तरार्ध त्यांच्या हातून तयार झाला नाहीं यापरतें दुसरें दुर्दैव तें कोणतें. **गांधी** आणि **नायडू** यांनीं केलेला कविता संग्रह त्यांचे मित्र किंवा आप्त वर्ग **रत्नावलीकरितां** मिळवून देण्याचें यश घेतील अशी आशा आहे.

पुत्र असो, मित्र असो, जाया असतांहि, त्यांत दोष नसे,
दुष्टांतें नृपनीति शासन द्यावें ह्मणोनि सांगतसे १११२
जैसें यांणीं छळिलें मत्प्रिय भार्येस या मुलासहित,
शासन तेंचि अशांला द्यावें मज हेंचि वाटतें उचित ११३
ऐसें बोलुनि, केलें दुष्टांतें १छिन्नहस्त घटकेंत,
प्रिय कांतेला घेउनि गेला सदनांत तो सुतासहित ११४
पहिली असतां, दुसरी भार्या केल्यास, काय परिणाम
होतो, हें वदलों मीं; ठेवा चित्तीं, स्मरोनि हरिनाम ११५
प्राप्त स्थितींत बरवा संतोष, नसे कधीं फजित लोकीं;
परमेशाज्ञोल्लंघन न २शिवद, हें मानसांत अवलोकीं ११६
मोठे मोठे ज्ञाते विद्यापटु अनुभवें दिसति वृद्ध,
पाहति, जाणति, लोकीं; संसारीं मोह त्यां करी बद्ध. ११७
ज्ञान असे पंगु सदा ३अनुभूतीविण समस्त या लोकीं,
होते ज्ञानपरीक्षा संकटसमयांत सत्य अवलोकीं ११८
नाहीं अपत्यसुख, तरि पुण्य करावें ४अपारधनदानें
धर्मपरायण होतां, ५मुक्तिचतुष्टय मिळे प्रभुपदानें ११९
आत्मार्पण, जीवार्पण, हरिपदकमलीं तसा सुलीनपणा;
सत्कीर्ति पुण्यवंता शतपुत्रांहुनि असे अधिक जाणा। १२०

---

१ हात तोडलेले २ अहितकारक ३ अनुभवावाचून ४ पुष्कळ द्रव्याच्या दानानें ५ चार प्रकारच्या मुक्ति–सलोकता, समीपता, स्वरूपता व सायुज्यता.

समाप्त.

# सापत्नमत्सरभाव.

कालपनिक काव्य.

काव्यरत्नावली.

मासिक पुस्तकांत

छापून प्रसिद्ध झालेलें

आणि

परीक्षक मंडळीनें

पसंतकेलेलें

गणेश अनंत दारवेकर

---:※:---

१८८९

'बावजी प्रिंटिंग' प्रेस जळगांव.

# दुष्काळ-वर्णन.

आर्याबद्ध

काव्यरत्नावली.

मासिक पुस्तकांत

छापून प्रसिद्ध झालेलें

आणि

परीक्षक मंडळीनें तपासून

शुद्ध केलेलें

मोरो गणेश लोंढे.

१८८८

'खानदेशमित्र' प्रेस भुसावळ.

# अनुक्रमणिका


| कवि आणि विषय. | अंक | पृष्ठ |
|---|---|---|
| **गणेश अनंत दारवेकर** | | |
| सतार | १६ | १६ |
| **विष्णुपंत सरवटे** | | |
| रामनाम | १७ | ९ |
| **धर्मराज नारायण गांधी** | | |
| स्वग्रामप्रीति | १८ | १ |
| **मोरो गणेश लोंढे** | | |
| निर्द्रव्य पुरुष | १३ | २१ |
| दुष्काळ-वर्णन | १४ | १ |
| इंद्रवज्राशतक | १५ | १० |
| ,, ,, | १६ | १० |
| ,, ,, | १७ | ५ |
| ,, ,, | १९ | १ |
| **केशवराव पेठे** | | |
| मानवकर प्रशंसा | १९ | ५ |
| अग्नीशलाका | २० | १ |
| शंकरसागरसाम्य | २२ | ८ |
| **शंकरराव पदे** | | |
| देव्यपराधस्तोत्र | १६ | १४ |
| **केशव सदाशिव रिसबूड** | | |
| सुभाषित | १३ | २३ |
| उजवा आणि डावा हात | १६ | ६ |
| कापूस | २१ | १४ |

## अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| **वासुदेव वामन शास्त्री खरे.** | | |
| जुबेली. | १३ | १ |
| **बळवंतराव कमळाकर** | | |
| विप्रलंभ शृंगार | १३ | २० |
| स्त्री अवयव | १३ | २१ |
| स्फूट पद्यें | १९ | २० |
| तमाखू | १९ | १० |
| विपद्ग्रस्त श्रीमानाचे उद्गार | १९ | १ |
| विपत्ति | २० | १० |
| शर्करायुक्त तीळ | २० | २३ |
| कूट | २१ | १ |
| **गोविंद गोपाळ टिपणीस** | | |
| शरद्वर्णन | १३ | ९ |
| मित्रत्व | १९ | ६ |
| **गोपाळ गणेश रानडे** | | |
| संध्याकाळ | १३ | १८ |
| **एकनाथ गणेश भांडारे** | | |
| स्त्रीदैन्य | १३ | १ |
| स्त्रीक्रोधशांतवन | १९ | १७ |
| वासवदत्ता | १६ | १ |
| विरहिणी | १७ | ८ |
| खऱ्याप्रेमाची खूण | २१ | ९ |
| स्त्रीरत्न | २१ | १० |
| **विष्णु गणेश नेने** | | |
| ईशदर्शन काव्य | १३ | १० |
| जीवितस्तोत्र | १९ | १ |

| | | |
|---|---|---|
| ईशदर्शन काव्य | १७ | १ |
| ” ” | २१ | ५ |
| **सदाशिव मोरेश्वर भिडे** | | |
| पांथागमन | १९ | ४ |
| स्वदेशदैन्य | २० | ७ |
| **वामन दाजी ओक** | | |
| सुभाषित | २० | २४ |
| कन्या | २२ | १४ |
| **विठ्ठल भगवंत लेंभे** | | |
| वर्षाऋतूंतील रात्रीचा समय | १३ | २१ |
| मातेचें प्रेम | २२ | १७ |
| दीन पत्नी | २३ | १० |
| **नारायण अनंत चिटणीस** | | |
| कविजनांस वंदन | २२ | १५ |
| **आण्णा देशपांडे** | | |
| ईशप्रार्थना | १९ | २३ |
| बोध | १९ | २४ |
| ” | २० | २२ |
| **गणेश बळवंत मोडक** | | |
| तुकोजीराव होळकर | २१ | १ |
| **गोविंद वासुदेव कानिटकर** | | |
| जुना प्रेमांकुर | १ | १८ |
| **लक्ष्मण गणेश लेले** | | |
| पद्यमंजूषा | २० | १९ |
| | २२ | २० |
| | २३ | १५ |

# मुलें सशक्त करा !

## बाल संजीवनामृत.

फक्त मुलांकरितांच. ओक, आंव, अतिसार, खरूज, दमा, खोकला, फेंपरें, माती खाण्याची संवई, दुधापासून आलेली पांडुरकी, आंगावरील फोड, आई पासून होणारे व्याधी, जंत, डबा हे सर्व रोग नाहींसे होऊन मुलें सशक्त होतात. जास्त माहिती बाटलीबरोबर बा. किं. ०॥ बं. क. ०४ बंगी नाटपेट.

## कॅस वाढण्यास रामबाण सुगंधिक तेल.

कॅस–वाढतात, पुन्हां येतात, काळे तुळतुळीत राहतात. त्राम होत नाहीं. नेहमीं सुवास राहतो. टक्कल भरतें. स्त्रियांच्या डोक्यावर टक्कल पडतें, तें या तेलानें भरून येईल. शोकीन लोकांस आनंद देणारें आहे. बा. किं. ०॥ बं. क. ०४ बंगी नाटपेट.

## शरम ठेऊन–रोग वाढवूं नका.

## परम्यावर गोळ्या.

प्र. रक्त्या, परमा, तिडिक कंडू त्वरित नाहींसा होतो. किती जुना अगर नवा असला तरी हटकून गुण. आळस केल्यानें परिणामीं हा रोग नुकसान करितो. डबींत गोळ्या २० किं. ०१० बं. क. ०२ बंगी नाटपेट. जास्त माहिती औषधा सोबत.

गजकर्णाचा वस्ताद दवा किं. ०३

एकेदिवशीय तापावर पुड्या ३ किं. ०७

दांतवज्र–दांत मजबूत करा किं. ०९

हीं तीन्हीं औषधें अमोल्यगुणकारक आहेत. जास्त माहिती–विचार–किंवा औषधा बरोबर.

म्यानेजर

न्यू इंग्लिश मेडिकल युनियन कॉव्हेल स्ट्रीट–रामवाडी मुंबई.